लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ च्या स्थानिक संस्था अहवालामधील नगरविकास आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१)

विसावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास
दिनांक एप्रिल, २०१७ रोजी सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
एप्रिल, २०१७

लोकलेखा समिती

(२०१५-२०१६)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ च्या स्थानिक संस्था अहवालामधील

नगरविकास आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१)

विसावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१५-२०१६

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१३) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१४) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१५) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१६) श्री. कालिदास कोळंबकर, वि.स.स.

(१७) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१८) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

* (२०) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(२१) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

** (२२) श्री. सुनिल तटकरे, वि.प.स.

(२३) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

*** (२४) श्री. माणिकराव ठाकरे, वि.प.स.

(२४अ) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

(२५) श्री. संजय दत्त, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक १ मे, २०१५ रोजी विधानसभा व दिनांक २१ मे, २०१५ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव.

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि. अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

---

* श्री. भास्कर जाधव, वि.स.स. दिनांक २२ मार्च, २०१७ ते ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत निलंबित

** श्री. सुनिल तटकरे, वि.प.स. यांनी दिनांक २८ सप्टेंबर, २०१६ रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिलेला असल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

*** श्री. माणिकराव ठाकरे , वि.प.स. यांची दिनांक ५ ऑगस्ट, २०१६ रोजी उप सभापती, विधानपरिषद या पदावर निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ३१ ऑगस्ट, २०१६ रोजी समिती सदस्य म्हूणन नामनियुक्ती केली.

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-२०१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालामधील नगरविकास आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ४.१) यावर विचार करून लोकलेखा समितीचा विसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ३० ऑगस्ट, २०१६, ९ नोव्हेंबर, २०१६, १८ जानेवारी, २०१७ तसेच २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी प्रधान सचिव, नगरविकास आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचीदेखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक ३१ मार्च २०१७ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशींवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन :
मुंबई/नागपूर,
दिनांक ३१ मार्च २०१७.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	(पाच)
	नगरविकास आणि पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग	...
	(परिच्छेद क्र. ४.१)	९५

नगरविकास विभाग

१. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक ४.१ . "निवडक नगरपरिषदांचे मूलभूत नागरी सेवांचा पुरवठा" या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिले आहेत :—

निवडक नगरपरिषदांमध्ये मुलभूत नागरी सेवांचा पुरवठा

१.१ कार्यकारी सारांश :

MCs सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी नियोजन करतात तसेच नागरिकांना अत्यावश्यक नागरी सुविधा जसे पिण्याचे पाणी, सांडपाण्याची विल्हेवाट आणि घन कचाऱ्याचे व्यवस्थापन, पथदिवे, अग्निशमन सेवा, जन्म-मृत्युची नोंद, इमारतींचे विनियमन, रस्त्यांची देखभाल, उद्याने आणि बगीचे इत्यादी पुरवितात.

३६ MCs द्वारे पुरविल्या जाणाऱ्या तीन मुलभूत नागरी सेवांबाबत म्हणजे, पाणीपुरवठा, घन कचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी व्यवस्थापन यांचे फेब्रुवारी आणि ऑगस्ट, २०१४ दरम्यान वर्षे २०११-१४ या कालावधीसाठी कार्यसिद्धी लेखापरीक्षा करण्यात आली. कार्यसिद्धी लेखापरीक्षेत असे आढळून आले की, ३६ पैकी १७ MCs मध्ये बंधनकारक असलेल्या ७० lpcd पाणी पाणीपुरवठ्याच्या तुलनेत, वितरण व्यवस्थेतील हानीमुळे, WTPs क्षमता कमी झाल्यामुळे आणि अनियमित वीज पुरवठ्यामुळे सरासरी पाणीपुरवठा २५ ते ६९ lpcd दरम्यान होता. २० MCs ने केंद्रीय योजना (UIDSSMT) आणि राज्य योजना (MSNA आणि MSJNA) अंतर्गत रु. ७०८ कोटी खर्चाचे २१ पाणीपुरवठा वाढीचे प्रकल्प वेळ आणि किंमत बाधित होते. २४ MCs द्वारे पाणीपुरवठा सेवां सुधारणांचे रु. ३३.५७ कोटींची हाती घेतलेली कामे मागे पडली होती.

एका MC व्यतिरिक्त, ३५ पैकी कुठल्याही MCs मध्ये, MCs MSW चे स्त्रोताच्या जागी किंवा लॅण्डफिल साईटसवर विलग्नीकरण करत नव्हत्या आणि प्रक्रिया न केलला घन कचरा तसाच लॅण्डफिल साईटसवर अ-पर्यावरण अनुकूल पद्धतीने साठविला जात होता किंवा खड्डयांमध्ये/जलाशयांमध्ये/रस्त्याच्या कडांना परस्पर फेकला जात होता. ३६ पैकी ११ MCs मध्ये एकूण रु. ६.२९ कोटी खर्चून बांधलेल्या/ अंशतः बांधलेल्या बायो-गॅस प्रकल्प आणि व्हर्मी/मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्पांचा दुरूस्ती आणि देखभालीच्या अडचणींमुळे, तयार होणाऱ्या मालाला (स्वयंपाकाच्या गॅस) मागणी नसल्यामुळे जास्तीत जास्त उपयोग होऊ शकला नव्हता. बहुतांश MCs कडे कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी आणि लॅण्डफिल एरियाजमध्ये विल्हेवाट लावण्यासाठी किंवा कत्तलखाने चालविण्यासाठी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाची कायदेशीर अधिकृतता नव्हती.

३६ MCs पैकी ३२ MCs मध्ये सांडपाणी संकलन आणि विल्हेवाटीची व्यवस्था अपूरी होती. सांडपाणी एकतर उघड्या गटारांना किंवा वादळी पाणी प्रवाहित करणाऱ्या नाल्यांना जोडले होते जे पुढे जवळपासच्या नदीत प्रवाहित होत होते. ३४ MCs मध्ये, २०८.५१ MLD सांडपाणी, STPs च्या अपर्याप्त क्षमतेमुळे किंवा STPs च्या अकार्यरततेमुळे प्रक्रिया केल्याशिवाय सोडले जात होते. १० MCs मध्ये मार्च, २००८ ते फेब्रुवारी, २०१४ दरम्यान मंजूर झालेल्या एकूण रु. ६१२.१७ कोटी किंमतीच्या दहा भांडवली प्रकल्पांपैकी फक्त दोन प्रकल्पांची सुरुवात झाली होती.

GOI च्या MOUD ने विहित केलेल्या सर्व्हिस लेव्हल बेंचमार्कसच्या तुलनेत पाणीपुरवठा, घन कचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी व्यवस्थापनातील विविध कार्यसिद्धी निदर्शके, ३६ MCs पैकी एकही MC साध्य करण्यास असमर्थ होती.

प्रस्तावना :

१.२ नागरी क्षेत्रांसाठी नगर परिषदा (MCs) निर्माण करण्यात आल्या आहेत. व तेथील लोकसंख्येच्या आधारावर त्या वर्गीकृत करण्यात आल्या आहेत. या MCs महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, १९६५ (MMC अधिनियम) द्वारे शासित केल्या जातात. सामाजिक व आर्थिक विकासासाठी नियोजन करणे तसेच पेयजलाचा पुरवठा, सांडपाण्याची विल्हेवाट आणि घनकचरा व्यवस्थापन करणे, पथदिवे, अग्निशमन सेवा पुरविणे, जन्म व मृत्यूची नोंदणी करणे, इमारतींचे विनियमन, रस्ते, उद्याने व बगिचे इत्यादींची देखभाल करणे यांसारख्या आवश्यक नागरी सेवा पुरविणे हे MCs वर बंधनकारक आहे. मार्च, २०१५ रोजी राज्यात २३८ MCs होत्या. MMC च्या अधिनियमाच्या अंतर्गत मालमत्ता कर, पाणी आकार, भाडेपट्टी आणि भाडे उत्पन्न आणि इतर किरकोळ शुल्क आकारण्याचे व संकलित करण्याचे जे अधिकार MCs ना देण्यात आले आहेत, त्यांचा समावेश MCs च्या महसूली जमांमध्ये होतो. महाराष्ट्र शासनाकडून भरपाई अनुदाने (रद्द केलेल्या जकात ऐवजी), यात्रेकरुंवरील कर आणि अनुदाने देखील मुक्त करतात. त्या व्यतिरिक्त, नागरी पायाभूत सुविधांची निर्मिती व वाढ यासाठी MCs ना केंद्र व राज्य शासनाकडून भांडवली सहाय्यक अनुदाने देखील प्राप्त होतात. MCs कडून महसुली जमा व भरपाई अनुदानांचा वापर मुलभूत नागरी सेवा तसेच आस्थापना खर्च भागविण्यासाठी होतो.

ज्ञापन :

१.३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात काहीही अभिप्राय नाहीत असे नमूद केले आहे.

संघटनात्मक रचना :

१.४ नगरविकास विभागाचे (UDD) प्रधान सचिव हे प्रशासकीय विभागाचे प्रमुख असतात. केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त करण्यासाठी नोडल एजन्सीच्या रुपात कार्य करणाऱ्या आणि हे अनुदान MCs ला वितरीत करणाऱ्या महापालिका प्रशासन संचालक यांचे त्यांना सहाय्य लाभते. MCs नी तयार केलेल्या कृती आराखड्याची छाननी करणे व नागरी सेवांचा विकास व त्या वृद्धिंगत करण्यासाठीही DMA जबाबदार असते. कामाचे प्रत्यक्ष कार्यान्वयन करण्यासाठी MCs/ नगर पंचायती (NPs) यांचे मुख्य अधिकारी जबाबदार असतात.

ज्ञापन :

१.५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात काहीही अभिप्राय नाहीत असे नमूद केले आहे.

लेखापरीक्षा उद्दीष्टे :

१.६ MCs कडून पुरविल्या जाणाऱ्या तीन मुलभूत नागरी सेवा जसे की, पाणीपुरवठा, घन कचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी व्यवस्थापन याची तपशीलवार छाननी करण्यासाठी लेखापरीक्षकांनी निवड केली. ज्याचा उद्देश MCs कडून या मुलभूत सेवा कार्यक्षमतेने व प्रभावीपणे, तसेच उपलब्ध साधनसामग्रीच्या जास्तीतजास्त वापरांसह होत असल्याचे प्रामुख्याने पडताळणे हा होता. या अहवालात ज्या ठिकाणी या मुलभूत सेवांविषयी विश्लेषण केले आहे. त्या संबंधित विभागांमध्ये त्यांची वैशिष्ट्यपूर्ण लेखापरीक्षा उद्दीष्टे दर्शविण्यात आली आहेत.

ज्ञापन :

१.७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात काहीही अभिप्राय नाहीत असे नमूद केले आहे.

लेखापरीक्षेचे निकष :

१.८ खालील दस्तऐवजांच्या आधारे योग्य निकष निश्चित करण्यात आले होते :

- महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, १९६५ ;
- घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २००० आणि जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९९८ आणि
- केंद्र शासन (GOI), महाराष्ट्र शासन (GOM) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) यांनी वेळोवेळी जारी केलेली मार्गदर्शक तत्वे.

ज्ञापन :

१.९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात काहीही अभिप्राय नाहीत असे नमूद केले आहे.

लेखापरीक्षेची व्याप्ती आणि कार्यपद्धती

१.१० नगरपरिषदांकडून पुरविण्यात येणाऱ्या तीन मुलभूत नागरी सेवा, जसे की, पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी व्यवस्थापन यांचे वर्ष २०११-१४ या कालावधीसाठी फेब्रुवारी आणि ऑगस्ट, २०१४ दरम्यान कार्यसिद्धी लेखापरीक्षण करण्यात आले. यासाठी DMA चे अभिलेखे तपासण्यात आले व स्तरीय नमुना पद्धतीने २३८ MCs पैकी ३६ MCs ची सखोल तपासणीसाठी निवड करण्यात आली. लेखापरीक्षा तपासणीत महाराष्ट्र शासनाच्या UDD च्या दस्तऐवजांच्या चाचणी तपासणीचाही समावेश होता. MCs कडून पुरविण्यात येणाऱ्या विविध नागरी सेवेच्या कार्यक्षमतेची पडताळणी करण्यासाठी लेखापरीक्षकांनी MCs च्या प्रतिनिधींबरोबर वेगवेगळ्या कार्यस्थळांवर संयुक्त स्थळ भेटी आयोजित केल्या होत्या.

जून, २०१४ मध्ये UDD च्या प्रधान सचिवांबरोबर लेखापरीक्षण पूर्व बैठक घेण्यात आली ज्यामध्ये लेखापरीक्षणाची उद्दीष्टे, निकष, व्याप्ती व कार्यपद्धती यावर चर्चा करण्यात आली. जानेवारी, २०१५ मध्ये UDD च्या सचिवांबरोबर अंतिम बैठक घेण्यात आली. परंतु, वारंवार स्मरणपत्रे पाठवूनही UDD च्या सचिवांनी स्वाक्षांकित केलेले अंतिम बैठकीचे कार्यवृत्त मार्च, २०१५ पर्यंत प्राप्त झाले नव्हते. कार्यसिद्धी लेखापरीक्षा अहवालाचे प्रारुप सप्टेंबर, २०१४ मध्ये शासनाकडे पाठविण्यात आले होते. मार्च, २०१५ पर्यंत त्यांचे उत्तर प्राप्त झाले नव्हते.

ज्ञापन :

१.११ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

- अंतिम बैठक (Exit Conference) दिनांक २९/०१/२०१५ रोजी संपन्न झाली.
- सदर बैठकीचे कार्यवृत्त शासनास दिनांक १३/०३/२०१५ रोजी प्राप्त झाले.

आवश्यक त्या फेरबदलासह कार्यवृत्ताची मूळ प्रत दिनांक ०७/०५/२०१५ च्या पत्राद्वारे महालेखापाल कार्यालयास पाठविण्यात आली.

लेखापरीक्षा निष्पत्ती

पाणीपुरवठा सेवा :

१.१२ MMC अधिनियमानुसार, नागरिकांना किमान ७० लिटर प्रतिव्यक्ती प्रति दिवस (lpcd) पाणी पुरविणे MCs वर बंधनकारक आहे. केंद्र शासनाच्या नगरविकास मंत्रालयाने (MOUD) विहित केलेल्या (जुलै, २००८) सेवा स्तराच्या बेंचमार्क मध्ये (SLB) इतर बाबींबरोबरच सर्वच्या सर्व पाणीपुरवठा जोडण्यांसाठी मीटर बसविणे, सर्वांना पाणीपुरवठा जोडण्या पुरविणे, पाणी पुरवठ्यावरील खर्चाची संपूर्ण वसुली करणे इत्यादी विनिर्दिष्ट केले होते. महाराष्ट्र शासनाने फेब्रुवारी, २०१० मध्ये पाणीपुरवठा सेवांबाबत या राष्ट्रीय बेंचमार्क्सचा अवलंब केला.

लहान व मध्यम शहरांमध्ये नागरी पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी केंद्र शासनाच्या MoUD ने डिसेंबर, २००५ मध्ये जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नगरोत्थान अभियानांतर्गत (JNNURM) लहान व मध्यम शहरांसाठी नागरी पायाभूत सुविधा विकास योजना (UIDSSMT) सुरू केली. नागरी पायाभूत सुविधांमधील त्रुटी शोधून आणि भांडवली कामे हाती घेऊन स्वयं-शाश्वत अखंड पाणीपुरवठा व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान सुद्धा (MSNA) सुरू केले (ऑक्टोबर, २००८). सुधारणात्मक कामांमध्ये पाण्याच्या आवश्यकतेचा आढावा घेण्यासाठी उपभोक्त्यांचे सर्वेक्षण करणे आणि बेकायदेशीरपणे केलेल्या पाणी जोडण्यांचा तपास लावणे, पाणी व वीजेची लेखापरीक्षा करणे इत्यादींचा समावेश होता. त्याव्यतिरिक्त, रस्ते, सांडपाणी गटारे, इमारती, पाणीपुरवठा व्यवस्था इत्यादी पायाभूत सुविधांच्या विकासासाठी UDD ने महाराष्ट्र स्वर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (MSJNA) या नावाची एक पायाभूत सुविधा विकास योजनाही सुरू केली (फेब्रुवारी, २०१०).

निवड केलेल्या ३६ MCs मध्ये केल्या जाणाऱ्या पाणी पुरवठ्यासाठीच्या लेखापरीक्षणात खालील बाबी उघडकीस आल्या :

- पायाभूत सुविधा निर्माण करण्यात आल्या होत्या आणि निर्धारित मात्रेत पाणीपुरवठा करण्यात आला होता ;
- योजना कार्यान्वित करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होता ;
- पाणी पुरवठ्यात वाढ करण्याच्या योजना आणि सुधारणा काटकसरीने, कार्यक्षमतेने आणि प्रभावीपणे राबविल्या जात होत्या ; आणि
- पाणी पुरवठ्यासाठी निर्धारित केलेली सेवा स्तरीय पातळी गाठण्यात यश आले होते.

ज्ञापन :

१.१३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात काहीही अभिप्राय नाहीत असे नमूद केले आहे.

निर्धारित मात्रेत पाणीपुरवठा न होणे

१.१४ MMC अनिनियमानुसार जरी प्रत्येक नागरिकाला ७० lpcd एवढा पाण्याचा पुरवठा करण्याचे बंधनकारक होते तरी, लेखापरीक्षेत असे आढळून आले की, निवड केलेल्या ३६ पैकी १७ MCs मध्ये २०१३-१४ दरम्यान सरासरी पाणीपुरवठा हा २५ ते ६९ lpcd दरम्यान होता, जे तक्ता १ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता १ : २०१३-१४ दरम्यान ७० लिटर प्रतिदिन प्रति व्यक्तीपेक्षा कमी पाणीपुरवठा केलेल्या १७ MCs चा तपशील

क्षेत्रनगर	:	परिषदेचे नाव (lpcd मध्ये सरासरी पाणीपुरवठा)
कोकण	:	अशी प्रकरणे आढळली नव्हती (कोकण हे कमाल पाऊस पडण्याचे क्षेत्र असल्यामुळे पाणी भरपूर आहे)
पुणे	:	अक्कलकोट (६६)
नाशिक	:	दोंडाईचा-वरवडे (२५) आणि मनमाड (५०)
औरंगाबाद	:	जालना (३१), उस्मानाबाद (४९), सिल्लोड (३९), उद्‌गीर (४५), आणि हिंगोली (६९)
अमरावती	:	आकोट (३१), खामगाव (५९), मेहेकर (५३), उमरखेड (६४) आणि वाशिम (६२)
नागपूर	:	भंडारा (५१), बल्लारपूर (५८), गोंदीया (५१) आणि नरखेड (६६)
स्त्रोत	:	महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेली माहिती

या १७ MCs मध्ये जिथे ७० lpcd पेक्षा कमी पाणीपुरवठा केला जात होता त्यापैकी १२ MCs नी पाणीपुरवठा वाढवण्याचे काम हाती घेतले होते जे ऑक्टोबर, २०१४ पर्यंत प्रगती पथावर होते. उर्वरित पाच MCs नी पाणीपुरवठा वाढवण्यासाठी कोणताही DPR, DMA ला सादर केला नव्हता. तसेच, दोन MCs नी (जालना व सिल्लोड) पाणीपुरवठा वाढवण्यासाठी हाती घेतलेले काम २०१३-१४ दरम्यान पूर्ण केले होते तरी, विद्युत आकार धारण करण्याची क्षमता किंवा पाणीपुरवठा पायाभूत सुविधांच्या निकृष्ट देखभालीमुळे या नगरपालिका अस्तित्वात असलेला अनुक्रमे ३१ lpcd आणि ३९ lpcd पाणीपुरवठा, बंधनकारक असलेल्या ७० lpcd इतके वाढविण्यास असमर्थ होत्या.

या १७ MCs मध्ये, निर्धारित प्रमाणात पाणीपुरवठा न होण्याची मुख्य कारणे म्हणजे पाणी वितरण यंत्रणेतून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होणे, पाणी प्रक्रिया संयंत्राची (WTP) आणि प्रस्थापित केलेल्या पंपींग यंत्रांची कार्यक्षमता कमी होणे, अनियमित विद्युत पुरवठा ही होती.

ज्ञापन :

१.१५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

महालेखापाल कार्यालयाने तपासणीसाठी निवड केलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी १७ नगरपरिषदांमध्ये सन २०१३-१४ मध्ये होत असलेल्या पाणीपुरवठ्याबाबत या परिच्छेदात उहापोह करण्यात आला आहे. सदर १७ नगरपरिषदांमध्ये नोव्हेंबर, २०१५ अखेर खाली नमूद केल्याप्रमाणे पाणीपुरवठा केला जात आहे :–

अनु. क्र.	नगरपरिषद	नोव्हेंबर, २०१५ अखेर होत असलेला पाणीपुरवठा (lpcd)
१	अक्कलकोट	३५
२	दोंडाईचा-वरवडे	७५
३	मनमाड	५०
४	जालना	८०
५	उस्मानाबाद	९०
६	सिल्लोड	१३५
७	उद्‌गीर	१५
८	हिंगोली	१३५
९	आकोट	९०
१०	खामगांव	७०
११	मेहेकर	७०
१२	उमरखेड	७०
१३	वाशीम	१२५
१४	भंडारा	६०
१५	बल्लारपूर	१३५
१६	गोंदिया	१३५
१७	नरखेड	९०

उपरोक्त १७ नगरपरिषदांपैकी चार नगरपरिषदांमध्ये ७० lpcd पेक्षा कमी पाणीपुरवठा केला जात असून त्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :–

- अक्कलकोट (३५ LPCD).–अक्कलकोट नपस उद्‌भवावरून (Source) होणारा पाणीपुरवठा पुरेसा नाही. अक्कलकोट नगरपरिषदेने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानांतर्गत पाणीपुरवठा योजनेत सुधारणा करण्यासाठी प्रस्ताव संचालनालयास सादर केला असून सदरचे प्रस्तावात असलेल्या त्रुटी अक्कलकोट नगरपरिषदेस कळविण्यात आल्या आहेत.
- मनमाड (५० LPCD).–मनमाड नपस धरणावरून पाणीपुरवठा.होत असून मागील काही वर्षापासून दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने धरणातील पाण्याची पातळी खालावलेली असल्याने नपस आवश्यक असलेले पाण्याचे आवर्तन मिळत नसल्याने मानकाप्रमाणे पाणीपुरवठा होत नाही.
- उद्‌गीर (१५).–उदगीर नगरपरिषदेस बोपणी, बनशिर्की व देवरदन धरणातून पाणीपुरवठा केला जातो. सद्यःस्थितीत बोपणी धरण व बनशिर्की धरणात पाणीसाठा नसल्याने व देवरदन धरणातून फक्त २ MLD पाणीपुरवठा मिळत असल्याने मानकाप्रमाणे पाणीपुरवठा करता येत नाही.

  उदगीर नगरपरिषदेने केंद्र शासनाच्या अमृत योजनेमधून लिंबोटी धरणातून पाणीपुरवठा योजना प्रस्तावित केली आहे.
- भंडारा (६० LPCD).–भंडारा नगरपरिषदेस उद्‌भवावरून होणारा पाणीपुरवठा अपूर्ण असल्याने मानकाप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येत नाही. भंडारा नगरपरिषदेने दिलेल्या माहितीनुसार नवीन पाणीपुरवठा योजना प्रस्तावित करण्यात आली असून तांत्रिक तपासणी-साठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सादर करण्यात आली आहे.

वरील नपच्या प्रस्तावित पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर मानकाप्रमाणे पाणीपुरवठा होण्यास मदत होईल.

पाणी पुरवठ्यात वाढ करण्यासाठीच्या योजना पूर्ण होण्यातील विलंब

१.१६ निवड केलेल्या ३६ MCs पैकी २० MCs नी अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा क्षमतेची ७० lpcd किंवा १३५ lpcd इतकी वाढ करण्यासाठी UIDSSMT, MSNA आणि MSJNA अंतर्गत २१ प्रकल्पांची ऑक्टोबर, २०१४ पर्यंतची पूर्णत्वाची स्थिती आणि झालेला खर्च यांची रुपरेखा तक्ता २ मध्ये दिली आहे.

तक्ता २ : निवड केलेल्या ३६ MCs मध्ये ऑक्टोबर, २०१४ ला UIDSSMT, MSNA आणि MSJNA अंतर्गत हाती घेतलेल्या पाणीपुरवठा योजनांची माहिती

योजनेचे नाव	मंजूर केलेले प्रकल्प	DPR प्रमाणे मंजूर केलेली मूळ किंमत (रु. कोटीत)	मंजुरीचा कालावधी	पूर्ण झालेले प्रकल्प	प्रगती पथावरील प्रकल्प	पूर्ण झालेल्या व प्रगती पथावरील प्रकल्पांवर झालेला खर्च (रु. कोटीत)
UIDSSMT	१३	५६३.८२	सप्टेंबर, २००६ ते जुलै, २००८	६	७	७३४.२९
MSNA (०७ MCs)	७	१०६.७८	फेब्रुवारी, २००९ ते जुलै, २०११	१	६	९०.४१
MSJNA (०२ MC)	१	३७.६७	फेब्रुवारी, २०१०	०	१	२५.११
एकूण ...	**२१**	**७०८.२७**		**७**	**१४**	**८४९.८१**

स्त्रोत : DMA आणि MCs नी सादर केलेली माहिती

* दोन योजनांतर्गत (MSNA आणि MSJNA) प्रकल्पांच्या कार्यान्वयनासाठी मनमाड MC ला संम्मिलित करण्यात आले होते.

UIDSSMT, MSNA आणि MSJNA अंतर्गत हाती घेतलेल्या पाणीपुरवठा योजनांच्या तपासणीतून खालील बाबी निदर्शनास आल्या.

UIDSSMT अंतर्गत प्रकल्पांची अंमलबजावणी :

१.१७ UIDSSMT अंतर्गत १३ प्रकल्पांचा खर्च (DPR प्रमाणे रु. ५६३.८२ कोटी) GOI, GOM आणि MC अनुक्रमे ८०.१०.१० प्रमाणात विभागायचा होता. परंतु, या प्रकल्पांना मंजुरी देण्याकरिता नोडल एजन्सीच्या (DMA) आणि राज्य स्तरीय मंजुरी समितीच्या (SLSC) स्तरावर विलंब (दोन वर्षापर्यंत) झाल्यामुळे, प्रकल्पाची अंदाजित किंमत रु. ५६३.८२ कोटीवरून वाढून रु. ८५२.५६ कोटी इतकी झाली. फरकाच्या रु. २८८.७४ कोटी रकमेचा भार हा GOM ने (रु. १४४.३७ कोटी) आणि MC ने (रु. १४४.३७ कोटी) समानतेने सोसायचा होता. जर DMA ने अंदाज पत्रक सुधारुन मंजुरी मिळण्याकरिता SLSC समोर आधी ठेवले असते तर, GOM आणि MCs वर पडलेला अतिरिक्त आर्थिक भार टाळता आला असता आणि रु. २८८.७४ कोटीचा निधी राज्यात इतरत्र विकासाच्या कामांसाठी वापरता आला असता.

१३ प्रकल्पांना केंद्र शासनाने मंजुरी दिल्याच्या तारखेपासून कंत्राट प्रत्यक्ष बहाल करण्यात १२ ते ३९ महिन्यांचा कालापव्यय झाला होता. जो मुख्यत्वे करून प्रकल्पांसाठी GOI/GOM कडून निधी विलंबाने प्राप्त होणे, MCs/DMAs मध्ये तज्ज्ञांची कमतरता असल्याने प्रकल्पांची सुधारित किंमत अंदाजित करण्यासाठी लागलेला वेळ, निविदा प्रक्रियेसाठी आणि बोलींचे मूल्यमापन करण्यासाठी लागलेला वेळ आणि जमीन विषयक मुद्दे इत्यादींमुळे झाला होता. परिणामी, GOI ने मंजूर केलेल्या DPR च्या किंमतीपेक्षा या १३ कामांच्या निविदांची किंमत रु. ३८५.४८ कोटींनी वाढली. तसेच, १३ हाती घेतलेल्या प्रकल्पापैकी पाच प्रकल्प १० ते ४० महिन्यांच्या विलंबाने पूर्ण झाले होते. तर ऑक्टोबर, २०१४ पर्यंत उर्वरित सात प्रकल्पांच्या पूर्णत्वाचा कालावधी अगोदरच १३ ते ३९ महिन्यांनी उलटून गेला होता.

ज्ञापन :

१.१८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

- UIDSSMT अंतर्गत पाणीपुरवठा योजना संबंधित नगर परिषदा नगर परिषद संचालनालयाकडे सादर करतात.
- संचालनालयाकडून या योजना तांत्रिक सहमतीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविल्या जातात.
- या सहमतीनंतर सदर योजना राज्यस्तरीय मंजुरी समिती (SLSC) समोर सादर केल्या जातात. (या समितीमध्ये केंद्र शासनाच्या प्रतिनिधीचा समावेश आहे)
- समितीच्या मंजुरीनंतर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेशी करारनामा करून योजना निधी प्राप्तीसाठी केंद्र शासनाकडे पाठविली जाते.
- केंद्र शासनाकडून निधी वितरित झाल्यानंतर त्याच प्रमाणात राज्य शासनाचा हिस्सा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेस देण्यात येतो.
- केंद्र शासनाचा निधी मिळण्यास झालेला विलंब व नगरपरिषदांना प्रकल्प राबविताना आलेल्या इतर अडचणी यामुळे प्रकल्प पूर्ण होण्यास विलंब झाला आहे.
- महालेखापाल कार्यालयाने तपासणी केलेल्या ३६ नगरपालिकांपैकी १३ पाणीपुरवठा प्रकल्प UIDSSMT खाली मंजूर करण्यात आले होते.
- यापैकी ७ प्रकल्प पूर्ण झालेले असून सहा प्रकल्प सन २०१६ मध्ये पूर्ण होतील.
- सदर योजना सन २००५-०६ ते २००६-०७ या यावर्षाच्या दरसूची नुसार तयार करण्यात आल्या असून त्या सन २००६ ते २००८ या कालावधीत मंजूर करण्यात आल्या होत्या.
- केंद्र शासनाकडून सन २००९ मध्ये पहिल्या हप्त्याचा निधी वितरीत करण्यात आला.
- केंद्र शासनाकडून सन २००६ ते २००८ या कालावधीत निधी प्राप्त झाला असता तर योजनांच्या किंमतीमध्ये वाढ झाली नसती.
- केंद्र शासनाकडून निधी सन २००९ मध्ये प्राप्त झाल्याने प्रकल्पांच्या निविदांचे सन २००९-१० चे दर सूचीप्रमाणे मुल्यांकन करून प्रकल्प मंजूर करण्यात आले व त्यामुळे प्रकल्पाच्या किंमतीत वाढ झालेली आहे.

MSJNA अंतर्गत प्रकल्पांची अंमलबजावणी :

१.१९ MSJNA अंतर्गत, महाराष्ट्र शासनाने मनमाड MC साठी रु. ३७.६७ कोटींचा एक प्रकल्प मंजूर केला (फेब्रुवारी, २०१०). रु. ४२.९१ कोटींचा हा प्रकल्प ऑक्टोबर, २०१२ मध्ये, ऑक्टोबर, २०१३ ला पूर्ण करण्यासाठी देण्यात आला. ऑक्टोबर, २०१४ ला या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर होते आणि कंत्राटदाराला रु. २५.११ कोटी प्रदान करण्यात आले होते. या प्रकल्पाबाबत खाली चर्चा केली आहे.

मनमाड MC ला सध्या ८.४ दशलक्ष लिटर प्रति दिवस इतकी पिण्याच्या पाण्याची आवश्यकता आहे. साध्या पाण्यासाठी पालखेड डावा कालवा (PLBC) हा चा स्त्रोत आहे. मागील १० वर्षांत पाटबंधारे विभागाने PLBC मधील पाण्याचे आवर्तन (पाणी फिरवणे) वर्षाला २४० दिवसांवरून १०० दिवस (पाच ते सहा कालांतरात) इतके कमी केले. PLBC कडून प्राप्त झालेले साधे पाणी पहिले पाटोडा संतुलन टाकीत (PBT) साठविले जाते जिची क्षमता १४८ दशलक्ष लिटर (ML) आहे. PBT मधून हे पाणी नागरिकांना वितरणासाठी (प्रक्रिया केल्यानंतर) जल प्रक्रिया संयंत्रात सोडले जाते आणि अतिरिक्त पाणी हे PBT पासून १८ किमी अंतरावर असलेल्या दुसऱ्या मातीच्या मोठ्या धरणामध्ये साठविले जाते, ज्याची क्षमता ३४६८ ML (वाघदर्डी धरण) आहे. धरण बंद असण्याच्या कालावधीत, PBT आणि वाघदर्डी धरणात साठविलेले पाणी नागरिकांना वितरीत करण्यात येते.

MC ने, सध्याची २० MLD साध्या पाण्याची पंपिंग क्षमता वाढवून ५२.१४ MLD करण्यासाठी आणि सध्याची असलेली PBT ची साठवणूक क्षमता १४८ ML वरून ५२० ML करण्यासाठी, ज्यामुळे वर्ष २०४२ पर्यंत आवश्यक असलेल्या १८.८१ MLD पाण्याची मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने, एक DPR तयार (डिसेंबर, २००९) केला. GOM ने MSJNA अंतर्गत रु. ३६.६७ कोटी किंमतीच्या या प्रकल्पाला मान्यता दिली (फेब्रुवारी, २०१०). MC ने रु. ४२.९१ कोटी खर्चाचा PBT ची क्षमता वाढ होण्यासाठीचा प्रकल्प इतर संलग्न कामांबरोबर ऑक्टोबर, २०११ ला ज्याचे काम ऑक्टोबर, २०१३ ला पूर्ण होईल या अटीवर दिला. कंत्राटातील PBT च्या क्षमतेच्या वाढीसंबंधातील घटकांचा खर्च रु. ९.०३ कोटी होता.

प्रकल्प प्रस्ताव/DPR यांची, MC ने केलेले प्रगणन आणि कंत्राटासंबंधीच्या इतर दस्तऐवजांची छानबीन केली असता, लेखापरीक्षेला असे आढळून आले की, रु. ९.०३ कोटी खर्चून १४८ वरून ५२० ML इतकी PBT ची क्षमता वाढ करण्याच्या निर्णयात उणिवा होत्या, ज्याची कारणे खाली दिलेली आहेत :—

- MC एका वर्षात पाच ते सहा चक्रीय कालावधीत सोडलेले पाणी नागरिकांना ११०दिवस पुरेल इतके पाणी प्राप्त करू शकेल. त्याचबरोबर पंपींग केलेले अतिरिक्त पाणी साठवणुकीच्या दोन्ही टाक्यांमध्ये (PBT आणि वाघदर्डी धरण) साठवू शकेल. दोन्ही साठवणूक टाकीतील अतिरिक्त पाणी धरण बंद असण्याच्या कालावधीत उपयोगात आणता येऊ शकेल.
- ५२.१४ MLD इतकी वाढीव पंपींग क्षमता आणि १३.८१ MLD (वर्ष २०४२ पर्यंतची प्रक्षपणे) लक्षात घेता, MC वाघदर्डी धरणामध्ये ११० दिवसात ४२१६ MLअतिरिक्त साधे पाणी साठवू शकेल. वाघदर्डी धरणातील पाण्याचे ३० टक्के अनुज्ञेय बाष्पीभवनामुळे होणारी हानी (जी MC ने ही लक्षात घेतली आहे) विचारात घेऊनही, वाघदर्डी धरणात २९५१ ML पाणी उपलब्ध असेल जे धरण बंद असतानाच्या कालावधीत देखील MC ची २१४ दिवसांची पाण्याची गरज भागवू शकेल.
- PBT ची सध्याची क्षमता (१४८ ML) लक्षात घेता, ८८८ ML पाणी वर्षभरात (सहा कालावधीत) उपलब्ध राहू शकेल आणि ३० टक्के अनुज्ञेय बाष्पीभवन हानी विचारात घेऊनही ६२२ ML पाणी उपलब्ध असेल जे MC ची ४५ दिवसांची पाण्याची गरज भागवू शकेल.

अशाप्रकारे, PBT ची क्षमता १४८ ML वरून ६५२ ML पर्यंत न वाढवताही MC नागरिकांची ३६९ दिवसांची (११० दिवस + २१४ दिवस + ४५ दिवस) आवश्यकता पूर्ण करू शकली असती. तसेच, वर्ष २०३०पर्यंत MC ची १० MLD पाण्याची वाढीव गरज लक्षात घेऊनही, MC नागरिकांची ४९६ दिवसांची गरज पूर्ण करू शकली असती. याशिवाय MC ने DPR तयार करताना पावसाच्या पाण्याची उपलब्धता लक्षात घेतली नव्हती. जर पावसाचे पाणी विचारात घेतले असते तर, दोन्ही टाक्यांतील (PBT आणि वाघदर्डी धरण) वाढीव पाण्याची उपलब्धता बघता, पाणीसाठा वाढविण्याची गरजच निर्माण झाली नसती.

म्हणून PBT ची क्षमता वाढविण्याचा MC निर्णय उणिवा असलेला होता. परिणामी रु. ९.०३ कोटींचा अनावश्यक खर्च झाला होता.

ज्ञापन :

१.२० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

- धरणक्षेत्रामध्ये पर्जन्यमान चांगले झाल्यास धरणामध्ये पुरेसा पाणीसाठा राहील आणि त्या परिस्थितीत लेखापरीक्षणातील परिच्छेदानुसार पाणी मिळणे शक्य होईल.
- मनमाड शहर वाढीव पाणीपुरवठा योजनेत नवीन पाणीपुरवठा योजनेसाठी पालखेड डाव्या कालव्यातून ३५५ द.ल.घ. फूट पाणी प्रतिवर्षी मंजूर करताना पालखेड कालवा आठमाही असल्यामुळे उन्हाळी हंगामात पाणी देता येणार नाही. त्यासाठी निदान चार महिने पुरेल एवढे पाणी साठवण्याची क्षमता असणारा तलाव नगरपरिषदेने बांधावा अशी अट पाटबंधारे विभागाकडून धरण्यात आली होती.

- पाटबंधारे विभागाच्या १२.०२.१९९० च्या परिपत्रकानुसार जेथे आठमाही कालवा आहे तेथे पाच महिने पुरेल इतका पाणी साठा ठेवणे आवश्यक आहे.
- पालखेड पाटबंधारे विभागाच्या दि. १९.१०.२००१ च्या पत्रानुसार पाटोदा साठवण तलावाची क्षमता वाढवून घ्यावी अन्यथा मंजूर पाणी कोटा कमी करण्याचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल अशा सूचना नगरपालिकेस देण्यात आल्या होत्या.
- त्याचप्रमाणे दि. २१.१२.२००१ च्या पत्रानुसार साठवण तलावाची क्षमता वाढविल्याशिवाय पाणीपुरवठा करण्यात येणार नाही अशी सूचना देण्यात आली.
- दि. १६.०३.२००३ च्या अध्यक्ष, नगरपरिषद मनमाड यांना पाठविलेल्या पत्रात पालखेड पाटबंधारे विभागाने कळविले आहे की, साठवण क्षमता वाढवणेबाबत वांरवार पत्रव्यवहार करूनही मनमाड नगरपरिषदेने कोणतीही कार्यवाही केलेली नाही तरी साठवण तलावाची क्षमता तात्काळ वाढवावी अन्यथा उन्हाळी हंगामात पाणीपुरवठा बंद करण्याबाबतचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास सादर करण्यात येईल.
- त्यामुळे सदर योजना तयार करताना साठवण तलावाची क्षमता वाढविण्याचे प्रस्तावित करण्यात आले.
- सन २०१२ मध्ये केवळ ६२.८२ टक्के एवढाच पाणी साठा शिल्लक असल्याचे व त्यामुळे टंचाई काळात पुरेसा पाणी साठा उपलब्ध होणार नसल्याचे पालखेड पाटबंधारे विभागाने २५.०९.२०१२ च्या पत्राने कळविले.
- या २०१२ च्या टंचाई काळात आवर्तनाद्वारे उपलब्ध होणारे पाणी चार महिने पुरवणे बंधनकारक असल्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी दि.१८.०८.२०१२ रोजी आदेश दिले होते.
- चालू वर्षी (२०१५) कमी पर्जन्यमानामुळे पालखेड धरण समुहातील पाणी साठा फक्त ४० टक्के असल्याने दर दोन महिन्यांनी कालव्यास पाणी सोडून आवर्तन देणे शक्य नसल्याचे पालखेड पाटबंधारे विभागाने दि. १६.११.२०१५ च्या पत्रानुसार कळविले आहे.
- त्यामुळे पाटोदा संतुलन टाकीची क्षमता वाढविणे अत्यावश्यक असल्याने सदर तलावाची साठवण क्षमता वाढविण्यासाठी केलेला खर्च अनावश्यक होता असा निष्कर्ष काढणे उचित ठरणार नाही.

सेवास्तरीय बेंचमार्किंग

१.२१ सेवा देण्यातील जबाबदारी निश्चित करण्यासाठी बेंचमार्किंग हे मान्यताप्राप्त असे महत्त्वाचे कार्यतंत्र आहे. बेंचमार्किंगमध्ये, सेवा पुरवठादाराच्या कार्यसिद्धीचे पद्धतशीर आणि सातत्याच्या आधारावर केलेले मोजमाप आणि संनियंत्रण संम्मिलित असते. सातत्याने केलेले बेंचमार्किंग, उपयोगितांमधील कार्यसिद्धी तफावती ओळखण्यात आणि माहिती आणि उत्तम कार्यपद्धतीची देवाण-घेवाण करून सुधारणा सुचविण्यात मदत करतात. परिणामी, नागरिकांना अधिक चांगली सेवा पुरवू शकतात. बेंचमार्किंगचे महत्त्व ओळखून, केंद्र शासनाच्या (GOI) नागरी विकास विभागाने (MOUD), प्रमुख चार क्षेत्रांमध्ये म्हणजे, पाणीपुरवठा, घन कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन आणि वादळी जलनि:सारण (SWD) सेवास्तरीय बेंचमार्किंग पद्धती जाहीर केली (जुलै, २००८).

महाराष्ट्र शासनाने (GOM) नागरी स्थानिक संस्थांकडून ध्येय साध्य करण्यासाठी राष्ट्रीय बेंचमार्क्सचा फेब्रुवारी, २०१० मध्ये अंगीकार केला. राज्य शासनाने दिलेल्या सुचनांनुसार प्रत्येक नगरपरिषदेने प्रत्येक राजकोषीय वर्षासाठी SLBs च्या साध्याचे लक्ष्य ठरवावे आणि ह्या लक्ष्याच्या साध्याची माहिती शासनाला द्यावी.

(अ) SLBs साध्य न करणे.–वर्ष २०१३-१४ दरम्यान पाणी पुरवठ्याच्या बाबतीत ज्या MCs नी (३६ निवडलेल्या MCs पैकी केंद्र शासनाच्या नऊ निदर्शकांच्या बाबतीत विहित केलेली SLB मानके साध्य केली नव्हती किंवा त्या नऊ मानकांच्या बाबतीत MCs नी स्वतः ठरविलेले लक्ष्य साध्य केले नव्हते, ह्यांचा तपशील तक्ता ४ मध्ये दिला आहे.

तक्ता ४ : वर्ष २०१३-१४ दरम्यान SLBs च्या तुलनेत साध्य केलेले लक्ष्य.

SLBs चे निर्देशांक	राष्ट्रीय बेंचमार्क	ज्या MCs नी केंद्र शासनाने निश्चित केलेली SLB मार्च २०१४ पर्यंत साध्य केली नव्हती त्यांची संख्या	MCs द्वारे लक्ष साध्यतेचे प्रमाण	MCs ने २०१४ पर्यंत साध्य करण्यासाठी निश्चित केलेल्या लक्ष्याचे प्रमाण	मार्च, २०१४ पर्यंत ज्या MCs नी त्यांचे स्वतःचे लक्ष्य साध्य केले नव्हते अशा MCs ची संख्या	ज्या MCs नी स्वतःचे लक्ष्य साध्य केले नव्हते त्यांची टक्केवारी
पाणीपुरवठा जोडण्याची व्याप्ती	१००%	३६	३५-९६ टक्के	४०-१०० टक्के	३१	८६
प्रति व्यक्ती पाणीपुरवठा	१३५ lpcd	३०	२५-१२९ lpcd	३५-३४० lpcd	२७	७५
ज्या पाणी जोडण्यासाठी मीटर बसविण्यात आले त्यांचे प्रमाण	१००%	३५	०-९४ टक्के	५-१०० टक्के	१७	१००
महसूलेतर पाण्याचे प्रमाण	२०%	२६	२१-५६ टक्के	०-५० टक्के	२९	८१
पाणीपुरवठा सेवांमधील खर्च वसुलीचे प्रमाण	१००%	२७	२०-९९ टक्के	२५-३०५ टक्के	२२	६१
पाणी पुरवठ्याशी संबंधित शुल्कांच्या वसुलीतील कार्यतत्परता	९०%	३६	१२-८७ टक्के	१५-९९ टक्के	२९	८१
पाणी पुरवठ्यातील सातत्य	प्रतिदिन २४ तास	३६	६	१-७	२४	७५
पुरवलेल्या पाण्याचा दर्जा/गुणवत्ता	१००%	१८	५२-९९ टक्के	८५-१०० टक्के	१८	५०
ग्राहकांच्या तक्रार निवारणातील कार्यतत्परता	८०%	१३	२८-७७ टक्के	४२-१०० टक्के	१३	३६

स्त्रोत : GoM ने प्रसिद्ध केलेली माहिती.

यावरून हे स्पष्ट दिसून येते की, वर्ष २०१३-१४ दरम्यान ३६ पैकी एकाही MC ने केंद्र शासनाने विहित केलेल्या नऊ निर्देशकांपैकी कुठलेच मानक साध्य केले नव्हते. वर्ष २०१३-१४ मध्ये MCs नी स्वतः निर्धारित केलेली लक्ष्य ३६ ते १०० MCs साध्य करू शकली नव्हती.

नऊ निदर्शकांपैकी तीन निदर्शकांवरील म्हणजे, पाणीपुरवठा सेवांवरील खर्चाची वसुली, नॉन रेव्हेन्यू वॉटरची व्याप्ती आणि पाणीपुरवठा जोडण्याची व्याप्ती याबाबतच्या लेखापरीक्षा निष्पत्ती खाली चर्चिल्या आहेत :

(i) पाणीपुरवठा सेवांवरील खर्चाची कमी वसुली

GoI च्या SLBs मध्ये पाणीपुरवठा सेवेच्या खर्चाची १०० टक्के वसुली करण्याचे विहित केले आहे. ज्यामुळे पुरविल्या जाणाऱ्या सेवा खर्च प्रभावी (Cost effective) असतील. महाराष्ट्र शासनाने साध्या पाण्याची किंमत, आस्थापना खर्च, व्याज असल्यास ते भांडवलात समाविष्ट करणे, घसारा शुल्क इत्यादी विचारात घेऊन वेगवेगळ्या प्रवर्गातील उपभोक्त्यांसाठी पाणी शुल्काचे दर निश्चित करण्यासाठी विस्तृत मार्गदर्शक तत्वे जारी केली (ऑगस्ट, २०१०) जेगेकरूण, कार्यचालन आणि देखभालीचा पूर्ण खर्च किंवा आवर्ती खर्च वसुली केला जाईल. तथापि, लेखापरीक्षेला असे आढळून आले की, ३६ निवड केलेल्या MCs पैकी वर्ष २०११-१२ दरम्यान २८ MCs, वर्ष २०१२-१३ मध्ये २५ MCs आणि वर्ष २०१३-१४ मध्ये २४ MCs, पाणीपुरवठा सेवांवरील १०० टक्के खर्च वसूल करण्याचे राष्ट्रीय बेंचमार्क साध्य करण्यात असमर्थ ठरल्या. परिणामी, एकूण रु. १३०.४५ कोटींची कार्यचालन हानी सहन करावी लागली.कार्यचालन हानीची मुख्य कारणे, प्रत्यक्ष खर्च भागविण्यासाठी MCs नी पाणीपुरवठा सेवांचे दर सुधारित न करणे, नॉन रेव्हेन्यू वॉटरची अधिक टक्केवारी , पाणी आकाराचे निकृष्ट संकलन इत्यादी होती. लेखापरीक्षेला असेही आढळून आले की, सहा MCs मार्च, २०१२ शी तुलना करता, मार्च, २०१४ मध्ये आपली कार्यचालन हानी कमी करू शकले होते.

अंतिम बैठकीत, सचिव UDD यांनी सांगितले की, MCs नागरिकांना नियमितपणे पाणीपुरवठा करण्यास समर्थ नसल्यामुळे MCs कडून पाणी आकाराची १०० टक्के वसुली करण्यासाठी आग्रह करणे अवघड होते.

ज्ञापन :

१.२२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

- मूलतः आवश्यक प्रमाणात पुरवठा करण्यासाठी पुरेसा पाणीसाठा नसल्याने बहुतांशी नगरपालिकांकडून अनियमित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पाणी पुरवठ्याबाबतच्या देयकांची वसुली करणे अवघड होत आहे.

तथापि, यावर उपाययोजना करण्यात येत असून, त्यामध्ये अनधिकृत नळ जोडण्या खंडित करणे, पाणीपुरवठा करणाऱ्या पाईप्सची गळती बंद करणे, मीटर बसवून घेण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणे, तसेच NRW चे प्रमाण कमी करणे अशा उपायांचा समावेश आहे.

नॉन रेव्हेन्यू वॉटरची अधिक टक्केवारी

१.२३ पाणी वितरण जाळ्याची अपुरी देखभाल, पाण्याची चारी, अनधिकृत जोडण्या, पाणी जोडण्यासाठी मीटर न बसविणे इत्यादीमुळे पाण्याची हानी होणे ही नॉन रेव्हेन्यू वॉटरची (NRW) ची मुख्य कारणे होती.

लेखापरीक्षेला असे आढळून आले की, निवड केलल्या ३६ MCs पैकी वर्ष २०११-१२ मध्ये १९ MCs नी, वर्ष २०१२-१३ मध्ये २३ MCs नी आणि वर्ष २०१३-१४ मध्ये २६ MCs नी २० टक्के राष्ट्रीय बेंचमार्कच्या तुलनेत २१ टक्के ते ५७ टक्के इतक्या जास्त प्रमाणे NRW नोंदविले. तथापि, वर्ष २०१३-१४ मध्ये १० MCs २० टक्के राष्ट्रीय बेंचमार्कच्यामर्यादेत NRW प्रतिबंधित करण्यात समर्थ ठरल्या.

सचिव UDD यांनी सांगितले की, MCs ना अनुज्ञेय मर्यादेत NRW ची सुनिश्चिती करण्यासाठी सूचित केले जाईल.

ज्ञापन :

१.२४ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

- (अ) (i) मध्ये उल्लेख केल्याप्रमाणे पाणी गळती व पाणी चोरी (अनधिकृत जोडण्या) यावर उपाययोजना करण्यात येत असून त्यामुळे NRW चे प्रमाण २० टक्के इतके राखण्यात १७ नगरपरिषदा यशस्वी झाल्या आहेत.

अन्य १९ नगरपरिषदांपैकी ९ नगरपरिषदांचे NRW चे प्रमाण २० ते ३० टक्के इतके असून उर्वरित १० नगरपरिषदेमध्ये NRW चे प्रमाण अद्याप ३० टक्के पेक्षा अधिक आहे.

पाणी जोडण्यांसाठी मीटर न बसविणे

१.२५ उपभोक्त्यांच्या पाणी जोडणीसाठी मीटर बसविल्यामुळे पाण्याचा वापर कार्यक्षमतेने होण्यास, पुरवठा यंत्रणेतील गळतीचा तपास लागण्यास आणि पाण्याचा अतिरिक्त वापर करणाऱ्या मोठ्या उपभोक्त्यांवर जास्त शुल्क आकारण्यास मदत होते.

लेखा परीक्षेला असे निदर्शनास आले की, वर्ष २०११-१४ दरम्यान ३६ निवड केलेल्या MCs पैकी फक्त एका MC ने (सावंतवाडी) पाणी जोडणीच्या मिटरींगबाबतचे १०० टक्के राष्ट्रीय बेंचमार्क लक्ष्य साध्य केले होते तर २२ MCs मध्ये मीटरच बसविले नव्हते आणि १३ MCs मध्ये अंशतः म्हणजेच ०.१ टक्के ते ९४ टक्के या दरम्यान मीटर बसविण्याचे ध्येय साध्य केले होते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

- अनियमित पाणी पुरवठ्यामुळे अद्यापपर्यंत काही नगरपरिषदांनी पाणी जोडण्यांना मीटर बसविलेले नाहीत हे खरे आहे. तथापि, अशा नगरपरिषदांमध्ये मीटर बसविण्यासंदर्भात नगरपरिषदेकडून ठराव संमत करून घेणे, त्यासाठी निविदा मागविणे, तसेच प्रत्यक्ष मीटर बसविणे याबाबतची कार्यवाही सुरू आहे.
- सद्य:स्थितीत लेखापरीक्षा केलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी तुळजापूर, गोंदिया व सावंतवाडी या तीन नगरपरिषदांनी १०० टक्के मीटर लावलेले असून ९ नगरपरिषदांमध्ये मीटर बसविण्याचे ५० टक्के अधिक काम पूर्ण झालेले आहे.
- ९ नगरपरिषदांमध्ये हे काम ५० टक्के पेक्षा कमी असून ते ०.०१ ते ४९.८ या दरम्यान आहे.
- उर्वरित १५ नगरपरिषदांमध्ये अद्यापपर्यंत मीटर बसविण्याची कार्यवाही झालेली नाही.

परंतु, वर उल्लेख केल्याप्रमाणे या नगरपरिषदांमध्ये मीटर बसविण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे.

घनकचरा व्यवस्थापन :

घनकचऱ्याचे व्यवस्थापन :

१.२६ घन कचरा व्यवस्थापनात नगरपालिका किंवा अधिसूचित क्षेत्रात निर्माण होणाऱ्या घन कचऱ्याचे संकलन, विलग्नीकरण, साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया आणि विल्हेवाट या गोष्टींचा समावेश होतो. भारत सरकारच्या पर्यावरण आणि वन खात्याने सप्टेंबर, २००० मध्ये महानगर घन कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, २००० (MSW नियम) अधिसूचीत केला ज्याद्वारे प्रत्येक नगरपालिकेला तिच्या भौगोलिक अखत्यारीतील घन कचरा व्यवस्थापन आणि हाताळणीसाठी जबाबदार धरण्यात येते.

खालील बाबींची पडताळणी करण्यासाठी ३६ निवड केलेल्या MCS मधील घन कचरा व्यवस्थापनाची लेखापरीक्षेद्वारे तपासणी करण्यात आली.

- MSW ची विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यात आल्या होत्या;
- MSW ची विल्हेवाट नियमानुसार लावली गेली होती;
- संनियंत्रण व पुनर्विलोकनासाठीची यंत्रणा अस्तित्वात होती व SLBs साध्य करण्यात आले होते.

MSW च्या विलग्नीकरणासाठी जमिनीची उपलब्धता, पर्यावरण अनुकूल पद्धतीने लँडफिलिंगसाठी दिलेल्या क्षेत्रात MSW वर प्रक्रिया करणे आणि त्याची विल्हेवाट लावणे या MSW च्या व्यवस्थापनासाठी पायाभूत आवश्यकता आहेत.

जैविक विघटन न होणारा रासायनिक प्रक्रिया होऊ न शकणारा आणि पुनर्चक्र करण्यास किंवा जैविक प्रक्रिया करण्यास योग्य नसणारा कचरा भरणा जागेवर टाकण्यास प्रतिबंध करायला हवा जेणेकरून भरणा जागेवरील भार कमी करता येईल. भरणा जमिनीसह कचरा प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी सुविधा प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येक MC ने राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून मंजुरी मिळवणे बंधनकारक होते.

MSW नियमांप्रमाणे कचऱ्याचे विलग्नीकरण न करणे

१.२७ MSW नियमांनुसार दोन स्वतंत्र कचराकुंड्यांची (नागरिकांच्या वापरासाठी आणि घरगुती वापरासाठी) पुन:चक्रीय कचरा (ओला आणि सुका) आणि पुन:चक्रीय न होणारा कचरा (रासायनिक प्रक्रिया करता येऊ न शकणारे पदार्थ जसे दगड, डेब्रीस इत्यादी) संकलित करण्यासाठी कचऱ्याच्या स्त्रोताच्या जागीच व्यवस्था करायला हवी. तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (MPCB) अटींनुसार लँण्डफिल साइटसवर वाहून आणलेल्या/नेलेल्या कचऱ्याचे पुन्हा विलग्नीकरण करण्यासाठी, पायाच्या जागी न झिरपणाऱ्या वाहिन्या बांधणे.

प्रक्रियेनंतर उरलेला घन कचरा जमिनीवर विसर्जनासाठी निर्धारित केलेल्या जागेत विसर्जित करणे म्हणजे भरणा जमीन, जेथे भूगर्भातील तसेच भूपृष्ठावरील पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी वाऱ्याबरोबर पसरणारा कचरा, वाऱ्याबरोबर वाहणारी उत्सर्जने दुर्गंधी नियंत्रित करण्यासाठी आग प्रतिबंधासाठी उपाययोजना असतील पक्ष्यांचा उपद्रव रोखण्यासाठी केलेली योजना, किटक व कृतक प्रतिबंधात्मक उपाययोजना, हरितगृहातील वायू उत्सर्जन यावरील उपाययोजना, जमिनीचा उतार कमी जास्त होणे आणि जमिनीची धूप नियंत्रित करण्यासाठीच्या उपाययोजना उपलब्ध असतील आणि कचऱ्याची विल्हेवाट लावायच्या जागी भिंती बांधणे (लँण्डफिल) लिचेटस संकलनासाठी तरतूद करणे, लँण्डफिल वायूनियंत्रण व्यवस्था बसविणे इत्यादींचे पालन करायला हवे होते.

लेखापरीक्षेला असे निदर्शनास आले की, ३६ निवड केलेल्या MCs पैकी पनवेल MC व्यतिरिक्त इतर कुठल्याही MC त, निर्देशित केलेल्या लँण्डफिल साइटवर अनुकूल पर्यावरणीय पद्धतीने घरांमधून किंवा व्यावसायिक प्रतिष्ठानांमधून दररोज संकलित केलेल्या MSW कचऱ्याचे वजन करण्याचे किंवा विल्हेवाट लावण्याचे कार्यतंत्र उपलब्ध नव्हते. लेखापरीक्षेने केलेल्या अंदाजाप्रमाणे ३६ MCS मध्ये दररोज ८२९ मेट्रीक टन (MT) MSW ची किंवा ३.०३ लाख MT MSW ची प्रतिवर्षी निर्मिती होते. तथापि, ३५ पैकी एकाही MC द्वारे MSW चे निर्मितीच्या जागीच विलग्नीकरण होत नव्हते आणि लँडफिल साईटस् च्या विकासाकरीता MPCB च्या अटींचे पालनही होत नव्हते. परिणामी या MCS कडून लँडफिल साईटस् वर पुढील विलग्नीकरण होत नव्हते आणि संकलित केलेला कचरा तसाच लँडफिल साइट्स वर साठविला जात होता अशास्त्रीय पद्धतीने MSW ची विल्हेवाट लावण्यामुळे भूजल पातळीवर विपरीत परिणाम होऊ शकतो आणि हवेचे प्रदूषण होऊ शकते.

ज्ञापन :

१.२८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

- महालेखाकार कार्यालयाने लेखापरिक्षणा साठी निवडलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी पनवेल नगरपरिषदेत MSW नियमांप्रमाणे कचऱ्याचे वजन तसेच १००टक्के कचऱ्याचे विलग्नीकरण केले जाते.
- अन्य ३५ नगरपालिकांपैकी १८ नगरपरिषदांमध्ये २० ते ८० टक्के कचरा विलग्नीकरणाची प्रक्रिया सुरू आहे.
- उर्वरित १७ नगरपरिषदांमध्ये कचऱ्याचे विलग्नीकरण होत नाही.
- सर्व नगरपरिषदांमध्ये १०० टक्के कचरा विलग्नीकरणाची प्रक्रिया राबविण्यासाठी लोकांमध्ये जनजागृतीचे कार्यक्रम हाती घेण्यात येत आहेत.
- १४ व्या वित्त आयोगा अंतर्गतप्राप्त होणाऱ्या निधीतून ५० टक्के रक्कम घनकचरा व्यवस्थापनासाठी वापरणे अनिवार्य करण्यात आले आहे.
- तसेच स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्यातील सर्व नगरपरिषदांनी घनकचरा व्यवस्थापनाकरीता प्रोत्साहीत करण्यात येत आहे.

MSW नियमाप्रमाणे घनकचरा विलग्नीकरणा बाबतची नगरपरिषदांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे :—

अनु. क्र.	नगरपरिषद	MSW नियमाप्रमाणे कचऱ्याचे विलग्नीकरण व वजन करण्यात येते अथवा नाही
१	पनवेल	MSW नियमाप्रमाणे विलग्नीकरण केले जाते.
२	उमरखेड	वजन यंत्र उपलब्ध नाही तसेच विलग्नीकरण ८० टक्के करण्यात येते.
३	यवतमाळ	वजन यंत्र उपलब्ध नाही तसेच विलग्नीकरण ८० टक्के करण्यात येत.
४	चाळीसगांव	वजन यंत्र उपलब्ध आहे विलग्नीकरण ६५ टक्के करण्यात येते.
५	कुळगांव-बदलापूर	वजन यंत्र उपलब्ध नाही तसेच विलग्नीकरण ६० टक्के करण्यात येत.
६	सिन्नर	वजन यंत्र उपलब्ध नाही तसेच विलग्नीकरण ५० टक्के करण्यात येत.
७	लोणावळा	कचऱ्याचे वजन ठेकेदारामार्फत करण्यात येते व ४० टक्के विलग्नीकरण केले जाते.
८	जालना	वजन यंत्र उपलब्ध नाही तसेच विलग्नीकरण २० टक्के करण्यात येत.
९	नरखेड	वजन यंत्र उपलब्ध नाही तसेच विलग्नीकरण २० टक्के करण्यात येत.
१०	बल्लारपूर	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण काही प्रमाणात केले जाते.
११	अकोट	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण काही प्रमाणात केले जाते.
१२	तुळजापूर	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण काही प्रमाणात केले जाते.
१३	गोंदिया	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण काही प्रमाणात केले जाते.
१४	खामगांव	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण काही प्रमाणात केले जाते.

अनु. क्र.	नगरपरिषद	MSW नियमाप्रमाणे कचऱ्याचे विलग्नीकरण व वजन करण्यात येते अथवा नाही
१५	पंढरपूर	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण काही प्रमाणात केले जाते.
१६	इचलकरंजी	वजन यंत्र उपलब्ध आहे विलग्नीकरण काही प्रमाणात केले जाते.
१७	भंडारा	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण काही प्रमाणात केले जाते.
१८	आळंदी	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण काही प्रमाणात केले जाते.
१९	काटोल	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण डंपिंग साईटवर काही प्रमाणात केले जाते.
२०	नंदुरबार	वजन यंत्र उपलब्ध आहे विलग्नीकरण होत नाही.
२१	मेहेकर	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही याबाबतच्या प्रस्तावास नुकतीच मान्यता देण्यात आली असून कार्यवाही सुरू आहे.
२२	वाशिम	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
२३	दोंडाईचा वरवाडे	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
२४	मनमाड	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
२५	अक्कलकोट	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
२६	उरण	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
२७	रत्नागिरी	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
२८	भुसावळ	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
२९	सावंतवाडी	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
३०	शिर्डी	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
३१	उद्गीर	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
३२	फलटण	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
३३	हिंगोली	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
३४	हिंगणघाट	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
३५	उस्मानाबाद	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.
३६	सिल्लोड	वजन यंत्र उपलब्ध नाही त्यामुळे वजन केले जात नाही तसेच विलग्नीकरण होत नाही.

MSW नियमांचे उल्लंघन करून कचऱ्याची साठवणूक हाताळणी आणि वाहतूक :

१.२९ MSW नियमानुसार, प्रत्येक नगरपालिका प्राधिकरणाने MSW ची साठवणूक आणि वाहतूक योग्य पद्धतीने होते आहे हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे आणि MSW ची वाहतुक करणारे वाहन हे कचरा इतस्ततः पसरु नये यासाठी आच्छादित असावे. तसेच, वाहुन नेला जाणारा कचरा लोकांच्या दृष्टीस पडू नये अथवा उघड्या पर्यावरणाच्या संपर्कात येऊ नये. ३६ निवड केलेल्या MCs पैकी १८ ३६ MCs मध्ये संयुक्तरित्या दिलेल्या भेटीदरम्यान असे दिसून आले की, चार MCs MSW ची वाहतुक या उघड्या वाहनातून कचरा आच्छादित न करता करत होत्या.

MSW नियमानुसार MSW प्रत्यक्ष हाताळण्यास प्रतिबंधित करण्यात आले आहे आणि जर काही अडचणींमुळे ते टाळता येणे शक्य नसेल तर असे काम करणाऱ्या कामगारांच्या सुरक्षिततेची योग्य काळजी घेऊन काळजीपूर्वकरित्या त्याची हाताळणी करावी. MC हा मुख्य नियोक्ता असल्याने कंत्राटदारांनी कामावर ठेवलेल्या कामगारांना (खुल्या निविदेद्वारे) जे, MSW ची स्वच्छता/संकलन/वाहतूक करण्याचे काम करतात त्यांना गणवेश, हातमोजे, मास्क, गमबुट, फावडी, कचरा विलग करण्यासाठी पाळ/झडप इत्यादी सुरक्षात्मक साधने देण्यात आली आहेत याची सुनिश्चिती करावयाची होती. परंतु लेखापरीक्षेत असे आढळून आले की, आवश्यक दस्तऐवजात्मक पुरावे कंत्राटदाराकडून प्राप्त करून किंवा

साईटस् च्या नियतकालिक तपासण्या करून त्याद्वारे नियमांचे अनुपालन होत असल्याची खातरजमा करण्याच्या पद्धतीविषयी MCs मध्ये कोणतीही कार्यपद्धती विहित करण्यात आली नव्हती. दोन MCs च्या (पंढरपूर आणि उस्मानाबाद) अधिकाऱ्यांबरोबर संयुक्तपणे केलेल्या तपासणी दरम्यान, लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की, MSW चे विलग्नीकरण कोणत्याही सुरक्षात्मक साधनांविना करण्यात येत होते.

ज्ञापन :

१.३० महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

लेखापरीक्षकांनी संयुक्तरित्या भेट दिलेल्या १८ नगरपरिषदांपैकी ज्या ४ नगरपरिषदांमध्ये MSW ची वाहतूक उघड्या वाहनांतून होत असल्याचे दिसून आले होते, त्यांची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे

(१) अक्कलकोट : बंदिस्त घंटागाड्याद्वारे कचरा डंपिंग ग्राउंडवर नेला जातो.

(२) मनमाड : कॉम्पॅक्टर व बंदिस्त घंटागाड्याद्वारे कचरा डंपिंग ग्राउंडवर नेला जातो.

(३) जालना : कॉम्पॅक्टर व बंदिस्त ट्रॅकरद्वारे कचरा डंपिंग ग्राउंडवर नेला जातो.

(४) यवतमाळ : कचरा वाहून नेणाऱ्या वाहनातून कचरा इतस्ततः पसरु नये, तसेच सदरचा कचरा उघड्या पर्यावरणाच्या संपर्कात येऊ नये म्हणून कचरा वाहून नेणारे वाहन ताडपत्रीद्वारे आच्छादीत करून लॅन्ड फिल साईटवर वाहतूक केली जाते.

सदर १८ नगरपरिषदांपैकी पंढरपूर व उस्मानाबाद या नगरपरिषदांमध्ये कचऱ्याचे विलग्नीकरण करणारे कर्मचारी कोणत्याही सुरक्षात्मक साधनाचा वापर न करता कचरा विलग्नीकरणाचे काम करत होते त्याबाबतचे स्पष्टीकरण खालीलप्रमाणे :—

(१) पंढरपूर : सफाई कर्मचाऱ्यांना कचऱ्यापासून संरक्षणासाठी मास्क, गमबुट, हातमोजे इ. साहित्य पुरवण्यात येते. तसेच सफाई कामासाठी झाडू, हातगाड्या, फावडे, खोरे व पाट्या इ. साहित्य पुरवण्यात येते. कचऱ्याचे विलग्नीकरण करताना सुरक्षात्मक साधनांचा वापर करण्याच्या सूचना सफाई कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

(२) उस्मानाबाद : उस्मानाबाद नगरपरिषदेने घनकचरा व्यवस्थापनाचे कंत्राट सुशिक्षित बेरोजगार संघ यांना दिले असून, त्यांनी सफाई कर्मचाऱ्यांना कचऱ्यापासून संरक्षणासाठी मास्क, गमबुट, हातमोजे इ. साहित्य पुरविणे अनिवार्य आहे. या अटीचे पालन न केल्यास कंत्राटदारावर दंडात्मक कार्यवाही करण्याचे सुचित करण्यात आले आहे. याबाबतची पूर्तता होते अथवा न होते याबाबत काटेकोरपणे पर्यवेक्षण करण्याच्या सूचना नगरपरिषदांच्या स्वच्छता निरीक्षकांना देण्यात आल्या आहेत.

MSW वर प्रक्रिया करणे :

१.३१ MSW नियमानुसार लँडफिल साइटस् च्या ठिकाणी कचऱ्याचा भार कमी करण्यासाठी महापालिका प्राधिकाऱ्यांनी कचऱ्याचा वापर करण्यासाठी योग्य तंत्रज्ञानाचा किंवा संयुक्तपणे एकापेक्षा अधिक तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. MSW वर प्रक्रिया करण्यासाठी MCs नी बायोगॅस प्रकल्प आणि व्हर्मी/मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्प प्रस्थापित केले आहेत. बायोगॅस प्रकल्पाच्या आणि व्हर्मी/मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्पाच्या लेखापरीक्षेतून निदर्शनास आलेल्या बाबी खाली चर्चिल्या आहेत.

MSW वर प्रक्रिया करणे :

१.३२ निवड केलेल्या ३६ MCs पैकी पाच MCs मध्ये मे, २००६ ते ऑगस्ट, २०१३ दरम्यान रु. २.२६ कोटी किंमतीचे बायोगॅस प्रकल्प प्रस्थापित करण्यात आले होते. हे बायोगॅस प्रकल्प MSW च्या प्रक्रियेसाठी आणि स्वयंपाकाचा गॅस/वीजेच्या निर्मितीसाठी प्रस्थापित करण्यात आले होते. बायोगॅस प्रकल्पांची स्थिती खाली तक्ता-५ मध्ये दिली आहे.

तक्ता-५ निवड केलेल्या MCs मध्ये प्रस्थापित केलेल्या बायो-गॅस प्रकल्पांची स्थिती

अ.क्र.	MC चे नाव	प्रस्थापित क्षमता (MT/ दिवस)	प्रयोजन	बांधकामाचे वर्ष	बांधकामा-वरील खर्च (रु. लाखात)	बायोगॅस प्रकल्पाची स्थिती
१.	पनवेल	५	स्वयंपाकाचा गॅस आणि वीज यांची निर्मिती	मे, २००६	१८.८५	प्रकल्पाची दुरुस्ती प्रलंबित असल्याने मे २०१४ पासून बंद आहे. स्वयंपाकाच्या गॅससाठी मागणी नसल्यामुळे मे, २०१४ च्या आधी फक्त ०.५ MT ते एक MT इतक्या कचऱ्यावरच प्रक्रिया केली जात होती. निर्माण झालेला गॅस हवेत सोडला जात होता किंवा जाळला जात होता.
२.	कुळगाव-बदलापूर	५	स्वयंपाकाचा गॅस आणि वीज यांची निर्मिती	ऑगस्ट २०१३	४९.८०	ऑक्टोबर, २०१४ पर्यंत गॅससाठी मागणी नसल्यामुळे आणि वीज निर्मितीसाठी विद्युतजनित्र प्राप्त न झाल्यामुळे ऑक्टोबर, २०१४ पर्यंत प्रकल्प सुरू करण्यात आला नव्हता.
३.	उरण	५	स्वयंपाकाचा गॅस आणि वीज यांची निर्मिती	फेब्रुवारी २०११	७१.५३	स्वयंपाकाच्या गॅससाठी मागणी नसल्यामुळे प्रकल्पात फक्त तीन MT कचऱ्यावर प्रक्रिया केली जात होती. निर्माण झालेला गॅस हवेत सोडला जात होता. वीज निर्मितीसाठी विद्युत जनित्र प्राप्त करण्यात आले नव्हते.
४.	पंढरपूर	६	वीज	ऑगस्ट २००८	५८.६०	संयंत्र व विद्युत जनित्राची दुरुस्ती व देखभाल प्रलंबित असल्यामुळे डिसेंबर, २०१३ पासून बंद आहे.
५.	वाशिम	५	वीज	सप्टेंबर २००९	२६.८०	कंत्राटदाराने दुर्लक्ष केल्यामुळे, प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकले नव्हते आणि ऑक्टोबर, २०१४ पर्यंत प्रकल्पाची सुरुवात झाली नव्हती. याच कारणास्तव कंत्राट फेब्रुवारी, २०१३ मध्येच रद्द करण्यात आले होते.
				एकूण	२२५.५८	

स्त्रोत : MCs नी सादर केलेली माहिती.

तक्ता ५ वरून असे दिसून येते की, रु. २.२६ कोटी खर्च करून उभारण्यात आलेले/अंशतः उभारलेले पाच बायोगॅस प्रकल्प दुरुस्ती आणि देखभालीच्या अडचणींमुळे तसेच कुकिंग गॅसला मागणी नसल्यामुळे त्यांच्या पूर्ण क्षमतेने वापरण्यात येऊ शकले नाहीत. MCs ने स्वयंपाकाच्या गॅससाठी असलेल्या कमी मागणीवर योग्य उपाययोजना करण्यासाठी कारणे शोधली नाहीत. तसेच, कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याद्वारे कचरा टाकण्याच्या जागेचा भार हलका करण्याचे मूळ उद्दिष्टही साध्य होऊ शकले नव्हते.

ज्ञापन :

१.३३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

लेखापरीक्षण पथकाने पाहणी केलेल्या ५ बायो-गॅस प्रकल्पांची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे :—

(१) **पनवेल.**—पनवेल नगरपरिषदेचा बायोगॅस प्रकल्प सन २००८ पासून २०१४ पर्यंत सुरू होता. प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या गॅसचा वापर नागरिकांनी स्वयंपाकाच्या गॅसकरीता देण्याचा प्रयत्न होता, परंतु मागणी नसल्याने प्रकल्प चालू शकला नाही. तसेच, प्रकल्पाचे तांत्रिक दुरूस्तीचे काम मोठ्याप्रमाणात असल्याने प्रकल्प सन २०१४ पासून बंद आहे. सदर प्रकल्प पुन्हा चालू करण्यासाठी जुलै, २०१३ मध्ये निविदा मागवण्यात आल्या प्राप्त निविदांपैकी न्युनतम दराच्या निविदाधारकाने निवदेतील दर वाटाघाटीने कमी करण्यास असमर्थता दर्शविली असल्याने फेरनिविदा मागविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची कार्यवाही चालू आहे.

(२) MEDA या संस्थेने सदर प्रकल्पाची पाहणी केली असून, दुरूस्ती व आवश्यक मशिनरी खरेदीसाठी प्रस्ताव संस्थेमार्फत सादर करण्यात येणार आहे.

या प्रकल्पास IIT पवई तसेच ओम साई मनिषा एन्व्हायरो सिव्हिल प्रा. लि. पुणे, तसेच अन्य संस्थांच्या तंत्रज्ञांनी भेट दिली असून बायो-गॅस प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या गॅसपासून वीज निर्मितीद्वारे पथदिवे प्रज्ज्वलित करणेबाबतची पाहणी करण्यात आली आहे. या संस्थाकडून नगरपरिषदेस अद्याप कोणतेही प्रस्ताव प्राप्त झालेले नाहीत.

(३) **कुळगांव-बदलापूर.**—कुळगांव-बदलापूर नगर परिषदेचा बायो-गॅस प्रकल्प दिनांक ०२.०७.२०१५ रोजी पूर्ण झालेला असून जनरेटरद्वारा स्ट्रीट लाईटकरीता बायो-गॅस वापरणेबाबत कार्वाही सुरू आहे.

(४) **उरण.**—उरण नगरपालिकेचा बायोगॅस प्रकल्प दि. १४.०३.२०११ रोजी कार्यान्वित करण्यात आला. सदर प्रकल्प चालविण्यासाठी अवनी एन्टरप्रायजेस या प्रकल्प उभारणाऱ्या एजन्सीला देण्यात आला होता. नगरपरिषदेकडे बायोगॅस व विद्युत निर्मिती प्रकल्प चालविण्याकरिता कुशल व तांत्रिक कर्मचारी वर्ग नसल्याने प्रकल्प चालविण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या व कमी दराची निविदा मंजूर करण्यात आली परंतु, निविदाधारकाने करारपत्र व इतर पूर्तता केलेली नसल्याने एजन्सी नियुक्त करण्यात आली नाही. सबब नगरपरिषदेकडे उपलब्ध असणाऱ्या अकुशल कामगारांमार्फत प्रकल्प चालविण्यात आला. परंतु, पूर्ण क्षमतेने प्रकल्प चालविला जाऊ शकत नसल्यामुळे पुरेश्या प्रमाणात गॅस व विद्युत निर्मिती होऊ शकली नाही. या क्षेत्रातील तज्ञ व अनुभवी एजन्सीची नेमणूक करून पूर्ण क्षमतेने प्रकल्प चालविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) **पंढरपूर.**—पंढरपूर नगरपरिषदेच्या बायो-गॅस प्रकल्पाचे डोम लिकेज असल्यामुळे सदर बायो-गॅस प्रकल्प बंद पडलेला असून, दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आलेले आहे.

(६) **वाशीम.**—वाशीम नगरपरीषदेने ५ मे टन क्षमतेचा बायो-गॅस निर्मितीचा प्रकल्प उभारणीसाठी दि.१५.०५.२००९ रोजी मे एनव्ही एन्टरप्रायजेस, नाशिक या संस्थेस दिला होता. कंत्राटदाराने काम पूर्ण न केल्याने नगरपरषिदेने जुलै, २००९ जे एप्रिल, २०१२ या कालावधीत कंत्राटदारास वारंवार नोटीसा दिल्या, परंतु कंत्राटदाराकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने दि.२५.१०.२०१३ रोजी कंत्राटदाराचा करारनामा रद्द करण्यात आला. सदर अपूर्ण पूर्ण करण्यासाठी नव्याने निविदा काढून सदर कामासाठी लागणारा जास्तीचा खर्च कंत्राटदाराकडून वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

व्हर्मी/मेकॅनिकल कपोस्टींगच्या प्रकल्पांचा कमी उपयोग :

१.३४ निवड केलेल्या ३६ ६ MCs पैकी ६ MCs मध्ये कंपोस्ट तयार करण्यासाठी व्हर्मी/मेकॅनिकल कपोस्टींग प्रकल्प उभारले गेले होते जे तक्ता ६ मध्ये दिले आहे.

तक्ता ६ : व्हर्मी/मेकॅनिकल कपोस्टींग प्रकल्पांची स्थिती

अ.क्र.	MC चे नाव	कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची प्रकल्पाची तयारी (MT/प्रतिदिन)	बांधकामाचे वर्ष	ऑक्टोबर, २०१४ पर्यंत बांधकामा वरील आणि O & M वरील खर्च (रु. लाखात)	प्रकल्प सुरू करण्याच्या वर्षापासून ऑक्टोबर, २०१४ पर्यंत कंपोस्ट उत्पादित करण्याची क्षमता (MT मध्ये)	ऑक्टोबर, २०१४ पर्यंत प्रत्यक्ष उत्पादन (MT मध्ये)	व्हर्मी/मेकॅनिकल कपोस्टींग प्रकल्पांची स्थिती
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)
१.	सावंतवाडी	६	२००३	१३.३३	३९६	१५.१८	कंपोस्टची मागणी नसल्याने प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत नव्हता.
२.	चाळीसगाव	३०	२००४	७२.७०	१८००	४७०.६७	कंपोस्टची मागणी नसल्याने प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत नव्हता.
३.	फलटण	१०	२००३	३०.००	६६०	६३.१०	अपुऱ्या जैव विघटनशील कचऱ्या-मुळे प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत नव्हता. वीजपुरवठा खंडीत केल्या-मुळे कचरा विलग करण्याचे संयंत्र आणि कंपोस्ट संयंत्रात वापरले जाणारे तुषारयंत्र चालविण्यासाठी वीज उपलब्ध नसल्यामुळे वर्ष २००९ पासून प्रकल्प बंद पडला.
४.	पंढरपूर (मेकॅनिकल कंपोस्टींग)	४०	२०११	MC कडे उपलब्ध नाही	४८०	MC कडे उपलब्ध नाही	वर्ष २०१२ मध्ये प्रकल्प सुरू झाला. परंतु पूर्ण क्षमतेने कार्यरत नव्हता. वीज पुरवठा खंडीत केल्यामुळे कचरा विलग करण्याचे संयंत्र आणि कंपोस्ट संयंत्रात वापरले जाणारे तुषारयंत्र चालविण्या साठी वीज उपलब्ध नसल्यामुळे जानेवारी, २०१४ पासून प्रकल्प बंद पडला.
५.	नंदुरबार (मेकॅनिकल कंपोस्टींग)	१५	२००८ मध्ये कार्यारंभ आदेश दिले गेले	१२३.५२	५४०	–	ऑक्टोबर, २०१४ पर्यंत प्रकल्पाची सुरुवात झाली नव्हती.
६.	यवतमाळ	४०	२००८	१६३.७९	१०५०	१६५	जानेवारी, २००९ मध्ये प्रकल्प सुरू झाला. परंतु प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत नव्हता.
		एकूण	**४०३.३४**	**४९२६**	**७१३.९५**		

स्त्रोत : MCs नी सादर केलेली माहिती.

तक्ता ६ वरून असे दिसून येते की, सहा MCs मध्ये रु. ४.०३ कोटींची व्हर्मी/मेकॅनिकल कपोस्टींगसाठी गुंतवणूक करूनही, ऑक्टोबर, २०१४ पर्यंत अपेक्षित ४९२६ MT च्या तुलनेत फक्त ७१४ MT कंपोस्ट तयार झाले होते. प्रकल्पाचा उपयोग कमी केला गेल्यामुळे जैव विघटनशील कचरा लँडफिल साईटस् वर प्रक्रिया केल्यावाचून तसाच पडला होता.

४० MT MSW वर प्रक्रिया करण्याची क्षमता असलेला एक व्हर्मी कंपोस्ट प्रकल्प रु. १६३.७९ लाख खर्चून जानेवारी, २००९ मध्ये यवतमाळ MC ने सुरू केला होता. MC ने व्हर्मी कंपोस्ट प्रकल्पाच्या कार्यचालन आणि देखभालीचे काम उर्जित पास्तो (पहिला कंत्राटदार) या कंपनीस रु. १.२० लाख (एप्रिल ते डिसेंबर, २००९) रु. १३५ लाख (जानेवारी, २०१० ते मार्च, २०११) रु. १.४८ लाख (एप्रिल, २०११ ते मार्च, २०१२) इतक्या मासिक मोबदल्यावर ३६ महिन्यांसाठी दिले होते. कंपोस्ट निर्मितीसाठी प्रत्येक दिवशी २० ते २५ MT MSW चे विलग्नीकरण करणे, प्रकल्पावरील वीज व पाणी शुल्काचे प्रदान, कामगारांचे वेतन इत्यादी खर्च मासिक मोबदल्यात समाविष्ट होते. कंपोस्टच्या विक्रीतून प्राप्त होणारी रक्कम कंत्राटदाराने स्वत:कडे ठेवावयाची होती. सप्टेंबर, २०१२ ते मार्च, २०१५ या कालावधीत (३१ महिने) व्हर्मी कंपोस्टच्या कार्यचालन आणि देखभालीचे काम कनक एंटरप्रायजेस (दुसरा कंत्राटदार) यांना रु. १.८५ लाख निश्चित मासिक मोबदल्यावर देण्यात आले होते. कंत्राटात कंपोस्ट निर्मितीसाठी दररोज ४० MT MSW चे विलग्नीकरण करायचे होते. एप्रिल, २०१२ ते ऑगस्ट, २०१२ या मधल्या कालावधीत (पाच महिने) दुसऱ्या कंत्राटदाराशी कंत्राट अंतिम करण्यातील विलंबामुळे कंपोस्ट प्रकल्पांचा वापर करण्यात आला नव्हता.

लेखा परिक्षेत असे आढळून आले की, एप्रिल, २००९ ते ऑगस्ट, २०१४ दरम्यान MC च्या कंत्राटदारांनी दररोज आवश्यक असलेल्या २५ MT (मार्च, २०१२ पर्यंत)आणि ४० MT (ऑगस्ट, २०१५ पर्यंत) च्या तुलनेत MSW च्या पाच MT चे विलग्नीकरण केले होते. परंतु कंत्राटदारानुसार संपूर्ण MSW चे विलग्नीकरण जर कंत्राटदार करू शकला नाही तर मोबदल्यातून करावयाच्या वजावटीविषयी कोणतीही तरतूद कंत्राटात नव्हती. कंत्राटानुसार विलग्नीकरण करावयाच्या MSW च्या तुलनेत विलग्नीकरण केलेल्या आणि कंपोस्टींगसाठी वापरलेला MSW लक्षात घेता, MC ने कंत्राटदाराला रु. ७०.८० लाखाचे अतिरिक्त प्रदान केले होते.

अंतिम बैठकीत सचिव UDD यांनी असे नमूद केले की, कंत्राटदारांना केलेले अतिरिक्त प्रदान वसूल करण्यासाठी कारवाई करण्यात येईल.

ज्ञापन :

१.३५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :–

३६ नगरपरिषदेपैकी ६ नगर परिषदांमध्ये व्हर्मी/ मेकॅनिकल कंपोस्टींगचा प्रकल्प राबविण्यात आले आहेत. नगरपरिषदांचे अत्यल्प उत्पन्न, देखभाल दुरुस्ती करीता निधी उपलब्ध न होणे, प्रक्रियेनंतर उपलब्ध होणाऱ्या खतास मागणी नसणे या कारणामुळे ६ नगर परिषदांमधील व्हर्मी/ मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्पांचे कार्यचालन करण्यास नगरपरिषदा असमर्थ असल्याचे दिसून येते. ६ प्रकल्पांची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे :–

(१) सावंतवाडी : सावंतवाडी नगरपरिषदेचे व्हर्मी कंपोस्टींगचे ४ छोटे प्रकल्प होते त्यापैकी २ प्रकल्प चालू असून, बंद असलेले २ प्रकल्प पुन्हा सुरू करण्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे.

(२) चाळीसगांव : प्रकल्प चालू आहे.

(३) फलटण : प्रकल्प पाण्याअभावी बंद होता आता पिट भरण्याचे काम सुरू आहे.

(४) पंढरपूर : पंढरपूर नगरपरिषदेकडील मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्प आता चालू आहे.

(५) नंदूरबार : नंदूरबार नगरपरिषदेकडील मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्प आता चालू आहे.

यवतमाळ.–सावरगड येथील रहिवाशींनी कचरा डेपोबाबत आक्षेप घेतल्याने प्रकल्प मार्च, २०१५ पासून बंद आहे.

पर्यावरण अनुकूल पद्धतीने MSW ची विल्हेवाट न लावणे :

१.३६ लेखापरीक्षेला असे निदर्शनास आले की, सर्वच्या सर्व ३५ MCs प्रक्रिया न केलेल्या MSW केचे उपलब्ध असलेल्या लॅण्डफिल साईटसवर किंवा परस्पर खड्डयांमध्ये किंवा रस्त्याच्या कडांना किंवा जलसाठ्याजवळ अनधिकृतपणे डंपींग करीत होत्या.

तसेच या ३५ MCs पैकी फक्त आठ MCs कडे निर्देशित लॅण्डफिल क्षेत्रांमध्ये प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा उभारण्यासाठी वैध अधिकृतता होती.

सुरुवातीला १५ MCsना दिलेली अधिकृतता, MCs ने नुतनीकरणासाठी आवेदन सादर न केल्यामुळे डिसेंबर, २००३ ते सप्टेंबर, २०१४ दरम्यान रद्द झाली होती. उर्वरित १२ MCsमध्ये MPCB ने अधिकृत केल्या संबंधीचे कुठलेही दस्तऐवज उपलब्ध नव्हते.

ज्ञापन :

१.३७ महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखाकार कार्यालयाने तपासणी केलेल्या ३६ नगरपरिषदांमधील लॅन्डफिल क्षेत्रांमध्ये प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा उभारण्यासाठीच्या वैध अधिकृततेबाबतची माहिती खालीलप्रमाणे :—

- सन २०१६ पर्यंत MPCB चे वैध प्रमाणपत्र प्राप्त नगरपरिषदा - ०५
- सन २०१५ पर्यंत MPCB चे वैध प्रमाणपत्र प्राप्त नगरपरिषदा - ०५
- सन २०१५ पूर्वी MPCB च्या वैध प्रमाणपत्राची मुदत संपलेल्या व नूतनीकरणासाठी अर्ज केलेल्या नगरपरिषदा - ०९
- सन २०१५ पूर्वी MPCB च्या वैध प्रमाणपत्राची मुदत संपलेल्या व नूतनीकरणासाठीची कार्यवाही सुरू असलेल्या नगरपरिषदा - ०४
- सन २०१५ पूर्वी MPCB च्या वैध प्रमाणपत्राची मुदत संपलेल्या व नूतनीकरणासाठीचा प्रस्ताव सादर केला नसलेल्या नगरपरिषदा - ०३
- MPCB ची प्राथमिक मान्यता प्राप्त नगर परिषदा - ०१
- MPCB कडून नव्याने वैध प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी अर्ज केलेल्या नगरपरिषदा - ०२
- MPCB कडून वैध प्रमाणपत्र प्राप्त नसलेल्या नगरपरिषदा - ०८

सदर नगरपरिषदांचा तपशील खालीलप्रमाणे :—

अ.क्र.	नगरपरिषदेचे नांव	**MPCB** कडून वैधता प्राप्त/अप्राप्त	नूतनीकरणाबाबत सद्यस्थिती
(१)	(२)	(३)	(४)
१	वाशीम	३१.०८.२०१६ पर्यंत वैध.	प्रश्न उद्‌भवत नाही.
२	इचलकरंजी	३०.०८.२०१६ पर्यंत वैधता प्राप्त आहे.	प्रश्न उद्‌भवत नाही.
३	काटोल	३०.०१.२०१७ पर्यंत वैधता प्राप्त आहे.	प्रश्न उद्‌भवत नाही.
४	भंडारा	३०.०६.२०१६ पर्यंत वैधता प्राप्त आहे.	प्रश्न उद्‌भवत नाही.
५	उरण	०३.०२.२०१६ पर्यंत वैध.	प्रश्न उद्‌भवत नाही.
६	अक्कलकोट	सन २०१५ पर्यंत वैधता प्राप्त आहे.	प्रश्न उद्‌भवत नाही.
७	पंढरपूर	३१.१२.२०१५ पर्यंत वैधता प्राप्त आहे.	प्रश्न उद्‌भवत नाही.
८	लोणावळा	३१.१२.२०१५ पर्यंत प्राप्त.	प्रश्न उद्‌भवत नाही.
९	सावंतवाडी	३१.१२.२०१५ पर्यंत वैधता प्राप्त आहे.	प्रश्न उद्‌भवत नाही.
१०	हिंगोली	३१.१२.२०१५ पर्यंत वैधता प्राप्त आहे.	प्रश्न उद्‌भवत नाही.
११	बल्लारपूर	३१.०८.२०१४ पर्यंत वैध.	दि. ०७.०४.२०१५ रोजी प्रस्ताव सादर.
१२	तुळजापूर	३०.०९.२०१४ पर्यंत प्राप्त आहे.	दि. १६.१२.२०१५ रोजी प्रस्ताव सादर.
१३	हिंगणघाट	३०.०६.२०१४ पर्यंत प्राप्त.	दि. ३.३.२०१५ रोजी प्रस्ताव सादर.
१४	नंदूरबार	सन २०१४ पर्यंत वैधता प्राप्त आहे.	कार्यवाही सुरू आहे.
१५	उस्मानाबाद	३१.१२.२०१४ पर्यंत वैधता प्राप्त होती.	कार्यवाही सुरू आहे.
१६	नरखेड	३०.०६.२०१४ पर्यंत वैधता प्राप्त आहे.	कार्यवाही सुरू आहे.
१७	भुसावळ	३१.१२.२०१० पर्यंत वैधता प्राप्त आहे.	दि. १९.३.२०१४ रोजी प्रस्ताव सादर.

अ.क्र.	नगरपरिषदेचे नांव	MPCB कडून वैधता प्राप्त/अप्राप्त	नुतनीकरणाबाबत सद्यस्थिती
(१)	(२)	(३)	(४)
१८	सिन्नर	सन २०१० पर्यंत वैधता प्राप्त आहे.	दि. २०.०४.२०१४ रोजी प्रस्ताव सादर.
१९	मनमाड	डिसेंबर, २०१० पर्यंत प्राप्त.	दि. ०५.०६.२०१३ रोजी प्रस्ताव सादर केला आहे. जागेच्या वादामुळे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे MPCB परवाना अप्राप्त आहे.
२०	कुळगांव-बदलापूर	डिसेंबर, २०१० पर्यंत वैध होते.	नुतनीकरण प्रस्ताव सादर केलेला नाही.
२१	गोंदिया	३१.१२.२००७ पर्यंत प्राप्त आहे.	नुतनीकरण केलेले नाही.
२२	उमरखेड	२००४ पर्यंत वैध.	२००७ मध्ये प्रस्ताव सादर.
२३	अकोट	सन २००३ पर्यंत वैधता प्राप्त होती.	दि. ०६.१२.२००७ रोजी प्रस्ताव सादर.
२४	सिल्लोड	२००३ पर्यंत प्राप्त.	नुतनीकरण केलेले नाही.
२५	पनवेल	सिडकोने घेतले आहे.	दि. २०.१०.२०१५ रोजी प्रस्ताव सादर.
२६	मेहेकर	२०.१०.२०१५ रोजी MPCB कडे प्रस्ताव सादर केला आहे.	प्रश्न उद्‌भवत नाही.
२७	आळंदी	१४.१२.२०१५ रोजी MPCB कडे प्रस्ताव सादर केला आहे.	प्रश्न उद्‌भवत नाही.
२८	खामगांव	MPCB चे दि. १५.०७.२०१३ रोजीच्या पत्रानुसार प्राथमिक मान्यता प्राप्त आहे.	प्रश्न उद्‌भवत नाही.
२९	रत्नागिरी	प्राप्त नाही.	जागेच्या वादामुळे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्यामुळे MPCB परवाना अप्राप्त आहे.
३०	दोंडाईचा वरवाडे	प्राप्त नाही.	कार्यवाही सुरू आहे.
३१	शिर्डी	प्राप्त नाही.	कार्यवाही सुरू आहे.
३२	जालना	प्राप्त नाही.	
३३	चाळीसगांव	प्राप्त नाही.	
३४	यवतमाळ	प्राप्त नाही.	
३५	उद्‌गीर	प्राप्त नाही.	
३६	फलटण	प्राप्त नाही.	

ज्या नगरपरिषदांनी अद्यापही MPCB कडून वैध प्रमाणपत्र घेतलेले नाही अथवा नुतनीकरण केलेले नाही अशा नगरपरिषदांनी याबाबत तातडीने कार्यवाही करावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

कत्तलखान्याचे अवैध कार्यचालन

१.३८ पाणी (प्रदूषण, प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा १९७४ आणि वायु (प्रदूषण, प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९८१ मधील तरतुदींनुसार, कत्तलखाना सुरू करण्यासाठी कत्तलखाने चालविणाऱ्यांसाठी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणे आवश्यक होते आणि प्राण्यांच्या कत्तलीमधून निर्माण होणाऱ्या उत्सर्जनावर प्रक्रिया करण्यासाठी उत्सर्जन प्रक्रिया प्रकल्प (ETPs) प्रस्थापित करणे बंधनकारक होते.

३६ निवड केलेल्या MCsपैकी ज्या १६ MCs मध्ये कत्तलखाने चालत होते त्यातील फक्त सात MCs नी MPCB ची परवानगी घेतली होती. सात MCs पैकी चार MCs ना सुरवातीला MPCB ने दिलेली परवानगी मार्च, २०१० ते ऑक्टोबर, २०१४ दरम्यान रद्द झाली

होती. या चार MCs पैकी तीन MCs नी परवानगी नूतनीकरणासाठी आवेदन केले नव्हते तर एका MC ने नूतनीकरणासाठी (बल्लारपूर) जरी आवेदन मे, २०१३ मध्ये केले होते तरी ऑक्टोबर, २०१४ पर्यंत MPCB ने नूतनीकरण करून दिले नव्हते. MPCB कडून बल्लारपूर MC ला नूतनीकरण न करून देण्याविष्ययीची कारणे लेखापरीक्षेला सादर केली नव्हती. अशाप्रकारे १३ MCs MPCB च्या संमतीशिवाय अनधिकृतरित्या कत्तलखाने चालवित होते. परिणामी कत्तलखान्यातून होणारे उत्सर्जन उघड्या गटारांमध्ये सोडले जात होते जे अंतिमतः जलाशयांना जाऊन मिळत असल्यामुळे जलाशये प्रदूषित होत होती.

ज्ञापन :

१.३९ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापाल कार्यालयाने तपासणी केलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी २१ नगरपरिषदांमध्ये कत्तलखाने आहेत.

यापैकी ६ नगरपरिषदांचे कत्तलखाने वैध असून, ८ नगरपरिषदांनी कत्तलखान्याचे वैधता प्रमाणपत्र नुतनीकरण करण्यासाठी MPCB कडे प्रस्ताव सादर केला आहे.

उर्वरित ७ नगरपरिषदांचे कत्तलखाने अवैध आहेत.

ज्या नगरपरिषदांनी कत्तलखान्यासाठी MPCB कडून अद्यापही वैध प्रमाणपत्र घेतलेले नाही अथवा नुतनीकरण केलेले नाही अशा नगरपरिषदांनी याबाबत तातडीने कार्यवाही करावी अशा सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत.

जैव वैद्यकीय कचऱ्याचे व्यवस्थापन :

१.४० भारत सरकारने जुलै, १९९८ मध्ये जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, १९९८ (BMW नियम) अधिसूचित केला होता जो नियम अशा सर्व व्यक्तींना जे असा कचरा कुठल्याही स्वरुपात निर्माण करतात, संकलित करतात, प्राप्त करतात, साठवणूक करतात, वाहतूक करतात, प्रक्रिया करतात, विल्हेवाट लावतात किंवा हाताळतात त्या सगळयांना लागू होतो. BMW नियमांनुसार, MC च्या कार्यकक्षेतील आरोग्य केंद्रे जसे, प्रत्येक रुग्णालय, चिकित्सालय, प्रयोगशाळा, रक्तपेढीने त्यांच्याकडे निर्माण झालेला जैव वैद्यकीय कचरा (BMW) (जसे की रक्त, वापरलेला कापूस, सिरिंज, कॅथेटर्स इत्यादी) स्वतः किंवा इतर संस्थेमार्फत शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करणे आवश्यक आहे. BMW हानीकारक असतो आणि MPCB ने प्रत्येकप्रकारच्या BMW साठी विहीत केलेल्या निश्चित प्रक्रियेनुसार ती नष्ट करणे आवश्यक असते अन्यथा इतर सजिवांना रोगाचा प्रादूर्भाव/लागण होऊ शकते. आवेदन प्राप्त झाल्यावर MPCB शासकीय किंवा खाजगी संस्थांना BMW वर प्रक्रिया करण्यासाठी प्राधिकृत करते. लेखापरीक्षेत खालील बाबी आढळून आल्या :

- MCs च्या कार्यकक्षेतील सर्व आरोग्य केंद्रे त्यांच्याकडे निर्माण होणाऱ्या जैव वैद्यकीय कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावत आहेत याची सुनिश्चिती करण्याची जबाबदारी MCs ची आहे. यासाठी प्रत्येक MCs कडे त्यांच्या कार्यकक्षेत कार्यरत असलेल्या आरोग्य केंद्राचा परिपूर्ण माहितीसंच उपलब्ध असणे आवश्यक होते. निवडलेल्या ३६ पैकी आठ MCs मध्ये सगळी आरोग्य केंद्रे BMW वर विहित केलेल्या नियमांनुसार प्रक्रिया करीत होती.
- उर्वरीत २८ MCs पैकी १७ MCs त्यांच्या कार्यकक्षेतील एकूण ११६१ आरोग्य
- केंद्रांपैकी फक्त ७१२ आरोग्यकेंद्र (६१ टक्के) BMW वर प्रक्रिया करत होती. अशा प्रकारे, ३९ टक्के आरोग्य केंद्रे BMW वर प्रक्रिया करत नव्हती ज्यामुळे व्यक्ती तसेच प्राण्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत होता. उर्वरित ११ MCs मध्ये सगळी आरोग्य केद्रे BMW वर विहित केलेल्या नियमांनुसार प्रक्रिया करीत होती.

सचिव, UDD यांनी अंतिम बैठकीत वस्तुस्थिती स्वीकारीत असे सांगितले की, BMW नियमांमध्ये सांगितलेल्या प्रमाणांची अंमलबजावणी करण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी केल्या जातील.

ज्ञापन :

१.४१ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखाकार कार्यालयाने तपासणी केलेल्या ३६ नगरपरिषदांमधील खाजगी संस्थेद्वारे जैव वैद्यकीय कचऱ्याची संकलन करून विल्हेवाट लावण्याबाबतच्या सद्यःस्थिती खालीलप्रमाणे आहे :–

(१) ज्या ८ नगरपरिषदांकडे आरोग्य केंद्राची माहिती उपलब्ध नव्हती त्या सर्व नगरपरिषदांकडे माहिती उपलब्ध असून त्यांचेकडून खाजगी संस्थेद्वारे जैव वैद्यकिय कचऱ्याचे संकलन करून विल्हेवाट लावण्यात येत आहे.

(२) ज्या १७ नगरपरिषदांमध्ये जैव वैद्यकीय कचऱ्याचे संकलन करून विल्हेवाट ६१ टक्के होत होती. त्यामध्ये सद्य:स्थितीत १०० टक्के जैव वैद्यकीय कचऱ्याचे संकलन करून विल्हेवाट लावण्यात येत आहे.

(३) तसेच उर्वरित ११ नगरपरिषदांमध्ये जैव वैद्यकीय कचऱ्याचे संकलन करून विल्हेवाट लावण्याचे काम यापूर्वीच होत होते.

१.४२ SLBs साध्य न करणे

MSW संबंधातील भारत सरकारने जुलै, २००८ मध्ये विहित केलेल्या SLBs च्या आठ निदर्शकांच्या बाबत तुलनेत निवड केलेल्या ३६ MCs मधील साध्य तक्ता ७ मध्ये दर्शविले आहे.

तक्ता ७ : २०१३-१४ दरम्यान GOI च्या SLBs शी तुलना करता मिळविलेले साध्य

SLB निदर्शक	राष्ट्रीय बेंचमार्क (टक्के)	SLB साध्य केलेल्या MCs ची संख्या	उर्वरीत MCs मधील SLB साध्य करण्याचे प्रमाण (साध्याचे प्रमाण टक्क्यांमध्ये)
MSW ची घरगुती पातळीवरील व्याप्ती	१००	१	३५ MCs(१-९८)
संकलनातील कार्यक्षमता	१००	६	३० MCs(६७-९९)
MSW विलग्नीकरणाचे प्रमाण	१००	०	३६ MCs(०-२५)
MSW च्या शास्त्रोक्त विल्हेवाटीचे प्रमाण	१००	०	३६ MCs(०)
SWM सेवातील खर्चाच्या वसुलीचे प्रमाण	१००	०	३६ MCs(०-४५)
MSW वसुलीचे प्रमाण	८०	१	३५ MCs(०-७०)
ग्राहक तक्रार निवारणातील कार्यक्षमता	८०	२९	७ MCs(४६-७७)
SWM शुल्क वसुल करण्यातील कार्यक्षमता	९०	१	३५ MCs(०-८१)

स्त्रोत :महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेली माहिती

यावरून असे दिसून येते की, ३६ MCsपैकी एकाही MC ला MSW चे संकलन, विलग्नीकरण, शास्त्रोक्त विल्हेवाट आणि सेवांच्या खर्चाच्या वसुलीबाबत राष्ट्रीय बेंचमार्क साध्य करता येऊ शकले नव्हते.

ज्ञापन :

१.४३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

SLB निदर्शक	राष्ट्रीय बेंचमार्क (टक्के)	SLB साध्य केलेल्या MCs ची संख्या	उर्वरित MCs मधील SLB साध्य करण्याचे प्रमाण (साध्याचे प्रमाण टक्क्यांमध्ये)
MSW ची घरगुती पातळीवरील व्याप्ती	१००	६	२९ MCs (०-९९)
संकलनातील कार्यक्षमता	१००	९	२७ MCs (०-९७)
MSW विलग्नीकरणाचे प्रमाण	१००	२	३४ MCs (०-८५)
MSW च्या शास्त्रोक्त विल्हेवाटीचे प्रमाण	१००	२	३६ MCs (०-९०)
SWM सेवातील खर्चाच्या वसुलीचे प्रमाण	१००	०	३६ MCs (०-८०)
MSW वसुलीचे प्रमाण	८०	०	३६ MCs (००)
ग्राहक तक्रार निवारणातील कार्यक्षमता	८०	२५	११ MCs (०-७७)
SWM शुल्क वसुल करण्यातील कार्यक्षमता	९०	२	३३ MCs (०-८०)

- **वाशिम**.–कचऱ्याचे विलग्नीकरण करण्याबाबत जनजागृती मोहिम राबवून योग्य प्रमाणात यश प्राप्त न झाल्याने याबाबत बॅनर्स, पोस्टर्सद्वारे जाहिरात करण्यात येत आहे. कचऱ्याचे विल्हेवाटीकरिता बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभारण्यात आला होता तथापि, कंत्राटदाराने काम पूर्ण करणेबाबत आवश्यक प्रतिसाद न दिल्याने त्याचे कंत्राट रद्द करून नव्याने निविदा काढून कंपोस्टिंग प्लँट उभारण्यात येत आहे. शुल्क वसूल करण्यातील कार्यक्षमता वाढविण्याकरिता जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.
- **उमरखेड.**–कचऱ्यापासून वीज निर्मिती प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव नगरपरिषद सर्व साधारण सभेत मंजुरीस्तव ठेवण्यात येत आहे. त्यास मंजुरीनंतर कामाचा प्रकल्प अहवाल तयार करून त्यास मंजुरी नंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल. कचरा विलग्नीकरणाबाबत शहरात जाहीर सूचना व जनजागृती कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नागरिकांमध्ये जागृती निर्माण होण्याकरिता शहरात बॅनर्स व पोस्टर्स लावण्यात येत आहेत.
- **नंदुरबार.**–नगर परिषदेच्या क्षेपण भूमीस सन २०१४ पर्यंत वैधता प्राप्त आहे. MPCB कडून वैधता प्राप्त करून घेण्याची कार्यवाही सुरू आहे. स्वामी समर्थ बायो-मेडिकल वेस्ट या खाजगी संस्थेद्वारे बायो-मेडिकल वेस्ट संकलन करून प्रक्रिया केली जाते.
- **दोंडाईचा-वरवाडे.**–कचऱ्याचे विलग्नीकरण करण्याबाबत नागरिकांना वेळोवेळी सूचना जनजागृती करूनही नागरिकांकडून प्रतिसाद न मिळाल्यामुळे विलग्नीकरण करण्याचे काम नगरपरिषद हद्दीत यशस्वी होण्यात अडचणी येत आहेत. भूमी भराव जागेचा वापर करण्यास संबंधित ग्रामपंचायतीने तीव्र विरोध केला होता याबाबत मा. जिल्हाधिकारी स्तरावर पाठपुरावा व बैठक होऊन दि. ९.६.२०१४ रोजी सदर जागेचा वापर करण्यास मान्यता मिळाली आहे. कचरा संकलन, विलग्नीकरण करणेबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.
- **जालना**.–कचऱ्याचे संकलन व विलग्नीकरण करण्याबाबत पथदर्शी प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम पूर्ण झाल्यानंतर कचऱ्याचे संकलन व विलग्नीकरण पूर्ण क्षमतेने करण्यात येईल.
- **मनमाड.**–विलग्नीकरणाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नगरपरिषदेमार्फत कठोर कार्यवाही करण्यात येत आहे. प्लॅस्टिक पिशव्या वापर, विक्रीबाबत फौजदारी गुन्हे, जप्ती, दंडात्मक कार्यवाही इ. करणेत येणार आहे. सध्या कचरा डेपोच्या जागेबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे कचरा विल्हेवाट प्रकल्प राबविता येत नाही. न्यायालयीन निर्णय होताच घनकचरा व्यवस्थापन, हाताळणी, विल्हेवाटीचा प्रकल्प अहवाल तयार करून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
- **अक्कलकोट**.–कचऱ्याचे विलग्नीकरण करण्याबाबत जनजागृती करण्यात येत आहे. तथापि, त्यास नागरिकांचा योग्य प्रतिसाद मिळत नसल्याने नगरपरिषदेमार्फत शहरातील प्रत्येक कुटुंबास २ स्वतंत्र कचराकुंड्या देण्याचे प्रस्तावित आहे.
- **उरण**.–घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत बायोगॅस प्रकल्पाद्वारे गॅस निर्मितीची प्रकल्प देखभाल व दुरुस्तीकरीता बंद ठेवण्यात आला होता पण आता प्रकल्प लवकरच सुरू करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शुल्क वसुली व कचऱ्याच्या विलग्नीकरणाबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.
- **चाळीसगांव**.–घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचऱ्याचे विलग्नीकरण करणेकरिता नगरपरिषद स्तरावर बॅनर्स व पोस्टर्सद्वारे माहिती देणे, जनजागृती मोहिम राबवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे शुल्क वसुलीबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.
- **कुळगांव-बदलापूर**.–कचऱ्याचे विलग्नीकरण १०० टक्के होण्याकरिता नगरपरिषदेमार्फत कचऱ्याचे वर्गीकरण करणाऱ्या कुटुंबास घनकचरा व्यवस्थापन सेवाशुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे सदरचे उद्दिष्ट साध्य होईल तसेच शास्त्रोक्त विल्हेवाटीकरिता निसर्गऋण बायोगॅस प्रकल्पाद्वारे वीज निर्मिती करण्यास नुकतीच सुरुवात केली आहे.
- **रत्नागिरी**.–घनकचरा प्रकल्पाच्या जागेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. या जागेपर्यंत जाणारा रस्ता खाजगी मालकीच्या जागेतून जात आहे. त्यामुळे संबंधित ग्रामपंचायतीचा त्यास विरोध आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने कचऱ्याचे विलग्नीकरण करून प्रक्रिया करणे शक्य झालेले नाही. सदर पोहच रस्त्याची जागा डिसेंबर, २०१४ मध्ये नगरपरिषदेच्या ताब्यात मिळाली आहे. त्यामुळे आता कचऱ्याचे संकलन, विलग्नीकरण व विल्हेवाट याबाबतचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यास मंजुरीनंतर पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
- **नरखेड.**–पर्यावरण अनुकूल पद्धतीने MSW ची विल्हेवाट लावण्याकरीता निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. १०० टक्के संकलन करणे व कचऱ्याची विल्हेवाट लावणे इ. करीता १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत प्रस्तावास मान्यता मिळाली असून, त्याबाबतची निविदा प्रक्रिया करण्यात आलेली आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण होताच कामाचे कार्यादेश देऊन घनकचरा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

- **भुसावळ**.–घनकचरा संकलन करिताच्या १७ घंटागाड्या नादुरुस्त/निकामी झाल्याने बंद आहेत त्यामुळे संकलन पूर्ण क्षमतेने होऊ शकत नाही. याकरिता नवीन गाड्या खरेदीचा प्रस्ताव सादर केला आहे. या प्रस्तावास मंजुरीनंतर संकलन क्षमता वाढेल. त्याचप्रमाणे घनकचरा व्यवस्थापनाकरिता कर्मचारी वर्ग कमी पडत असल्याने तसेच जनजागृती होत नसल्याने उद्दिष्ट पूर्ण होण्यास अडचणी येत आहेत. याप्रकरणी संकलन व विलग्नीकरणाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी नगरपरिषद स्तरावर बॅनर्स व पोस्टर्सद्वारे माहिती देणे, जनजागृती मोहिम राबवण्यात येत आहे.
- **अकोट**.–कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिताची जागा रहिवास क्षेत्रात येत असल्याने MPCB च्या निर्देशानुसार त्याठिकाणी घनकचरा प्रकल्प राबविता येत नाही. याबाबत सदर क्षेत्र रहिवास क्षेत्रातून वगळण्याबाबत शहर विकास योजनेमध्ये फेरबदलाची कार्यवाही करण्यात येत आहे.
- **तुळजापूर**.–क्षेपण भूमीस MPCB कडून सप्टेंबर, २०१४ पर्यंत ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त असून, दि. ६.१२.२०१४ रोजी नुतनीकरणाकरिता प्रस्ताव सादर केला आहे. कचरा संकलित करून आच्छादित करून वाहतूक केली जाते. कचरा विलग्नीकरण करणे प्रस्तावित आहे.
- **गोंदिया**.–घनकचरा व्यवस्थापनाकरिताच्या पूर्ण जागेचा ताबा अद्याप मिळालेला नाही. सदरचा ताबा मिळताच जागेस संरक्षक भिंत बांधूनच शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यात येईल.
- **खामगांव**.–नवीन क्षेपणभूमी विकसीत करणेकरिता प्रस्ताव विभागीय आयुक्त यांना सादर केला असून, त्यास मान्यता मिळताच कचरा संकलन, विलग्नीकरण, विल्हेवाट लावण्याच्या प्रकल्प अहवालास तयार करून कार्यवाही करण्यात येत आहे.
- **पंढरपूर**.–नगरपरिषद मालकीच्या ३३ एकर जागेवर टाकलेल्या कचऱ्याचे जागोजागी ढीग करून त्याच्यावर बायोकल्चरची फवारणी केली जाते. तसेच गोपाळपूर येथील गट नं. ३०२ या जागेत ओल्या कचऱ्यापासून गांडूळखत बनविण्याचा प्रकल्प सुरू आहे. तसेच ६ टन क्षमतेच्या बायोगॅस प्रकल्पाची उभारणी केलेली आहे.
- **सिन्नर**.–संकलन व विलग्नीकरणाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी नगरपरिषद स्तरावर बॅनर्स व पोस्टर्सद्वारे माहिती देणे, जनजागृती मोहिम राबवण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे संकलन, विलग्नीकरण व विघटन करण्यात अडचणी येत आहेत. तथापि, नगरपरिषद स्तरावर योग्य नियोजनाद्वारे आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.
- **इचलकरंजी**.–कचऱ्याचे विलग्नीकरण करणेबाबत जनजागृती मोहिम राबविणे, बॅनर्स व पोस्टर्सद्वारे जाहिरात करूनही नागरिकांमार्फत १०० टक्के विलग्नीकरण करण्यात येत नव्हते. त्यामुळे विलग्नीकरणाचे उद्दिष्ट साध्य होणेकरिता प्रत्येक कुटुंबास दोन स्वतंत्र कचराकुंड्या देणेचे प्रस्तावित आहे. कचऱ्याची विल्हेवाट खत निर्मितीद्वारे करण्याच्या प्रकल्पाचे काम मे. हायट्रोयर टेक्टोनिक्स या कंत्राटदारास दिले होते. पण कंत्राटदाराच्या गैरव्यवस्थापनामुळे प्रकल्प बंद होता सदर कंत्राटदारास ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याचे प्रस्तावित केलेनंतर त्याने दि. १२.०५.२०१५ पासून प्रकल्प अंशतः सुरू केला आहे. तसेच सध्याची क्षेपणभुमीची जागा अपुरी पडत असल्याने दुसऱ्या जागेची मागणी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे. त्याचप्रमाणे कचऱ्याची वाहतूक व हाताळणी MSW-२००० नुसार न केल्यास रु. ५००/- ट्रिप इतका दंड नगरपरिषद मार्फत कंत्राटदारास आकारण्यात येतो, त्याचप्रमाणे वसुलीकरिता नागरिकांमध्ये जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.
- **पनवेल.**–नगर परिषदेने घरस्तरावर कचरा विलग्नीकरणावर भर दिला असून, ११० ली. क्षमतेचे १०० बीन्स व ६०० ली. क्षमतेचे १५० बीन्स अशाप्रकारे बीन्स ठेवण्यात आले आहेत. सिडको प्राधिकरण यांनी घोटचाळ, तळोजा MIDC येथे विकसित केलेले क्षपण भूमीमध्ये SWM च्या नियमानुसार जमा झालेला कचरा वर्गीकृत करून विंड्रोज कॉम्पेस्टिंग द्वारे खत निर्मिती करण्यात येते.
- **काटोल.**–कचऱ्याच्या विल्हेवाटीकरिता २ टन क्षमतेचा बायोमिथेन गॅस प्रकल्प राबविण्यात आला होता तथापि, त्यामध्ये तांत्रिक बिघाड असल्याने त्याची तज्ज्ञांमार्फत तपासणी करण्यात आली आहे. तज्ज्ञांच्या अहवालानुसार डोमची भिंत व गॅस पाईप लिकेज असल्याने प्रकल्प बंद आहे. सदर प्रकल्प पुनश्चः सुरू करण्याकरिता निविदा प्रक्रिया करण्यात आली असून, लवकरच कार्यादेश देण्यात येत आहेत.
- **मेहेकर.**–१४ व्या वित्त आयोगांतर्गत कचरा संकलन, वाहतूक विलग्नीकरण प्रकल्पास नुकतीच मान्यता मिळाली असून पुढील कार्यवाही सुरू आहे.
- **आळंदी**.–'ग्रीनी द ग्रेट' या संस्थेमार्फत नागरिकांना ओला व सुका कचरा वेगळा करण्यासंबंधी ग्रुप मिटींग, कार्यशाळा, रुली, घरोघरी जाऊन जनजागृती करण्यात आली आहे. कचऱ्याची विल्हेवाट लावण्याकरिता खाजगी कंत्राटदाराशी करार केला आहे. त्यानुसार खत निर्मिती व प्लॅस्टिकपासून ऑईल निर्मिती करण्यात येणार आहे या कामी कार्यवाही चालू आहे.

- **बल्लारपूर**.–कचऱ्याच्या विलग्नीकरणा करिता कंत्राटदाराने पुरविलेले सेग्रिगेशन मशिन निकृष्ट दर्जाचे असल्याने ते स्विकारण्यात आले नाही. याबाबत पुढील कार्यवाही सुरू आहे.
- **लोणावळा**.–शहरातील सर्व कचरा उचलणेकरिता ठेकेदाराची नेमणूक केली असून, या ठेकेदारामार्फत सकाळी ६ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत कचरा गोळा केला जातो. घनकचरा उचलणाऱ्या सर्व वाहनांवर GPS मशिन बसविण्यात आल्या असून त्याचा व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टीमद्वारे अहवाल घेण्यात येतो.
- **यवतमाळ**.–नगरपरिषदेद्वारे MSW नियमानुसार २ स्वतंत्र कचराकुंडीची व्यवस्था करण्यात आली असून, गोळा झालेला कचरा बंदिस्त वाहनातून क्षेपण भूमीपर्यंत नेण्यात येतो व तेथे पुन्हा विलग्नीकरण करण्यात येते. क्षेपणभूमीवर व्हर्मीकम्पोस्टिंगचा प्रकल्प राबविण्यात येत आहे.
- **सावंतवाडी**.–घनकचरा सेवेच्या शुल्क वसुलीबाबत तसेच विलग्नीकरणाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.
- **शिर्डी**.–MSW घरगुती पातळीवरील व्याप्ती वाढविण्यासाठी 'ग्रीन द ग्रेट' या संस्थेची नेमणूक केली आहे. घंटागाड्यांची संख्या कमी होती ती आता वाढविण्यात आली आहे. शास्त्रोक्त विल्हेवाटीकरिता १०५ टन कचरा साईबाबा संस्थान यांच्या बायोगॅस प्रकल्पासाठी वापरण्यात येत आहे.
- **उद्‌गीर**.–घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबवण्याकरिता पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने कोणताही प्रकल्प राबविणे शक्य झालेले नाही. आवश्यक जागा मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला आहे.
- **फलटण**.–नगरपरिषदेमध्ये १० ते १५ टन ओला व सुका कचरा संकलित करण्यात येऊन कंपोस्ट डेपोमध्ये टाकण्यात येतो. सदरच्या कचऱ्यावर न.प. ने १० टन क्षमतेचा गांडूळखत प्रकल्प सुरू केला आहे.
- **हिंगोली.**–नगरपरिषदेमार्फत ओला व सुका कचरा गोळा केला जातो व राहोली खुर्द येथे ४ हेक्टर जमीन घेण्यात आली असून तेथे टाकण्यात येतो.
- **हिंगणघाट**.–८ प्रभागातील घराघरातील कचरा संकलनाकरिता १० नग ४ व्हिलर ऑटोद्वारे संकलनाचे काम सुरू असून १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून सग्रीगेशन मशिन खरेदी, कंम्पोस्टींगद्वारे खत तयार करणे प्रस्तावित असून कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे प्रस्तावित आहे.
- **उस्मानाबाद**.–नगरपरिषदेने २.९ हेक्टर जागा घेतली असून, त्याला बंदिस्त कंम्पाउंड केले आहे. त्यात सॅग्रीगेशन सेल, मशीन प्लॅटफॉर्म इ. व्यवस्था केली आहे.
- **सिल्लोड.**–सेग्रीगेशन मशीन नसल्याने कचऱ्याचे सेग्रीगेशन होत नव्हते, आता मशीन नुकतीच खरेदी केली आहे. त्याचप्रमाणे पाण्याची कमतरता असल्याने खत प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला नव्हता. आता पाणीपुरवठा योजना मंजुर झाल्याने खत प्रकल्प कार्यान्वित करण्यात येत आहे.

  भंडारा.–घनकचरा प्रक्रिया करण्याकरिता ठेकेदार नियुक्त करण्यात आला नव्हता, आता या कामाकरिता निविदा काढण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शुल्काची वसुली वाढवणे, कचऱ्याचे विलग्नीकरण करणे याबाबत जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.

सांडपाणी व्यवस्थापन :

१.४४ MMC अधिनियम नुसार MC मध्ये निर्माण झालेल्या सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी एखाद्या रस्त्यावर किंवा रस्त्याखाली किंवा कोणत्याही ठिकाणी सांडपाणी वाहीन्या, झाकलेले गटार, बोगदे, कलव्हर्टस्, नाले, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) इत्यादी बांधणे आणि ते सांडपाणी समुद्र, नदी इत्यादीमध्ये प्रवाहीत करण्याआधी त्यावर प्रक्रिया करणे ही बंधनकारक असलेली MCs ची कर्तव्ये आहेत. राष्ट्रीय बेंचमार्कमध्ये सर्व स्वच्छतागृहांची व्याप्ती, गटाराच्या जाळयांची सेवा आणि सांडपाणी प्रक्रियेची पर्याप्त क्षमता इत्यादी विहित केल्या होत्या.

निवड केलेल्या ३६ MCs मधील सांडपाणी व्यवस्थापनाची खालील बाबी पडताळून पहाण्यासाठी लेखापरीक्षेने तपासणी केली होती

- सांडपाणी जमा करण्यासाठी व त्याची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य पायाभूत सुविधा उपलब्ध होत्या.
- सांडपाण्याची संकलन आणि विल्हेवाट यात सुधारणा करण्यासाठीच्या योजना काटकसरीने कार्यक्षमतेने व प्रभावीपणे कार्यान्वित करण्यात आल्या होत्या आणि

केंद्र शासनाने सांडपाणी व्यवस्थापनासाठी विहीत केलेले SLBs साध्य करण्यात आले होते.

MCs मधील सांडपाण्याचे संकलन आणि विल्हेवाट यासाठीच्या पायाभूत सुविधांची पर्याप्तता :

१.४५ सांडपाण्याचे योग्य प्रकारे व्यवस्थापन होण्यासाठी स्वच्छतेच्या सुविधा सुधारण्यासाठी स्वच्छतागृहे सहज उपलब्ध असणे, गटारांशी थेट जोडणी उपलब्ध असणे, आणि STP पर्यंत वाहून आणलेले सांडपाणी अंतिम निचरा होण्याआधी त्यावर प्रक्रिया करण्यासाठी STP ची क्षमता पर्याप्त असणे आवश्यक असते. निवड केलेल्या ३६ MCs मध्ये २०१३-१४ दरम्यान २४७.१५ MLD इतके सांडपाणी निर्माण झाले होते. निवड केलेल्या ३६ MCs मध्ये वर्ष २०१३-१४ दरम्यान सांडपाणी संकलनाची आणि विल्हेवाटीसाठी उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधांची स्थिती तक्ता ८ मध्ये दिली आहे.

तक्ता ८ : निवड केलेल्या MCs मध्ये उपलब्ध असलेल्या सांडपाणी संकलनाची आणि पायाभूत सुविधांची २०१३-१४ मधील स्थिती—

निदर्शक	१०० टक्के राष्ट्रीय बेंचमार्कच्या तुलनेत टक्केवारीत उपलब्धता	MCs द्वारे साध्य केलेले प्रमाण			
		० टक्के	०१-५० टक्के	५१-८० टक्के	८१-१०० टक्के
स्वच्छतागृहांची व्याप्ती	४७-९८	असे काहीही प्रकरण नाही	२	१५	१९
गटारांच्या जाळयांच्या सेवांची व्याप्ती	०-५६	३२	३	१	०
गटारांच्या जाळयातून कार्यक्षमतेने केलेले संकलन	०-९६	३२	३	०	१
सांडपाणी प्रक्रीया क्षमतेची पर्याप्तता	०-१६०	३२	१	१	२

स्त्रोत : महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेली माहिती

वरील तक्ता ८ मधून खालील बाबी आढळून आल्या :

- एकाही MCs मध्ये तेथील नागरिकांसाठी घरगुती किंवा सार्वजनिक स्वच्छतागृहांची उपलब्धता १०० टक्के नव्हती. ज्या इमारतींसाठी घरगुती किंवा सार्वजनिक स्वच्छतागृहे उपलब्ध होती त्यांची व्याप्ती ४७ टक्के (वाशिम) ते ९८ टक्के (रत्नागिरी) होते.
- ३६ पैकी फक्त चार MCs मध्ये इमारतींचे सांडपाणी थेट जमिनीखालील गटारांमध्ये अथवा सांडपाणी संकलन वाहीन्यांमध्ये सोडले जात होते. इतर दोन MCs मध्ये (आळंदी व भुसावळ) जमिनीखालील गटार खूप जुने होते आणि ऑक्टोबर, २०१४ मध्ये कार्यरत नव्हते. त्यामुळे निर्माण झालेले सांडपाणी जवळच्या जलाशयात प्रवाहीत केले जात होते. उर्वरित ३० MCs मध्ये उघड्या गटारात किंवा पुराचे पाणी वाहून नेणाऱ्या गटारात सांडपाणी सोडले जात होते जे जवळच्या नदयांमध्ये प्रवाहीत होत होते. शोष खड्डयांमध्ये जमा झालेला सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना डंपिंग मैदानात टाकण्यात येत होता.
- चार MCs मधील सांडपाणी संकलनाची कार्यक्षमता (STP च्या इनलेट मध्ये जमा झालेल्या सांडपाण्याची एकूण निर्माण झालेल्या सांडपाण्याशी टक्केवारी) २३ टक्के ते ९० टक्के या दरम्यान होती आणि उर्वरीत ३२ MCs मध्ये शुन्य टक्के होती. अशाप्रकारे, व्यवस्थेमधून (जमिनीखालील व्यवस्था किंवा उघडी गटारे) सांडपाणी जमा करून ते प्रक्रियेसाठी पुढे पाठविण्याचे प्रमाण बहुतांश MCs मध्ये अत्यल्प होते.

फक्त दोन MCs मध्ये (शिर्डी व पंढरपूर) निर्माण झालेल्या संपूर्ण सांडपाण्यावर अंतिमतः विल्हेवाट लावण्यापूर्वी संपूर्णपणे प्रक्रिया करीत होते. उर्वरित ३४ MCs मध्ये २०८.५१ MLD एवढे सांडपाणी STP च्या अपर्याप्त क्षमतेमुळे किंवा ती कार्यरत नसल्यामुळे प्रक्रियेविना सोडले जात होते.

ज्ञापन :

१.४६ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

- केंद्र शासन पुरस्कृत स्वच्छ भारत अभियान व महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये घरगुती तसेच सार्वजनिक स्वच्छतागृह उभारण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत असून, या अंतर्गत सर्व स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये स्वच्छतागृहांची १०० % व्याप्ती होणार आहे.

- केंद्रशासनाचे CPHEEO विभागाचे निकषानुसार किमान १३५ LPCD पाणीपुरवठा असल्याशिवाय सांडपाणी योजनेचे प्रस्ताव मंजूर करता येत नसल्याने राज्यातील बहुतांशी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये सांडपाण्याचे संकलन व विल्हेवाट लावण्याबाबत पायाभूत सुविधा उपलब्ध नाहीत.
- महालेखाकार कार्यालयाने छाननी केलेल्या ३६ नगरपालिकापैकी UIDSSMT योजने अंतर्गत पनवेल, शिर्डी, गोंदिया, पंढरपूर, काटोल व इचलकरंजी या नगरपरिषदेचे भुयारी गटार योजनेचे प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत.
- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत नंदुरबार, लोणावळा, हिंगोली व वाशिम या नगरपरिषदांचे भुयारी गटार योजनेचे प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत.
- शिर्डी व पंढरपूर या नगरपरिषदांचे भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण झाले आहे.
- इचलकरंजी व लोणावळा नगरपरिषदेचे मध्ये अस्तित्वात असलेली भुयारी गटार योजना जीर्ण व अपुरी असल्याने सांडपाणी संकलनाची व्याप्ती कमी दिसून येते. तथापि, या नगरपरिषदांची सुधारीत भुयारी गटार प्रकल्प मंजूर असून सदरचे प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर सांडपाणी संकलनाची व्याप्ती वाढणार आहे.
- शिर्डी व पंढरपूर नगरपरिषदेचे भुयारी गटार योजनेचे काम पूर्ण झाले असल्याने या ठिकाणी सांडपाण्यावर संपूर्ण प्रक्रिया करून सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यात येते.
- त्याचप्रमाणे पनवेल, गोंदिया, काटोल, इचलकंरजी, नंदूरबार, लोणावळा, हिंगोली व वाशिम या ८ नगरपरिषदांच्या भुयारी गटार योजना वरीलप्रमाणे मंजूर असून त्या कार्यान्वित झाल्यानंतर नियमानुसार सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याची कार्यवाही सुरू होईल.

उर्वरित २६ नगरपरिषदांमध्ये भुयारी गटार योजना अद्याप मंजूर नाहीत.

जमिनीखालील गटारांसाठी भांडवली प्रकल्पांची अंमलबजावणी :

१.४७ जमिनीखालील गटारांची सुधारणा करण्यासाठी SLSC/GoM ने मार्च, २००८ ते फेब्रुवारी, २०१४ पर्यंत रु. ६१२.१७ कोटीचे दहा प्रकल्प (UIDSSMT अंतर्गत सात आणि MSJNA अंतर्गत तीन) मंजूर केले. ऑक्टोबर, २०१४ पर्यंतची प्रकल्पाची स्थिती तक्ता ९ मध्ये दिली आहे.

तक्ता ९ : जमिनीखालील गटार यंत्रणेसाठी हाती घेतलेल्या भांडवली प्रकल्पांच्या अंमलबजावणीची स्थिती

अ.क्र.	MC चे नांव	मंजूर खर्च (रु. कोटीत)	निविदा किंमत (रु. कोटीत)	मंजुरीची तारीख	कंत्राट दिल्याची तारीख	ऑक्टोबर, २०१४ पर्यंतचा खर्च (रु. कोटीत)	कामाची स्थिती
				UIDSSMT			
१	गोंदिया	१२५.७२	निविदा बोलाविली नाही	१८.०६.२०१३	-	-	काम सुरू झाले नाही
२	शिर्डी	२४.२६	३७.९५	२८.०९.२००६	१३.०८.२००९	३७.०४	काम सुरू झाले
३	पंढरपूर	३१.७५	५७.००	०४.०५.२००७	२७.१०.२००९	३१.७५	काम सुरू झाले
४	कुळगांव बदलापूर	१५१.४६	२२६.४३	२९.१२.२००८	१५.०२.२०१०	१६२.१५	अपूर्ण
५	हिंगोली	६१.६१	निविदा बोलाविली नाही	२०.०७.२०१३	-	-	निधी मुक्त न केल्यामुळे काम सुरू झाले नाही
६	पनवेल	३१.०७	४९.४१	०१.०३.२००८	STP साठी ऑगस्ट, २००९ आणि गटारांसाठी फेब्रुवारी, २०१०	३१.७२	अपूर्ण

अ.क्र.	MC चे नांव	मंजूर खर्च (रु. कोटीत)	निविदा किंमत (रु. कोटीत)	मंजुरीची तारीख	कंत्राट दिल्याची तारीख	ऑक्टोबर, २०१४ पर्यंतचा खर्च (रु. कोटीत)	कामाची स्थिती
७	इचलकरंजी	८२.६०	९७.४५	०४.०२.२०१४	२८.०८.२०१४	२०.५०	अपूर्ण
				MSJNA			
८	नंदूरबार	४७.३७	४९.८९	०२.०२.२०१०	१७.०७.२०१०	१९.२१	अपूर्ण
९	लोणावळा	२१.५२	२६.०१	३१.०३.२०१०	३१.१०.२०११	१.५०	अपूर्ण
१०	वाशिम	३४.८१	३१.८८	२५.११.२०१०	३१.१२.२०१२	६.५४	अपूर्ण
	एकूण	६१२.१७					

स्त्रोत : लेखापरीक्षेने MCs कडून संकलित केलेली माहिती

तक्ता ९ वरून असे दिसून येते की, शिर्डी आणि पंढरपूर MCs मधील दोन प्रकल्पांचे काम सुरू झाले होते. सहा प्रकल्पांमध्ये प्रकल्पास मंजुरी मिळाल्याच्या तारखेपासून कंत्राट देण्यात १३ ते ३४ महिन्यांचा विलंब लागला जो कामाचे कार्यान्वयन MJP ने करावे की MC ने याविषयीचे मतभेद दूर न होणे, केंद्र शासन/महाराष्ट्र शासनाने निधी विलंबाने मुक्त करणे/निधी मुक्त न करणे, कंत्राटदाराने काम सोडून देणे इत्यादी कारणांमुळे झाला होता.सात प्रकल्पात सुरुवातीच्या मंजूर किंमतीपेक्षा निविदेच्या किंमतीत रु. १५१.११ कोटींची वाढ दिसून आली. पाच प्रकल्पात कंत्राटात काम पूर्ण होण्यासाठी जी तिथी निर्धारित केली होती त्यापेक्षा सहा महिने ते ३६ महिने इतका वाढीव कालावधी लागला होता. हा वाढीव कालावधी अराखड्यात बदल केल्यामुळे, कंत्राटदाराने काम अर्धवट सोडल्यामुळे, काम पूर्ण करण्याविषयी कंत्राटदाराची शिथीलता इत्यादींमुळे लागला होता.

तक्ता ९ मध्ये दर्शविलेल्या १० प्रकल्पांपैकी तीन प्रकल्पांवरील लेखापरीक्षा निष्पत्तीबाबत खाली चर्चा केली आहे.

- गोंदिया MC मध्ये जमिनीखाली गटारे प्रस्थापित करण्याच्या कामासाठी UIDSMT अंतर्गत मार्च, २०१२ मध्ये रु. ८२.३३ कोटींसाठी मंजुरी देण्यात आली (संदर्भ : तक्ता ९, अनु.क्र. १). तथापि, कामाच्या दोन बाबींबाबतच्या (नवीन गटारांशी घरे/इमारती जोडणे आणि रस्त्यांचे बांधकाम पूर्ववत करणे) अपूर्ण अंदाजपत्रकामुळे जून, २०१३ मध्ये रु. १२५.७१ कोटींची वाढीव किंमतीची सुधारित मंजुरी जारी करावी लागली होती. जून, २०१३ मध्ये सुधारित मंजुरी जारी करूनही ऑक्टोबर, २०१४ पर्यंत या कामाची सुरुवात होऊ शकली नाही कारण हे काम MJP मार्फत करावे की MC ने करावे याबाबतचा निर्णय अखेर मार्च, २०१४ मध्ये घेण्यात आला होता.

  सचिव UDD यांनी अंतिम बैठकीत असे सांगितले की, कामाची सुरुवात वेळेत करण्यासाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या जातील आणि ज्या ठिकाणी कालापव्यय जास्त झाला असेल त्या ठिकाणची अनुदाने काढून घेतली जातील.

- केंद्र शासनाने पनवेल MC ला UIDSSMT अंतर्गत रु. ३१.०७ कोटी खर्चास STP(१४ MLD क्षमतेचे) आणि ४२.४६ कि.मी. जमिनीखालील गटार बांधण्याचे काम मंजूर केले होते (मार्च, २००८) (संदर्भ : तक्ता ९ अनु. क्र. ६). मुख्य अभियंता MJP पुणे यांनी फेब्रुवारी, २००८ मध्ये रु. ३७.०२ कोटीच्या कामास तांत्रिक मंजुरी दिली होती. ऑगस्ट, २००९ मध्ये कंत्राटदाराला रु. १५.४४ कोटी किंमतीस STP बांधण्याच्या कामासाठी कार्यादेश देण्यात आले होते. STP चे बांधकाम वर्ष २०१३ मध्ये पूर्ण झाले होते आणि त्यावर रु. १५.०६ कोटी इतका खर्च झाला होता. ४२.४६ कि.मी. जमिनीखालील गटार बांधावयाचे काम दुसऱ्या एका कंत्राटदाराला रु. २८.९७ कोटीस फेब्रुवारी, २०१० मध्ये देण्यात आले जे फेब्रुवारी, २०१२ पर्यंत पूर्ण करायचे होते. लेखापरीक्षेत असे आढळून आले की, ऑक्टोबर, २०१४ पर्यंत रु. १४.७२ कोटी खर्चून फक्त १६.०४ कि.मी. (३८ टक्के) गटार बांधण्याचे काम पूर्ण करण्यात आले होते. त्यामुळे, स्वतंत्र इमारती गटारांशी जोडल्या जाऊ शकल्या नाहीत.परिणामी रु. १५.०६ कोटी खर्चून वर्ष २०१३ ला आधीच बांधलेल्या STP ची ऑक्टोबर, २०१४ पर्यंत चाचणीही होऊ शकली नाही.

- GOM ने MSJNA अंतर्गत रु. २१.५२ कोटी (संदर्भ : तक्ता ९ अनु. क्र. ९) किंमतीच्या जमिनीखालील गटार व्यवस्थेत वाढ करण्यासाठी एका प्रकल्पाला मंजुरी दिली (मार्च, २०१०). MC ने हे काम एका कत्राटदारास रु. २६.०१ कोटी किंमतीस एप्रिल,

२०१४ ला पूर्ण करण्याच्या अटीवर दिले (ऑक्टोबर, २०११). कंत्राटदाराने कंत्राटातील अटींनुसार दि नांदेड मर्चंट्स कोऑपरेटिव्ह बँक लिमिटेड, नांदेड यांनी जारी केलेले रु. ६५.०२ लाखाची सुरक्षा ठेव, डिपॉझिट कॉल रिसिट्सच्या स्वरुपात सादर केले.

कंत्राटदाराच्या विनंतीवरून (मे, २०१२) कंत्राटात तरतूद नसतानाही MC ने रु. १.५० कोटी व्याज धारण सुसज्जता अग्रिम (MA) दिला (जून, २०१२). MC ने त्यासाठी कंत्राटदाराकडून त्यास अनुरूप अशी बँक हमीही घेतली नव्हती.

फेब्रुवारी, २०१३ मध्ये पेण MC ने लोणावळा MC ला कळविले की, याच कंत्राटदाराने पेण MC च्या कार्यकक्षेतील पूर्वी केलेल्या कामासाठी बनावट CDRs सादर केले होते. त्यावेळी लोणावळा MC ने कंत्राटदाराने सादर केलेल्या CDRs ची वैधता तपासून बघितली आणि ते बनावट असल्याचे उघडकीस आले. जेव्हा ही फसवणूक कंत्राटदाराला दर्शविली गेली तेव्हा कंत्राटदाराने मार्च, २०१३ मध्ये रु. ६५ लाख रकमेचे सुरक्षा ठेवीचे नवीन धनाकर्ष सादर केले. MC ने हे DDs रोख रकमेत बदलून घेतले आणि MA वरील व्याजापोटी रु. ३८.९५ लाख आणि मुद्दलाचे रु. २६.०५ लाख असे समायोजित करून घेतले. कंत्राटदाराविरुद्ध पोलिसात तक्रार नोंदविण्यात आली (नोव्हेंबर, २०१३) आणि कंत्राट डिसेंबर, २०१३ मध्ये रद्द केले गेले. कंत्राटदाराचा ठावठिकाणा माहित नसल्यामुळे MC ऑक्टोबर, २०१४ पर्यंत MA च्या मुद्दल रकमेच्या उर्वरित रकमेची (रु. १.२४ कोटी) वसुली करण्यास असमर्थ ठरली होती. MC ने कामाचे रु. २५.१० कोटीचे नवीन अंदाजपत्रक तयार केले होते जे ऑक्टोबर, २०१४ पर्यंत तांत्रिक मंजुरीसाठी प्रलंबित होते.

अशा प्रकारे जमिनीखाली गटार व्यवस्थेत वाढ होण्याचे काम जे एप्रिल, २०१४ पर्यंत पूर्ण करायचे होतेत्या कामाची ऑक्टोबर, २०१४ पर्यंत सुरुवातही झाली नव्हती आणि केवळ निष्काळजीपणामुळे MC ला रु. १.२४ कोटीची हानी सहन करावी लागली होती. तसेच कंत्राटदाराकडून देय असलेल्या रकमांची वसुली न करता कंत्राट रद्द करण्याची MC ची कृती नियमबाह्य होती.

सचिव UDD यांनी सत्य स्वीकारत असे सांगितले की, कंत्राटदाराला MA चे प्रदान करण्यापूर्वी शासनाच्या वित्त विभागाच्या सूचना पाळल्या जातील.

ज्ञापन :

१.४८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

UIDSSMT अंतर्गत मंजूर केलेल्या सात पैकी शिर्डी, पंढरपूर व पनवेल या नगरपरिषदांचे भुयारी गटार योजनेचे प्रकल्प पूर्ण झालेले आहेत.

- **गोंदिया** नगर परिषदेच्या भुयारी गटार योजनेस मंजुरी प्राप्त असून सदर काम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करून घेण्याचे निर्देश दिनांक २७/०८/२०१५ च्या शासन निर्णयाद्वारे देण्यात आलेले आहेत.
- **कुळगांव बदलापूर** नगरपरिषदेच्या भुयारी गटार योजनेस UIG अंतर्गत मान्यता देण्यात आलेली असून सदर योजनेचे ९० टक्के काम पूर्ण झालेले आहे.
- **हिंगोली** नगर परिषदेच्या भुयारी गटार योजनेस UIDSSMT अंतर्गत मान्यता देण्यात आली होती व निधी मंजुरीसाठी प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला होता. परंतु केंद्राकडून निधी प्राप्त होऊ न शकल्याने आता सदर योजनेसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियाना अंतर्गत मंजुरी देण्यात आली आहे.
- **इचलकरंजी** नगर परिषदेच्या भुयारी गटार योजनेस माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये मंजुरी व माहे मे, २०१४ मध्ये निधी देण्यात आला आहे. योजनेचे ३५ टक्के काम पूर्ण झालेले असून निविदेतील अटीनुसार सदर योजना सन २०१६ च्या ऑगस्ट महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे.

  महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियाना अंतर्गत मंजुरी देण्यात आलेल्या भुयारी गटार योजनांबाबतची सद्य:स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

- **नंदुरबार** नगर परिषदेच्या भुयारी गटार योजनेचे ५५ टक्के काम पूर्ण झालेले आहे.
- **लोणावळा** नगरपरिषदेच्या भुयारी गटार योजनेस दिनांक ३१/०३/२०१० रोजी मान्यता देण्यात आली होती, त्यानुसार माहे ऑक्टोबर, २०११ मध्ये कामाचे कार्यादेश देण्यात आले होते, परंतु कंत्राटदाराने खोटी बँक गॅरंटी देऊन फसवणूक केल्याने सदर कंत्राट रद्द करण्यात आले व नवीन प्रस्तावास MJP ची तांत्रिक मान्यता घेऊन सदर प्रस्ताव सहमतीसाठी माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये IIT, मुंबई कडे सादर करण्यात आलेला आहे.

  वाशीम नगर परिषदेच्या भुयारी गटार योजनेचे ७५ टक्के काम पूर्ण झालेले असून सदर योजना सन २०१६ च्या पूर्वार्धात पूर्ण होईल.

जमिनीखालील गटारांच्या व्यवस्था कामांची धिमी अंमलबजावणी :

१.४९ फेब्रुवारी, २०१० च्या शासन निर्णयानुसार, नगरपालिका क्षेत्रांमध्ये १३५ lpcd पाणीपुरवठा करण्याच्या हेतूने पाणी पुरवठ्याची वाढ करण्याचे काम जमिनीखालील गटार व्यवस्थेच्या परिपूर्ण कामाशी अनुषंगिक असे करायला हवे. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, ३६ निवड केलेल्या MCs पैकी जरी पांच MCs नी १३५ lpcd पाणीपुरवठा वाढ करण्याचे काम ६४ ते १०० टक्के पूर्ण केले होते तरीही, या MCs मधील जमिनीखालील गटाराच्या कामांना ऑक्टोबर, २०१४ पर्यंत सुरुवात झाली नव्हती किंवा ३ ते ३९ टक्के या प्रमाणात अंशतः पूर्ण झाली होती.याबाबतचा तपशील तक्ता १० मध्ये दर्शविला आहे.

तक्ता १० : पाणीपुरवठा सुधारणा कामाच्या तुलनेत जमिनीखालील गटारांच्य कामाची स्थिती

MCs चे नाव	पाणीपुरवठा सुधारण्याच्या कामाच्या मंजुरीचा दिनांक	कामाची भौतिक प्रगती (टक्केवारीत)	जमिनीखालील गटार व्यवस्थेच्या मंजुरीची तारीख	कामाची भौतिक प्रगती (टक्केवारीत)
गोंदिया	जुलै, २००८	७३	जून, २०१३	सुरू झाले नाही
वाशिम	डिसेंबर, २००६	७१	नोव्हेंबर, २०१०	३९
हिंगोली	सप्टेंबर, २००७	६४	जुलै, २०१३	सुरू झाले नाही
नंदूरबार	मार्च, २००८	१००	फेब्रुवारी, २०१०	३९
इचलकरंजी	सप्टेंबर, २००७	१००	फेब्रुवारी, २०१४	३

स्त्रोत : प्रत्येक MC कडून प्राप्त केलेली माहिती

यावरून असे स्पष्ट होते की, पाणीपुरवठा सुधारण्याच्या कामात व जमिनीखालील गटारांच्या कामात समन्वय नव्हता त्यामुळे जेव्हा पाचही MCs मध्ये १३५ lpcd ची पातळी गाठली जाईल तेव्हा या नगरपालिका क्षेत्रांमध्ये नागरी धोका आणि प्रदूषणाचा धोकाही निर्माण होईल.

ज्ञापन :

१.५० महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

- महालेखाकार कार्यालयाने तपासणी केलेल्या ५ शहरामध्ये अरुंद रस्ते व छोट्या गल्ली बोळी असल्याने तेथील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पाणीपुरवठा योजनेचे काम करीत असताना रस्त्याचे खोदकाम होणार असल्याने सोबतच भुयारी गटार योजनेचे काम घेण्यात आले आहे. जेणेकरून दोनवेळा रस्ते खोदण्याची वेळ येणार नाही.
- संबंधित ५ नगरपरिषदांपैकी नंदूरबार व इचलकरंजी नगरपरिषदेच्या पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या असून उर्वरित ३ नपचे या (गोंदिया, वाशिम, हिंगोली) पाणीपुरवठा योजनांचे काम २०१६ मध्ये पूर्ण होणार आहे.
- भुयारी गटार योजनेबाबत ५ नगरपरिषदांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

  (१) **गोंदिया** नगरपरिषदेचे भुयारी गटार योजनेस मंजुरी देण्यात आली असून, नगर विकास विभागाच्या दि. २७.०८.२०१५ रोजीच्या निर्णयान्वये सदरचे कामाची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात यावी असे निर्देश दिले आहेत.

  (२) **वाशिम** नगरपरिषदेच्या भुयारी गटार योजनेस दि. ३१.०३.२०११ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून आतापर्यंत योजनेवर रु. १२.४३ कोटी खर्च झाला असून भौतिक प्रगती ७५ टक्के आहे व योजना २०१६ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

  (३) **हिंगोली** नगरपरिषदेचे भुयारी गटार योजनेस UIDSSMT अंतर्गत मंजुरी देण्यात येऊन केंद्र शासनाकडे निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. केंद्र शासनाने सदरच्या योजनेस प्रशासकीय मान्यता दिली परंतु निधी वितरीत केला नाही. तदनंतर सदर प्रकल्पास महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत दि. २२.१२.२०१५ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

  (४) **नंदुरबार** नगरपरिषदेचे भुयारी गटार योजनेस दि. ३१.३.२०१० रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून आतापावेतो योजनेवर रु. २२.१४ कोटी खर्च झाला असून भौतिक प्रगती ५५ टक्के आहे.

(५) **इचलकरंजी** नगरपरिषदेच्या भुयारी गटार योजनेस केंद्र शासनाने माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये मंजुरी दिली असून मे, २०१४ मध्ये निधी वितरीत करण्यात आलेला आहे. योजनेचे काम प्रगतीपथावर असून कामाची भौतिक प्रगती ३५ टक्के असून योजना २०१६ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

SLB साध्य न होणे

१.५१ GoI च्या MoUD ने विहित केलेल्या नऊ निदर्शकांच्या किंवा MC ने सांडपाणी व्यवस्थापनाबाबत स्वतः ठरविलेल्या निदर्शकांच्या तुलनेत, निवड केलेल्या ३६ MCs नी साध्य केलेले SLBs तक्ता ११ मध्ये दर्शविले आहेत.

तक्ता : ११ : २०१३-१४ दरम्यान SLBs च्या तुलनेत प्राप्त केलेले साध्य

अ.क्र.	SLB निदर्शके	राष्ट्रीय बेंच मार्क	ज्या MCs नी राष्ट्रीय बेंचमार्क साध्य केले त्यांची संख्या (टक्केवारी)	ज्या MCs नी स्वतःचे लक्ष्य ठरविले होते त्यांची संख्या (टक्केवारीत)	लक्ष्य साध्य केलेल्या MCs ची संख्या
१	शौचालयांची व्याप्ती	१००	एकही नाही	३६ MCs (३५-१००)	११ MCs
२	गटारांच्या जाळयांच्या सेवांची व्याप्ती	१००	एकही नाही	७ MCs (३०-७५)	एकही नाही
३	गटारांच्या जाळयाची संकलन कार्यक्षमता	१००	एकही नाही	६ MCs (३०-७०)	एकही नाही
४	सांडपाणी प्रक्रीया क्षमतेची पर्याप्तता	१००	२ MCs (१००-१६०)	५ MCs (४०-९०)	१ MCs
५	सांडपाणी प्रक्रीयेची गुणवत्ता	१००	४ MCs (१००)	५ MCs (३५-१००)	३ MCs
६	सांडपाणी पुनर्वापर आणि पुनर्चक्रतेचे प्रमाण	२०	१ MCs (८७)	६ MCs (८-९०)	एकही नाही
७	ग्राहक तक्रार निवारणातील कार्यक्षमता	८०	२५ MCs	३६ MCs (४५-१००)	२१ MCs
८	सांडपाणी व्यवस्थेवरील खर्चाच्या वसुलीचे प्रमाण	१००	१ MCs	२२ MCs (१-१००)	३ MCs
९	सांडपाणी शुल्क वसुलीची कार्यक्षमता	९०	१ MCs (१००)	२२ MCs (१५-१००)	२ MCs

तक्ता ११ वरून असे दिसून येते की, ग्राहक तक्रार निवारणातील कार्यक्षमते व्यतिरिक्त (संदर्भ तक्ता ११ मधील अ.क्र. ७), इतर आठही निदर्शकांच्या तुलनेत MCs कडून SLBs चे साध्य अत्यल्प होते.

ज्ञापन :

१.५२ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अ.क्र.	SLB निदर्शके	राष्ट्रीय बेंचमार्क	ज्या MCs नी राष्ट्रीय बेंचमार्क साध्य केले त्यांची संख्या(टक्केवारी)	ज्या MCs नी राष्ट्रीय बेंचमार्क अंशतः साध्य केले त्यांची संख्या (टक्केवारी)
१	शौचालयांची व्याप्ती	१००	१	३५ MCs (४७ ते ९९)
२	गटारांच्या जाळयांच्या सेवांची व्याप्ती	१००	२	३४ MCs (0 ते ९५)
३	गटारांच्या जाळयाची संकलन कार्यक्षमता	१००	३	३३ MCs (0 ते ९५)
४	सांडपाणी प्रक्रीया क्षमतेची पर्याप्तता	१००	२	३४ MCs (0 ते ९२)
५	सांडपाणी प्रक्रीयेची गुणवत्ता	१००	३	३३ MCs (0 ते ७०)
६	सांडपाणी पुनर्वापर आणि पुनर्चक्रतेचे प्रमाण	२०	७	२९ MCs
७	ग्राहक तक्रार निवारणातील कार्यक्षमता	८०	२७	९
८	सांडपाणी व्यवस्थेवरील खर्चाच्या वसुलीचे प्रमाण	१००	२	३४ MCs (0 ते ७७)
९	सांडपाणी शुल्क वसुलीची कार्यक्षमता	९०	१	३५ MCs (0 ते ८०)

- **वाशिम.**—महाराष्ट्र नगरोत्थान महाभियानांतर्गत रु. ३४.८१ कोटी रक्कमेच्या वाशिम भुयारी गटार योजनेला दि. १८.१.२०१२ रोजी मान्यता दिली असून, योजनेची आतापर्यंची ९० टक्के कामे पूर्ण झाली आहेत उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत. सदरची कामे जून, २०१६ अखेर पर्यंत पूर्ण करावयाचे उद्दिष्ट आहे.
- **उमरखेड.**—शौचालयाची व्याप्ती १०० टक्के करण्याची कार्यवाही स्वच्छ भारत अभियानांतर्गत करण्याची कार्यवाही सुरू आहे व महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अंतर्गत CDP तयार करण्याचे काम सुरू आहे. सदरचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा व भुयारी गटार योजनेचे काम हाती घेण्यात येईल.
- **नंदुरबार.**—नगरपरिषदेचे भुयारी गटार योजनेस दि. ३१.३.२०१० रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून, अद्यापपावेतो योजनेवर रु. २२.१४ कोटी खर्च झाला असून भौतिक प्रगती ५५ टक्के आहे.
- **दोंडाईचा-वरवाडे**.–नगरपरिषद क्षेत्रात १३५ LPCD नुसार पाणीपुरवठा होत नाही त्यामुळे भुयारी गटार योजना अद्याप मंजूर झालेली नाही. सद्यःस्थितीत सांडपाण्याची विल्हेवाट नगरपरिषद क्षेत्रात उघड्यावर गटाराद्वारे केली जाते. शौचालयाची व्याप्ती १०० टक्के करण्याची कार्यवाही स्वच्छ भारत अभियानांतर्गत करण्याची कार्यवाही सुरू आहे.
- **जालना**.–नगरोत्थान अभियानांतर्गत पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेची योजना नुकतीच मंजूर झाली असून, सदरची योजना पूर्णत्वास गेल्यानंतर १३५ LPCD पाणीपुरवठा करण्यात येईल. तसेच अंदाजे रु. ३०० कोटी किंमती भुयारी गटार प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.
- **मनमाड**.–शहरात अद्याप पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध नसल्याने भुयारी गटार योजना राबविण्यात आलेली नाही. तसेच, शौचालयाची व्याप्ती १०० टक्के करण्याची कार्यवाही स्वच्छ भारत अभियानांतर्गत सुरू आहे.
- **अक्कलकोट**.–शहरात अद्याप भुयारी गटार योजना राबविण्यात आलेली नाही.
- **उरण**.–भुयारी गटार योजना व सांडपाणी प्रक्रिया केंद्राचा रु. ३९ कोटी किंमतीचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता तथापि, सदर प्रस्तावात असलेल्या त्रुटी उरण नपस दि. ५.९.२०१४ रोजीच्या पत्रान्वये नपस कळविण्यात आले आहे. अद्यापावतेतो त्याची पूर्तता करण्यात आलेली नाही.
- **चाळीसगांव**.–नगरपरिषदेस पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध नसल्याने भुयारी गटार योजना राबविण्यात आलेली नाही. तसेच शौचालयाची व्याप्ती १०० टक्के करण्याची कार्यवाही स्वच्छ भारत अभियानांतर्गत सुरू आहे.
- **कुळगांव-बदलापूर**.–UIG अंतर्गत भुयारी गटार योजनेचे काम प्रगतीपथावर असून ९० टक्के काम पूर्ण झाले आहे.
- **रत्नागिरी**.–शहरातील सांडपाणी उघड्या गटाराद्वारे वहन करण्यात येते. शहरात अद्याप भुयारी गटार योजना प्रक्रिया केंद्र राबविण्यात आलेले नाही. रत्नागिरी शहराची निवड सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत झाली असून पाणीपुरवठा व मलनिःसारण योजनेचे प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण या संस्थेस PMC म्हणून काम देण्यात आले आहे.
- **नरखेड**.–शहरात १३५ LPCD नुसार पाणीपुरवठा योजना राबविल्यानंतर भुयारी गटार योजना प्रकल्प तयार करून मंजुरीस्तव सादर करण्यात येईल. सध्या बंदिस्त नाल्यातून सांडपाणी वाहून जाते.
- **भुसावळ.**—शहरात सद्यःस्थितीत भुयारी गटार योजना राबविण्यात आलेली नाही. नदी संवर्धन योजनेंतर्गत रु. २४.०० कोटी इतक्या रक्कमेचा प्रस्ताव केंद्रशासनास सन २००८ मध्ये सादर केला होता त्यास मंजुरी अप्राप्त असल्याने आता अमृत योजनेमध्ये रु. २६० कोटी इतक्या रकमेची भुयारी गटार योजना प्रक्रिया केंद्रासह मंजुरीसाठी सादर केली आहे.
- **अकोट.**–UIDSSMT अंतर्गत अकोट नपचे पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू असून, सदरची योजना कार्यान्वित झाल्यानंतर १३५ LPCD पाणीपुरवठा प्राप्त झाल्यानंतर भुयारी गटार योजनेचे काम हाती घेण्यात येईल. शौचालयाची व्याप्ती १०० टक्के करण्यासाठी स्वच्छ भारत अभियानांतर्गत कार्यवाही सुरू आहे.
- **तुळजापूर**.–सन २०११-१२ पासून सांडपाणी व्यवस्थापन करण्याचे काम तुळजापूर विकास प्राधिकरण अंतर्गत सुरू असून ते तांत्रिक अडचणीमुळे अद्याप पूर्ण नाही.
- **गोंदिया**.–नगरपरिषदेची पाणीपुरवठा योजना UIDSSMT अंतर्गत सुरू असून योजनेचे काम अंतिम टप्प्यात आहे. तसेच, UIDSSMT अंतर्गत भुयारी गटार योजना मंजूर असून, शासनाचे दि. १८.३.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदरचे योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने करण्याबाबत कळविले आहे. तथापि, केंद्र व राज्यशासनाकडील पहिल्या हप्त्याचा निधी

गोंदिया नगरपरिषदेस प्रदान केलेला असतांना मजिप्राने सदरचा निधी वर्ग करण्याबाबत दि. ३०.१०.२०१५ अन्वये मागणी केली असता सदरचा निधी वर्ग करण्यास मा. उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांनी स्थगिती आदेश दिलेले असल्याने अद्याप निधी मजीप्रास देण्यात आलेला नाही.

- **खामगांव.**–UIDSSMT अंतर्गत खामगांव नपचे पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू असून सदरची योजना कार्यान्वित झाल्यानंतर १३५ LPCD पाणीपुरवठा प्राप्त झाल्यानंतर भुयारी गटार योजनेचे काम हाती घेण्यात येईल. शौचालयाची व्याप्ती १०० टक्के करण्यासाठी स्वच्छ भारत अभियानांतर्गत कार्यवाही सुरू आहे.
- **पंढरपूर**.–नगरपरिषदेची भुयारी गटार योजना पूर्ण झाली असून १५.५० MLD क्षमतेचा STP पूर्ण क्षमतेने सुरू आहे. वाढीव शहर हद्दीसाठी तसेच नवीन विकसित भागात त्याबरोबर शहरातील मुख्य ३ नाल्यामधून नदीचे प्रदूषण होऊ नये म्हणून भुयारी गटार योजना टप्पा क्र. ३ महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत छाननीसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पाठविण्यात आली आहे.
- **सिन्नर**.–UIDSSMT अंतर्गत सिन्नर नगरपरिषदेचे पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू असून भुयारी गटार योजनेचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत सादर करण्यात आलेला आहे. सदरचे प्रस्तावामध्ये असलेल्या त्रुटी सिन्नर नगरपरिषदेस कळविण्यात आल्या आहेत.
- **इचलकरंजी.**–शहरात सद्यःस्थितीत ५० टक्के भागात भुयारी गटार योजना राबविली आहे. उर्वरित भागात रु. ८२.६० कोटी इतक्या किंमतीची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची आतापर्यंत ३५ टक्के कामे पूर्ण झाली आहेत.
- **पनवेल**.–शहरात भुयारी गटार योजनेची कामे पूर्ण झाली आहेत. प्रक्रिया केंद्र पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आले आहे. जुन्या अस्तित्वातील वाहिन्यातून वाहणारे सांडपाणी नवीन वाहिनीस जोडण्यास आले आहे तसेच, नवीन वाहिनीस घरगुती जोडण्याची कामे प्रगतीत आहेत.
- **काटोल**.–सद्यःस्थितीत काटोल शहरात प्रक्रिया केंद्रासह भुयारी गटार योजना अद्याप राबविण्यात आलेली नाही. उघडी गटारे ६७ Km असून त्याद्वारे सांडपाणी लेंडी नदीमध्ये मिसळते. आता रु. ४२.०० कोटी किंमतीची भुयारी गटार योजना मंजूर झाली असून त्यामध्ये प्रक्रिया केंद्राचा समावेश आहे. कामाचे कार्यादेश दि. ३१.१२.२०१५ रोजी देण्यात आले असून लवकरच कामास सुरुवात करण्यात येत आहे.
- **मेहेकर**.–नगरपरिषदेमध्ये सद्यस्थितीमध्ये ५० LPCD पाणीपुरवठा होत असल्याने भुयारी गटार योजना राबविण्यात आली नाही.
- **आळंदी.**–शहराकरिता रु. १७ कोटी किंमतीची भुयारी गटार योजना तिर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत मंजूर झाली असून योजनेची कामे प्रगतीत आहेत. यामध्ये २६ km भुयारी गटार व प्रक्रिया केंद्रचा समावेश आहे. नदी संवर्धन योजने अंतर्गत इंद्रायणी नदी सुधारणा प्रकल्प पर्यावण विभागास मंजुरीसाठी सादर केला आहे.
- **बल्लारपूर**.–शहरात तयार होणाऱ्या सांडपाण्याद्वारा प्रदूषण रोखण्याकरिता भुयारी गटार योजना व प्रक्रिया केंद्रचा प्रस्ताव तयार करण्याचे काम नगरपरिषद स्तरावर अंतिम टप्प्यात आहे.
- **लोणावळा.**–नगरपरिषदेची भुयारी गटार योजनेस दि. ३१.३.२०१० रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात येऊन रु. ८.६० कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. लोणावळा नगरपरिषदेने माहे ऑक्टोंबर, २०११ मध्ये कामाचे कार्यादेश दिले. परंतु, कंत्राटदाराने खोटी बँक गॅरंटी देऊन फसवणूक केल्याने लोणावळा नगरपरिषदेने डिसेंबर, २०१३ मध्ये कंत्राट रद्द केले व रक्कम रु. १०५० कोटी (mobilization Advance) १८ टक्के व्याजासह परत करणेबाबत ठेकेदारास कळविण्यात आले होते. परंतु ठेकेदाराने काहीही प्रतिसाद न दिल्याने लोणावळा नगरपरिषदेने सदर रक्कम वसूल करण्यासाठी मा. जिल्हा न्यायालय, पुणे यांचेकडे क. ३३९/२०१४ नुसार दावा दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

  लोणावळा नगरपरिषदेने माहे मार्च, २०१३ मध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून रु. २९.३७ कोटी रुपयाचे सुधारित अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता घेऊन संचालनालयास सादर केले. सदरचा प्रस्ताव २६ नोव्हेंबर २०१५ रोजीचे पत्रान्वये IIT, मुंबई यांचे कडे तांत्रिक सहमतीसाठी सादर करण्यात आला आहे.
- **यवतमाळ**.–UIDSSMT अंतर्गत यवतमाळ नगरपरिषदेची पाणीपुरवठा योजना सुरू असून सदरची योजना कार्यान्वित झाल्यानंतर भुयारी गटार योजनेचे काम हाती घेण्यात येईल.
- **सावंतवाडी**.–न.प. मध्ये ७०-७५ LPCD पाणीपुरवठा होत असल्याने अद्यापावेतो भुयारी गटार योजनेचे काम हाती घेण्यात आलेले नाही.

- **शिर्डी**.–UIDSSMT अंतर्गत २०१२ मध्ये सांडपाणी प्रकल्प पूर्ण केला आहे. २०१२ नंतर नवीन वसाहतीमध्ये निधी उपलब्धतेनुसार गटारांची कामे चालू आहेत. १६ MLD क्षमतेचे प्रक्रिया केंद्र शहरात बांधण्यात आले असून, त्यास शहरातील सर्व गटारांचे जाळे जोडण्यात आले आहे. सदरचा प्रकल्प पूर्ण क्षमतेने चालविण्यात येत आहे.
- उद्गीरः- सद्यःस्थितीत शहरात १३५ LPCD नुसार पाणीपुरवठा योजना राबविण्यात आलेली नाही त्यामुळे भुयारी गटार योजनेचे काम अद्याप हाती घेतलेले नाही.
- **फलटण**.–महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत फलटण नगरपरिषदेने भुयारी गटार योजना सादर केली असून सदरचे प्रस्तावामध्ये असलेल्या त्रुटी, फलटण नगरपरिषदेस DMA मार्फत कळविण्यात आल्या आहेत.
- **हिंगोली.**–महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत हिंगोली नगरपरिषदेचे रु. ६९.७३ कोटीचे भुयारी गटार योजनेस दि. २२.१२.२०१५ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच शौचालयाची व्याप्ती १०० टक्के करण्यासाठी स्वच्छ भारत अभियानांतर्गत कार्यवाही सुरू आहे.
- **हिंगणघाट**.–१४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून भुयारी गटार, सांडपाणी प्रक्रिया करीता DPR करून प्रस्ताव तयार करणे इत्यादी कामे प्रस्तावित आहेत.
- **उस्मानाबाद**.–UIDSSMT अंतर्गत उजनी धरणावरील पाणीपुरवठा योजना पूर्ण झाली असून, भुयारी गटार योजनेचे DPR तयार करण्यासाठी निविदा काढून कार्यादेश देण्यात आले आहेत.
- **सिल्लोड**.–शहराकरिता १३५ LPCD नुसार पाणीपुरवठा योजना दि. १६.१२.२०१५ रोजी मंजूर झाली असून, याबाबतची पुढीलबाबतची कार्यवाही सुरू आहे. या योजनेचे काम पूर्ण होताच भुयारी गटार योजना तयार करण्याचे काम हाती घेण्यात येईल. सद्यःस्थितीत सांडपाण्याची विल्हेवाट उघड्या गटाराद्वारे करण्यात येते.

  भंडारा.–नगरपरिषदे तर्फे महाराष्ट्र सुजल अभियान अंतर्गत १३५ LPCD अंतर्गत हायड्रोलिक मॉडेलिंग करण्यात आलेले असून, तांत्रिक मान्यतेकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण नागपूर यांचेकडे पाठविण्यात आलेली आहे. त्यांच्या तांत्रिक मंजुरीनुसार भूमिगत गटारासाठी प्रकल्प शासनास सादर करण्यात येईल.

सेवा पुरवठ्याचे संनियंत्रण

१.५३ प्रभावी अंतर्गत नियंत्रण व्यवस्थेमुळे एकंदर व्यवस्थापकीय प्रक्रियेविषयी पर्याप्त खात्री देता येते आणि त्याद्वारे संघटनेकडून केले जाणारे कार्यचालनाच्या संनियंत्रणाचे प्रमाण दर्शविले जाते. GoM च्या UDD च्या नियंत्रणाखाली कामकाज करणाऱ्या DMA यांच्याकडून सर्व MCs वर प्रशासकीय नियंत्रण व संनियंत्रण ठेवले जाते. DMA कडून सेवा पुरविण्यातील संनियंत्रणात आढळून आलेल्या त्रुटी खालीलप्रमाणे होत्या :-

- मुंबईच्या DMA कार्यालयाकडून MCs च्या सर्व कारभारावर मध्यवर्ती संनियंत्रण ठेवले जाते. प्रशासकीय आणि तांत्रिक कर्मचारी / स्त्रोतांच्या अपुऱ्या संख्येमुळे
- DMA च्या कार्यालयात प्रकल्प प्रस्ताव आणि DPRs च्या मंजुरीसाठी विलंब होत होता.
- मूळ मंजूर किंमती आणि निर्धारित वेळांबाबत राज्य प्रकल्पांच्या (MSNA आणि MSJNA) परिणामकारक संनियंत्रण आणि अंमलबजावणीसाठी DMA ने MCs करिता कुठलेही अहवाल आणि विवरणे विहित केली नव्हती.
- पाणीपुरवठा, घनकचरा आणि सांडपाणी याबाबत MCs कडून SLBs निश्चित न करण्याची कारणे आणि SLBs कमी साध्य केल्याबाबत त्याची निर्धारणा किंवा मूल्यमापन, त्यावर सुधारणात्मक कारवाई करण्यासाठी DMA कडून केले गेले नव्हते.

घनकचरा व्यवस्थापन (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, २००० नुसार, MCs नी घन कचरा, वैद्यकीय कचरा आणि कत्तलखान्यांच्या कचऱ्याच्या विल्हेवाटीबाबत MPCB ला प्रपत्र II मध्ये तपशीलवार माहिती सादर करणे आवश्यक असते. बहुसंख्य MCs कडून MPCB ला ही माहिती विलंबाने सादर करण्यात आली होती. तथापि, DMA ही कायदेशीर आवश्यकता पूर्ण करण्याचे संनियंत्रण करण्यात अपयशी ठरली.

ज्ञापन :

१.५४ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

- महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानांतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पांचा नगर विकास विभाग, मंत्रालय येथे होणाऱ्या तसेच, संचालनालयामार्फत वेळोवेळी होणाऱ्या विभागीय बैठकीमध्ये आढावा घेण्यात येतो.

तसेच स्थानिक स्वराज्य संस्थाकडून मंजूर योजनेची विहित विवरणपत्रामध्ये माहिती मागविण्यात येते. तसेच संचालनालयामध्ये असलेल्या तांत्रिक कक्षामार्फत वेळोवेळी भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात येते.

निष्कर्ष व शिफारशी :

पाणीपुरवठा सेवा :

१.५५ MMC कायद्यानुसार बंधनकारक असलेल्या ७० LPCD पाणीपुरवठ्याच्या तुलनेत ३६ निवड केलेल्या MCS पैकी १७ MCS मधील सरासरी पाणीपुरवठा हा २५ आणि ६९ LPCD दरम्यान होता. पाणीपुरवठा करण्यासाठी कमतरता ही वितरण व्यवस्थेतील हानी, WTPD/पंपिंग मशिनरीची कमी कार्यक्षमता आणि अनियमित वीज पुरवठा यामुळे होती.

१७ बाधित MCS मध्ये ७० lpcd पाणी पुरवठ्याचे लक्ष्य साध्य करण्यासाठी १२ MCS मधील पाणीपुरवठा वाढीचे काम कालबद्ध रितीने पूर्ण करायला हवे आणि उर्वरित पाच MCS ज्यांनी वाढीव कामासाठी DMA ला DPR सादर केला नव्हता, त्यांनी याबाबत ताबडतोब कारवाईला सुरुवात करावी.

केंद्र योजना (UIDSSMT) आणि राज्य योजना (MSNA आणि MSJNA) अंतर्गत २० MCS नी रु. ७०८ कोटींची २१ पाणीपुरवठा वाढ करण्याचे जे प्रकल्प हाती घेतले आहेत त्यावर बराच कालावधी उलटून गेला आहे आणि प्रकल्पाची किंमतही वाढली आहे तसेच ऑक्टोंबर, २०१४ पर्यंत या २१ प्रकल्पांपैकी फक्त सात प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

प्रकल्पावर कालापव्यय आणि किंमतीत वाढ न होण्यासाठी शासनाने प्रकल्प प्रस्तावाची छानबीन, मंजुरी आणि कंत्राट वेळेत देण्याची सुनिश्चिती करावी. शासनानेही प्रकल्पातील अजून कालपव्यय व किंमत वाढ टाळण्यासाठी केंद्र आणि राज्य योजनांच्या निधीचा हिस्सा वेळेत मूक्त करावा.

२४ MCS नी रु. ३३.५७ कोटी किंमतीचे पाणीपुरवठा सेवा सुधारणेचे हाती घेतलेले काम मागे पडले होते. ३६ निवड केलेल्या MCS पैकी एकही MC, GoI च्या MOUD ने विहित केलेल्या नऊ निदर्शकांपैकी किंवा त्यांनी स्वत:ची ठरविलेल्या सर्व्हिस लेव्हल बेंचमार्क साध्य करण्यात यशस्वी ठरली नव्हती. ३६ MCS पैकी बहुसंख्य MCS या पाणीपुरवठा सेवांच्या १०० टक्के वसुलीच्या लक्ष्यापेक्षा खूप दूर होत्या आणि सत्य परिस्थिती अशी होती की वर्ष २०११-१४ दरम्यान रु. १३०.४५ कोटीचा कार्यचालन तोटा (Operational loss) सहन केला होता.

पाण्याचे व्यवस्थापन उत्कृष्ट करण्यासाठी, पाणीपुरवठा सेवांमधील सुधारणा पूर्ण करायला हव्यात आणि MCS नी त्या अंगीकारायला हव्यात. पाणी आकाराची संकलन क्षमता जोमदार पाठपुरावा करून आणि नियमांनुसार दंडात्मक कारवाई करून सुधारावी. SLBS साध्य करण्यासाठी त्यातील कार्यसिद्धी तफावती ओळखून आणि सुधारणा लागू करून शासनाने/ MCS नी नियोजित प्रयत्न करावेत.

मलप्रवाह व्यवस्थापन

१.५६ ३६ निवड केलेल्या MCS पैकी ३२ MCS मधील सांडपाणी संकलन आणि विल्हेवाट प्रणाली अपर्याप्त होती. सांडपाणी हे एकतर उघड्या गटारांत किंवा वादळी पाणी वाहिन्यांना जोडलेले होते जे पुढे जवळपासच्या नदीत प्रवाहित होत होते. शोष खड्ड्यात झालेल्या मालाची संकलित डंपींग ग्राऊंडमध्ये कुठलेही प्रक्रियेशिवाय सोडले जात होते. ३४ MCS मध्ये रु. २०८.५१ MLD मल, STP च्या अपुऱ्या क्षमतेमुळे किंवा STPS अकार्यरत असल्यामुळे प्रक्रियेशिवाय सोडले जात होते. १० MCS मधील जमिनीखालील गटार अद्ययावत करण्यासाठी रु. ६१२.१७ कोटी रकमेचे मार्च, २००८ ते फेब्रुवारी, २०१४ दरम्यान मंजूर केलेल्या १० भांडवली प्रकल्पांपैकी फक्त दोन प्रकल्पांची सुरुवात झाली होती. सहा प्रकल्पांबाबत, मंजुरीच्या तारखेपासून कंत्राट अंतिमत: देईपर्यंत १३ ते ३४ महिन्यांचा कालावधी उलटून गेला होता. सात प्रकल्पात सुरुवातीला मंजूर केलेल्या रकमेपेक्षा निविदेतील रक्कम रु. १५१.११ कोटींनी वाढली होती आणि पाच प्रकल्पांना, प्रकल्प पूर्ण होण्याच्या नियत तारखेपेक्षा सहा ते ३६ महिन्यांचा जास्त कालावधी उलटून गेला होता. सांडपाणी व्यवस्थापन प्रणालीतील नऊ निदर्शकांपैकी आठ निदर्शकांबाबत सर्व्हीस लेव्हल बेंचमार्कसची साध्यता निकृष्ट होती.

शासनाने, प्रभावित MCS मधील भूमिगत गटार प्रभावी संकलन आणि विल्हेवाटीसाठी वेळेवर अद्ययावत करावीत अस्तित्वात असलेली STPS जेव्हा गरज असेल तेव्हा वाढवावी आणि सर्व अकार्यरत STPS कार्यरत कराव्यात.

ज्ञापन :

१.५७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात नगरविकास विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

पाणीपुरवठा प्रकल्पांची यशस्वी अंमलबजावणी व त्यांच्या देखभाल व दुरुस्तीच्या अनुषंगाने कार्यपद्धती विहित केली असून त्यानुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

२ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या " स्थानिक संस्था अहवालातील " परिच्छेद क्रमांक ४.१.६.२ (ब) या संदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

MSNA अंतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी :

२.१ राज्य MSNA योजने अंतर्गत " अ " प्रवर्गातील MCs मध्ये ८०:२० व " ब " आणि " क " प्रवर्गातील MCs मध्ये ९०:१० या गुणोत्तरात प्रकल्पाचा खर्च महाराष्ट्र शासन व MCs मध्ये विभागाला जातो. फेब्रुवारी, २००९ ते जुलै, २०११ दरम्यान रु. १०६.७८ कोटी खर्चाचे पाणीपुरवठा वाढवण्यासाठीचे सात प्रकल्प महाराष्ट्र शासनाने मंजूर केले होते.

या सात प्रकल्पांपैकी, एक प्रकल्प १४ महिन्यांच्या (झालेला खर्च रु. ०८.०८ कोटी) विलंबाने पूर्ण झाला होता तर ऑक्टोबर, २०१४ पर्यंत उर्वरित सहा प्रकल्प प्रगतिपथावर होते आणि त्यांच्या पूर्णत्वाच्या नियत कालावधी पासून तीन ते ४४ महिने (झालेले खर्च रु. ८२.३३ कोटी) उलटून गेले होते. प्रकल्प अंमलबजावणीतील विलंबाची मुख्य कारणे ही जनतेचा क्षोम प्रस्तावित कोल्हापूर पद्धतीचा बंधारा (KT Weir) च्या नदी किनाऱ्याची धूप झाल्यामुळे काम थांबविण्यात आले होते GOM कडून अनुदानाची विलंबाने प्राप्ती इत्यादी होती. सात प्रकल्पांपैकी दोन प्रकल्पातील मुख्य निष्पत्ती खाली चर्चिल्या आहेत :

२.२ हिंगणघाट MC मधील पाणीपुरवठा प्रकल्प क्षमतेची वाढ :

४.१.६.२ (ब) — (i)

(१) हिंगणघाट MC साठी साध्या पाण्याचा मुख्य स्त्रोत म्हणजे वूना नदी होती ज्यासाठी १८८३ पासून KT Weir अस्तित्वात होते. पुरामुळे KT Weir ला हानी पोहोचल्यामुळे (१९९४) पाण्याची गरज भागवण्यासाठी नदीतील पाण्याची आवश्यक पातळी कायम राखण्यासाठी दरवर्षी वूना नदीवर तात्पूरते बंधारे बांधण्यात येतात. १३५ lpcd इतक्या पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने MSNA अंतर्गत रु. ५.१८ कोटी रकमेच्या प्रकल्पास मंजुरी दिली (जुलै, २००९) ज्यामध्ये क्षतीग्रस्त KT Weir बांधणे, नवीन विहीर व निरीक्षण कक्ष बांधणे या बाबी अंतर्भूत होत्या.

मध्यवर्ती संकल्पचित्र संस्था नाशिक (CDO) यांनी KT Weir चे संकल्पचित्र तयार केले होते (एप्रिल, २००८) आणि KT Weir च्या शीरावर नदीच्या बंधाऱ्याला बळकटी आणण्यासाठी पुरेश्या दगडाच्या तुकड्याचा थर असलेली संरक्षक भिंत बांधण्याचे सुचविले होते. परंतु CDO नी सुचविल्याप्रमाणे संरक्षक भिंत बांधण्याची बाब विचारात न घेता हिंगणघाट MC नी कामाचे अंदाजपत्रक तयार केले (जुलै, २००९) आणि जुलै, २००९ मध्ये अंदाजपत्रकाला तांत्रिक मान्यता दिली ज्यात संरक्षक भिंतीचा समावेश नव्हता.

हिंगणघाट MC ने KT Weir च्या बांधकामाचे कंत्राट रु. ४.९२ कोटीस एप्रिल, २०१० मध्ये दिले. जे ऑक्टोबर, २०११ पर्यत पूर्ण करावयाचे होते. ज्यासाठी पुढे मे, २०१३ पर्यत मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु बांधकाम सुरू असताना जून, २०१२ मध्ये अति पर्जन्यदृष्टीमुळे KT Weir च्या उर्ध्वभागावरील नदीच्या काठावरील ३० ते ४० मीटरचा भाग वाहून गेला. जून, २०१२ पर्यत नवीन KT Weir चे ९० टक्के काम पूर्ण झाले होते त्यासाठी कंत्राटदाराला रु. ५.३४ कोटी प्रदान करण्यात आले होते. उर्वरित १० टक्के काम पूर्ण करण्यासाठी MC ने GCO च्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाला संरक्षित भिंत आणि पुरामुळे आवश्यक झालेल्या अतिरिक्त कामासाठी रु. १०.३७ कोटीचे नवीन अंदाजपत्रक (संरक्षक भिंतीचा खर्च रु. १.२५ कोटी) सादर केले (जानेवारी, २०१४) ज्यावरील निर्णय ऑक्टोबर, २०१४ पर्यत प्रलंबित होता. अशाप्रकारे नदीचा काठ बळकट करण्यासाठी संरक्षक भिंत बांधण्याविषयी CDO नी केलेली सूचना नजरेआड केल्यामुळे रु. ७.२० कोटीचा अतिरिक्त खर्च आणि १७ महिन्यांचा (जून, २०१३ ते ऑक्टोबर, २०१४) विलंब तर झालाच शिवाय हिंगणघाट MC मधील १.०२ लाख नागरिकांना १३५ Ipcd इतक्या वाढीव पाणी पुरवठ्याच्या लाभापासून १७ महिने वंचित राहावे लागले.

ज्ञापन :

२.३ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

हिंगणघाट.—हिंगणघाट नगर परिषदेच्या पाणीपुरवठा योजनेच्या भांडवली व सुधारणा कामास दिनांक १०.७.२००९ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तथापि, प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार तसेच कंत्राटदार यांनी विहित वेळेत काम पूर्ण केले नाही. पुरामुळे नदीच्या एका बाजूची मातीची थड वाहून गेल्याने बंधाऱ्यात पाणी साठत नसल्याने पुन्हा रिटेनिंग वॉल बांधणे व स्टोन पिचिंगची कामे करण्याची आवश्यकता निर्माण झाली. कंत्राटदाराशी नगर परिषदेने केलेल्या करारातील अटी व शर्तीनुसार काम झाले किंवा कसे,

प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या जबाबदाऱ्या काय निश्चित केल्या होत्या, त्यानुसार त्यांनी काम पूर्ण केले किंवा कसे, बंधाऱ्यात पाणी अडविणे शक्य झाले नसल्याने योजनेचे उद्दिष्ट पूर्ण झाले नाही. इ. बाबत जबाबदारी निश्चित करण्यासाठी श्री. वासुदेव गोरडे, मुख्य सल्लागार, सुधारणा व्यवस्थापन कक्ष व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. पुणे यांची समिती गठीत करण्यात आली होती. समितीने दिलेल्या अहवालानुसार नगर परिषदेस खालीलप्रमाणे कळविण्यात आले आहे.

१. हिंगणघाट पाणीपुरवठा योजनेच्या के. टी. वेअरची स्टॅबिलिटी तपासून त्याबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा.

२. नगर परिषदेने सादर केलेल्या दोन्ही कामाच्या आवश्यकतेबाबत व अंदाजपत्रकाबाबत स्वयंस्पष्ट अभिप्राय तपासणी अहवालात समावेश करण्यात यावा.

तसेच शासने सदर योजनेमध्ये प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर संकल्पचित्र अहवाल व रेखाचित्रा- व्यतिरिक्त करण्यात आलेले वाढीव बांधकाम किंवा संकल्पनापेक्षा वेगळया पद्धतीचे बांधकाम केल्याचे दिसून येत असल्याने सदर कामाची स्टॅबिलीटी ॲनॅलिसीस मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून करून घेण्याबाबत. तसेच सादर करण्यात आलेल्या दोन्ही कामांच्या आवश्यकतेबाबत व अंदाजपत्रकाबाबत मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून स्वयंस्पष्ट अभिप्राय घेऊन त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा असेही मुख्य अधिकारी, हिंगणघाट नगर परिषद यांना कळविले आहे. तथापि नगर परिषदेकडून त्याबाबत शासनास अहवाल प्राप्त झालेला नाही.

२.४ अक्कलकोट MC मधील पाणीपुरवठा वाढवण्याचे काम कंत्राटदाराला रु. ९.२८ कोटी किंमतीस देण्यात आले (ऑक्टोबर, २०११) या कामात इतर बाबींबरोबर बोरी नदीवर रायझिंग मेन्ससाठी डक्टाइल पाईप्स (DI) (३५० मी.मी.) पुरविणे आणि ते बसविणे यांचा समावेश होता. लेखापरीक्षेत असे आढळून आले की, MC सल्लागाराकडून तयार केलेल्या अंदाजित १३,००३.५० रनिंग मीटर (rmt) इतक्या DI पाईप्सच्या तुलनेत कंत्राटदाराने ११,२२९.४७ rmt (८६ टक्के) एवढयाच DI पाईप्सचा प्रकल्पात वापर केला होता. तथापि, MC ने कंत्राटदाराला १३,००३.५० rmt चे रु. ४.६८ कोटी प्रदान केले (मार्च, २०१४) होते, ज्यामध्ये १७७४.०३ rmt साठीचे रु. ६३.७९ लाख अतिरिक्त प्रदान केले.

मार्च, २०१५ ला अतिरिक्त DI पाईप्स (१७७४.०३rmt) MC कडे पडून होते कारण रायझिंग मेन्सचे काम अगोदरच पूर्ण झाले होते आणि नजिकच्या भविष्यात त्याचा उपयोग होण्याची शक्यता कमी होती कारण रायझिंग मेन्सचे आरेखीत आयुष MC ची वर्ष २०१४ पर्यतची गरज पुर्ण करणार आहे.

ज्ञापन :

२.५ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अक्कलकोट.—१. माहे मार्च, २०१४ मध्ये धावते देयक क्र.११ दरम्यान झालेल्या लेखापरिक्षणापर्यंत, ठेकेदाराने १३००३.५० मीटर इतक्या लांबीचा पाईपचा पुरवठा केला असून त्यापैकी ११२२९.४७ मीटर इतक्या लांबीचे पाईप अंथरण्यात आले होते.

२. तद्नंतर१३ व्या धावते देयकानुसार, ठेकेदारामार्फत १३,३७८ मीटर लांबीचा पाइप पुरवठा करण्यात आला.

३. तथापि, चालू कामामध्ये उर्ध्वनलिकेच्या मार्गात अडचणी आल्यामुळे व विलंब होऊ लागल्यामुळे सदर मार्गात बदल करण्यात आला, ज्यामुळे उर्ध्वनलिकेच्या लांबीत बचत झाली.

४. मार्ग बदलामुळे १२,८४०मीटर इतक्या लांबीचे पाईप अंथरण्यात आले व त्यानंतर जलदाब चाचणीनंतर पाणीपुरवठा सुरू करण्यात आला.

५. उर्वरित ५२८ मीटर लांबीचे पाइप नगर परिषदेच्या ताब्यात आहेत. त्यामुळे ठेकेदारास कोणत्याही प्रकारे अतिप्रदान झालेले नाही.

MSMA अंतर्गत केलेली सुधारणेची कामे

२.६ MDNA हा सुधारणेला प्राधान्य देणारा कार्यक्रम आहे. सुधारणात्मक उपायांच्या मालिकांवर भर देऊन अखंड पाणीपुरवठा करण्याबरोबरच उत्कृष्ट जल व्यवस्थापनासाठी शाश्वत संस्थात्मक व्यवस्था करण्याचे अंतिम लक्ष्य या कार्यक्रमाद्वारे साध्य करायचे आहे.

सुधारणा कामांमध्ये (i) पाण्याच्या गरजेचा आढावा घेण्यासाठी आणि अवैध जोडण्यांचा शोध लावण्याससाठी उपभोक्ता सर्वेक्षण करणे (ii) पाणी आणि वीजेची लेखापरीक्षा (iii) डिजीटल माहितींशी जोडलेल्या भौगोलिक माहिती यंत्रणेमार्फत (GIS) जलविद्येचा नकाशा तयार करणे जो डिजीटल डेटाबेसशी जोडला असेल (iv) कार्यक्षम पाणी वितरण जाळे प्रस्थापित करण्यासाठी जलव्यवस्थेचा नमुना तयार करणे आणि (v) घाऊक प्रमाणात पुरवलेल्या पाण्यासाठी मीटर्स बसविणे/प्रवाह मीटर बसविणे यांचा समावेश होता.

चाचणी तपासणी केलेल्या ३६ MCs पैकी २७ MSc मध्ये जुलै, २००९ ते मार्च, २०१३ या कालावधीत MSNA अंतर्गत रु. ३३.५७ कोटीची सुधारणा कामे मंजूर करण्यात आली होती. ऑक्टोबर,२०१४ पर्यत या २७ MCs मध्ये रु. १०.८० कोटी खर्च करण्यात आला. तक्ता ३ मध्ये चाचणी तपासणी केलेल्या २७ MS मधील सुधारणा कामांची स्थिती देण्यात आली.

ज्ञापन :

२.७ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

आळंदी.—सदर नगर परिषदेसाठी सुधारणा कामांसाठी दिनांक २९.७.२०११ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. तथापि, प्रस्तुत सुधारणा कामे दिनांक २२.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात आलेली आहेत.

भंडारा.—दिनांक १.६.२०१२ च्या शासन निर्णयानुसार सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर कामे दिनांक १०.०५.२०१४ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि एन. आर. एस. सी. हैद्राबाद यांच्याकडून उपग्रह प्रतिमा उशीरा प्राप्त झाल्याने दिनांक ३१.५.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. सदर सुधारणा कामे दिनांक २७.५.२०१५ पर्यंत पूर्ण झालेली आहेत.

हिंगणघाट.—शासन निर्णय दिनांक १०.७.२००९ अन्वये उपभोक्ता सर्वेक्षण, पाणी व वीज लेखा परीक्षा इ. सुधारणा कामांच्या अनुषंगाने रु. १४,८२,८४८/- इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. तथापि, इतक्या कमी तरतूदीमध्ये सुधारणा कामे कोणत्याच परिस्थितीत पूर्ण करणे शक्य नव्हते. त्यामुळे नगर परिषदेने खाजगी तांत्रिक व्यवस्थापन सल्लागार यांच्यामार्फत रु. १.८१ कोटींचा सविस्तर प्रस्ताव तयार करून तो शासनास स्वतंत्ररित्या सादर करण्यात आला तथापि, त्यास शासनाची मंजुरी प्राप्त न झाल्याने न.प.कडून प्रस्तुत सुधारणा कामे हाती घेण्यात आलेली नाहीत.

तक्ता ३ :२४ MSc मधील सुधारणा कामांच्या पूर्ततेची प्रगती :

सुधारणा कामाचे स्वरुप	ज्या MSc नी सुधारणा कामे पूर्ण केली नव्हती त्यांची संख्या आणि नाव
उपभोक्ता सर्वेक्षण	24 पैकी नऊ MSc (आळंदी, भंडारा, हिंगणघाट, मनमाड,उस्मानाबाद, पंढरपूर,फलटण,उदगीर,उरण)
पाणी व वीज लेखापरीक्षा	२४ पैकी १० MSc (अक्कलकोट, आळंदी,भंडारा, चाळीसगाव, हिंगणघाट, जालना, उस्मानाबाद, फलटण, सावंतवाडी आणि उरण)
GIS नकाशे तयार करणे	२४ पैकी आठ MSc (आळंदी, भंडारा, हिंगणघाट, उस्मानाबाद, पंढरपूर, फलटण, शिर्डी आणि उरण)
मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठ्यासाठी प्रवाह मीटर बसविणे	२४ पैकी आठ MSc (आळंदी, आकोट, हिंगणघाट, हिंगोली, जालना, उदगीर, रत्नागिरी, भंडारा, उरण, मनमाड, उस्मानाबाद, खामगाव, शिर्डी, फलटण)
जलव्यवस्थेचा नमूना तयार करणे	२४ पैकी नऊ MSc (आळंदी, भंडारा, हिंगणघाट, जालना, उस्मानाबाद, पंढरपूर, शिर्डी, उदगीर आणि उरण)

स्त्रोत MSc कडून संकलित केलेली माहिती

MSc कडून सुधारणांच्या अंमलबजावणीत अपर्याप्तता असल्याचे लेखापरीक्षेला आढळुन आले जे खाली चर्चिले आहे.

- ऑक्टोबर, २००८ मध्ये, MSNA मार्गदर्शक तत्वांनुसार, सुधारणेची कामे ही, पाणी पुरवठा क्षमता वाढविण्याची कामे (भांडवली कामे) हाती घेण्याआधी करावीत. लेखापरीक्षेला असे आढळून आले की, मनमाड MC मध्ये पाणी वितरण जाळे वाढविण्यासाठीचा प्रकल्प महाराष्ट्र शासनाने रु. ४.७९ कोटीस मंजूर केला होता. (फेब्रुवारी, २००९) तथापि, महाराष्ट्र शासनाने रु. १.४१ कोटीचे विविध सुधारणेचे काम मात्र ऑगस्ट, २००९ मध्ये मंजूर केले होते. परिणामी ऑगस्ट, २००९ मध्ये MC ने रु. ४.१० कोटी खर्चाचे नवीन वितरण जाळे (१६.२९ कि.मी.) प्रस्थापित करण्याचे काम हाती घेतले होते. तर, जल व्यवस्थेचा नमूना तयार करण्यासंबंधातील सुधारणा अहवाल मात्र ३२ महिन्यानंतर म्हणजे मार्च, २०१२ मध्ये आला. जानेवारी, २०१२ पर्यत वितरण जाळयाचे काम ९५ टक्के पूर्ण झाले होते.

  अशा प्रकारे महाराष्ट्र शासनाने सुधारणेची कामे पूर्ण होण्याआधी वितरण जाळयाचे काम हाती घेणे हे योजनेच्या मार्गदर्श तत्वांशीच विसंगत होत असे नाही तर सुधारणा अहवालातील (जो अहवाल २०१२ मध्ये सादर केला होता) वितरण जाण्याच्या कार्यक्षमतेच्या सुधारणासाठीच्या जलव्यवस्थेच्या नमून्यासंबंधातील विर्निदिष्ट केलेल्या शिफारशींचा MC वापर करू शकली नव्हती. तसेच डिसेंबर, २०१४ पर्यत सुधारणा कामांवर (जल व्यवस्था नमूना घटक) केलेला रु. २० लाखांचा खर्च निष्फळ ठरला.

- बिलींग मोठयूल हे महानगरपालिका प्रशासन वितरण संगणक प्रणाली (MAINet) मध्ये मध्ये उपलब्ध असलेल्या ११ मोडल्यूल्सपैकी एक मोडयूल होत जे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने (KDMC) २००-०४ च्या दरम्यान विकसीत केले होते. हे मोडयूल DMA ने वितरीत केले होते आणि जुलै, २००९ पासून MCs नी यांच्या अंमलबजावणीस सुरुवात केली होती. बिलींडींग मोडयूलची उपलब्धता असतांनासुध्दा चार नगरपालिकांनी (उमरखेड, काटोल,नरखेड, आणि सिल्लोड सुधारणा कामांच्या अंतर्गत ऑगस्ट, २००९ ते ऑक्टोबर, २०१३ दरम्यान पाण्याची संगणकीकृत देयके जारी करणे व संकलित करणे यासाठी संगणक आज्ञावली प्राप्त करण्यासाठी रु. ३२ लाख निष्फळ खर्च केले.

सचिव नगर विकास विभाग यांनी अंतिम बैठकीत वस्तुस्थिती स्विकारत असे सांगितली की, DMA नी त्यानंतर सॉफ्टवेअर प्राप्त करण्यासाठी होणाऱ्या खर्चास मान्यता देण्याचे थांबविले होते आणि सर्व MSc MAINet वापरीत होते.

ज्ञापन :

२.८ महालेखापरिक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायाच्या संदर्भात पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

मनमाड.—शासन निर्णय दिनांक १०.७.२००९ अन्वये सुधारणा कामांच्या कृती आराखड्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. दिनांक २५.११.२०१० पर्यंत सदर कामे पूर्ण होणे अपेक्षित होते. दि.१६.१२.२०१० च्या नगरपरिषदेच्या ठरावानुसार सदर कामे पुर्ण करण्यास पुढील २४ महिन्यांच्या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर कामे मुदतवाढीनंतरच्या मुदतीत पुर्ण झाली आहेत.

पहिल्या मुदतीत ठेकेदाराने काम सुरू करून ते ५० टक्के पुर्ण केले होते. तथापि, उर्वरीत काम पुर्ण करण्यासाठी सॅटेलाईटची रेंज उपलब्ध न झाल्याने काही तांत्रिक कामे करण्यास विलंब झाला. तसेच उपभोक्ता सर्वेक्षण हे काम करण्यासाठी स्थानिक ठिकाणी निवास स्थाने बंद असणे, पडीक जागा इ. ठिकाणचे सर्वेक्षण करताना जुन्या लाईनवर नळ कनेक्शनचा शोध घेणे, गावठाण भागामध्ये जुन्या लाईन असल्या कारणाने सदर काम मुदतीत पूर्ण होऊ शकले नाही.

उस्मानाबाद.—उस्मानाबाद नगर परिषदेस सदर सुधारणा कामांसाठी दि.१०.०७.२००९च्या आदेशान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. म.जी.प्रा. औरंगाबादकडून दि ३१.०८.२०१० रोजी तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर सुधारणात्मक कामांसाठी नगर परिषदे कडून ४ वेळा निविदा मागविण्यात आल्या. तथापि, त्यास प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे सदरील कामास विलंब झाला.

या संदर्भात तत्कालिन राज्यमंत्री, जिल्हाधिकारी, सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांच्यात दि.७.०१.२०१३ रोजी बैठक झाली. त्यात झालेल्या निर्णयानुसार सदरहू कामे म.जी.प्रा. कडून करून घेण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार म.जी.प्रा.कडून ग्राहक सर्वेक्षण व जीआयएस मॅपिंगची ७५% कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित कामे न.प.कडून मागविण्यात आलेल्या निविदा धारकाकडून ४०% पूर्ण करण्यात आलेली आहेत.

प्रस्तुत सुधारणा कामे करण्यासाठी निविदा धारकांकडून प्रतिसाद न मिळाल्याने वेळेत पूर्ण होऊ शकली नाही.

पंढरपूर.—शासन निर्णय दिनांक ५.३.२०१३ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामे दिनांक २९.५.२०१५ पर्यंत पूर्ण करावयाची होती. तथापि, सदर कालावधीत कामे पूर्ण न झाल्याने सर्वसाधारण सभेच्या दिनांक ३.११.२०१५ च्या ठरावानुसार दिनांक ३१.३.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. दिनांक २८.३.२०१६ पर्यंत कामे पूर्ण झालेली आहेत.

मेकॅनिकल फ्लोमीटरऐवजी इले. मॅग्नेटिक फ्लोमीटर बसविल्यास अंदाजपत्रकीय किंमतीमध्ये बचत होईल, अशी शिफारस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून करण्यात आल्याने त्या बदलास नगर परिषदेच्या मुख्य सभेची मंजुरी घेणे इ. कारणास्तव काम पूर्ण करण्यास विलंब झाला.

फलटण:- शासन निर्णय दिनांक ४.५.२०१२ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर योजनेच्या कार्यारंभ आदेशानुसार दि. २३.०६.२०१६ रोजी पुर्ण होणे अपेक्षित होते. शासनाच्या धोरणानुसार मंजुर योजनेच्या किंमतीच्या १० % इतकी लोकवर्गणीची रक्कम राष्ट्रीयकृत बँकेमध्ये नगर परिषदेने विलंबाने भरल्याने पर्यायाने शासनाकडून निधी प्राप्त होण्यास विलंब झाला.यास्तव सदर सुधारणा कामे पूर्ण होऊ शकली नाहीत. तसेच सॅटेलाईट इमेज प्राप्त होण्यास झालेला विलंब, फ्लो मिटरला तांत्रिक मंजुरी मिळण्यास झालेला विलंब इत्यादी कारणामुळे सदर योजनेचे काम विहित मुदतीत पुर्ण होऊ शकले नाही.

उदगीर:- शासन निर्णय दिनांक १०.७.२००९ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामे दिनांक २७.८.२०१० पर्यंत पूर्ण करावयाची होती. तथापि, सदर कालावधीत कामे पूर्ण न झाल्याने सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार प्रथम मुदतवाढ दिनांक २०.७.२०११, दुसरी मुदतवाढ दिनांक ३०.५.२०१२ व तिसरी मुदत वाढ दिनांक ३१.३.२०१३ पर्यंत देण्यात आली. तथापि, उपग्रह प्रतिमा विलंबाने प्राप्त झाल्याने, तसेच फ्लो मीटर चालू पाणीपुरवठा खंडीत करून बसवावे लागणार होते. पाणी टंचाईमुळे पाणी पुरवठ्यावर परिणाम होणार असल्याने सदर कामे मे, २०१२ नंतर करावी लागली. ग्राहक सर्वेक्षणाचे काम ५ % प्रलंबित आहे.

प्रवाह मीटर बसविणेचे काम ५० % प्रलंबित आहे.

जलव्यवस्थेचा नमुना तयार करणेचे काम ४० % प्रलंबित आहे.

उरण.—सदर योजनेस शासन आदेश दि. १०.१२.२०१२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यानुसार नगर परिषदेने मे. एडीसीसी एजन्सी, नागपूर यांची निविदा नगर परिषदेच्या दिनांक १८.८.२०१३ च्या ठरावानुसार मान्य करण्यात आली. तथापि नगर परिषदेने सदर कामाबाबत ई-निविदा न मागविता वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविल्याने त्याबाबत नगर परिषदेकडून खुलासा मागविला होता. त्यावर नगर परिषदेने सादर केलेला खुलासा शासनाने मान्य केला. त्यानुसार सदर कामे १३ महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित होते. सदर कंत्राटदाराकडून सुधारणा कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत

खामगांव.—शासन आदेश दिनांक १०.७.२००९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामाची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत असून सदर कामे दिनांक २४.८.२०१० पर्यंत कामे पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि, सदर विहीत कालावधीत पूर्ण न झाल्याने वेळोवेळी मुदतवाढ देण्यात येऊन अंतिम मुदत दिनांक ३०.४.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. दिनांक ३०.४.२०१४ रोजी कामे पूर्ण झालेली आहेत.

सदर सुधारणा कामे पूर्ण करण्यास खालील कारणांस्तव विलंब झाला आहे.

१. शहराची उपग्रह प्रतिमा एम.आर.एस.ए.सी., नागपूर यांच्याकडून उपलब्ध न झाल्यामुळे सदर उपग्रह प्रतिमा एन.आर.एस.ए., हैद्राबादकडून विकत घेण्यात आली. या करिता एक वर्षाचा कालावधी लागला.

२. योजनेचा वितरण व्यवस्थेचा नकाशा ऑटोकॅड मध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्यास जी.आय.एस. सॉफ्टवेअर मध्ये रुपांतरीत करणे शक्य नव्हते. या करीता प्रत्यक्ष साईटवरून जी.पी.एस. सर्वेद्वारे वितरण व्यवस्थेची आखणी जी.आय.एस. सॉफ्टवेअर मध्ये करण्यात आली.

३. योजनेचे जल लेखा परिक्षणाकरीता डीएमए मधील काही बंद असलेले जलमापके (ग्राहकांचे) सुरू करण्याकरीता नगर पालिकेस विलंब लागला.

४. योजने अंतर्गत बल्क फ्लो मीटरची उभारणी करण्याकरीता नगर परिषदेला शहरातील पाणीपुरवठा बंद करण्याच्या नियोजनास विलंब झाला.

जालना.—शासन आदेश दिनांक ८.७.२००९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सदर कामाची अंमलबजावणी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत करण्यात येत असून त्यानुसार जिल्हा अधिकारी, जालना यांना सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना कळविले आहे. सदरील कामासाठी आवश्यक लोक वर्गणीचा वाटा पुर्ण न भरल्यामुळे भरलेल्या लोकवर्गणीच्या प्रमाणात नगर परिषदेस रुपये ५७.३३ लक्ष इतकी रक्कम पहिल्या हप्त्याच्या पोटी अदा करण्यात आली आहे. सदर कामांसाठी आवश्यक असलेला लोक वर्गणीचा वाटा नगर परिषदेने न भरल्याने शासनाकडून उर्वरीत अनुदानाची रक्कम नगरपरिषदेस अदा करण्यात आलेली नाही. त्यामुळे कामे प्रलंबित आहेत.

अकोट.—शासन आदेश दिनांक १०.७.२००९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. ग्राहक सर्वेक्षण/प्रवाह मीटर बसविणे ही कामे पूर्ण झाली असल्याचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तथा व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, नागपूर यांनी कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, यवतमाळ यांना कळविले आहे.

हिंगोली.—शासन निर्णय दिनांक १०.७.२००९ अन्वये सुधारणा कामे करण्यासंदर्भात प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर काम दिनांक २८.७.२०१० पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि सदर कालावधीत काम पूर्ण न झाल्याने दिनांक २०.७.२०११ व दिनांक ३०.५.२०१२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. सदर मुदतवाढीनंतर दिनांक ११.२.२०१३ रोजी सुधारणा कामे पूर्ण झाली आहेत. खालील कारणास्तव सुधारणा कामे पूर्ण करण्यात विलंब झाला.

१. एन.आर.एस.सी. हैद्राबाद यांच्याकडून सॅटेलाईट इमेज मिळण्यास विलंब झाला (दिनांक २३.०८.२०१० रोजी प्राप्त)

२. शहरातील घरधारकांकडून माहिती अपुरी मिळणे, घर कुलूप बंद असणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, कोल्हापूर यांच्या कार्यारंभ आदेशानुसार.

अक्कलकोट.—शासन निर्णय दिनांक १०.७.२००९ अन्वये सुधारणा कामे मंजुरीस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार दिनांक ११.८.२०१० पर्यंत कामे पूर्ण होणे आवश्यक होते. म.जी.प्रा., पुणे यांच्या आदेशानुसार दिनांक ५.११.२०१२ पर्यंत व त्यानंतर दिनांक ३०.४.२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. दिनांक ३०.४.२०१४ रोजी कामे पूर्ण झाली असून कामे पूर्ण होण्यास खालील कारणास्तव विलंब झाला आहे.

प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेस दोन वेळा प्रतिसाद मिळाला नाही. मक्तेदाराकडून कामे पूर्ण करण्यास विलंब झाला. त्यामुळे दि.५ नोव्हेंबर २०१२ पर्यंत म.जी.प्रा., पुणे व नंतर म.जी.प्रा., सोलापूर यांचेकडून दि.३० एप्रिल २०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. दि.३० एप्रिल २०१४ रोजी कामे पूर्ण झालेली आहेत.

सावंतवाडी.—शासन आदेश दि. २४.०८.२००९ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तथापि, सावंतवाडी पाणीपुरवठा योजना ही गुरुत्वाकर्षणावर आधारित असल्याने व पाणी उचल करण्यासाठी पंपाचा वापर होत नसल्याने ऊर्जा लेखापरीक्षण करणे हे काम वगळण्यात यावे, असे म.जी.प्रा.,ठाणे यांनी कळविल्याने सदर काम सुजल निर्मल योजनेतून वगळण्यात आले. त्याऐवजी पाणी लेखा परीक्षण व हायड्रॉलिक मोड्युलिंग ही कामे करणे आवश्यक होते. त्यामुळे सदर कामास दिनांक ०१.०३.२०१२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले. त्यामुळे सदर कामास कार्यारंभ आदेश देण्यात आले. सदर कामे दि.२८.०२.२०१३ रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. सदरहू सुधारणा कामे दि.२४ जून २०१५ रोजी पूर्ण केलेली आहेत.

शिर्डी.—शासन निर्णय दिनांक २९.६.२०१३ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर कामे १०० % पूर्ण झाली आहेत.

सँटेलाईट ईमेज उशीरा प्राप्त झाल्याने विलंब झाला आहे.

सदर कामे ८० % पूर्ण झाली आहेत.

सदर कामे १०० % पूर्ण झाली आहेत.

चाळीसगाव.—शासन निर्णय दिनांक २५.८.२००९ नुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर कामे १२ महिन्यांत म्हणजे दिनांक ११.९.२०१२ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक होते. तथापि, सदर कालावधीत कामे पूर्ण न झाल्याने दिनांक २.११.२०१२ च्या नगर परिषदेच्या ठरावानुसार काम पूर्ण होईपर्यंत मुदत देण्यात आली. फ्लो मीटर वगळता दिनांक८.८.२०१४ रोजी कामे पूर्ण झाली आहेत. काही प्रमाणात फ्लो मीटर बसविणे अद्याप बाकी असून पूर्वी निश्चित करण्यात आलेली ठिकाणे रद्द करण्यात आल्याने नवीन ठिकाणास म.जी.प्रा. कडून मान्यता प्राप्त झालेली नाही.

सुधारणा कामांना खालील कारणांमुळे विलंब झाला आहे :-

१ तांत्रिक अडचणी.

२. फ्लो मीटर मंजुरी उशिरा प्राप्त.

३. नगर परिषदेकडून उर्वरित फ्लो मीटर बसविण्यासाठी जागा निश्चिती उशिराने झाली.

रत्नागिरी.—रत्नागिरी शहर पाणीपुरवठा योजनेच्या सुधारणा कामास दि.१४.०३.२०१२ रोजी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून दि.३०.०१.२०१३ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. कार्यारंभ आदेशानुसार सदर सुधारणा कामे दि.२१.०१.२०१४ रोजी पूर्ण होणे अपेक्षित होते. तथापि, सदर कामे खालील कारणास्तव अपूर्ण आहेत :—

१. कामच्या स्वरूपात तांत्रिक बदल. उदा. मेकॅनिकल बल्क फ्लो मिटर ऐवजी बॅटरी ऑपरेटेज अल्ट्रासोनिक फ्लो मिटर बसविणे.

२. प्रत्यक्ष ठिकाणी मिटर बसविताना आलेल्या तांत्रिक अडचणीमुळे उदा. पाईपलाईन जीर्ण झाल्यामुळे मिटर बसविण्यास अडचणी, नवीन झालेला रस्ता खोदाई करण्यास होणारा लोकांचा विरोध.

२.९ माहिती सादर न केल्याबाबत स्पष्टीकरण :

बल्लारपूर.—१. सन २०१२-१३ या वर्षीचे बल्लारपूर नगर परिषदेचे AG Audit करण्यात आले होते, त्यावेळी नगर परिषद, बल्लारपूर सदर माहिती सादर करू शकली नाही, कारण सुजल निर्मल अभियांनांतर्गत बल्लारपूर पाणीपुरवठा सुधारण्याची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन विभाग, नागपूर यांचेकडे होती.

२. कार्यकारी अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन विभाग, नागपूर यांचे कार्यालय दि.२१.०५.२०१५ पासून बंद झाल्यामुळे सदर कामाचा कार्यभार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, चंद्रपूर यांचे कार्यालयाकडे दि.१२.०६.२०१५ पासून हस्तांतरित करण्यात आला आहे.

हिंगोली.—१. हिंगोली शहरातील सुजल निर्मल अभियानांतर्गत सुधारणात्मक कामे ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा विभाग, औरंगाबाद यांचेमार्फत करण्यात आलेली आहेत.

२. सबब, भारतीय लेखा तथा लेखापरीक्षा विभाग कार्यालयाच्या दि.५.०३.२०१५ रोजीच्या Parformance Audit च्या पत्राच्या अनुषंगाने विहित नमुन्यात मागणी केलेली माहिती हिंगोली नगर परिषदेकडे उपलब्ध नव्हती. तसेच, याबाबत मुख्याधिकारी, हिंगोली नगर परिषद यांनी भारतीय लेखा तथा लेखापरीक्षा विभागाला दि.१२.०३.२०१५ च्या पत्राने अवगत केले.

गोंदिया.—१. गोंदिया शहराकरिता सुजल निर्मल अभियानांतर्गत रु. २००.१७ लक्ष किंमतीच्या प्रस्तावास दि.१०.०७.२००९ रोजी मान्यता प्राप्त झाली असून सदर सुधारणात्मक कामे ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उप विभाग क्र.१, गोंदिया यांचे कार्यालयाकडून पूर्ण करण्यात आलेली आहेत.

२. तसेच, भारतीय लेखा तथा लेखापरीक्षा विभाग कार्यालयाच्या दि.५.०३.२०१५ रोजीच्या Performance Audit च्या पत्राच्या अनुषंगाने गोंदिया नगर परिषदेने ई-मेल संदेशाद्वारे माहिती सादर केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे.

२.१० योजना अपर्याप्त असल्याबाबत :

मनमाड.—मनमाड नगर पालिकेच्या भांडवली कामांसाठी मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान अंतर्गत स्थापन राज्यस्तरीय संनियंत्रण व समन्वय समितीच्या दिनांक ५.२.२००९ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला होता.सदर बैठकीत महाराष्ट्र सुजल निर्मल अभियान या अभियानांतर्गत शहरांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावावर कार्यवाही करण्याची कार्यपद्धती, त्याचा प्राधान्यक्रम इ.बाबत राज्यस्तरीय समितीच्या बैठकीमध्ये चर्चा होऊन ज्या नगरपालिका/महानगरपालिकांना खरोखरच पाण्याची आत्यंतिक निकड आहे/पाणी टंचाई आहे तेथे प्राधान्याने प्रस्ताव मंजूर करण्यात यावे, असा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार मनमाड नगर पालिकेच्या रु. ४.८० कोटी एवढ्या रकमेच्या पाणीपुरवठा टप्पा (१) योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

मनमाड शहरातील वितरण व्यवस्थेचे हॉयड्रॉलिक मॉडेलिंग करताना मनमाड पाणीपुरवठा टप्पा-१ मधील वितरण व्यवस्था विचारात घेण्यात आली आहे. तसेच शहरातील उर्वरित भागात वितरण व्यवस्था अद्यापही सुधारित करावयाची आहे. सुधारणांच्या कृती आराखड्यात उर्वरित सर्व भागांचा समावेश आहे. त्यामुळे रु. २० लाखाचा खर्च निष्फळ ठरलेला नाही.

२.११ बिलिंग मॉडयूलच्या मुद्दयांचे स्पष्टीकरण :

उमरखेड.—बिलिंग मोड्यूल हे महानगरपालिका प्रशासन वितरण संगणक प्रणालीमध्ये उपलब्ध असलेल्या ११ मोड्यूल्सपैकी एक आहे. सदर कल्याण डोंबिवलीचे मोड्यूल जुलै, २००९ पासून नगरपरिषदांनी वापरावयास सुरुवात केली होती. परंतु, नगरपरिषदांनी उमरखेड येथे सदर मोड्यूलची अंमलबजावणी दि.२०.०६.२०११ पासून करण्यात आली असून प्रत्यक्षात सदर मॉड्युलची दि. १.४.२०१३ पासून सुरुवात झाली आहे. महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानामधील एक भाग हा बिलिंग व वसुली संगणकीकरण आणि स्पॉट बिलिंग असल्यामुळे व सदर कालावधीमध्ये नगरपरिषद उमरखेडमध्ये कल्याण डोंबिवली मॉड्यूलची बिलिंग प्रणाली सुरू झालेली नसल्यामुळे सुधारणा कामांच्या अंतर्गत ऑगस्ट, २००९ ते ऑक्टोबर, २०१३ दरम्यान पाण्याची संगणकीकृत देयके जारी केली आहेत. दि. १.४.२०१३ पासून KDMC चे मोड्यूल सुरू असून त्यानुसार पाण्याची संगणकीकृत देयके काढण्याचे काम नियमितपणे सुरू आहे.

काटोल.—१. महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत काटोल पाणीपुरवठा संबंधित विविध सुधारणांबाबत कृती आराखडा शा.नि.क्र.सुनिअ/२००९/प्र.क्र.१७४/पापु-२२, दि.१०.०७.२००९ द्वारा मंजूर करण्यात आला. त्यात बिलिंग मोड्युल कामाचा समावेश होता. या योजनेंतर्गत बिलिंग मोड्युलचे काम करण्यात आले.

२. त्यानंतर KDMC संगणक प्रणाली दि.२४.०८.२०१० पासून काटोल नगरपरिषदमध्ये कार्यान्वित करण्यात आली. बिलिंग मोड्युल कामाचा वर नमूद दि.१०.०७.२००९ च्या शासन निर्णयात समावेश असल्याने KDMC चे बिलिंग मोड्युल घेण्यात आलेले नाही. परंतु, पाणीपट्टी कराचे बिलिंग मॉड्यूल समाविष्ट करण्यात आले आहे.

३. काटोल नगरपरिषदेने कृती आराखडा महाराष्ट्र सुजल निर्मल योजनेंतर्गत दि.१०.७.२००९ द्वारा मंजूर असल्यामुळे या योजनेंतर्गत बिलिंग मॉड्यूलचे काम करण्यात आले आहे. त्यामुळे पाण्याची संगणकीकृत देयके संकलित करणे यासाठी संगणक आज्ञावली प्राप्त करण्यासाठी नगरपरिषदेने अतिरिक्त खर्च केलेला नाही.

नरखेड - सुधारणात्मक कामास मंजुरी शा.नि.क्र.सुनिअ/प्र.क्र.२९९/पापु-२२, दि.२४.०८.२००९ अन्वये पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाद्वारे मंजुरी प्राप्त असून न.प. नरखेड येथील वाढीव पाणीपुरवठा योजना मार्च, २००८ मध्ये कार्यान्वित झाली आहे. बऱ्याच कामात नवीन वितरण नलिका टाकण्यात आलेली नाही. तथापि, डी.आय.के.९ ऐवजी एच.डी.पी.ई. पाईप सह सुधारणात्मक कामाच्या प्रस्तावास शा.नि. दि.२४.०८.२००९ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली असून सुधारणात्मक कामात बिलिंग व वसुली यांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

KDMC मोड्यूलला मा.संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी वितरीत केले असून देखील प्रत्यक्षात हार्डवेअर माहे, मे, २०१२ मध्ये नगरपरिषद नरखेडला प्राप्त झाले. शिवाय सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीकरिता आवश्यक कर्मचारी प्रशिक्षण व इतर बाबी उपलब्ध नसल्याने नगरपरिषद नरखेड द्वारे प्रत्यक्षात वॉटर मॉड्यूल दि.७.१२.२०१३ रोजी लाईव्ह करण्यात आले. नगरपरिषदकडे पाणीपुरवठा करिता स्वतंत्र अभियंता नाही. पाणीपुरवठा आस्थापनेवर केवळ ४ कर्मचारी आहेत. सदर संगणक आज्ञावलीच्या मूळ मंजूर प्रकल्पातच समावेश असल्याने व त्या कालावधीत KDMC आज्ञावलीची नगरपरिषद नरखेड मध्ये प्रत्यक्षात अंमलबजावणी नसल्याने मंजूर प्रकल्पातील सुधारणात्मक कामातील बिलिंग व वसुलीची आज्ञावली वापरणे आवश्यक व क्रमप्राप्त होते.

सिल्लोड.—सदर नगर परिषद कार्यालयामधून डाटा अपडेट करण्याची कार्यवाही पूर्ण झाली नसल्यामुळे सदर मॉड्यूल (KDMC) सन २०११-१२ पासून कार्यान्वित केले आहे. सद्यस्थितीत पाणीपट्टीसह KDMC चे मॉड्यूल दैनंदिन कामकाजात कार्यरत आहेत.

साक्ष :

३.१ उपरोक्त लेखी माहितीच्या आधारे दिनांक ३० ऑगस्ट, २०१६, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६, दिनांक १८ जानेवारी, २०१७ तसेच २८ फेब्रुवारी, २०१७ रोजी समितीने परिच्छेद क्रमांक ४.१ 'निवडक नगरपरिषदांमध्ये मूलभूत नागरी सेवांचा पुरवठा' या संदर्भात नगरविकास विभागाची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने 'निर्धारित मात्रेत पाणीपुरवठा न होणे' या मुद्दयासंदर्भात विभागास असे अवगत केले की, नगरपरिषदांमध्ये अक्कलकोट ३५, मनमाड ५०, उदगीर १५, भंडारा ६० याप्रकारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. पाणीपुरवठा करण्यात येतो अशाप्रकारचा प्रशासनाला फिडबॅक देण्यात येतो परंतु ही वस्तुस्थिती नाही कारण एमजीपीने एवढे पाणी आरक्षित केलेले नाही आणि देतही नाही. वाढीव पाणीपुरवठा अजून कार्यान्वित झालेला नाही. प्रशासनाला जी काही माहिती पुरविण्यात आलेली आहे ती वस्तुस्थितीला धरुन नाही असे समितीचे म्हणणे आहे. जर एकंदरीत कनेक्शन, १२५ लिटर पाणी, आणि लोकसंख्या तसेच धरणातून उचललेले पाणी बघितले तर नगरपालिकेने जी आकडेवारी कळविलेली आहे यात किती विसंगती आहे हे दिसून येईल. एवढे पाणी उचलले नसेल तर दिले कसे ? नगरविकास विभागाने जी आकडेवारी दिलेली आहे आणि पाणीपुरवठा विभागाने किती बिल दिलेले आहे, किती पाणी लिप्ट केले. लोकसंख्येनुसार प्रत्येक नगरपालिकेची आकडेवारी दिलेली आहे यानुसार किती पाणी उचलले गेले पाहिजे. याठिकाणी पाणीपुरवठा विभागाचेही अधिकारी आहेत. मुख्य अधिकाऱ्यांनी जी काही माहिती पुरविलेली आहे ती वस्तुस्थितीला धरुन नाही हे निदर्शनास येईल. याबाबत विभागाने स्पष्टीकरण द्यावे असे निदेश दिले असता महालेखाकारांनी ३६ नगरपरिषदांचे ऑडीट केले होते. कायद्याच्या तरतुदीनुसार ७० एलपीसीडी पाणी देणे नगरपालिकांना बंधनकारक आहे. त्यानुसार एजीने असे म्हटलेले होते की, १७ मध्ये ७० एलपीसीडीच्या कमी पाणी दिले जाते. त्यानंतर एजीला जी माहिती सादर करण्यात आली आणि नगरपालिकांनी जी माहिती दिली त्यानुसार विभागाने आकडेवारी सादर केलेली आहे. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.२ वाशिम आणि जालना हे दोन्ही ठिकाणे घेण्यात यावीत कारण जालना येथेही १५-१५ दिवस नळांना पाणी येत नाही. मागच्या पाच वर्षापासून ही परिस्थिती असून फक्त आकडेवारी देण्यात आलेली आहे की, रोज एवढा पाणीपुरवठा करतो तथापि हे वस्तुस्थितीला धरुन नाही. इलेक्ट्रीसिटी कन्झमशनमधून सुद्धा या गोष्टी टॅली करता येऊ शकतील. धरणातून उचललेले पाणी, लोकसंख्या आणि आकडेवारी यावरून हे सर्व लक्षात येऊ शकते. ज्या मुख्याधिकाऱ्यांनी चुकीची आकडेवारी आपल्याकडे सादर केली आणि आपल्या माध्यमातून समितीला सादर करण्यात आली त्यांच्यावर कारवाई करण्यात आली पाहिजे. कित्येक वेळा नगरपालिका बैठका घेऊन आढावा घेतात आणि विचारले तर हो करतो म्हणून सांगतात, वस्तुस्थिती ग्राऊंटीलिटी नाही म्हणून याचे क्रॉस चेकिंग करण्याची गरज आहे असे समितीने सांगितले असता याची नोंद घेण्यात आलेली आहे असे विभागीय सचिवांकडून सांगण्यात आले.

३.३ नगरपालिका क्षेत्रामध्ये वैयक्तिक शौचालयांची योजना राबवित आहोत. महानगरपालिका ओडीएफ करायची हे शासनाचे धोरण आहे. समजा ७० लिटर पाणी पुरविले नाही तर ते शौचालय सुद्धा बंद होणार आहे. त्यामुळे प्रत्येक नगरपालिकेने ७० लिटर पाणी पुरवावे याबाबत शासनाचे काही नियोजन आहे काय? यामध्ये दिलेल्या नगरपालिका या ७० पेक्षा कमी असलेल्या आहेत. अनेक नगरपालिकांमध्ये वाढीव पाणीपुरवठा योजना करण्याची आवश्यकता आहे. कारण नगरपालिका क्षेत्र वाढत आहे, तेथील लोकसंख्या वाढत आहे, भूमीगत गटार योजनेकडे सुद्धा प्रोज करीत आहोत. त्यासाठी साधारणपणे १४० लिटर पाणी पाहिजे. याबाबत राज्य शासनाने कोणते नियोजन केलेले आहे. या संदर्भात समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने विभागीय सचिवांना सांगितले असता याबाबत केंद्र आणि राज्य शासन मिळून पाणीपुरवठा सन २०१९ पर्यंत प्रत्येक शहराला किमान ७० एलपीसीडी व्हावा असे नियोजन केले आहे. एक लाख लोकसंख्येच्या वरची जी शहरे आहेत त्यांना केंद्र शासनाने अमृत शहरे म्हणून घोषित केली आहेत. या अमृत शहरांना सन २०१९ पर्यंत १०० टक्के पाणीपुरवठा म्हणजे १३५ एलपीसीडीने पाणीपुरवठा आणि १०० टक्के एरियाला पाणीपुरवठा करण्याचे केंद्र शासनाचे धोरण आहे. महाराष्ट्र राज्याला सन २०१९ पर्यंत अमृत शहरांकरिता ७ हजार कोटी रुपये नियतव्यय प्राप्त होणार आहे. अमृत शहरे सोडून जी शहरे आहेत, म्हणजे समितीतील सन्माननीय सदस्यांची जी शहरे आहेत ती नॉन अमृत शहरे असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.४ महाराष्ट्रातील ज्या नगरपालिका आहेत त्या नगरपालिकांमध्ये भूमिगत गटार योजना, त्याचप्रमाणे वैयक्तिक शौचालयांवर भर देण्यात येत आहे. आजही अशा अनेक नगरपालिका आहेत की, ७० लिटर प्रती माणसी एवढा कमी पाणीपुरवठा केला जातो. त्यामुळे या योजनेच्या यशस्वीतेवर निश्चितपणे परिणाम होणार आहे. सर्व महाराष्ट्रातील शहरांमध्ये कमीत कमी ७० लिटर प्रती माणसी पाणी किंवा मोठ्या नगरपालिकांमध्ये १३५ ते १४० लिटर माणसी पाणी देण्याची योजना शासनाने केलेली आहे, काय अशी विचारणा समितीने पुनश्च केली असता. सर्व शहरांना पाणीपुरवठा शाश्वत स्वरुपात सन २०१९ पर्यंत मिळावा अशी केंद्र आणि राज्य शासनाची भूमिका आहे. केंद्र शासनाने अमृत योजना निश्चित करून एक लाखापेक्षा जास्त सर्व अमृत शहरांना सन २०१९ पर्यंत शाश्वत पाणीपुरवठा देण्याचे नियोजन केले आहे. महाराष्ट्राला या मिशन कालावधीमध्ये ७ हजार कोटी रुपये नियतव्यय प्राप्त झालेला आहे. जी नॉन अमृत शहरे आहेत त्यासाठी महाराष्ट्र शासनाने नियोजन केले आहे की, आपल्या कायद्यामध्ये ७० एलपीसीडीची तरतूद आहे. ज्या शहरांना ७० एलपीसीडी पाणी मिळत नाही ही सर्व शहरे डीएमए आणि मजिप्रा हे एकत्रितपणे आयडेंटीफाय करीत आहेत. साधारणपणे पुढच्या दोन महिन्यात ही शहरे आयडेंटीफाय होतील आणि ज्या ठिकाणी सर्वात जास्त गॅप आहे ती शहरे पहिल्यांदा घेऊन पुढच्या चार वर्षामध्ये ज्यांना ७० एलपीसीडी पाणीपुरवठा होत नाही, ही सर्व शहरे १०० टक्के टॅकल करण्याचे महाराष्ट्र शासनाचे नियोजन आहे, अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

३.५ नगरोत्थानमध्ये ७० लिटर पाणी प्रती माणशी राहणार आहे की १३५ लिटर पाणी प्रती माणशी देण्याचे नियोजन राहणार आहे. अशी विचारणा समितीकडून करण्यात आली यावर विभागाकडे अशी बरीच शहरे आहेत की, त्याठिकाणी ७० एलपीसीडी पाणीपुरवठा होत नाही अशी शहरे प्राधान्याने घेण्यात येतील. ज्यावेळेस नगरोत्थानमध्ये मंजुरी देण्यात येते त्यावेळेस १३५ लिटर प्रती माणशी पाण्याची मंजुरी देण्यात येते अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला सादर केली.

३.६ सरफेस वॉटर सप्लायवर विशेष भर देण्यात येणार आहे त्याचे व्हेरीफिकेशन झाले पाहिजे. त्याप्रमाणे त्याचे इन्फ्रास्ट्रक्चर आणि ग्रॅव्हीटीवरून पाणी देण्यात आले तर पैशांचा सोर्स सुद्धा कमी होणार आहे. अशा प्रकारचे काही नियोजन करण्यात आलेले आहे काय की, सरप्लस पाणी देण्यात येईल. यावर विभागीय सचिवांनी माहिती देतांना असे सांगितले की, एमजेपीचे एमएस आहेत ते सुद्धा याबाबत अधिक स्पष्टता देऊ शकतील. परंतु ज्याठिकाणी नगरपरिषदांचा प्रश्न येतो त्यावेळेस पाणीपुरवठा आणि नगरविकास या दोन्ही विभागांचे असे म्हणणे आहे की, नगरपरिषदांना शक्यतो सोर्स हा सरप्लस वॉटर सोर्स पाहिजे जोपर्यंत शक्य आहे तोपर्यंत पाटबंधारे विभागाने पाणीपुरवठा योजनेला आरक्षण द्यायला पाहिजे पाटबंधारे विभागाचे आरक्षण प्राप्त झाल्यानंतर या सोर्समधून पाणीपुरवठा योजना करणार आहोत.

३.७ यामध्ये जो तक्ता दिलेला आहे आणि एजीने जे स्पष्टीकरण दिलेले आहे यात १७ नगरपरिषदांमध्ये तफावत दिसते. अक्कलकोट ६५ आहे स्पष्टीकरणामध्ये ३५ दिलेले आहे. तसेच सिल्लोडमध्ये एजीने ३९ चा आकडा दिलेला आहे आणि स्पष्टीकरणामध्ये १३५ चा आकडा दिलेला आहे. तसेच एजीच्या आक्षेपानंतर विभागाने स्पष्टीकरण दिलेले आहे. यात एजीचे सन २०१५ चे रिमार्क्स दिलेले असल्याने समितीने नमूद केले तसेच एजीने सन २०१३-२०१४ मध्ये सिल्लोड येथील १३५ चा आकडा दिलेला आहे एवढा कसा काय फरक झालेला आहे काय ? तसेच या योजनेला निधी मिळत नसल्याबाबत तेथिल स्थानिक लोकप्रतिनिंधीनी ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिलेली असून हिंगोली येथील योजनेची सुद्धा तीच परिस्थिती आहे यापुर्वी अक्कलकोटला ६६ होते ते आता ३५ झालेले आहे. त्यामुळे योजना अर्धवट राहिलेल्या आहेत. अक्कलकोट आणि सिल्लोड या दोन्हीबाबतची माहिती समितीला देण्यात यावी अशी सुचना समितीने केली असता सिल्लोड येथे आधी दोन योजना होत्या त्या अंतर्गत डिस्ट्रीब्युशनची योजना होती ती पूर्ण झाली ज्या योजनेबाबत बोलत आहेत ती सोर्स ऑगमेंटेशनची योजना आहे या ३६ योजनांमध्ये जालनाचे सुद्धा मेन्शन आहे जालना येथे सुद्धा उलट झालेले आहे जालना येथे सोर्स ऑगमेंटेशनची योजना यूआयडीएसएसएमटीमधून पूर्ण झाली. आता नगरोत्थानमधून डिस्ट्रीब्युशनची योजना करीत आहोत. सिल्लोड येथे डिस्ट्रीब्युशन योजना पूर्ण झाली असून सोर्स ऑगमेंटेशनच्या योजनेबद्दल समिती विचारणा करत असूननसोर्स ऑगमेंटेशनची योजना नगरोत्थानमधून करण्यात येत आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

३.८ नवीन शासननिर्णयाप्रमाणे नगरोत्थानला २५:७५ चा रेश्यो आहे काय ? तरीही विभागाकडून जास्तीच्या निधीची मागणी करण्यात येते असे समितीने नमूद केले असता विभागाकडून कोणताही जास्तीचा निधी मागितला जात नाही असे समितीला सांगण्यात आले.

३.९ अक्क्लकोट येथे पुरवठा कमी कसा काय झाला. सिल्लोड येथील १३५ LPCD पाण्याची योजना पूर्ण झाली काय ? व १३५ लिटरची योजना नोव्हेंबर, २०१५ मध्ये सुरू आहे असे सांगितले ती योजना पूर्ण झाली काय? जोपर्यंत आक्युमोडेशन होणार नाही तोपर्यंत पाणी मिळणार नाही. याबाबत विचारणा समितीने केली असता, डिस्ट्रीब्युशनची योजना पूर्ण झालेली आहे तसेचचचयामध्ये दोन प्रकार असतात एक म्हणजे डिस्ट्रीब्युशनमध्ये बरेचसा लिकेज असतो आणि लिकेजमुळे एनआरडब्ल्यू असतो. भुसावळसारख्या शहरात जवळपास ५० टक्क्यांपर्यंत लिकेज आणि थेप्ट रिलेटेड एनआरडब्ल्यू गेलेला आहे. त्यामुळे डिस्ट्रीब्युशन सिस्टम ऑगमेंट केली तर जी काही गळती होत असते ती थांबते आणि त्यामुळे पाणीपुरवठा सुधारतो. काही नगरपरिषदा अशा असतात की, त्याठिकाणी गळती थांबवून सुद्धा ड सोर्स पाणी ७० एलपीसीडी किंवा १३५ एलपीसीडीने कमी उचलला जातो. त्याठिकाणी सोर्स ऑगमेंटेशन करायला लागते. नगरपरिषदेच्या तपशीलावर अवलंबून आहे की, सोर्स ऑगमेंटेशनची गरज आहे की, डिस्ट्रीब्युशन सुधारायची गरज आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

३.१० याठिकाणी शुद्ध पाणी देण्यास सांगण्यात आलेले आहे. परंतु बऱ्याच नगरपालिकांमध्ये जे फिल्टर प्लँट आहेत ते पूर्णपणे बंद आहेत. ज्यावेळेस योजना सुरू होते त्यावेळेस सुरू करण्यात येतात आणि नंतर बंद करण्यात येतात. आजही अनेक नगरपालिकांमध्ये फिल्टर प्लँट बंद असतील यासाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहे. तसेच, नगरपरिषदांमध्ये फिल्टर प्लँटबाबत जी योजना तयार करतो ती योजना पूर्णपणे कार्यान्वित आहे किंवा नाही याची माहिती घेण्यात येते किंवा नाही याबाबत खुलासा करावा यावर पाणीपुरवठा योजनेमधील सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे WTP किंवा वॉटर ट्रिटमेंट प्लँट असतो कोणतीही नगरपरिषद ही रॉ वॉटर उचलते आणि नागरिकांना शुद्ध पाणी देण्याचे बंधनकारक कर्तव्य हे अत्यंत महत्त्वाचे कर्तव्य असल्याने कोणत्याही नगरपरिषदा WTP आहे हे बघत असते. तसेच याबाबत सतर्क असते. समजा एखाद्या दिवशी WTP ला काही अडचण आली तरर लगेच त्याचे प्रतिसाद गावातील नागरिकांवर जाणवतात. तसेच नगरपरिषद आणि डीएमएए सतर्क असतात. WTP प्लँट हा सर्वसाधारणपणे सर्व नगरपरिषदा ऑपरेट करीत असतात. जर समितीकडे अशा दोन चार नगरपरिषदांची माहिती असेल तरर त्याची तात्काळ दखल घेण्यात येईल असे समितीला विभागीय सचिवांकडून अश्वासित करण्यात आले.

३.११ एमजीपीने जवळपास ५० वर्षापूर्वी ही योजना बनविली आणि जवळपास ५५ वर्षे झालेली आहेत या सोर्सला बाराही महिने पाणी असते. विभागाने त्याठिकाणी जाऊन बघितले तर लक्षात येईल की, किती अशुद्ध पाणी प्यायला मिळते. रॉ वॉटर येते तसेच्या तसे बाहेर जाते की काय असे वाटते. त्याठिकाणी फिल्ट्रेशन स्टँड बसविलेले नाहीत, आलम बरोबर वापरला जात नाही, वेळेवर क्लोरीनचे सिलेंडर नसतात. व त्याठिकाणची एवढी वाईट अवस्था आहे की, बारा महिने पाणी असून देखील नागरिकांना पाणी मिळत नाही. विभागाकडून ७० एलपीसीडी पाणी येत असल्याचे सांगत आहेत त्याठिकाणी १३५ एलपीसीडी पाणीी देता येईल एवढे पाणी आहे. परंतु मनमानी पद्धतीने डिस्ट्रीब्युशन सिस्टम बसविलेल्या आहेत. आपआपल्या वार्डामध्ये १२ मिमी पर्यंतचे पाईप टाकण्यात येणे, बाकीच्या वॉर्डांमध्ये पाणी जाऊ न देणे, या सर्व पद्धती त्याठिकाणी करण्यात आलेल्या आहेत. याला कंट्रोल कसे करणार आहात. या संदर्भात कोण नियंत्रण ठेवणार आहे ? ७० एलपीसीडी पाण्याचा पुरवठा करणे हे

कायदयानुसार बंधनकारक असून यापेक्षा कमी पाणीपुरवठा करण्यात आला तर त्या संदर्भात कोणीतरी नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता, भुसावळ हे शहर अमृत शहर योजनेमध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे. समितीने पाणीपुरवठ्यासंदर्भात जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत, ते विचारात घेऊन सन २०१६-२०१७ च्या अमृत शहर योजनेच्या सॅप मध्ये त्यांचा समावेश करण्यात येईल. एमजेपी यांच्याकडे शास्त्रोक्त पद्धतीने डीपीआर करून या संदर्भातील जी काही योजना आहे, त्यामध्ये दुरुस्ती करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

३.१२ सदर योजनेकरिता १३५ एलपीसीडी पाणी ट सोर्स उपलब्ध असतानाही असे होत आहे, हे योग्य नाही. तसेच भुसावळ शहरामध्ये सगळीकडे मनमानी पद्धतीने पाणी वाटप चालू आहे. याबाबत विचारणा केली असता भुसावळ शहरामध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त एनआरडब्ल्यू (Non radio active waste) व चोरीचे प्रमाण आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला दिली.

३.१३ पुढे समिती साक्षी दरम्यान माहिती घेताना भुसावळ शहरामध्ये मोठ्या प्रमाणात लिकेजच्या दुरुस्तीची बिले कशी निघतात ? लिकेजेसची लाखो रुपयांची बिले काढली जातात, मात्र प्रत्यक्षात लिकेजेसची दुरुस्ती होत नाही. ही बाब विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता. एमजेपीचे नवीन डीएमए यांनी प्रती महिना दोन नगरपरिषदांची चौकशी करण्यात येईल, निर्णय घेतलेला आहे. या संदर्भात भुसावळ नगरपरिषदेचे नाव प्राधान्याने घेण्यासंदर्भात सूचना देण्यात येतील असे समितीला विभागीय सचिवांनी सांगितले

३.१४ नगरपालिकांनी योजनेंतर्गत २५ टक्के निधी देणे आवश्यक आहे, ही जी अट टाकलेली आहे, ती जाचक आहे. आज महानगरपालिकांची व नगरपालिकांची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. जर समजा २५० कोटी रुपयांच्या योजनेकरिता २५ टक्के निधी द्यावायाचा असेल तर संबंधित नगरपालिकांना शक्यच होणार नाही. यासंदर्भात काहीतरी मार्ग शोधणे आवश्यक आहे. जेणेकरून योजनाही प्रभावीरितीने राबविल्या जाऊन त्याचा जनहितार्थ उपयोग होईल. या संदर्भात काही उपाययोजना केली आहे काय अशी विचारणा समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी अशी माहिती दिली की, शासनाला याची पूर्ण कल्पना आहे की, २५ टक्के योजनेची रक्कम भरण्यास फार कमी नगरपालिका सक्षम आहेत. विभागाच्या या उपाययोजनेचा चौदाव्या वित्त आयोगाशी सांगड घातलेली आहे. अमृत शहर योजनेमध्ये जी शहरे समाविष्ट आहेत, केवळ त्या शहरातील नगरपालिकांकरिता ही २५ टक्क्यांची अट लागू आहे. इतर नॉन अमृत शहर योजनेतील शहरामध्ये असलेल्या नगरपालिकांना मात्र दहा ते पंधरा टक्क्यांचीच अट अद्यापहि लागू आहे.

३.१५ याची सांगड जर चौदाव्या वित्त आयोगाशी घातली तर इतर आवश्यक कामे जी चौदाव्या वित्त आयोगामार्फत होणे अपेक्षित आहे, त्याकरिता निधी कमी पडता कामा नये. बाकीची कामे या आयोगातून कशी करण्यात येणार आहेत ? अशी विचारणा केली असता या संदर्भात व्यक्तिगत पातळीवर एक-एक नगरपालिका अर्थपुरवठ्याकरिता हुडकोसारख्या संस्थांकडे जातात. विभागाचे यावरील सोल्यूशन पुढीलप्रमाणे आहे या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी निर्देश दिलेले आहेत. नगर विकास विभागातून एक ५०० कोटी रुपयांचा कॉर्पस फंड उभा करून त्यातून नगरपालिकांना इजी लोन उपलब्ध करून देण्यात यावे. हे लोन नगरपालिकांना एक महिन्याच्या आत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कॉर्पस फंडमधून जे इजी लोन मिळणार आहे, त्याचा व्याजदर कमी आणि पेमेंट पिरियड जास्त असे स्वरुप असणार आहे. ज्या नगरपालिकांनी कॉर्पस फंडमधून घेतलेले पैसे जर परत दिले नाही तर चौदाव्या वित्त आयोगातून ते परस्पर शासन वळते करून घेणार आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीला सादर केली.

३.१६ विभागाने सादर केलेल्या माहितीमध्ये पाणीपुरवठ्यासंदर्भातील जी आकडेवारी दिलेली आहे ती, ॲट सोर्सची आहे की डिस्ट्रीब्यूशनची आहे, हे कळत नाही. प्रत्यक्ष सोर्समधून किती पाण्याची उचल केली आणि वाटप किती पाण्याचे होत आहे, याच्या आकडेवारीमध्ये फरक आहे. टाकीपासून मेन लाईनने प्रत्यक्ष किती पाणीपुरवठा केला जातो, या आकडेवारीला जास्त महत्त्व आहे. सोर्समधून केलेली पाण्याची उचल आणि प्रत्यक्ष वाटप झालेल्या पाण्याचे प्रमाण यामध्ये प्रत्यक्षात ५० टक्क्यांचा फरक असतो. या आकडेवारीमध्ये डिस्ट्रीब्यूशनचे लिकेजेस गृहित धरण्यात आलेले आहेत का ? तसेच एजी यांनी या संदर्भातील जी आकडेवारी दिलेली आहे, त्याकरिता कोणता आधार घेतलेला आहे, याकरिता त्यांनी एनआरडब्ल्यू, गळती याचा विचार डिस्ट्रीब्यूशन लेव्हलपर्यंत केलेला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, ही बाब योग्य आहे. त्याचा सविस्तर अभ्यास विभागाने केलेला आहे. ४० टक्क्यांपर्यंत या भागामध्ये एनआरडब्ल्यूचे प्रमाण आहे. तसेच, चोरीचे प्रमाण असल्यामुळे ॲट सोर्स आणि डिस्ट्रीब्यूशनच्या पॉईंटपर्यंतच्या पाण्याच्या प्रमाणात फरक आहे. ज्या भागामध्ये ७० एलपीसीडीपेक्षाही कमी पाणीपुरवठा केला जातो, तेथे या योजनेंतर्गत पाणीपुरवठा करण्याचे नियोजन केलेले आहे असे समितीला विभागीय सचिवांनी अवगत केले.

३.१७ टाकीपासून वितरणापर्यंत पाण्याची प्रत्यक्षात गणना केली गेली पाहिजे. रॉ वॉटर उचल केल्याप्रमाणे पाणीपुरवठ्याच्या आकडेवारीची गणना करणे हे संयुक्तिक नाही. याकरिता पीडब्ल्यूटी म्हणजे पब्लिक वॉटर टँक बंद करण्यासंबंधी सूचना देणे आवश्यक आहे. हे पीडब्ल्यूटी बंद केल्यामुळे जे पाणी सेव्ह होईल, त्यातून पाणीपुरवठ्याचे नियोजन करता येईल याकरिता चार्जेस लावणे सुरू केले होते. ही योजना नगरपालिका व नगरपरिषदा यांना ना नफा ना तोटा या तत्त्वावर चालविणे भाग होते. डिस्ट्रीब्यूशन सिस्टममधील लॉस कमी करण्यासाठी ही जी गणना केलेली आहे, ती चुकीची आहे असे मत समितीने नोंदविले.

३.१८ पुढे साक्षी दरम्यान समितीने महालेखाकारांना अशी विचारणा करण्यात आली की, सदर पाणीपुरवठ्याची आकडेवारी ॲट सोर्स घेतलेली आहे की डिस्ट्रीब्यूशनची गृहित धरलेली आहे ? यावर महालेखाकारांनी खुलासा करताना असे सांगितले की, महानगरपालिकेच्या पाणी परिषदांनी आम्हाला ज्या पद्धतीने पाणीपुरवठ्यासंबंधीची आकडेवारी दिलेली आहे, त्याप्रमाणे आम्ही त्यासंबंधीची गणना केलेली आहे. महालेखाकार यांनी या संदर्भात रॉ वॉटरची ॲट सोर्स गणना केलेली आहे. पाणीपुरवठ्यासंबंधीची प्रत्येक स्तरावरील गणना महालेखाकार यांनी पाणी परिषदांना माहिती विचारुन केलेली आहे.

३.१९ पाणीपुरवठ्यासंबंधी जलसंपदा विभागाचे दिनांक १८ मे,२०१५ रोजी पत्र आले त्यामध्ये म्हटले होते की, पाणीपुरवठ्याकरिता सिंचनाचे आरक्षण वाढविण्यात यावे. महत्त्वाच्या पाणी आरक्षणासंबंधीच्या पाणीपुरवठा योजना सन २०१० मध्ये बंद पडलेल्या आहेत. त्यानंतर सन २०१४ मध्ये एक शासन निर्णय लागू करण्यात आलेला आहे. वाशिम नगरपरषिदेला या पाणीपुरवठा योजनेच्या खर्चाच्या रकमेपोटी १३.७६ कोटी रुपयांचा भरणा क्रमप्राप्त आहे. परंतु आता नगरपरिषदांची आर्थिक स्थिती इतकी वाईट आहे की, एवढे पैसे भरुन पाणीपुरवठा योजना चालविणे त्यांना अशक्य झालेले आहे. सन २०१४ चा जो पाणीपुरवठ्याचा खर्च माफ करण्याचा शासन निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू केला तर यातून बऱ्याच नगरपरिषदांमधील पाणीपुरवठा योजनांना संजीवनी मिळेल. त्यावेळी वाशिम नगरपरिषदेची पाणीपुरवठा योजना ही १२५ एलपीसीडी इतकी होती. त्यावेळी त्यांच्याकडे एवढा पाणीपुरवठा करण्याचे नियोजन ॲट सोर्स होते. या संदर्भातील सन २०१० पासूनच्या योजनांनाही हा शासन निर्णय लागू करण्यासंबंधीचा शासन निर्णय शासन काढणार आहे का ? यापूर्वी अशा प्रकारचे अनेक सिंगल नगरपालिकांचेही प्रस्ताव कॅबिनेटपुढे जाऊन मान्य होऊन आलेले आहेत. अशा प्रकारे हा जी.आर. पूर्व लक्षी प्रभावाने मान्य करणे आवश्यक आहे. अशी सूचना समितीने विभागाला केली असता विभागीय सचिवांनी असे सांगितले की, सन २०१४ मध्ये शासनाने एक निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार नगरपरिषदांना पाणीपुरवठ्याच्या योजनांचे पैसे माफ करण्यात आलेला आहे. कारण की, त्यावेळी नगरपालिका व नगरपरिषदा यांची आर्थिक परिस्थिती बिकट होती. परंतु सन २०१० मध्ये देखील नगरपरिषदाव नगरपालिका यांची आर्थिक परिस्थिती बिकटच होती. विभागाने या संदर्भात प्रॉस्पेक्टिव्हली व पूर्व लक्षी प्रभावाने स्टॅण्ड घेणे आवश्यक आहे नगरविकास विभाग या संदर्भातील प्रस्ताव पाटबंधारे विभागाकडे पाठवून त्यांची मान्यता मागू शकते किंवा हा सर्व एकत्रित प्रस्ताव कॅबिनेटपुढे मान्यतेकरिता पाठवू शकते. परंतु याकरिता मूळात पाटबंधारे विभागाची मान्यता आवश्यक आहे.

३.२० परंतु याचा परिणाम हा झाला की, अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे महानगरपलिका क्षेत्राकरिता दैनंदिन वापराकरिताही धरणातील पाण्यामध्ये आरक्षण मागावे लागते. तसेच सन २०१४ चा हा शासन निर्णय सरसकट सर्व नगरपरिषदा व नगरपालिका यांना लागू करणे आवश्यक होते. यापूर्वी अनेक पाणीपुरवठा योजनांच्या निधीसंदर्भात शासनाने अनेक नगरपरिषदांना माफी दिलेली आहे. क व ड नगरपालिकांसमवेतच या संदर्भात ब वर्ग नगरपालिकांचाही प्रश्न महत्त्वाचा आहे. नगरपालिकांनी २५ टक्के निधी भरुन योजना कार्यान्वित करण्यासंबंधीचा विषयही अशक्य वाटतो. कारण आता कोणत्याही नगरपालिकेची योजनेच्या एकूण निधीपैकी २५ टक्के निधी भरण्याची ताकद राहिलेली नाही. वित्त आयोग व विभागाचा कॉर्पस फंड त्यातून इजी लोनची जी संकल्पना सचिव महोदयांनी सांगितलेली आहे, त्यासंदर्भात कमी व्याजदर व पेमेंट पिरियड जास्त ठेवण्यात आलेला आहे, ही चांगली गोष्ट आहे. परंतु ही २५ टक्के निधीची अट जर १० टक्क्यांपर्यंत आणली तर उक्त कल्पना यशस्वीरितीने साकार होईल. अन्यथा कॉर्पस फंडमधून २५ टक्के निधी शासनालाच देण्याकरिता इजी लोन घेणे ही संकल्पनाही यशस्वीरितीने कार्यान्वित होणार नाही. ग्रामीण भागामध्ये पाणीपुरवठा योजना राबविणे म्हणजे नगरपालिका व नगरपरिषदांकरिता पांढरा हत्ती पोसण्यासारखे बिकट होऊन बसलेले आहे. तसेच, या पाणीपुरवठा योजनेचा विजेचा व देखभालीचा खर्च म्हणजे ओएनएम बघितला तर तोही पेलण्याची आर्थिक क्षमता ग्रामीण भागातील नगरपालिकांमध्ये नाही. सन २०१४ चा जी.आर. सरसकट सर्व ब,क,ड वर्ग नगरपालिकांकरिता लागू करण्यात यावा. उपरोक्त सर्व बाबी समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिल्या. उपरोक्त मुद्दयाच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असे विहित केले की, नगरविकास विभागाचा असा कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव नाही. वित्त आयोगापोटी नगरपालिकांकरिता विभागाला २००० कोटी रुपये प्राप्त होतात, त्यामध्ये विभागाला अंडरटेकिंग असे द्यावे लागते की, नगरपरिषदा पाच वर्षात या पाणीपुरवठा चांगल्या प्रकारे सक्षमरित्या राबवतील. ओएनएमचा खर्च भागविण्याकरिता नगरपरिषदांनी आवश्यक ती पाणीपट्टी लावून वसूल करणे आवश्यक आहे.

३.२१ स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणीपुरवठा योजनांचा खर्च व इतर विकास योजनांमधील २५ टक्के निधीचा शेअर परवडण्याइतकी त्यांची आर्थिक कुवतच नाही. ही २५ टक्क्यांची अट १० टक्क्यांवर आणली तर काही नगरपालिकांना या योजनेमध्ये समाविष्ट होणे कुठेतरी शक्य होईल. काही नगरपालिका व नगरपरिषदा यांना तर दहा टक्के निधीच्या अटीवरही योजनेमध्ये समाविष्ट होणे परवडत नाही. योजनांमध्ये समावष्टि होण्याकरिता शासनाने ठेवलेली निधीची अट कमीत कमी केली तरच या योजना यशस्वी होतील, अन्यथा या योजना कागदावरच राहतील. योजनांकरिता बजेटमध्ये २०० कोटी रुपये फंड मिळतो, परंतु नगरपालिका समाविष्ट होऊ न शकल्यामुळे त्या राबविल्या जात नाहीत, त्यामुळे त्यावरील खर्च केवळ २ कोटी रुपये इतकाच राहतो. योजना राबविली गेली नाही तर हा २ कोटी रुपये खर्चही वाया गेल्यासारखा आहे. लोकवर्गणीच्या माध्यमातून पाणीपुरवठा राबवून उर्वरित शेअर नगरपालिकांनी दयावा, ही योजनाही राबविणे नगरपालिका व नगरपरिषदा यांना कमकुवत आर्थिक क्षमतेमुळे अशक्य आहे. असे समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले असता २५ टक्क्यांची अट ही केवळ अमृत शहर योजनेंतर्गत येणाऱ्या नगरपालिका व नगरपरिषदा यांनाच लागू आहे. नॉन अमृत शहर योजनेंतर्गत असलेल्या साधारण नगरपालिकांना केवळ दहा टक्के योजना निधीची अट लागू आहे असे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

३.२२ नागपूर महानगरपालिकेंतर्गत खाजगी तत्त्वावर विजेचा वापर न करता तीन ते चार माळयाच्या इमारतीमध्ये पाणी चढविणे व त्याचा देखभाल खर्चही कमी अशी योजना चालू आहे, या योजनेची वसूलीही अतिशय चांगली आहे. तसेच खाजगी कन्सल्टंट नेमून ही योजना चालू केलेली आहे, ही योजना नागपूर महानगरपालिका क्षेत्रातील काही झोनमध्ये सुरू आहे. या योजनेमध्ये हळूहळू सुधारणा करून सगळीकडे राबविण्यात येणार आहे. या योजनेसंबंधी विचारणा करून सांगली नगरपालिका क्षेत्रात ही योजना राबविण्याचा प्रयत्न केला होता, परंतु ही योजना राबविण्याचा विचार केला असताना सर्व नगरपालिका क्षेत्रातील कल्चर हे वेगवेगळे असते असे कळल्याचे मत समितीने साक्षी दरम्यान नोंदविले.

३.२३ सन २००८ मध्ये मंजूर केलेल्या पाणीपुरवठा योजनांचा डीपीआर तयार झाला होता. ती योजना २०१२-१३ मध्ये मंजूर झाली. डीपीआर १०० रुपयांचा असताना डीएसआर वाढल्यामुळे १६० ते १७० रुपयांपर्यंत योजनेची रक्कम वाढली. परंतु त्यानंतर १०० रुपये देण्यात आले आणि ६० ते ७० रुपयांपैकी फक्त ५० टक्के रक्कम देण्यात आली उर्वरित ५० टक्के रक्कम देण्यात आली नाही. आता आपण समितीला

सॉफ्ट लोन देण्याची संकल्पना सांगितली. त्यात अपूर्ण योजनांना प्राधान्याने लोन दिले जाईल का ? जेणेकरून त्या योजना पूर्ण होऊ शकतील. या दृष्टीकोणातून विभागाने काही उपाययोजना केल्या आहेत? या समितीच्या प्रश्नांवर त्यांना प्राधान्याने कर्ज उपलब्ध करून देऊ. महाराष्ट्रात अपूर्ण असलेल्या १४० योजना पुढील २ वर्षांत पूर्ण करण्याची नगरविकास विभागाने व डीएमएने जबाबदारी घेतली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

३.२४ पाणीपुरवठा योजनेत युआयडीएसएसएमटीमधील भुयारी गटांचा सुद्धा समावेश होता तेथे सुद्धा शॉर्ट फॉल आहे त्यांचा सुद्धा यात समावेश करणार आहात का ? यावर माहिती देताना विभागीय सचिवांनी असे सांगितले की, योजना मंजूर झाल्यानंतर त्यावर काही प्रमाणात निधी खर्च झाला आहे. परंतु योजना पूर्ण न झाल्यामुळे अद्याप आऊटकम उपलब्ध झालेला नाही. सदर योजना पूर्ण करण्यासाठी सॉफ्ट लोन उपलब्ध करून दिले जाईल.

३.२५ ज्या नगरपालिका एमजीपीला योजना चालविण्यासाठी देण्यास इच्छूक असल्यास त्याबाबतीत नगरविकास विभाग निर्णय घेणार आहे का? वाशिम जिल्ह्यात असलेल्या २ नगरपालिकांपैकी एका नगरपालिकेत एमजीपीकडून पाणीपुरवठा योजनाा सुरू आहे. ती योजना अतिशय चांगल्या प्रकारे सुरू असून चांगला पाणीपुरवठा होत आहे. एमजीपी तेथील लोकांकडून पाणीपट्टी वसूल करीत आहे. परंतु दुसऱ्या नगरपालिकेतत नगरपालिकेकडून पाणीपुरवठा योजना चालविली जात आहे. तेथील नगरपालिकेकडून पाणीपुरवठा केला जात नाही, पाणी पट्टी वसूल केली जात नाही किंवा त्यात वाढ केली जात नाही. अशा परिस्थितीत ज्या नगरपालिका ना नफा ना तोटा तत्वावर एमजीपीला सदर योजना चालविण्याकरिता ठराव करून देतील, त्यांना शासन परवानगी देणार आहे का ? ना नफा ना तोटा तत्वावरील दर एमजीपीला परवडतात. त्यांना ना नफा ना तोटा तत्वावरील दर सध्या परवडत नाहीत. अशाप्रकारे नगरपालिकांनी ठराव करून दिल्यानंतर एमजीपीला सदर योजना चालवितांना नुकसान होत असल्यामुळे त्या नगरपालिकांनी घेण्यासंबंधी त्यांच्याकडून आग्रह केला जातो गोंदियामध्ये ही वस्तुस्थिती आहे. यामुळे ना नफा ना तोटा हे तत्व नगरपालिकेसाठी आहे की एमजीपीसाठी आहे ? एखाद्या नगरपालिकाने ठराव करून सदर योजना चालविण्यासाठी एमजीपीला चालविण्यास देण्याकरिता इच्छूक असल्यास त्याकरिता शासनाची हरकत नसावी. यावर खुलासा करताना MJP च्या प्रतिनिधींनी असे सांगितले की, डिस्ट्रीब्युशनमध्ये लॉसेस असल्यास आम्ही सदर योजना चालविण्यासाठी घेणार नाही.

३.२६ तांत्रिकदृष्टया मार्गदर्शन करून योजना हस्तांतरीत करणे हे एमजीपीचे काम आहे. राज्यातील पाणीपुरवठा योजना चालविणे हा एमजीपीचा मूळ हेतू नाही. त्यांची मूळ संकल्पना अशी आहे की, सदर योजना नगरपालिकांनी सुरू ठेवून स्वयंपूर्ण व्हावे. तसेच पाणीपुरवठा योजनेसंबंधी पाणीपट्टी दर व इतर बाबतीत शासन जो पर्यंत ठाम भूमिका घेणार नाही तोपर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. याचे मुख्य कारण आहे की, अशा योजनेवर कोट्यवधी रुपये खर्च केल्यानंतर केवळ बिले न भरल्यामुळे योजना बंद होते. म्हणून यासंबंधी निर्णय झाला पाहिजे. तसेच शासनाच्या विविध योजनांच्या आधारावर योजना सक्षम करता येऊ शकतील. अनेक ग्रामपंचायतींमध्ये हीच स्थिती आहे. त्यांच्याकडून बिले न भरल्यामुळे १-१, २-२ कोटी रुपयांच्या योजना बंद आहेत. नगरपालिकांनी पाणी गळती, पाणी चोरीच्या संदर्भात एनआरडब्ल्यूचे प्रमाण कमी करण्याकरिता तसेच सक्षमीकरणाच्या दृष्टीने शासनाकडून निधी मागणे गरजेचे आहे. तसेच शासनाने दरवर्षी २ हजार रुपये पाणीपट्टी घेण्यास सांगितले. त्यानंतर नगरपालिका ठराव करते की, आम्हाला पाणीपुरवठा योजना मंजूर करावी आणि २ हजार रुपये पाणीपट्टी घेतो. परंतु दरवर्षी २ हजार रुपये पाणीपट्टी न घेता त्याऐवजी ३००, ६०० किंवा ८०० रुपये पाणीपट्टी घेतली जाते. परिणामी मेंटेनन्स न झाल्यामुळे योजना बंद होतात, एमएसईबीकडून वीज कनेक्शन कट केले जाते. शासनाने योजना मंजूर केल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांनी शासनाने ठरवून दिलेल्या दरानुसार पाणीपट्टी वसूल करणे अत्यावश्यक आहे अन्यथा योजना बंद होतील. ही गोष्ट लक्षात घेता पाणीपुरवठा योजना सुरू राहण्यासाठी ठाम धोरण स्वीकारणे अत्यावश्यक आहे. लोकप्रतिनिधी कडून योजना सुरू करण्यासाठी वारंवार प्रयत्न करण्यात येतो. त्यानंतर योजना मंजूर झाल्यानंतर नगरपालिका याकडे दुर्लक्ष करून त्या व्यवस्थित सुरू ठेवत नाहीत. ग्रामपंचायतींप्रमाणे नगरपालिकांची स्थिती झाली असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता समितीने सांगितलेली वस्तुस्थिती बरोबर आहे. अशाप्रकारे पाणीपट्टी आकारणी करून त्यातून योजनेचा ऑपरेशन व मेटेनन्स होऊ शकेल अशाप्रकारे नगरपालिकेने ठराव करून दिल्यानंतर योजना मंजूर होत असते. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, योजना मंजूर झाल्यानंतर नगरपालिका त्या ठरावाचे पालन करीत नाही. तसेच ठरावानुसार पाणीपट्टी आकारण्याची जबाबदारी नगरपरिषद आणि त्यात कार्यरत असलेल्या पॉलिटीकल एक्झीक्युटीव्हची आहे. परंतु नगरपरिषदांकडून ठरावानुसार पाणीपट्टी आकारणी केली जात नसल्यास, ठरावानुसार त्यांनी पाणीपट्टी आकारणी करण्यासंबंधी डीएमएकडून प्रयत्न केला जाईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.२७ योजना कोणी चालवावी हा प्रश्न नाही. लोकांना पाणी मिळत नाही, योजना बंद होत आहेत ही मुळ समस्या आहे व नगरपालिकेने ठराव केल्यानंतर संबंधित मुख्याधिकाऱ्यांनी त्याची अंमलबजावणी केली पाहिजे. परंतु मुख्याधिकारी कोणतीही कार्यवाही करीत नाहीत. मुख्याधिकारी शासनाचे प्रतिनिधी म्हणून काम करीत असल्यामुळे त्यांनी या संदर्भात कार्यवाही केली नाही तर त्यांच्याविरुद्ध शासनाने कारवाई केली पाहिजे. तसेच समितीची अशी सूचना आहे की, नगरविकास विभागाने स्टॅण्डर्ड नॉम्स केला पाहिजे. पाणीपुरवठा योजना केल्यानंतर त्याच्या दरडोई उत्पन्नाइतका खर्च नगरपालिकेने केल्यानंतर त्या योजनेचा किमान मेटेनन्स होईल इतकी पाणीपट्टी आकारुन व ती वसूल करून पाणीपट्टी योजना लॉसमध्ये जाणार

नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे. अशाप्रकारे नगरपालिकांकडून काळजी घेतली जात नसल्यास नगरविकास विभागाने अशा नगरपालिकांना पुढील कोणतीही ग्रँट देता कामा नये. याकरिता नगरविकास विभागाने तक्ता तयार करून त्यात नगरपालिकांचा परफॉर्मन्स लेव्हलच्या वर असल्यास त्यांना पुढील ग्रँट द्यावी. तसेच लेव्हलच्या खाली परफॉर्मन्स असल्यास त्यांना पुढील कोणतीही ग्रँट देऊ नये. आणि युआयडीएसएसएमटीमध्ये अनुदान देत असताना नगरपालिकांसमवेत करार केला जातो त्यात मिटरिंग करणे व इतर बाबी येतात. मिटरिंग करणे बंधनकारक आहे. परंतु अनेक ठिकाणी मिटरिंग झालेले नाही. एक ठराविक मुदत देऊन मिटरिंगची कामे झाली पाहिजेत. तसेच पाणीपट्टी वसूल केल्यानंतर ती आहे त्याच कामांकरिता खर्च केल्यास ही बाब शक्य होऊ शकते. सध्या जमा झालेली टॅक्सची रक्कम एकत्रित करून तो इतरत्र खर्च केला जात आहे. अशा सुचना समितीने सुचविल्या यावर विभागाकडून या संदर्भात सर्व नगरपालिकांना त्यांची वसुली व इतर कार्यवाही करण्यासाठी दिनांक ३१ मार्च पर्यंत मुदत दिली जाईल. त्यानंतर १ एप्रिल पासून समितीने केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करण्याचा विभागामार्फत प्रयत्न करू असे समितीला सांगण्यात आले.

३.२८ समितीने दिलेल्या सूचनेनुसार आपण नगरपालिकांच्या परफॉर्मन्सकरिता तक्ता तयार करावा. त्यात व्हायोलेशन झाले आहे किंवा कसे ? यासंबंधी डीएमए लक्ष ठेवतील. तसेच ज्यांच्याकडून व्हायोलेशन केले जाईल त्यांचे प्रस्ताव आपल्याकडे येणार नाहीत अशी व्यवस्था करावी. अशाप्रकारे नगरपालिकांचा परफॉर्मन्स लेव्हलच्या वर असल्यास त्यांना पुढील ग्रँट द्यावी. तसेच लेव्हलच्या खाली परफॉर्मन्स असल्यास त्यांना पुढील कोणतीही ग्रँट देऊ नये. आपल्याला ही बाब मान्य असल्यास पुढील बैठकीच्या वेळी सदरचा परफॉर्मन्सचा तक्ता कशाप्रकारे करणार आहात त्याबाबत समितीला माहिती द्यावी. तसेच ही प्रक्रिया दिनांक १ एप्रिल ऐवजी दिनांक २ एप्रिलपासून सुरू करावी. असे मत समितीने व्यस्त केले. विभागाने नॉर्म्स ठरवून द्यावेत नॉर्म्सचे पालन न केल्यास त्यांना पुढील ग्रँट न देणे असे काही करणार आहात का ? अशी विचारणा समितीने केली तसेच नगरपालिकेला मदत केल्यानंतर त्यांनी नॉर्म्सनुसार योजना कार्यरत न ठेवल्यास किंवा तेथील स्थानिक नगरसेवकांचा ग्रुप नगरपालिका डिटोरिएट करीत असल्यास ते नॉर्म्समध्ये रिफ्लेक्ट झाले पाहिजेत, अशाप्रकारे नॉर्म्स असले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

३.२९ समितीचे म्हणणे मान्य आहे योग्य परफॉर्मन्सअभावी नगरपालिकांची ग्रँट बंद करायची असल्यासस त्यांचा परफॉर्मन्स सुधारण्याकरिता त्यांना ६ महिन्यांचा कालावधी देणे अत्यावश्यक असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच विभागातर्फे नॉर्म्स ठरवितो व त्यांना ६ महिन्यांचा कालावधी देतो असेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले

३.३० पुढील बैठकीच्या वेळी आपण तयार केलेले नॉर्म्स समितीस सर्क्युलेट करावेत तसेच त्यात समितीने केलेल्या सूचनांचा समावेश करणे शक्य झाल्यास तसे करावे. सप्टेंबर, २०१६ महिन्याअखेर एक परिपत्रक काढावे की, दिनांक १ एप्रिल, २०१७ पासून परफॉर्मन्सच्या आधारावरच ग्रँट दिल्या जातील अशी सुचना समितीने केली तसेच नगरपालिकेच्या बॉडीसमवेत मुख्याधिकाऱ्यांना सुद्धा ही गोष्ट बंधनकारक केली पाहिजे. ५० टक्के नगरपालिकांमध्ये मुख्याधिकाऱ्यांची पदे रिक्त असून मुख्याधिकाऱ्यांच्या नियुक्ती करण्यासंदर्भात सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता

३.३१ यापूर्वी दिलेल्या माहितीनुसार नगरविकास विभागाने एमपीएससीकडे १५० मुख्याधिकाऱ्यांच्या पदांची मागणी केली होती. त्यापैकी ९५ मुख्याधिकारी रुजू झाल्यानंतर दिनांक १६ ऑगस्ट रोजी त्यांना नियुक्त्या दिलेल्या आहेत. उर्वरित ७० मुख्याधिकाऱ्यांचे प्रशिक्षण सुरू होणार आहे. दिनांक १ जानेवारी, २०१७ रोजी ते कामावर रुजू होतील. एकूण ३५० मुख्याधिकाऱ्यांच्या पदांपैकी ७० पदे वगळता सर्व जण कार्यरत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

३.३२ या परिच्छेदात अक्कलकोट आणि उदगीरमध्ये थोडी विसंगती आहे. एजींच्या अभिप्रायानुसार अक्कलकोटला ६६ एलपीसीडी आहेत. परंतु विभागाने दिलेल्या माहितीमध्ये ३५ एलपीसीडी आहेत. तसेच एजींनी दिलेल्या अभिप्रायानुसार उदगीरला ४५ एलपीसीडी आहेत परंतु आपण १५ एलपीसीडी असल्याची माहिती दिली आहे. ऑडिटनंतर परिस्थितीमध्ये काही बदल झाला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता अक्कलकोट आणि उदगीर दुष्काळी पट्टयातील शहरे आहेत. अक्कलकोटला हलचिंचोली, सांगवी आणि कुनूर येथून पाण्याचा स्त्रोत होता स्त्रोतांमध्ये पाणी कमी झाल्यामुळे दरडोई पाणीपुरवठा कमी झाला. तसेच उदगीरकरिता असलेले ३ स्त्रोत पूर्णपणे आटल्यामुळे त्यांना २१ दिवसांनी पाणीपुरवठा केला जात होता. उदगीर हे अमृत शहर आहे. लिबोंटी धरणातून उदगीरकरिता अमृतची पाणीपुरवठा योजना मंजूर केली आहे. एजी यांनी दिलेल्या अभिप्रायासंदर्भात सांगायचे झाल्यास स्त्रोत ड्राय झाल्यामुळे पाणीपुरवठा कमी झाला असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

३.३३ माहे नोव्हेंबर, २०१५ अखेर गोंदियामध्ये १३५ एलपीसीडी पाणीपुरवठा झाल्याचे नमूद केलेले आहे. या संदर्भात दिलेले १८ कोटी रुपयांची वर्कऑर्डर दिलेली असून काम अद्याप सुरू झालेले नाही, अद्याप ३२ कि.मी.ची लाईन पूर्ण झालेली नाही. परिणामी १० ते १५ टक्के लोकांना पाणी मिळत नाही. अशी परिस्थिती असताना आपण १३५ एलपीसीडी पाणीपुरवठा होत असल्यासंबंधी आकडेवारी दिली आहे. विभागाने समितीला वस्तुस्थितीनिहाय माहिती द्यावी. असे समितीने विभागास सांगितले तसेच गोंदियाप्रमाणे वाशिमची सुद्धा तशीच परिस्थिती आहे.

याबाबतीत ज्या अधिकाऱ्यांनी आपल्याला चुकीची माहिती दिली आहे, त्यांना निलंबित करून त्यांच्याविरुद्ध कारवाई करावी असे समितीने सुचित केले असता समितीचे म्हणणे मान्य असुन समितीने केलेल्या सूचनेची विभागाने नोंद घेतली आहे समितीला वस्तुस्थितीनिहाय आकडेवारी देणे अत्यावश्यक असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

३.३४ या नगरपालिकेत पाणीपुरवठा उशिराने होत आहेत, आता काही पाणीपुरवठा योजना नव्याने मंजुर केल्या आहेत, नगरपालिकेने एक नवीन पॅटर्न अवलंबिला आहे, पाईपचे टेंडर व योजनेचे टेंडर वेगवेगळे काढण्यात येत आहेत म्हणजे १०० रुपये आले की, जेवढ्या पैशांचे पाईप घेता येतात तेवढे पाईप नगरपालिकेकडून घेण्यात येतात ते पाईप टाकण्यासाठी नगरपालिकेकडे कोणतीही सिस्टीम नसल्यामुळे ते काम दोन ते पाच वर्षे सुरू राहते. अशा प्रकारे वेगवेगळे टेंडर काढण्याचे धोरण पहिल्यांदा पाहण्यात येत आहे. हे प्रकार शासन बंद करणार किंवा नाही, नगरपालिकेची सर्वसाधारण बॉडी स्वतः पाईप खरेदी करते, त्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी जीवन प्राधिकरणाकडे देण्यात येते. असे धोरण बंद करण्याची गरज आहे. यंत्रणेकडून संमतरपणे दोन्ही कामे एकाच वेळी करता आली पाहिजेत. अशा प्रकारचे धोरण शासन स्वीकारणार आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीचे म्हणणे योग्य आहे. ही बाब विभागाच्या लक्षात आली की, ज्या शास्त्रोक्त पद्धतीने योजना व्हायला पाहिजे होत्या तशा पद्धतीने योजना झालेली नाही. समितीने निदर्शनास आणून दिलेल्या मुद्यासंदर्भात सहा महिन्यापूर्वी शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. जेएनएनयुआरएमबाबत घेतलेल्या साक्षीच्यावेळी, असे लक्षात आले होते की, स्त्रोत डेव्हलप न करता पाईप लाईन टाकण्याचे काम झाले आहे, शाननिर्णयामध्ये विभागाने स्पष्टपणे नमूद केले आहे की, पहिल्यांदा स्त्रोत डेव्हलप करायला पाहिजे, स्त्रोत डेव्हलप झाला असेल तर एमजेपीचे प्रमाणपत्र घ्यायला पाहिजे. स्त्रोत डेव्हलप झाल्यावर मग पाईपलाईनचे काम करण्यात यावे. WTP आणि ESR सायमलटेनेसली होऊ शकतात कारण प्रत्येकाला एक किंवा दोन वर्षांचा कालावधी लागतो. फक्त पाईप खरेदी करण्यात येत आहेत असा मुद्दा समितीने उपस्थित केलेला आहे. त्यामुळे ही बाब विभागाने वित्तीय अनियमितता म्हणून डिफाईन केलेली आहे, अशा प्रकारे नुसते पाईप खरेदी करता येणार नाहीत, अमृत योजनेबाबत यामध्ये आता अशी सुधारणा केली आहे की, कंत्राटदाराने पहिल्यांदा पाईप विकत घेतल्याची बिले दिली तर त्यांना १०० टक्के निधी देण्यात येत होता त्यामुळे त्याला पाईप लेईंगचा इन्सेटिंव्ह मिळत नव्हता, आता त्यांना ६० टक्के निधी पाईप खरेदी करते वेळी मिळेल व उर्वरित ४० टक्के निधी त्यांनी पाईप ले केल्यानंतर मिळेल.

३.३५ विभागीय सचिवांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे समितीने पुन्हा विचारणा केली की, महाराष्ट्र जलप्राधिकरणाने सर्व करून निविदा काढावीत व पाईप खरेदीची निविदा नगरपालिका काढते असे प्रकार सुरू आहेत ते बंद करण्यात येतील काय ? त्यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, ही बाब पूर्णतः बंद केली आहे, असे आता कोठे सुरू असेल तर ती बाब विभागाच्या निदर्शनास आणून द्यावी. कारण हा शासन निर्णय विभागाने सहा महिन्याअगोदर काढलेला आहे.

३.३६ गोंदिया जिल्ह्यात महाराष्ट्र जल प्राधिकरणाने पाईप खरेदी केले असून जलप्राधिकरणानेच सर्व प्रक्रिया केली आहे. आरसीनुसार पाईपची खरेदी करण्यात आलेली आहे. कंत्राटदारांना पाईप खरेदी करण्याचा अधिकार नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शासनाच्या निदर्शनास अशा किमान तीन योजना आल्या आहेत, यामध्ये फक्त पाईप खरेदीचा घटक नगरपरिषदेने केला आहे. बाकीची सर्व योजना राबविण्याची कार्यवाही महाराष्ट्र जल प्राधिकरणाने करावी असा ठराव केला तर याला शासनाची मान्यता नाही. यासंदर्भातील शासन निर्णयात या बाबीवर स्पष्टपणे निर्बंध घातले आहेत.

३.३७ या संदर्भात समितीने विचारणा केली की, पाईपची खरेदी दर करारा प्रमाणे करण्यात येते, त्याचवेळी बाजार भाव खूप कमी असतो, दर कराराचे भाव जास्त असतात तेव्हा ती कंपनी वेळेवर मालाचा पुरवठा करीत नाही. बाजारभावापेक्षा दर कराराचे भाव जास्त असतात तेव्हा ती कपंनी मालाचा पुरवठा तातडीने करते. यासाठी खुल्या निविदा का मागविण्यात येत नाही? या विषयाचा पाठपुरावा केला असून मार्केटमध्ये दर कमी असताना दर करार कशासाठी घेण्यात येतात खुल्या निविदा मागविण्यात याव्यात, असे समितीने सूचित केले व मागे काय झाले ते जाऊ द्या याबाबत आता सध्या कोणती पद्धत अवलंबिण्यात येत आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, महाराष्ट्र जलप्राधिकरणामार्फत जी पाईप खरेदी करण्यात येते ती खुल्या निविदेनुसार करण्यात येते. डीआयके-७ व डीआयके-९ असे दोन प्रकारचे पाईप खरेदी करण्यात येतात.त या व्यतिरिक्त कोणतेही पाईप खरेदी करण्यात येत नाहीत, ही दोन्ही पाईप खरेदी खुल्या निविदेच्या माध्यमातून करण्यात येते. एका वर्षात जेवढी मागणी आहे त्यांची विभागाकडून निविदा काढण्यात येते.

३.३८ समितीने विचारणा केली की, वर्षभरासाठी लागणारे पाईप कशाच्या आधारे ठरविण्यात येतात तसेच एका वर्षात लागणारे पाईप खरेदी करण्यासाठी पैसे उपलब्ध असतात काय ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, आता जी कामे चालू असतील व पुढील वर्षात ज्या पाईपांची गरज भासणार आहे याबाबत विभागाच्या इंजिनिअरकडून माहिती मागविण्यात येते. जेव्हा मागणी केली जाते त्यावेळी निधी आहे किंवा नाही याची तपासणी करण्यात येते व त्यानुसार कार्यवाही करण्यात येते.

३.३९ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, ते दरकराराप्रमाणेच होईल, ज्या प्रमाणे विभागा कडून एका वर्षासाठी दरकरार करण्यात येत असे त्याप्रमाणेच दरवर्षी दरकरार करण्यात येत नाही, दरवर्षी जी एकत्रित मागणी आहे त्याप्रमाणे निविदा मागविण्यात येतात.

३.४० याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, यासाठी खुल्या निविदा मागविण्यात येतात. मागणी लक्षात घेऊन विभागाकडून तेवढ्या रकमेची खरेदी दरवर्षी करण्यात येते.

३.४१ आता सर्व प्रणाली (Systems) प्रगत झालेल्या आहेत, पाईपच्या किंमती पाहिल्या तर विभागाची जिल्हा दर सूची (डीएसआर) एका वर्षापूर्वीची आहे, आताच्या जिल्हा दर सूची (डीएसआर) प्रमाणे ३० टक्के भाव कमी झाले आहेत. पुर्वी स्टीलमध्ये तेजी आली होती, चार वर्षापूर्वी चायना मध्ये ऑलिपिंक होते, त्यावेळी ४० टक्के भाव वाढले होते. त्यामुळे सर्व किंमती वाढल्या होत्या, आता सर्व प्रणाली प्रगत झालेल्या असल्याने, आता तीन महिन्यात दर मागवून दरकरार अंतिम केली पाहिजे. एका वर्षापूर्वीच्या दराने २०० कोटी रुपयांचे पाईप घेण्यात येत असेल तर यामध्ये शासनाचे ५० कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे. विभागाची वार्षिक मागणी किती आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यावेळचे निर्देशांक (Index) पाहून कार्यवाही करण्यात येते. जवळपास दोन्ही प्रकारचे पाईप मिळून १०० कोटी रुपयांच्या आसपास विभागाची वार्षिक मागणी असते.

३.४२ याप्रमाणे आता ७००० कोटी रुपयांचा अमृत पाणीपुरवठा योजनेचा कार्यक्रम घेण्यात आलेला आहे, त्यामध्ये एक वर्षाची सिस्टीम ठेवण्यात येणार असेल तर प्रत्येक महिन्यात दरांचे आता अपग्रेडेशन होते. त्यामुळे समितीची अपेक्षा अशी आहे की, ही सर्व सिस्टीम विभागाकडून पारदर्शक करण्यात येणार असेल तर दर कराराचे दर प्रत्येक तीन महिन्यातून ठरविले पाहिजेत. सर्व कार्यवाही विभागाने एक महिना आगाऊ सुरू करावी विभागीय सचिवांनी खुलासा केला की, आता या योजनेवर हजारो कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत ३० टक्के भाव सहा महिन्यात कमी झाले व जुन्याच डीएसआरप्रमाणे खरेदी करण्यात येत असेल तर ते योग्य होणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता निविदा उघडणे करणे त्यांची प्रक्रिया करणे त्यावर विचार करणे यासाठी एक ते दीड महिन्याचा वेळ लागतो, त्यामुळे तीन महिन्यातून आरसीचे दर निश्चित करणे शक्य होणार नाही असे वाटते. ३० ते ४० टक्के भाव कमी जास्त होत नाहीत, आता भाव स्थिर आहेत.

३.४३ आज लोखंडाचे भाव २६ रुपये किलो इतके खाली आले आहेत, भाव कमी होत नाही असे नाहीत असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आज बाजार भावानुसार पी गॅलनच्या जीआय पाईपचे दर आता स्थिर आहेत, त्यामध्ये जास्त घसरण झालेली नाही.

३.४४ ज्यांनी वार्षिक खरेदी केली त्यात शासनाचे काहीच नुकसान होणार नाही. याची शाश्वती महाराष्ट्र जलप्राधिकरणाच्या माध्यमातून विभाग देणार काय ? यामध्ये तोटा होत होणार नाही असे असेल तर समितीने विभागाचे म्हणणे मान्य करेल, यामधील विभागीय सचिवांचा अनुभव जास्त आहे, कारण विभागीय सचिव त्या क्षेत्रामध्ये काम करीत असतात. समितीची भूमिका अशी आहे की, दरकराराचे दर तिमाही किंवा सहा महिन्यातून करावेत, वार्षिक करू नयेत, परंतु विभागाच्या मतानुसार दरकराराचे वार्षिक दर केले पाहिजेत. यामध्ये शासनाचे नुकसान होणार नाही याची विभागाने शाश्वती द्यावी. असे समितीने सूचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये सहा महिन्यातून दर करारातील दराचा विचार करता येईल. ज्या निविदा झाल्या आहेत त्याबाबत काही करता येणार नाही. सहा महिन्यांतून आरसी दर करता येतील.

३.४५ नगर विकास विभागाकडील सात हजार कोटी रुपयांचा अमृत योजनेचा कार्यक्रम महाराष्ट्र प्राधिकरणाला मिळणार आहे, ही कार्यवाही करण्यासाठी नगरविकास व पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे मनुष्यबळ आहे काय ? महाराष्ट्र जलप्राधिकरणाकडे डेप्युटी इंजिनिअर व ज्युनिअर इंजिनिअरच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत, हा अमृत कार्यक्रम एमजेपीच्या माध्यमातून राबविण्याचे नगर विकास विभागाचे धोरण असेल तर विभागाकडे तेवढे मनुष्यबळ आहे काय ? विभागाकडे रिक्त जागांचे प्रमाण किती आहे. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, अमृत योजना महाराष्ट्र जल प्रधिकरणामार्फत राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. महाराष्ट्र जल प्राधिकरण कडे डेप्युटी इंजिनिअर व ज्युनिअर इंजिनिअरच्या फार काही जागा रिक्त नाहीत. कनिष्ठ स्तरावर जे मोजणीचे काम करतात, तांत्रिक कामे करतात त्यामध्ये रिक्त जागा नाहीत. ज्युनिअर इंजिनिअर सरप्लस आहेत.

३.४६ परि.क्रमांक ६.२. मध्ये दर्शविलेले सहा प्रकल्प अद्याप प्रलंबित आहेत, त्यांची काय परिस्थिती आहे, आता ऑगस्ट महिना संपलेला आहे, २०१६ मध्ये हे प्रकल्प पूर्ण होतील असे विभागाने नमूद केलेले आहे . असे समितीने निदर्शनास आणले असता याबाबत नगरविकास विभागाच्या सचिवांनी माहिती दिली की, यामध्ये अकोट, गोंदिया, हिंगोली, खामगांव, वाशिम व यवतमाळ असे हे प्रकल्प आहेत. हे सर्व प्रकल्प सन २०१६-२०१७ मध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे. हे प्रकल्प पूर्ण होण्यासाठी दोन मुख्य अडचणी आहेत, एक तर या कामासाठी निधीची अडचण आहे, विभागाने १४ व्या वित्त आयोगाकडे भागीदारी (Tie up) केली आहे. कर्ज घेऊन याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. काही प्रकल्पांमध्ये शासन गॅप फंडाची सोय करीत आहे, काही प्रकल्पामध्ये जागेची अडचण आहे, या सहा प्रकल्पाबाबत तशी अडचण नाही. १४० प्रकल्पांमध्ये काही प्रकल्प गुतागुंतीचे आहेत, WTP व STP यासाठी जागा नाही. जागा मिळवून हे सर्व प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन नगरविकास विभाग व डीएमएच्या स्तरावर करण्यात आले आहे.

३.४७ सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत एक प्रकल्प ३७ कोटी ६७ लाख रुपयांचा आहे त्यासाठी २५ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. हा प्रकल्प कोणता आहे, १३ प्रकल्पांपैकी ६ प्रकल्प पूर्ण झाले आहेत, सात प्रकल्प अपूर्ण होते, आता सात पैकी एक पूर्ण झालेला आहे व एक प्रकल्प अपूर्ण आहे अशा प्रकारे १४ प्रकल्प प्रलंबित आहेत. १४ प्रकरणामधील युआयडीएसएसएमटी अंतर्गत ७ प्रकल्प होते, या सात प्रकल्पाबाबत विभागीय सचिवांनी माहिती दिली आहे. बाकी दोन प्रकल्प सुवर्ण जयंती नगरोत्थान अंतर्गत आहेत, त्यांची काय परिस्थिती आहे, अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सुवर्ण जयंती नगरोत्थान मधील एक प्रकल्प होता, सहा प्रकल्प सुजल अभियान अंतर्गत आहेत, त्याची माहिती पाणीपुरवठा विभागाचे सचिव देतील. नगरोत्थानमधील मनमाड येथील एक प्रकल्प प्रलंबित आहे.

३.४८ सहा प्रकल्पाची काय परिस्थिती आहे त्याची माहिती आम्हाला देण्यात यावी. असे समितीने सुचविले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या प्रकल्पांची माहिती मी लेखी स्वरुपात समितीला सादर करण्यात येईल. (माहिती अप्राप्त आहे).

३.४९ एमएसजे एनए १६ अंतर्गत १०६ कोटी रुपयांचा मुळ प्रस्ताव होता. तो सुधारित व वाढीव करण्यात आला आहे काय? याबाबत समितीकडे ९० कोटी रूपयांची अद्ययावत माहिती आहे. या योजनेवर मागील दोन वर्षात किती रक्कम खर्च झालेली आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी त्यांच्याकडे अद्ययावत माहिती नाही. यावर समितीने या योजना केव्हा पूर्ण होणार आहेत, सुजल निर्माण योजनेत या सहा योजना आहेत त्या केंव्हा पूर्ण होणार आहेत. मनमाड येथील प्रकल्प सुजल योजनेमध्ये होता काय ? मनमाड येथील प्लॅनची क्षमता किती आहे? त्यांच्याकडे अशी विचारणा समितीने केली असता पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या सचिवांनी सांगितले की, आळंदी येथील योजनेची माहिती आहे, ते काम दिनांक २२/०६/२०१४ मध्ये रद्द करण्यात आले आहे.

३.५० एमएसजेएनए अंतर्गत प्रकल्पाची माहिती विचारली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एसजेएनए अंतर्गत सुधारणेची कामे करण्यात येतात, पाण्याची गळती कमी करणे. विभागीय सचिवांकडे समितीने यासंदर्भात पुढील बैठकीत सविस्तर माहिती द्यावी असे सूचविले.

३.५१ एमएसजेएनए अंतर्गत सहा प्रकल्प अद्याप प्रलंबित आहेत, या योजनांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे काय ? या योजनांची आता काय परिस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली.

३.५२ सुवर्ण जयंती मनमाड मधील कामाच्या संदर्भातील असा आक्षेप आहे की, या योजनेत ॲडीशनल वॉटर टँकची गरज नव्हती. ती कशासाठी तयार करण्यात आली अशी विचारणा समितीने केली असता नगरविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, मनमाड शहराची लोकसंख्या साधारणपणे ९० हजार इतकी आहे, मनमाडची योजना अशी आहे की, तेथे पालखेड डावा कालवा आहे, या कालव्यातून ग्रॅव्हीटीने पाणी पाटोदा साठवण तलावात जमा होते. तेथून ११ किलोमीटर पंम्पिंग केल्यानंतर ते पाणी बीपीटी म्हणजे ब्रेक प्रेशर टँकमध्ये जाते. तेथून ते पाणी ग्रॅव्हीटीने वाघदर्डी धरणात जाते व तेथून पाणी WTP कडे जाते त्यानंतर त्या पाण्याचे वाटप केले जाते. असे या योजनेचे स्ट्रक्चर आहे, कालव्यातून पाणी रोटेशनने मिळते. दर तीन ते चार महिन्यांनी रोटेशनद्वारे एकदा पाणी मिळते व ते पाणी त्यांना पाटोदा साठवण तलावात साठवून ठेवावे लागते. गणित करण्यासाठी सोपे व्हावे म्हणून मनमाड शहराची लोकसंख्या एक लाख धरली तर त्यांना ७० एलपीएस पाणीपुरवठा प्रत्येक दिवसाला मनमाड शहराला करायचा आहे. तर यासाठी दरदिवशी ७ एमएलडी पाणी लागते. किमान ९० दिवसांने रोटेशनद्वारे पाणी मिळते. म्हणून ९० दिवसाचे पाणी पाटोदा साठवण तलावात साठवून ठेवावे लागते, या साठवण तलावाची क्षमता ६३० एमएलडी असली तर मनमाड शहराला ७० एलपीसीडी पाणी देता येईल. ही योजना नगरोत्थान मधून घेण्यात आली आहे. ही योजना घेण्याच्या अगोदर या पाटोदा साठवण तलावाची क्षमता फक्त १४८ एमएल इतकी होती, ही क्षमता अपूर्ण होती. ९० किंवा १०० दिवसांच्या रोटेशनने जे पाणी मिळते ते पाणी पुढील ९० दिवसांसाठी साठवण तलावात साठवून ठेवावे लागते. ते पाणी कमी पडत असल्यामुळे नगरपालिकने सूचविल्याप्रमाणे ५०४ एमएलपर्यंत तलावाची क्षमता वाढविण्यासाठी पीएस देण्यात आले त्यानुसार ती क्षमता वाढविण्यात आली आहे.

३.५३ महालेखाकारांचे विशिष्ट आक्षेप असा आहे की, समजा पाटोदा संतुलन टाकीची क्षमता अगोदरच १४८ मिलियन लिटर होती. परंतु, विभागाकडून ती वाढवून ६५२ मिलियन लिटर करण्यात आली. नागरिकांची ३६९ दिवसांची पाण्याची आवश्यकता १४८ मिलियन लिटर मध्येच पूर्ण होऊ शकत होती. तसेच, विभागाने २०३० पर्यंत म्युनिसिपल कौन्सिलची १० एमएलडी पाण्याची वाढीव गरज लक्षात घेऊनच डीपीआर तयार करावयास पाहिजे होता. परंतु, विभागाने जी अतिरिक्त टाकी तयार केलेली आहे त्याची आवश्यकताच नव्हती. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, कालव्यातून पाणी घेण्यात येते आणि ते साठवण तलावात साठविण्यात येते परंतु, विभागाचे रोटेशन ९० दिवसानंतर असेल तर ९० दिवसाचे पाणी साठवून ठेवण्याची क्षमता साठवण तलावामध्ये असली पाहिजे. कारण, एकदा कालव्यातून पाणी आल्यानंतर जलसंपदा विभाग पुढील शंभर दिवस पाणी देत नाही. प्रती दिन ७ एमएलडी प्रमाणे ९० दिवसासाठी लागणारे पाणी साठवून ठेवावयाचे आहे असे गृहीत धरले तर आदर्शरितीने (Ideally) ६३० एवढी क्षमता पाहिजे होती. परंतु, नगरपालिकेने ही क्षमता ५०४ पर्यंत वाढविली. हा साठवण तलाव आहे आणि नगरपालिकेला ९० दिवसानंतर पाणी मिळते. त्यामुळे मनमाड शहरासाठी लागणारा ९० दिवसांचा पाणी साठा नगरपालिकेला या साठवण तलावामध्ये साठवून ठेवावयाचा आहे, असे लक्षात घेतले तर एवढी क्षमता आवश्यक आहे.

३.५४ याबाबत उप महालेखाकार यांनी असे मत व्यक्त केले की, अगोदर ही योजना समजून घेण्याची आवश्यकता आहे. पालखेड डाव्या कालव्यातून पाटोदा साठवण तलावामध्ये पाणी येते आणि त्याची मुळ क्षमता १४८ दशलक्ष लिटर आहे. त्या फेजमध्ये अतिरिक्त पाणी आले तर पाटोदा येथून पाणी गेल्यानंतर ते वाघाडी डॅममध्ये साठविण्याची क्षमता आहे आणि त्या डॅमची क्षमता जवळपास ३,५०० दशलक्ष लिटर आहे. या प्रकल्पामध्ये पाणी घेण्यासाठी पाटोदा साठवण तलावामध्ये जी पम्पिंग क्षमता होती ती प्रतिदिन ५२ मिलियन लिटर आहे. ती अगोदर २० मिलियन लिटर इतकी होती. त्या पम्पची क्षमता वाढवून प्रत्येक दिवशी ५२ मिलियन लिटर पाणी उचलून ते पाणी शहराला पुरविणे शक्य आहे आणि उर्वरित पाणी वाघदर्डी डॅममध्ये सोडण्यात येईल. जलसंपदा विभागाअगोदर २४० दिवसांचे पाणी द्यायचे. परंतु, जलसंपदा विभागाने नंतर ते ११० दिवसापर्यंत आणले आणि ते ११० दिवस ५ ते ६ फेजमध्ये पाणी देत होते. ज्यावेळी प्रती दिन ५२ मिलियन लिटर पाणी घेतात त्या क्षमतेने वाघदर्डी डॅम पूर्णपणे भरुन जाईल आणि पीबीटीमध्ये १४८ वरून ५२० ची कॅपॅसिटी केलेली आहे. पाटोदा साठवण तलावाची जी वाढीव क्षमता केली त्याबाबत महालेखाकारांचा आक्षेप आहे. विभागाकडे वाघदर्डी डॅम आहे, ५ फेजमध्ये पाणी येते आणि विभागाने ५२ मिलियन लिटर पम्पिंग कॅपॅसिटी केलेली आहे तर त्यानुसार वाघदर्डी डॅममध्ये स्टोअरेज कॅपॅसिटी भरपूर असेल. त्यामुळे पाटोदा बॅलन्सिंग येथे जो पम्प लावलेला आहे. त्याचा सोर्स असा आहे की, पालखेड डावा कालवा आहे. तेथून पाटोदा साठवण तलावात पाणी जाते आणि पाटोदा येथून पुढे वाघदर्डी डॅम आहे. म्हणजे पालखेड डाव्या कालव्यातून पाटोदा साठवण तलावामध्ये पाणी जाते. तेथून शहराला पाणीपुरवठा केला जातो आणि एक्सेस पाणी असेल तर ते वाघदर्डी डॅममध्ये साठविले जाते. परंतु, यामध्ये असे झालेले आहे की, पाटोदा येथे पूर्वी २० लाख मिलियन लिटर पाणी उचलले जात होते. त्याची कॅपॅसिटी ५२ केलेली आहे. म्हणजे १० ते १५ दिवसात कालव्यातून ५२ एमएलडी पाणी उचलून ते साठवून ठेवले शक्य आहे.

३.५५ पाटोदा डॅम पासून वाघदर्डी डॅममध्ये पाणी साठविले जाते. जे जास्तीचे पाणी आहे ते वाघदर्डी डॅममध्ये वळते केले जाते. त्यासाठी पाटोदा डॅमची पम्पिंग सिस्टीम वाढवून घेतलेली आहे. त्यामुळे विभागास ५२ एमएलडी पर्यंत पाणी पम्पिंग करणे शक्य आहे परंतु, ती वाढविण्याची आवश्यकता नव्हती, असे महालेखापालांचे मत आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता नगरविकास विभागाच्या सचिवांनी सांगितले की, यामध्ये तीन गोष्टी आहेत. एक म्हणजे पाटोदा येथे बॅलन्सिंग टँक आहे. त्या टँकची कॅपॅसिटी वाढविली असा महालेखाकारांचा आक्षेप आहे. दुसरे म्हणजे महालेखाकारांचे असे म्हणणे आहे की, वाघदर्डी डॅममध्ये तेवढी कॅपॅसिटी आहे. म्हणजे वाघदर्डी डॅमच्या कॅपॅसिटीचा प्रॉब्लेम नाही. प्रॉब्लेम असा आहे की, बॅलन्सिंग टँक पासून वाघदर्डी डॅम पर्यंत पाणी ट्रान्सपोर्ट करावयाचे आहे. आज पाईप लाईनची जी क्षमता आहे ती प्रत्येक दिवसाचे किंवा त्यापेक्षा थोडे अधिक पाणी ट्रान्सफर करण्याची क्षमता आहे. महालेखाकारांचे म्हणणे आहे की, विभागाने बॅलन्सिंग टँकचे पाणी तत्काळ वाघदर्डी डॅममध्ये साठवून ठेवावयास पाहिजे होते. म्हणजे ५०, ६० किंवा ७० दिवसांचा पाणीपुरवठा पाटोदा येथून पम्प करून वाघदर्डी डॅममध्ये साठवावयास पाहिजे होता. यासाठी जी रायझिंग मेन आहे तिची क्षमता, त्याचा व्यास, सर्कमफरन्स किती तरी पटीने वाढवावा लागला असता. विभागाने महालेखाकारांनी सूचविलेला पर्याय निवडला असता तर विभागाच्या कॅल्क्युलेशन प्रमाणे रायझिंग मेनची पाईप लाईन १४०० एमएम डायमिटर वगैरे करावी लागली असती. त्यासाठी ५६ कोटी रुपये खर्च आला असता आणि विभागास पीबीटी देखील त्या क्षमतेचा करावा लागला असता. त्यामुळे पीबीटी ऑग्मेन्ट करण्यासाठी २ कोटी रुपये खर्च आला असता आणि पम्प वगैरे अशी ती ६० कोटी रुपयांची योजना झाली असती.

३.५६ यासंदर्भात वाघदर्डी डॅममध्ये पाणी ट्रान्सफर करण्यासाठी ६० कोटी रुपये खर्च आला असता. त्यामुळे विभागाने याला पसंती दिली आहे. असे मत समितीने व्यक्त केले.असता आता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

३.५७ सद्यःस्थितीत पाटोदा डॅममधून पाणीपुरवठा करण्यासाठी कोणती सिस्टीम आहे ? त्याची क्षमता किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, शहराला पाईप लाईनद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो. प्रत्येक दिवशी ७ ते १० एमएलडी पाणीपुरवठा करण्यासाठी पाईप लाईन आहे.

३.५८ जोपर्यंत नवीन रायझिंग मेनचे काम करीत नाही तोपर्यंत पूर्णपणे एक्सेस पाणी तिकडे पाठवू शकत नाही. त्यामुळे तो खर्च टाळून सदर काम करण्याला प्राधान्य दिले, असे नगरविकास विभागाचे म्हणणे आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता महालेखाकार यांनी विचारणा केली की, सन २०४२ पर्यंत ७ एमएलडी ऐवजी १३ एमएलडी रिक्वॉयरमेंट केलेली आहे. ही कॅपॅसिटी म्हणजे प्रेझेंट सिस्टीममध्ये तेथे पाईप लाईन्स होत्या. वेगळ्या उच्च प्रतीच्या डायमिटरचे पाईप टाकण्याचे प्रपोजल होते. हे प्रपोजल एक्सेस कॉस्टचे होते असे विभागाच्या सचिवांचे म्हणणे आहे. परंतु, प्रेझेंट कॉन्टॅक्समध्ये जी पाईप लाईन होती त्यामध्ये ते एक्सप्लोअर करू शकले नसते काय ? यावर समितीने मत व्यक्त केले की, सचिवांचे म्हणणे आहे की, त्या पाईप लाईनची कॅपॅसिटी ८ ते १० एमएलडी आहे. त्यामुळे त्यांना संबंधित योजनेची पम्पिंग सिस्टीम वाढविणे हा एक उपाय होता, यावर महालेखाकारांनी मत व्यक्त केले की, मग विभागाने जी पम्पिंग कॅपॅसिटी ती पम्पिंग कॅपॅसिटी वाढवायची आणि पुन्हा पीबीटी देखील वाढवायची परंतु, अगोदर पालखेड डाव्या कालव्यातून पाणी उचलण्यासाठी २० मिलियन लिटरची कॅपॅसिटी होती. तुम्ही ती वाढवून ५२ मिलियन लिटर केली. विभागाने पम्पिंग कॅपॅसिटी वाढविली आणि रिर्झवॉयर देखील वाढविले.

३.५९ पालखेड डाव्या कालव्यातून पाणी उचलण्यासाठी ५२ एमएलडीची पम्पिंग कॅपॅसिटी वाढविली आणि त्याच बरोबर पाटोदा डॅमची कॅपॅसिटी देखील वाढविली, ही दोनच कामे आहेत काय ? तेथून पम्पिंग करून पाणी घ्यावयाचे आहे ? असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बेसिकली पालखेड हा कालवा आहे. विभागास पाटोदा डॅममध्ये ९० ते १०० दिवसांचा पाणी साठा ठेवावयाचा आहे. विभागास फक्त पाटोदा येथील साठवण कॅपॅसिटी वाढवून उपयोग नाही. त्यामधून तेवढे पाणी सुद्धा पम्प करता आले पाहिजे. त्यासाठी विभागाने दोन गोष्टी केलेल्या आहेत. विभागाने पम्पिंगची क्षमता वाढविली आणि साठवण तलावाची क्षमता देखील वाढविली. विभागाने हे करण्यासाठी रायझिग मेन बदलली असती तर त्यासाठी जास्त खर्च आला असता. यामुळे तो खर्च वाचलेला आहे. दुसरे म्हणजे, महालेखाकारांनी जे सूचविले त्याप्रमाणे नगरपरिषदेने सिस्टीम केली असती तर त्यांना जवळपास ६४ लाख रुपये प्रती माह विजेचे बिल आले असते. आज त्यांना केवळ १२ लाख रुपये विजेचे बिल येते. त्यामुळे ते ओएनएमच्या दृष्टीने व्यवहार्य राहिले नसते. आजच्या घडीला हे काम पूर्ण झालेले आहे. पाणी पुरठ्याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, यावर्षी चांगला पाऊस झालेला असल्यामुळे आज मनमाड शहराला पाटोदा येथूनही पाणी मिळते आणि वाघदर्डी डॅममध्ये पाणी साठल्यामुळे तेथूनही पाणी मिळते. आज मनमाडला ७० एलपीसीडी पाणी मिळते. पाटोदा डॅमची किती क्षमता आहे याबाबत समिती समोर आकडेवारी सादर करण्यात आली होती. पाटोदा डॅमची ९० दिवसाकरिता ६३० इतकी क्षमता पाहिजे होती. परंतु, प्रत्यक्षात ती क्षमता ५०४ इतकी आहे. आज वाघदर्डी डॅममध्ये पाणी आहे. परंतु, वाघदर्डी डॅममधील पाणी आटले तर मनमाड शहराला ७० ऐवजी ५६ एलपीसीडी पाणी मिळेल. पाटोदा व वाघदर्डी हे दोन्ही एकत्रित केले तर मनमाड शहराला सध्या ७० एलपीसीडी पाणी मिळते.

३.६० मनमाड नगर पालिकेच्या एमएसएमए योजनेंतर्गत पाणी वितरण व्यवस्थेची सद्य:स्थिती काय आहे याबाबत प्रधान सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सांगितले की, मनमाड नगरपालिकेची रिफॉर्म्स वर्क आणि वितरण नलिकेचे काम होते. वितरण नलिकेचे १६.२९ कि.मी.चे काम होते. १०० मि.मी. ते ३५० मि.मी.चे पाईप टाकावयाचे होते व हे पाईप अरुंद रस्त्यामधून जाणार होते. हे काम करताना खोदकाम करण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या. काही भागामध्ये अतिरिक्त पाईपची मागणी झाल्यामुळेही अडचण झाली होती. १६.२९ कि.मी. च्या ऐवजी २२.४२ कि.मी.चे काम करावे लागले त्यामुळे या कामामध्ये विलंब झाला होता. आता हे काम पूर्ण झालेले आहे.

सेवास्तरीय बेंचमार्किंग :

३.६१ यासंदर्भात समितीने विचारणा केली की, ज्या नगरपालिकांनी एसएलबी २०१४ पर्यंत साध्य केली नव्हती त्यांची संख्या मग त्यामध्ये प्रती व्यक्ती पाणीपुरवठा करण्यासाठी जे मीटर बसवावयास पाहिजे होते ते बसविण्यात आले नाहीत, महसुलेतर पाण्याचे प्रमाण, खर्च आणि वसुलीचे प्रमाण अशा सिस्टीम विभागाने आखून दिल्या आणि त्या धोरणानुसार पाणीपुरवठा योजना मंजूर केल्या. परंतु, संबंधित नगरपालिकांनी या सर्व गोष्टी केलेल्या नाहीत. मग त्यासाठी विभागाचे कोणते धोरण आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, नगरपरिषदेने एखादा ठराव केला असेल आणि त्या ठरावाच्या आधारे त्या नगरपरिषदेला युआयडीएसएसएमटी, नगरोत्थान आणि आता अमृत योजने अंतर्गत एखादी योजना मंजूर झाली असेल तर त्या ठरावाची अंमलबजावणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी नगरपरिषदेवर असते. विभाग आता सर्व नगरपरिषदांसाठी पुन्हा एक परिपत्रक काढत आहे आणि सर्व नगरपरिषदांनी त्यांच्या मागणीनुसार संपूर्ण वसुली करण्यासाठी त्यांना ६ महिन्यांचा अवधी देण्यात येत आहे.

३.६२ यासंदर्भात समितीने सूचना केली की, प्रथम मुख्याधिकाऱ्यांना सांगावे की, ते शासनाचे प्रतिनिधी आहेत. शासनाने जे निर्देश दिलेले आहेत त्या निर्देशाचे पालन करण्याची जबाबदारी त्यांची आहे. नगरपालिकेचे कामकाज शासनाच्या पद्धतीनुसार सुरू आहे किंवा नाही हे बघण्याची जबाबदारी मुख्याधिकाऱ्यांची आहे. परंतु, मुख्याधिकारी जर मंडळाचा भाग झाला तर पद्धती (System) कशी काय चालेल ? म्हणून ट्रेनिंगच्या वेळी सर्वप्रथम मुख्याधिकाऱ्यांना सांगावे की, ते शासनाचे प्रतिनिधी आहेत. शासनाने दिलेल्या निर्देशाचे पालन करणे हे त्यांचे कर्तव्य आणि जबाबदारी आहे. परंतु, सध्या परिस्थिती अशी आहे की, तो अधिकारी फक्त शासनाकडून पगार घेतो. यामुळे यात सुधारणा होणार नाही. आपली पद्धती मंडळाच्या प्रभावाखाली गेलेली आहे. शासनाने आयुक्तांना अधिकार दिलेले आहेत. आयुक्त महानगरपालिकेचे कामकाज चालवितात. परंतु, मुख्याधिकाऱ्यांची तशी स्थिती राहिलेली नाही. ९० टक्के मुख्याधिकारी अध्यक्षांचे रबर स्टॅम्प झालेले आहेत. यामध्ये सुधारणा केली नाही तर कितीही सिस्टीम केल्या, येथे कितीही वस्तुस्थिती मांडली तरी कनिष्ठ स्तरावरील परिस्थिती वेगळी आहे. कोणत्या अडचणी आहेत हे मुख्याधिकाऱ्यांनी सांगितले पाहिजे. त्यामुळे ग्रँड आणि इतर गोष्टींवर त्याचा परिणाम होणारच आहे. परंतु, अल्टीमेटली मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे काय काम आहे ? मुख्याधिकारी जिल्हाधिकाऱ्यांकडे ३०८ का दाखल करीत नाहीत ? मुख्याधिकाऱ्यांनी ३०८ दाखल केला पाहिजे, डीएमए, आरडीएमए यांना सांगितले पाहिजे. परंतु, ते तसे करीत नाहीत.

३.६३ काही ठिकाणी असे नसते. परंतु, ते मुख्याधिकारी गप्प का बसतात ? काही ठिकाणी संगतमत नसते, पूर्ण निर्णय त्या मंडळाचाच असतो परंतु अवैध कामाबाबत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सक्रीय राहून शासन, जिल्हाधिकारी, डीएमए आणि आरडीएमए यांना कळविले नाही तर ते सुद्धा दोषी आहेत असे मत समितीने व्यक्त केले.

३.६४ ७३ वी घटना दुरुस्ती होऊन नगरपालिकांना स्वायत्त संस्था म्हणून घोषित केलेले आहे. नगरपालिकांना संपूर्ण अधिकार दिलेले आहेत. आज परिस्थिती अशी आहे की, नगरपालिकेमध्ये एखादी चुकीची गोष्ट घडत असली तरी तो बहुमताने जे मंजूर करण्यात येते तेच मंजूर होते. आमदार खासदार यासारख्या स्थानिक लोकप्रतिनिधींचे मत विचारात घेतले जात नाही.

३.६५ केंद्र सरकारने निश्चित केलेल्या मानकांची पूर्तता बहुतांश नगरपरिषदांनी केलेली नाही, हे आक्षेपावरून दिसून येत आहे. लेखापरीक्षकांनी असे निरीक्षण नोंदविले आहे की, सन २०१३-२०१४ दरम्यान ३६ पैकी एकाही नगरपरिषदेने केंद्र शासनाने विहित केलेल्या नऊ निर्देशांकांपैकी कुठलेच मानक साध्य केले नव्हते. सन २०१३-१४ मध्ये नगरपरिषदांनी स्वतः निर्धारित केलेली लक्ष्य ३६ ते १०० नगरपरिषदा साध्य करू शकली नव्हती यापुढे लेखापरीक्षकांनी नऊ निदर्शकांपैकी तीन निदर्शकांवरील म्हणजे पाणीपुरवठा सेवांवरील खर्चाची वसुली, नॉन रेव्हेन्यू वॉटरची व्याप्ती आणि पाणीपुरवठा जोडण्यांची व्याप्ती याबाबतच्या लेखापरीक्षा निष्पत्तीबाबतची चर्चा पुढे केली आहे. हा अहवाल मागील दोन वर्षांचा आहे व अहवाल प्राप्त होऊन आता दोन वर्षे झाली आहेत.त या दोन वर्षात या स्थितीत काही सुधारणा झाली आहे का ? या आकडेवारीमध्ये काही बदल झाला आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र शासनाकडून राज्य सरकारला चौदाव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून जो निधी दिला जातो त्या एकूण रकमेपैकी ९० टक्के रक्कम राज्याचा हिस्सा म्हणून दिली जाते. उर्वरित १० टक्के निधी केंद्र सरकार सुचविल्याप्रमाणे विविध सर्व्हिसेसच्या बाबतीत जे बेंचमार्क डिफाईन करावयाचे आहेत, त्यांची पूर्तता राज्यांनी किती केली आहे, यानुसार दिला जाणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या सुचनेनुसार डिफाईन केलेले बेंचमार्क पूर्ण करण्याची जबाबदारी राज्यातील सर्व नगरपरिषदांवर आली आहे. संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी या बेंचमार्कची पूर्तता करून घेण्याबाबत सर्व नगरपरिषदांकडे पाठपुरावा करावा, अशा प्रकारच्या सूचना त्यांना विभागाने दिलेल्या आहेत.

३.६६ राज्यातील नगरपरिषदांचा एकूण कारभार लक्षात घेतला तर संचालक, नगरपालिका प्रशासन यांना आम्हाला अशी सूचना करावयाची आहे की, त्यांनी आपल्या मुख्यालयातून बाहेर पडून राज्यातील नगरपरिषदांना प्रत्यक्ष भेटी द्याव्यात व त्यांच्या कामकाजाचा आढावा घ्यावा. अन्यथा, आपल्याला नगरपरिषदांच्या कारभाराची खरी परिस्थिती लक्षात येणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले यासंदर्भात नगरपालिका प्रशासनाने यासंदर्भात कशा प्रकारचे नियोजन केले आहे, याबाबतची माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, नगरपरिषदांची सखोल तपासणी मागील काळात होत नव्हती, ही वस्तुस्थिती आहे. तथापि, अशा प्रकारचे सखोल तपासणी करण्याचे काम सुरू केले आहे. माहिती संचालकांनी स्वतः प्रत्येक महिन्याला किमान ४ नगरपरिषदांना भेटी देऊन तपासणी करण्याचे ठरविले आहे. केंद्र शासनाने निश्चित केलेल्या बेंचमार्कची पूर्तता करण्याबाबत नगरपरिषदांचा मागील काळातील परफॉर्मन्स योग्य नाही, हे दिसून येत आहे. तथापि, पुढील काळात पूर्तता होण्याच्या दृष्टीकोनातून विभाग नियोजन करीत आहे. या विभागातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या सक्षम गटाची निर्मिती केली आहे. साधारणपणे बेंचमार्कची पूर्तता करण्याच्या दृष्टीकोनातून कशा पद्धतीने कार्यवाही केली जावी, यासंदर्भात सक्षम गट विचार करणार असून त्यांचे कामही सुरू झाले आहे. या माध्यमातून पुढील काळात चांगली कामगिरी दिसून येऊ शकेल, अशी अपेक्षा आहे.तथापि, समितीने या ठिकाणी मांडलेल्या विचाराप्रमाणेच विभागाने यापूर्वीच नियोजनाला सुरुवात केलेली आहे व त्याचे परिणाम आपल्याला पुढील काळात दिसून येतील.

३.६७ केंद्र शासनाकडून नगरपरिषदांना आणि पर्यायाने राज्याला मिळणाऱ्या निधीच्या संदर्भातील हा महत्वाचा प्रश्न आहे. विभागाने जर केंद्र सरकारने निश्चित केलेल्या निदर्शकांची पूर्तता केली नाही तर हा निधी मिळू शकणार नाही व तो एक प्रकारे राज्याचे नुकसान आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, केंद्र सरकारने बेंचमार्कच्या पूर्ततेसाठी राज्याला ५ वर्षांचा कालावधी दिलेला आहे. पहिल्या वर्षी वित्त आयोगामार्फत राज्याला १६०० कोटी रुपये प्राप्त झाले आहेत व ते विभागाने नगरपरिषदांना दिले आहेत. केंद्र सरकारने असे सांगितले होते की, पहिल्या वर्षी राज्याने बेंचमार्क डिफाईन करून ते पब्लिश करावेत आणि उत्पन्न वाढीचा प्लॅन द्यावा. त्यामुळे पहिल्या वर्षी विभागास केंद्र सरकारने सुट दिली होती. परंतु, सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात मात्र निदान काही नगरपरिषदांमध्ये हे सर्व बेंचमार्क साध्य करून दाखवावे लागणार आहेत.त मागील वर्षीची १० टक्के रक्कम राज्याला मिळाली आहे. कारण, विभागाने केंद्र सरकारने सांगितल्याप्रमाणे बेंचमार्क निश्चित करून ते पब्लिश केले आहेत. परंतु, पुढील ४ वर्षात मात्र विभागाला हे बेंचमार्क साध्य करावे लागणार आहेत, काही प्रमाणात का होईना वसुलीची टक्केवारी सुधारावी लागणार आहे. तरच पुढील वर्षापासून आपल्याला १० टक्के निधी मिळू शकेल.

३.६८ लेखापरीक्षकांनी सेवास्तरीय बेंचमार्क साध्य केल्याबाबतच्या दिलेल्या आकडेवारीत काही प्रगती झाली आहे का? असा प्रश्न समितीने विचारला होता. त्याचा खुलासा विभागाने केलेला नाही. हा अहवाल प्राप्त होऊन दोन वित्तीय वर्ष उलटून गेली आहेत. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरची सद्यःस्थिती समितीला सादर करण्यात येईल. तथापि, काही पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या आहेत व काही येत्या चार ते सहा महिन्यात पूर्ण होणार आहेत. त्यामुळे ही आकडेवारी आपल्याला निश्चितच सुधारलेली दिसेल. (माहिती प्राप्त नाही) या दोन वर्षात काही योजना पूर्ण झाल्या आहेत व त्यामुळे बेंचमार्क साध्य केल्याची आकडेवारी सुधारलेली आहे. ही माहिती समितीला सादर करण्यात येईल.

३.६९ बेंचमार्कची पूर्तता करण्याच्या दृष्टीकोनातून नगरविकास विभागाने सर्व नगरपरिषदांना कालबद्ध कार्यक्रम निश्चित करून दिलेला आहे का ? विभागाने या संदर्भातील शासन निर्णय काढला असावा. त्यामध्ये अशाप्रकारची कालमर्यादा निश्चित करून दिलेली आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, विभागाने एकूण नगरपरिषदांची विभागणी दोन कॅटगरीमध्ये केलेली आहे. ज्या नगरपरिषदांनी ठराव केलेला आहे त्यांना निधी दिला आणि त्यांची योजना पूर्ण झाली किंवा पूर्णत्वाकडे आहे. त्यांना त्या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी ६ महिन्यांचा कालावधी दिलेला आहे. अनेक नगरपरिषदा अशा आहेत की, ज्यांना अद्याप नगरोत्थरान किंवा युआयडीएसएसएमटी अंतर्गत योजनाच मिळालेली नाही. त्यामुळे पाणी पुरवठ्याचा बेंच मार्क साध्य केल्याची टक्केवारी कमी आहे. विभागाचे असे नियोजन आहे की, ज्यांचा एनपीसीडी कमी आहे त्यांना नगरोत्थानमधून योजना द्यावी. तशी ती दिली जाईल व त्यांच्या बेंचमार्क मध्ये सुधारणा होईल.

पाणीपुरवठा सेवांवरील खर्चाची कमी वसुली

३.७० पाणीपुरवठा सेवांवरील खर्चाच्या कमी वसुलीबाबत जो आक्षेप आहे त्यानुसार १३०.४५ कोटी रुपयांची हानी झालेली आहे. या संदर्भात विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात असे नमूद केले आहे की, "आवश्यक प्रमाणात पुरवठा करण्यासाठी पुरेसा पाणीसाठा नसल्याने बहुतांशी नगरपालिकांकडून अनियमित पाणीपुरवठा होत आहे. त्यामुळे पाणी पुरवठ्याबाबतच्या देयकांची वसुली करणे अवघड होत आहे." या मताशी समितीने पूर्ण सहमत होऊ शकत नाही. फार कमी ठिकाणी मीटरप्रमाणे वसुली होत आहे. नगरपरिषदांची इफिशिअन्सी किती आहे ? अनेक वेळा पाणीपट्टी वसुलीमध्ये नगरसेवक हस्तक्षेप करतात. त्यामुळे नगरपरिषद कर्मचाऱ्यांची वसुली करण्याबाबतची इफिशिअन्सी आणि वसुलीमध्ये हस्तक्षेप होणार नाही, यावर भर देण्याची आवश्यकता आहे. म्हणूनच विभागाने दिलेले स्पष्टीकरण १०० टक्के संयुक्तिक नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, काही ठिकाणी तशी परिस्थिती आहे. उदाहरणार्थ, उदगीर शहराला २१ दिवसातून एकदा पाणीपुरवठा होत असेल तर नगरपरिषदा अशा ठिकाणी पाणीपट्टी वसुली करू शकत नाहीत. परंतु, हेही खरे आहे की, सर्व ठिकाणी विभागाने दिलेले कारण लागू पडणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले.

३.७१ गोंदिया जिल्ह्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून अखंडितपणे पाणीपुरवठा केला जातो. परंतु, तेथे विभाग ८० टक्क्यांपेक्षा जास्त वसुली करणे शक्य झाले नाही. या संदर्भात समितीने सूचित केले की, विभागात अनेक ठिकाणी पाणी पुरवठ्यासाठी स्टॅण्डपोस्ट लावले आहेत. विभागाने जे बेंचमार्क निश्चित केले आहेत त्यानुसार विभागाने २४ तास पाणीपुरवठा करावयाचा आहे. तसे असेल तर मग स्टॅण्ड पोस्ट काढून टाकले पाहिजेत. परंतु, राजकीय फायदयासाठी विभाग ही संकल्पना बंद करणार नाही आणि बेंचमार्कच्या विरुद्ध स्टॅण्डपोस्टची उभारणी करण्यात येईल. असे केले तर विभाग बेंचमार्क साध्य करू शकेल का ? त्यामुळे सर्वप्रथम ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता आहे त्या ठिकाणी विभागाने स्टॅण्डपोस्टवर बंदी आणली पाहिजे. चोवीस तास पाणीपुरवठा करण्याबाबतच्या बेंचमार्कची पूर्तता करावयाची असेल तर स्टॅण्डपोस्टवर बंदी आणलीच पाहिजे. असे समितीने सूचित केलेयाबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीची सूचना मान्य आहे. ज्या ठिकाणी पुरेसे पाणी उपलब्ध आहे व घराघरात आपण पाण्याच्या जोडण्या दिलेल्या आहेत त्या ठिकाणी नवीन रिफॉर्म्सप्रमाणे विभागाकडून स्टॅण्डपोस्टवर बंदी आणण्यात येईल.

३.७२ विभागाने सर्व नगरपरिषदांसाठी एक सामान्य परिपत्रक निर्गमित करावे. असे समितीने सूचित केले तसेच समितीने निदर्शनास आणून दिले की, यासंदर्भात ज्या भागातील वसुलीचे प्रमाण चांगले असते त्याच ठिकाणी पाणीपुरवठा सुरळीत नसतो व स्लम एरियामध्ये जेथे वसुलीचे प्रमाण अगदीच नगण्य असते त्या ठिकाणी मात्र चोवीस तास पाणीपुरवठा केला जात आहे, असे दिसून येते. ही परिस्थिती यामुळे निर्माण होते की, नगरपरिषदांमध्ये पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी काही कर्मचारी नेमलेले आहेत व ते परस्पर संगनमताने अशा गोष्टी करीत असतात. त्यामुळे या संदर्भात बारकाईने निरिक्षण करून योग्य ती कार्यवाही नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी केली पाहिजे. म्हणजे, जे लोक प्रामाणिकपणे पाणीपट्टी भरतात व ज्यांच्याकडून सक्तीने वसुली करण्यात येते त्यांना खंडित पद्धतीने पाणीपुरवठा होतो. या संदर्भात विभागाने काही तरी उपाययोजना केली पाहिजे. तसेच मीटरिंगची पद्धत काही नगरपरिषदांनी राबविलेली आहे. पण काही नगरपरिषदांनी ही बाब गांभीर्याने घेतलेली नाही. साधारणपणे १५ नगरपरिषदांनी या संदर्भात कोणतीच कार्यवाही केलेली नाही, ९ नगरपरिषदांमध्ये हे प्रमाण ५० टक्.यांपेक्षा कमी आहे व केवळ ९ नगरपरिषदांनी याची पूर्तता केली आहे. या संदर्भात विभागाचा काय खुलासा आहे ?

३.७३ या संदर्भात विभाग काही मोहीम राबविणार का ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भात शासनाची ही भूमिका आहे की, शासन योजना तयार करून देईल व त्याचे संचालन व व्यवस्थापन नगरपरिषदेने करावयाचे आहे. मीटरींगच्या संदर्भात संबंधित नगरपरिषदा आणि नागरीक यांनी खर्च करावयाचा आहे. विभागाचे निरिक्षण आहे की, मीटरचा खर्च नागरीक उचलत नाहीत.

३.७४ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, हे खरे नाही. मीटरचा सर्व खर्च नागरिकांकडूनच घेतला जातो.

३.७५ ३० ते ४० वर्षांपूर्वी मीटर पद्धती होती. आता आधुनिकीकरण झाले आहे. परंतु, तरी देखील अनेक शहरांमध्ये मीटर पद्धती राबविली जात नाही. हे विसंगत आहे. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता या संदर्भात विभागाकडून स्पेशल ड्राईव्ह घेण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अश्वासित केले.

घनकचरा व्यवस्थापन :

३.७६ लेखापरीक्षकांनी घनकचरा व्यवस्थापनाबाबत ३६ नगरपरिषदांची निवड केली होती व त्यांचे आक्षेप नोंदविले होते. या संदर्भात विभागाचा खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, यापूर्वी समितीमध्ये जेएनएनयुआरएम संदर्भात साक्ष झाली होती. त्यानंतर घेतलेल्या माहितीनुसार १४० योजना अपूर्ण होत्या. या योजना पुढील दोन वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे. मुख्यमंत्री महोदयांना विभागाने सादर केलेले आहे की, या संदर्भात प्रोत्साहन देण्यासाठीची योजना सुरू करावी.

३.७७ अनेक ठिकाणी सुरू असलेल्या योजना बंद होतात. त्या ठिकाणी मीटर बसविले जात नाही, पाणीपट्टी वसुली होत नाही व शेवटी योजना बंद होतात.त या संदर्भात विभागाने काही तरी विचार करण्याची आवश्यकता आहे. मुख्याधिकाऱ्यांनी इच्छाशक्ती दाखविली तर ही प्रणाली सुधारणे शक्य आहे असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, यामधील एक कारण असे आहे की, काही ठिकाणी थेप्टचे कारण आहे. ते अमृतमधून घेण्यात येत आहे.

३.७८ एमएसईबीने ज्या ठिकाणी गळती होते त्या ठिकाणी ड्राईव्ह घेतला होता. सुरुवातीला त्यांनी प्रत्येक पोलला मीटर लावले होते व झोनवाईज मिटरींग केले होते. त्यामुळे गळतीचे प्रमाण कमी झाले. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, समितीच्या माध्यमातून येत्या तीन महिन्यात तशा सूचना देण्यात येतील वॉटर ऑडिट बंधनकारक करण्यात येतील. त्यामुळे कोणत्या झोनमध्ये गळती होते हे लक्षात येईल. ज्या नगरपरिषदा स्वतः मीटरींग करतील आणि योजना सक्षमपणे चालवतील त्यांना प्रोत्साहन देण्याबाबत शासन विचार करील.

MSNA अंतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी

३.७९ हिंगणघाट नगर परिषदेत हिंगणघाट पाणीपुरवठा क्षमतेची वाढ करण्याबाबत कंत्राटदाराशी नगर परिषदेने केलेल्या करारातील अटी व शर्तीनुसार काम झाले किंवा कसे यासंबंधी विभागाचे काय म्हणणे आहे ? अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सांगितले की, हिंगणघाट पाणीपुरवठा योजनेवर केटी वेअर बांधले होते. त्याचे डिझाईन CDO मार्फत केले होते. त्या आधारावर एस्टीमेट तयार करण्यात आले होते. सदर बांधकाम पूर्ण झाल्यानंतर बाजूने पाणी निघून गेलेले आहे. त्यामुळे ते काम बरोबर झाले नाही. त्यामुळे याची तांत्रिकदृष्ट्या तपासणी करण्यासाठी श्री.गर्ग, मुख्य अभियंता, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती घटित करण्यात आली होती.सदर समितीने २७ जून, २०१४ रोजी भेट दिली होती व त्याचा अहवाल डिसेंबर, २०१४ मध्ये शासनाला सादर करण्यात आलेला आहे. त्यानंतर शासनाने नगर पालिकेला केटीवेअरचा स्टॅबिलिटी रिपोर्ट देण्यासाठी कळविले. यासंबंधी २-३ वेळा विभागामार्फत स्मरणपत्र देखील पाठविण्यात आले. तथापि, नगर पालिकेकडून तो अहवाल अद्यापपर्यंत अप्राप्त आहे. नगर परिषदेकडे दिनांक ११ फेब्रुवारी २०१५ रोजी विभागाने नगर परिषदेला खुलासा करण्याचे पत्र पाठविले आहे. त्यानंतर स्मरणपत्र दिनांक १२ मार्च २०१५ व २० जून २०१५ रोजी पाठविले होते. पण त्यांच्याकडून आजमितीपर्यंत अहवाल प्राप्त झालेला नाही.

३.८० विभागाकडे स्टॅबिलिटी अहवाल प्राप्त झालेला नाही. त्यामुळे आता विभागाकडून नेमकी कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव पाणीपुरवठा यांनी समितीस सांगितले की, ते स्ट्रक्चर सुस्थितीत आहे किंवा कसे यासंबंधातील माहिती घेणे गरजेचे आहे. ती माहिती देण्यासाठी CDO हीच यंत्रणा सक्षम आहे. तसेच प्रत्यक्षात साईटवर फिझिकली स्ट्रक्चर उभे आहे त्याचे जे डिझाईन करण्यात आले आहे त्याची पुन्हा तपासणी करण्यासाठी, सल्ला घेण्यासाठी पैसे भरावे लागणार आहेत.

३.८१ तथापि हा पेच विभाग कसा काय सोडवणार आहे असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता याबाबत प्रधान सचिव पाणीपुरवठा यांनी खुलासा केला की, सचिव, नगर विकास विभाग यांच्याकडून तातडीने त्यांना पत्र गेले तर मार्ग निघू शकेल.

३.८२ यावर समितीने विचारणा केली की, यासंबंधी नगरविकास विभाग त्यांना पत्र पाठविणार आहे काय ? कारण यासंबंधी त्यांच्याकडून जवळ जवळ दोन वर्ष माहिती आलेली नाही. आता दुसरे वर्ष देखील संपत आलेले आहे. यासंदर्भात सचिव, नगर विकास विभाग यांनी समितीस अश्वासित केले की, हिंगणघाट नगर परिषदेला MJP कडून अहवाल अपेक्षित आहे. तो तातडीने सादर करण्याच्या सूचना नगरविकास विभागाकडून देखील करण्यात येतील.

३.८३ यामध्ये पैसे भरण्याचा मुद्दा आहे. विभागाने सल्लागाराची नेमणूक केली होती. पैसे भरले तरच सल्लागार अहवाल देणार आहेत. सल्लागारानेच काम बरोबर केले नाही म्हणून बाजूने पाणी वाहून गेले आहे. जो पर्यंत अहवाल येत नाही तो पर्यंत हा प्रश्न सुटणार नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी सांगितले की, अंदाजे ८ ते १० लाख रूपये एवढी रक्कम द्यावी लागेल असे दिसते.

३.८४ सदर नगर परिषदेने त्यांच्याकडे पैसे नाहीत असे लेखी कळविले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी नकारार्थी उत्तर दिले.

३.८५ मग आता यावर विभागाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे. कारण याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर परिषद यांनी रिप्लाय देखील पाठविलेला नाही. तेव्हा त्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांवर विभागाकडून कोणती कारवाई करण्यात येणार आहे अशी विचारणर समितीने केली असता प्रधान सचिव पाणीपुरवठा विभागाने समितीस सांगितले की, पाणीपुरवठा विभाग मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यावर कारवाई करू शकत नाही. नगरविकास विभागच त्यांच्यावर कारवाई करू शकतो.

३.८६ नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्याला पत्र पाठविण्यात आले आहे. दोन वर्ष होत आली तरी देखील ते उत्तर देत नाही. याबाबत प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, CDO कडून MJP ला ज्याप्रमाणे अहवाल पाहिजे आहे त्याप्रमाणे तात्काळ अहवाल पुढील तीन महिन्याच्या आत प्राप्त करून घेण्यासाठी सूक्त सूचना देण्यात येतील.

३.८७ फेब्रुवारी, २०१५ मध्ये पत्र देण्यात आले होते.आता नोव्हेंबर, २०१६ चालू आहे. पावणे दोन वर्ष झाले तरी त्यांनी पत्राला साधे उत्तर देखील पाठविलेले नाही. असे असताना नगर विकास विभाग अजून तीन महिन्यांचा कालावधी मागत आहात. पावणे दोन वर्ष उत्तर न दिल्यामुळे त्यांच्यावरती खरतर विभागाने कारवाई केली पाहिजे. अजूनही विभागाकडे औपचारिक उत्तर आलेले नाही. पैसे न भरल्यामुळे ते अहवाल देत नाही अशा प्रकारचे अनौपचारिक उत्तर पाणीपुरवठा विभागाचे सचिव देत आहेत. खर्च झालेल्या प्रकल्पाची स्टॅबिलिटी काय आहे, कशामुळे अशा प्रकारचे काम झाले आहे यासंबंधातील माहिती देत नसल्यामुळे त्या अधिकाऱ्यावर कारवाई केली पाहिजे होती. तेव्हा यासंबंधी विभागाकडून कोणती कारवाई करण्यात येणार आहे हे आधी समितीस अवगत करावे. यावर प्रधान सचिव नगरविकास यांनी समितीस आश्वासित केले की, सर्वप्रथम पाणीपुरवठा विभागाला ज्या प्रमाणात अहवाल अपेक्षित आहे तो अहवाल त्यांच्याकडून तीन महिन्यांच्या आत अहवाल प्राप्त करून घेऊ. यात जो काही विलंब केलेला दिसतो त्या विलंबाबाबत DMA ना चौकशी करून अहवाल प्राप्त करून घेतला जाईल.

३.८८ प्रकल्पासाठी सल्लागार नेमले होते. त्या सल्लागाराची भूमिका काय होती, त्यांची काय जबाबदारी होती ? प्रोजेक्ट मॅनेजमेंट लोकांवर जबाबदारी निश्चित केली असणारच ना अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव पाणीपुरवठा यांनी समितीस सांगितले की, पर्यवेक्षणाचे काम सल्लागारावर होते. MJP ने एस्टीमेट केले होते. तांत्रिक पर्यवेक्षणाचे म्हणजे टेंडर काढण्यापासून ते दैनंदिन पर्यवेक्षण करणे हे सल्लागाराचे काम होते.

३.८९ कॉन्ट्रॅक्टचे पूर्ण पेमेंट करण्यात आले आहे काय ? कंत्राटदाराला पैसे दिले आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता यासंदर्भात पाणीपुरवठा विभागाकडे कोणतीही माहिती नाही असे सांगण्यात आले.

३.९० पण कंत्राटदाराला रूपये ५.३४ कोटी रूपये प्रदान केलेले आहेत.त सल्लागाराने (सर्टिफिकेशन) प्रमाणित केल्यानंतरच विभागाकडून त्यांना पैसे दिले असतील. केटी वेअर मधून पाणी जाणार नसेल तर मग त्याचा काय फायदा आहे असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता प्रधान सचिव पाणीपुरवठा विभागाने समितीस सांगितले की, आता बांधकामाशिवाय पर्याय नाही.

३.९१ सल्लागार, कंत्राटदार यांनी विभागाकडून पैसे घेतले आहेत. करारनाम्यानुसार काम व्हावयास पाहिजे होते तसे काम झालेले नाही. त्यास कोण अधिकारी जबाबदार आहे अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव पाणीपुरवठा यांनी सांगितले की, VNIT व CDO या दोन तांत्रिक संस्थांकडून व्हेटींग करून घेतले आहे. तरी देखील डिझाईनमध्ये अडचण निर्माण झाली आहे. पण याला जबाबदार अधिकारी कोण व त्यांवर काय कार्यवाही करण्यात येणार याबाबत मात्र माहिती समितीस देण्यात आली नाही.

३.९२ ज्यांनी या कामाचे पर्यवेक्षण केले त्यांनी तेथून पाणी जाते आहे किंवा नाही हे पाहिले असणारच ना. तसे प्रमाणपत्र विभागाने त्या सल्लागाराकडून घेतले आहे काय? त्या शिवाय कंत्राटदाराला पैसे कसे काय दिले आहेत ? कंत्राटदाराना कशाच्या आधारावर पैसे दिले आहेत? असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता समितीस याबाबत कुठलेही उत्तर प्राप्त झाले नाही. कारण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अंतिम टप्प्यामध्ये आहेत.त निवडणुका जिल्हाधिकारी कंडक्ट करतात. जिल्हाधिकारी कार्यालयातील बराच कर्मचारी वर्ग स्टाफला निवडणुकीच्या कारणामुळे सोडलेले नाही. नगर परिषदेतील मुख्याधिकारी हा सहायक निवडणूक अधिकारी असतो, तर अन्य कर्मचारी हे निवडणुकीच्या कामासाठी घेतलेले असतात. अशी माहिती विभागाकडून प्राप्त झाली.

३.९३ विभागाने कंत्राटदाराला रूपये ५.३४ कोटी इतक्या रकमेचे प्रदान केले आहे. तेथे सल्लागार नेमला आहे. त्याला वेगळा पैसा दिले असणार. सल्लागाराने प्रमाणित केल्यावर ठेकेदाराला पैसे देण्यात येतात.ततप्रमाणित केलेले काम प्रॅक्टीकली झालेलेच नाही. पाणी वेगळ्या दिशेने, बाजूने जात आहे. केटी वेअर सोडून बाजूच्या दिशेने पाणी जात आहे, ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता प्रधान सचिव पाणीपुरवठा विभागानी यांनी समितीस सांगितले की, डिझाईन नुसार काम केलेले आहे. पण डिझाईन सदोष होते असे दिसते आहे.

३.९४ या मुद्दया संदर्भात महालेखाकारांनी समितीस सांगितले की, डिझाईन नुसार काम केलेले आहे. परिच्छेद असा आहे की, CDO नाशिक यांनी आपल्याला सांगितले होते की, गाईड वॉल बांधणे गरजेचे आहे. त्या गाईड वॉलची किंमती रूपये १.२५ कोटी रूपये एवढी होतो. विभागाने पूर्ण अंदाजपत्रक हे ५.०० कोटी रूपयाचे होते. गाईड वॉल न बांधल्यामुळे नंतरचा जो पूर आला त्यात ९० टक्के जे काम झाले होते ते पूर्णपणे वॉश झाले. ती एक कोटी रूपयांची वॉल न बांधल्यामुळे आता १५ कोटी रूपयांचा खर्च करावा लागणार आहे. रूपये १.२५ कोटी इतक्या रकमेची गाईड वॉल न बांधल्यामुळे हा सर्व घोळ झालेला आहे. डिझाईन प्रमाणे काम झाले आहे असे जरी विभाग म्हणत असलो तरी ते मान्य करता येण्यासारखे नाही. केटीवेअरचे काम केले होते ते पूर आल्यामूळे वाहून गेले का ? याबाबत कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.(बां) विभाग, वर्धा यांनी सांगितले की, यामध्ये गाईड वॉल बांधलेले आहेत. सन २००९ मध्ये या कामाला मंजुरी मिळाल्यानंतर हे काम सन २०१० मध्ये सुरू झाले आणि सन २०१२ मध्ये पूर आला. पूर आल्यामुळे दुसऱ्या बाजूला पाणी गेले. शेवटच्या ३० मीटरमधून पाणी गेलेले आहे. आम्हाला पाणी अडवायचे आहे. पाणी जाऊ द्यायचे आहेत.त गाईड वॉल आणि फ्रेम वॉल घेतलेली आहे.

३.९५ "Thus, the non-adherence to the recommendation of the CDO, Nashik for conception of the guide wall not only lead to an extra expenditure of Rs.7.20 crores but also delay of 17 months (i.e. from June 2013 to October 2014)" असे अगदी स्पष्टपणे लिहिले आहे. त्यामुळे ३०मीटरचे बांधकाम न करण्याचे कारण काय आहे अशी विचारणा समितीने केली असता कार्यकारी अभियंता मा.जी.प्रा.(बांधकाम विभाग) वर्धा यांनी समितीस सांगितले की, २२५ मिटर एकूण लेंथ होती. ती बांधलेली आहे. तेथील बँक हा सॉफ्ट होता. त्यामुळे पुरामुळे तेथील माती वाहून गेली. त्यामुळे ३०मीटरचा गॅप पडला आहे. परिच्छेदामध्ये संरक्षण भिंत (प्रोटेक्शन वॉल) अशा प्रकारचा उल्लेख करण्यात आला आहे

३.९६ CDO यांनी गाईड वॉल, संरक्षण भिंत प्रोटेक्शन वॉल बांधण्यात यावी असे विभागाला सांगितले होते का, तसेच पुर येऊन गेल्यानंतर ते विभागाने सुधारित अंदाज पत्रक घेतले आहे. ही बाब समितीन विभागाच्या निदर्शनास आणली व विचारणा केली की, विभागाने सन २०१३ नंतर गाईड वॉल घेतलेली आहे. हे चुकीचे झालेले आहे असे वाटते काय ? सल्लागाराला त्याचे शुल्क दिल्यानंतर, सल्लागाराने प्रमाणित केल्यानंतर कंत्राटदारास पैसे देण्यात येतात. सल्लागाराने डिझाईन प्रमाणे काम झाले आहे असे प्रमाणित केले होते काय यावर प्रधान सचिव पाणीपुरवठा विभागाने सांगितले की, तेथे गाईड वॉल बांधलेली आहे. डिझाईनचे व्हेर्टींग झाले आहे. त्यानुसार काम केलेले आहे. डिझाईन नुसार काम झाले नाही असे नाही. डिझाईन पूर्ण नव्हते. ते अपूर्ण होते. अपूर्ण डिझाईन म्हणजे तांत्रिकदृष्ट्या ते बरोबर वाटत नव्हते.

३.९७ जर सदोष डिझाईन करणारा सल्लागार होता का की ते विभागाचे अधिकारी होते. जर अधिकाऱ्यांनी डिझाईन केले तर अधिकाऱ्यांवर विभागाकडून कोणती कारवाई करण्यात येणार आहे. निधी अपुरा पडल्यामुळे व मध्ये चौकशी झाल्यामुळे पुढचे काम करता आले नाही असे विभागाने आपल्या उत्तरात देखील कुठेही नमूद केलेले नाही. गाईड वॉल बांधण्यात आली असे उत्तरात देखील नाही. दुसरी गंभीर बाब अशी आहे की, फेब्रुवारी, २०१५ पासून सदर नगर परिषदे कडे उत्तर मागण्यात येत आहेत. पण ते उत्तर देखील देत नाही. असे अधिकारी असतात का, अशी विचाराणा समितीने केली असता प्रधान सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस आश्वासित केले की, यासंदर्भात पुन्हा आढावा घेण्यात येईल. तेथे गाईड वॉल बांधलेला पुरावा देखील विभागाकडे आहे. यासंबंधीचे ड्रॉईंग आणि फोटो देखील उपलब्ध आहेत. फाऊंडेशन एक्स्केव्हेशनचा प्रोफाईल चेंज झाला त्यामुळे निधी अपुरा पडलेला आहे. यासाठी विभागाने निधी देखील वाढवून मागितला आहे.

३.९८ प्रकल्पाचा आऊटपूट पाहिजे तो मिळत नाही. आता निधी मागवून काय करणार आहात. असे मत समितीने व्यक्त केले असता प्रधान सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सांगितले की, आता दोन कामे प्रस्तावित आहे. एक म्हणजे जे काम अपूर्ण आहे ते पूर्ण करता येईल. दुसरे म्हणजे पाणी वाहून गेल्यामुळे गाईड वॉल वाढवावयाची आहे ते काम देखील त्यातून पूर्ण करता येईल. या कामासाठी एकूण रूपये १२.०० कोटीचे अंदाजपत्रक आहे.

३.९९ The guide wall was to be built with stones. विभागाकडून सांगण्यात येते की, ते सॉईल बंड आहे. तसे विभागाने त्याच्या उत्तरात देखील म्हटले आहे ही बाब महालेखाकारानी समितीच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय प्रतिनिधी याबाबत खुलासा की, परिच्छेदामध्ये त्यांनी संरक्षण भिंत असे म्हटलेले आहे. बंधाऱ्यासोबत गाईड वॉल असतात. प्रोटेक्शन वॉल हे डिशनल वर्क आहे.

३.१०० पुराचे पाणी आले तर केलेले काम वाहून जाईल त्यामुळे प्रोटेक्शन वॉल करावयास पाहिजे होती व त्याचा उल्लेख डिझाईन मध्ये असावयास पाहिजे होता. खरे म्हणजे डिझाईन सदोष आहे याबाबत नाशिकच्या सीडीओ यांनी दिलेला सल्ला सुद्धा मानलेला नाही. त्यामुळे सदोष

डिझाईन तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी सांगितले की, डिझाईन तयार करताना काळजी घेण्यात येईल.

३.१०१ बॅरेजमधून जे पाणी जाणार आहे त्याचे फाऊंडेशन किती खोल राहणार आहे त्याचे डिझाईन असते. खालची माती वाहून गेली की, वरचे काम आपोआप पडून जाईल.असे मत समितीने व्यक्त केले व निदेश दिले की, यासंदर्भात नगरपालिकेच्या अधिकाऱ्यावर कारवाई करून तीन महिन्याच्या आत स्टॅबिलिटी सर्टीफिकेटचे पैसे भरुन त्याची माहिती समितीला उपलब्ध करून द्यावी. यावर प्रधान सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी सदर माहिती समितीस उपलब्ध करून देण्यात येईल असे आश्वासित केले.

MSMA अंतर्गत केलेली सुधारणाची कामे.–आळंदी नगरपरिषद :

३.१०२ आळंदी येथील पाणीपुरवठा योजना सन २०१४ मध्ये बंद झालेली आहे. याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २०११ मध्ये आळंदी येथील पाणीपुरवठा योजनेच्या सुधारीत कामांना शासकीय मंजुरी देण्यात आली होती. तथापी जुलै, २०१४ मध्ये ही मान्यता रद्द करण्यात आली आहे.

३.१०३ या अनुषंगाने समितीने पुढे अशी विचारणा केली की, आळंदी नगर परिषदेसाठी सुधारणा कामांसाठी दिनांक २९ जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेली प्रशासकीय मान्यता दिनांक २२ जुलै, २०१४ च्या शासननिर्णयान्वये रद्द करण्याची कारणे काय आहेत. यावर माहिती देताना प्रधान सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी असा खुलासा केला की, आळंदी नगरपरिषदेचे कामाच्या संदर्भात तत्कालीन विधानसभा अध्यक्षांबरोबर २८ फेब्रुवारी, २०१४ रोजी बैठक झाली होती. ही योजना केवळ आळंदी शहरासाठी नव्हती तर या योजनेत एकंदर ९ गावांचा समावेश होता. या योजनेत आळंदी गावाला वगळून आळंदी पाणीपुरवठा योजनेचे प्रस्ताव सादर करण्याचे आदेश देण्यात आले होते. यामध्ये एकंदर ३२ कोटी रुपयांचे भांडवली काम होते. या कामाला प्रशासकीय मान्यता १३ ऑगस्ट, २०१४ रोजी देण्यात आली होती. नंतर तत्कालीन उप मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली १४ ऑगस्ट, २०१४ रोजी एक बैठक झाली होती व त्या बैठकीमध्ये असे सांगण्यात आले होते की, आळंदी ही नगरविकास खात्यामध्ये असून त्याचा प्रस्ताव तुम्ही नगरविकास विभागाकडे सादर करा. या योजनेत अजून आठ गावांचा समावेश होता त्यामुळे ही प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात आली.

३.१०४ यानुषंगाने समितीने अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने अशी विचारणा केली की, आळंदी येथील पाणीपुरवठा योजना मंजुर झाली त्यावेळी तेथील सोर्स मंजूर झालेला नव्हता, ही योजना पूर्ण झालेली आहे. योजना कार्यान्वित करताना सोर्सचा का विचार करण्यात आलेला नाही, याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ही योजना वेगळी आहे, ही योजना एमएनजेएनए अंतर्गत आहे, सुजल योजनेमध्ये जी कामे देण्यात आली होती. यामध्ये उपभोक्ता सर्वेक्षण करण्याचे काम होते, पाणी व वीज लेखा परीक्षणाचे काम होते, नकाशे तयार करण्याचे काम होते, मोठ्या प्रमाणात पाणीपुरवठा मीटर बसविण्याचे कामे होते. सोर्स किंवा इतर कामे यामध्ये नव्हती.

३.१०५ दुसरी नवीन प्रशासकीय मान्यता कन्व्हेटेड प्रोजेक्टला देण्यात आली आहे काय यासंदर्भात प्रधान सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सांगितले की, दि.१३ मे,२०१६ रोजी या विषयाच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षेतेखाली बैठक झाली व त्या बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला होता की, पुर्ण महानगरपालिकेत जेएनयुआरममध्ये योजना झाली असून भामा, आस्केड या उद्‌भवावरून एक योजना मंजूर असून त्या योजनेमध्ये ५ एमएलडीचे टॅपिंग आळंदीला देण्यात यावे असा निर्णय झाला आहे. ही टॅपिंग आळंदी शहरासाठी होती. टॅपिंगपासून आळंदी शहरापर्यंत जेवढया अंतराचे पाईपलाईन लागणार आहे त्यासंदर्भात अंदाजपत्रक तयार करून ते सादर करण्यात यावे असा निर्णय झालेला आहे. याबाबतीत नगरपालिकेने ठराव केला असून त्यासाठी MJP ४.३२ कोटी रुपयांचा डीपीआर तयार करीत आहे. एक महिन्याच्या आत यासंदर्भातील प्रस्ताव नगरविकास विभागाला सादर करणार असून ही योजना कमी पैशात पूर्ण होणार आहे.

३.१०६ चांगल्या जलव्यवस्थापनासाठी हे अभियांन शासनाने सुरू केले होते. हे सुजल सुरू आहे की, बंद आहे. या योजनेत पाणीपुरवठा करण्याबरोबर उत्कृष्ठ जल व्यवस्थापन असावे अशी धारणा असते. जलव्यवस्थापन नसेल तर कितीही पाणीपुरवठा असला तरी शहराला आणि भागाला पाणी मिळत नसते आणि हा अनुभव आपण प्रत्यक्ष अनुभवत असतो. सन २०१० मध्ये काही नगरपालिकेंचे आदेश निघाल्यामुळे काही तरुण अभियंत्यांनी यामध्ये कामे केली असून त्यांना २०१६ पर्यंत एक पैसाही मिळालेला नाही. धुळे महानगरपालिकेमध्ये संदर्भात असा प्रकार घडलेला आहे. धुळे महानगरपालिकेत एक चांगली जलव्यवस्थापना आहे. त्यांना सन २०१० मध्ये कार्यारंभ आदेश मिळाला हा प्रकल्प १.५ कोटी रुपयांचा होता. सन २०१४ मध्ये त्यांनी १.०५ कोटी रुपयांचे एमडी रेकॉर्ड सुद्धा केले होते परंतु आजपर्यंत धुळे महानगरपालिकेने त्यांना एक रुपयासुद्धा दिलेला नाही. हे पैसे कोणत्या कारणामुळे देण्यात आले नाहीत तसेच बऱ्याच महानगरपालिकेमध्ये या व्यवस्थापनाअंतर्गत ज्यांनी कामे केलेली आहेत त्यांना देखील अद्याप पर्यंत पैसे मिळालेले नाहीत. त्यामुळे या लोकांना पैसे का दिले जात नाही ? जल व्यवस्थापनामध्ये अनेक चांगली तरुण मुले असून त्यांनी फार चांगले काम केलेले आहे. ही बाब समितीने विभागाला निदर्शनास आणली तरच यावर प्रधान सचिव

पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सांगितले की, आता नवीन योजना मंजूर होत नसून ज्या जुन्या योजना मंजूर आहेत त्यांनाच निधी उपलब्ध करून दिला जातो. तसेच समितीने आता जी बाब विभागाच्या निदर्शनास आणली आहे. त्यांसदर्भातील लेखी माहिती समितीस उपलब्ध करून देण्यात येईल असे अश्वासित केले.

३.१०७ बल्लारपूर, गोंदिया, अकोट, परतूर, खामगाव, जळगाव जामोद, करंजा, सिल्लोड,परळी, भंडारा, दापोली, रत्नागिरी, परभणी या महानगरपालिकांना अद्याप फंड दिला गेला नाही. ज्यांनी चांगली कामे केली आहेत त्यांना पैसे उपलब्ध करून दिले पाहिजेत. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी सागितले की, ज्या योजना सुरू आहेत अशा सर्व योजनांचे पैसे मिळतील परंतु नवीन योजनांना मिळणार नाही. ज्यांनी कामे केली आहेत त्यांना पैसे मिळतील. तसेच धुळे महानगर पालिकेच्या जलव्यवस्थापन योजने संदर्भात माहिती घेऊन त्याना पैसे कसे उपलब्ध करून कसे देता येतील यावर विचार करण्यात येईल.

३.१०८ पाच वर्षे झालेली असताना तरुण मुलांना त्यांच्या कामाचे पैसे मिळाले नाहीत हे योग्य नाही. असे मत समितीने खेदाने व्यक्त केले असता या सपुर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती समितीस लेखी स्वरुपास सादर करण्यास येईल, असे विभागाकडून आश्वासित केले.

३.१०९ हिंगणघाट नगरपरिषदेतील पाणीपुरवठा योजनेच्या संदर्भात जे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते त्यामध्ये गाईड वॉलचा समावेश करण्यात आलेला नव्हता. अंदाजपत्रकामध्ये गाईडवॉल नव्हत्या तर आपण गाईड वॉल कशा काय बांधल्या व गाईड वॉल बांधलेल्या आहेत त्या चांगल्याच आहेत परंतु त्याचा उल्लेख अंदाजपत्रकामध्ये असावयास पाहिजे ही बाब समितीच्या विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता यावर कार्यकारी अभियंता, माजिप्रा, वर्धा यांनी समितीस सांगितले की, अंदाजपत्रकात गाईड वॉलचा उल्लेख असून त्याप्रमाणे बांधलेल्या आहेत.

३.११० एस्टीमेटमध्ये गाईडवॉल होत्या, मग त्याचा उल्लेख निविदामध्ये होता का, याबाबत कार्यकारी अभियंता, माजिप्रा, वर्धा यांनी सांगितले की, टेंडर निविदा नगरपालिकेने काढले होते.

३.१११ अंदाजपत्रक असा उल्लेख नाही असे महालेखाकाराचे म्हणणे आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी सांगितले की, अंदाजपत्रकामध्ये तसा उल्लेख आहे.

उस्मानाबाद नगरपरिषद :

३.११२ उस्मानाबाद नगरपरिषदेस सुधारणा कामांसाठी सुधारणात्मक कामांसाठी नगरपरिषदेकडून ४ वेळा निविदा मागविण्यात आल्या. तथापि, त्यास प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे सदरील कामास विलंब झाला. त्यानुसार म.जी.प्रा. कडून ग्राहक सर्वेक्षण व जीआयएस मॅपिंगची ७५ टक्के कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरित कामे नगरपरिषदेकडून मागविण्यात आलेल्या निविदा धारकाकडून ४० टक्के पूर्ण करण्यात आलेली आहेत ? सदर कामे केव्हा पूर्ण करण्यात येणार आहेत अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सांगितले की, उस्मानाबाद हिंगणघाट नगरपरिषदेने चार वेळा निविदा काढल्या होत्या परंतु त्यांना प्रतिसाद मिळाला नाही, ही वस्तुस्थिती आहे. आता ग्राहक सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून जल व्यवस्थापनाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. जीआयएस मॅपिंगचेही काम १०० टक्के पूर्ण झालेले आहे. तिन्ही कामे पूर्ण झालेली आहेत.

फलटण नगरपरिषद :

३.११३ फलटण प्रकरण नगरपरिषदेच्या एमएसएमए अंतर्गत पाणीपुरवठा सुधारणा करण्याबाबतच्या कामाची सद्यःस्थिती बाबत प्रधान सचिव पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सांगितले की, फलटण नगरपरिषदेत ग्राहक सर्वेक्षाचे ९५ टक्के, जल व्यवस्थापनाचे ७५ टक्के, जीआयएस मॅपिंगचे काम ८० टक्के आणि जललेखा परिक्षणाचे ८० टक्के काम पूर्ण झालेले आहे. या ठिकाणी सुद्धा दोन वेळेस निविदा देण्यात आली होती परंतु दोन्ही निविदेला प्रतिसाद मिळाला नव्हता. पहिल्या निविदेमध्ये कोणीही आले नाही, दुसऱ्या निविदेत ठेकेदार आला परंतु त्याने सिक्यूरिटी डिपॉझिट भरले नव्हते परंतु तिसरी निविदा सक्सेसफूल राहिलेली आहे. तिसऱ्या निविदेचे काम ॲक्वासी लि.पुणे यांना काम देण्यात आले असून हे काम जून, २०१५ मध्ये सुरू झाले आहे.

३.११४ निविदेमध्ये भाग न घेण्याची कारणे काय आहेत ? उस्मानाबाद येथे चार वेळेस, फलटण येथे तीन वेळेस निविदा काढावी लागली त्यामुळे पाटीसिपेंट न येण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी समितीस सांगितले की, विभागाकडे जे जुने प्रकल्प होते त्याची निविदा तीनदा, चारदा काढली तरी ती निविदा कोणी भरत नव्हते. परंतु यासंदर्भात अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले की, प्रत्येक नगरपालिका स्वतःचे वेगळे टेंडर डॉक्यूमेंट काढायची आणि प्रत्येक टेंडर डॉक्यूमेंटमध्ये वेगवेगळे पीक्यू असायचे. आपल्याला कल्पना आहे की, पीक्यूवर ठेकेदार कॉलिफाय होत असतात तर कधी होत नसतात. आता या यंत्रणेमध्ये अशी सुधारणा केली आहे की, अमृत योजनेमध्ये कॉमन मॉडेल टेंडर डॉक्यूमेंट काढले आणि सर्व अमृत शहरांना तेच मॉडेल टेंडर डॉक्यूमेंट वापरले जावे असे शासनाने बंधनकारक केले. नगरविकास विभाग नगरोत्थान योजनेकरिता तेच मॉडेल टेंडर डॉक्यूमेंट वापरत आहे. आता ठेकेदाराला १४ दिवसात पेमेंट उपलब्ध होणार आहे. १४ दिवसांत पेमेंट मिळत असल्यामुळे आता चांगला प्रतिसाद मिळत आहे.

३.११५ अमृत शहराअंतर्गत जी शहरे घेतली नाहीत त्या शहरांच्या संदर्भात काय परिस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता

प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी समितीस सांगितले की, अमृत योजनेमध्ये केवळ १ लाख लोक संख्येच्या वरची शहरे येतात. एक लाखाच्या खालच्या शहरांना सुजलचे प्रकल्प असतील तर सुजलचे नाही तर नगरोत्थान योजना. अमृत शहराकरिता जे मॉडेल टेंडर डॉक्यूमेंट लागू केले आहे तेच मॉडेल टेंडर डॉक्यूमेंट नगरोत्थान करिताही लागू करीत आहोत. सप्टेंबर पासून जितके टेंडर निघत आहेत त्यांना मॉडेल टेंडर डॉक्यूमेंट कायम केले आहे. नगरपालिकांमध्ये बरेचदा तांत्रिक मनुष्यबळ नसते त्यामुळे ते कोणत्या तरी सल्लागारांना काम दिले जाते. परंतु त्यांच्याकडेही मनुष्य-बळ नसते. त्यामुळे यासंदर्भात मंत्रीमंडळाने असा निर्णय घेतला आहे की, यापुढे पाणीपुरवठा योजनेच्या प्रत्येक प्रकल्पामध्ये मग तो अमृत असो किंवा नगरोत्थान असो, एमजेपी हे पीएमसी असतील पीएमसीकडे तेवढे मनुष्यबळ असते. एमजेपीला कन्सल्टन्सीचा यासंदर्भात मंत्रीमंडळाने ३ टक्क्याचा निर्णय घेतला आहे परंतु तो पोस्ट फॅक्टो लागू आहे.

३.११६ हा पैसा त्या प्रकल्पामध्ये समाविष्ट केला जाईल की, तो पैसा तेथील नगरपरिषदांना द्यावयाचा आहे अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी सांगितले की, हा पैसा त्या त्या नगरपरिषदांना द्यावे लागणार आहेत. नाही तरी नगरपरिषदा तसेही सल्लागार लावतच होते. परंतु बऱ्याच ठिकाणी फारसा अनुभव नसलेले कंत्राटदार काम करीत होते आणि बहुतेक महानगरपालिकेकडे तर तांत्रिक मनुष्यबळ नसते.

३.११७ नगरपरिषदेने ३ टक्के पैसे द्यावयाचे आहेत परंतु जोपर्यंत एमजीपीला पैसे मिळत नाही तोपर्यंत ते फॉरवर्ड होणार नाहीत. सीडीओला पैसे मिळाले नाही म्हणून सर्व्हे आणि रिपोर्ट फायनल करण्याचे होत नाही. तशीच परिस्थिती एमजीपीची होईल. त्याऐवजी शासनाने प्रोजेक्ट कॉस्टमध्ये त्यांची कॉस्टींग टाकली तर ते योग्य होईल. हा भार प्रोजेक्ट कॉस्टमध्ये टाकला तर नगरपरिषदेवरचा ३ टक्क्याचा भार येणार नाही आणि ते पेमेंट डिपार्टमेंटली केले जाईल अशी सूचना समितीने केली असता प्रधान सचिव, नगरविकास विभागानी सांगितले की, समितीच्या सूचनेचा विचार करण्यात येईल.

३.११८ अमृत योजना या २५०, ३०० कोटी रुपयांच्या मंजूर झालेल्या असून यामध्ये केंद्र शासनाचा पैसा ५० टक्के असून २५ टक्के राज्य शासन आणि २५ टक्के नगरपिरिषदा किंवा महानगरपालिकांचा हिस्सा आहे. परंतु २५ टक्के हिस्सा भरण्याची नगरपरिषदांची आर्थिक स्थिती असते काय, त्यासाठी कर्ज उभारण्यासाठी विभागाकडून परवानगी देण्यात येणार आहे काय, अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांनी समितीस सांगितले की, यावर शासनस्तरावर खूप सविस्तर अशी चर्चा झाली. चंद्रपूरला साधारणतः २०० कोटी रुपयांची योजना मंजूर असेल तर त्यांना ५० कोटी रुपयांचा निधी भरावा लागतो. हा निधी प्राप्त करून घेणे त्यांना अवघड जाते. त्यामुळे आता शासनस्तरावर २ निर्णय घेतले आहेत. एका निर्णयाच्या संदर्भात शासनाचा एक जी.आर. ऑलरेडी निघालेला आहे. चौदाव्या वित्त आयोगात सर्वांना चांगल्या स्वरुपात निधी मिळतो. पूर्वी नगरपरिषदा चौदाव्या वित्त आयोगाचा निधी कधी वळवायच्या तर कधी वळवायच्या नाहीत. आता शासनस्तरावरूनच चौदाव्या वित्त आयोगातील निधीच्या किमान ५० टक्के निधी प्रोजेक्टला देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचे चालू असलेले प्रकल्पाचे (ऑनगोईंग प्रोजेक्टचे) जी.आर. ही शासनाने काढले आहेत. तरीही पूर्ण निधीची सोय होत नाही. शासनाने आता एक व्यवस्था केलेली आहे आणि आचारसंहिता संपल्यानंतर साधारणतः १५ जानेवारी पासून ती अंमलात येईल. शासनाची एक वेगळी संस्था आहे, त्यामध्ये एमएमआरडीएचा काही निधी आहे आणि शासनाचा काही निधी आहे. नगरपालिकेने शासनाकडे लोनची मागणी करावयाची आहे व संस्थेने मागणी केल्यानंतर या निधीतून शासन ३ महिन्यांच्या आत लोन उपलब्ध करून देईल, अशी एक व्यवस्था शासन करीत आहे. याची औपचारिक (फॉर्मल) घोषणा १५ जानेवारी पर्यंत होईल.

३.११९ त्यामध्ये आणखी एक सिस्टम ॲड होऊ शकते जसे की, पाणी पुरवठ्याचे जे पैसे नगरपालिका वसूल करतात ते स्क्रो मॅकनिझमने शासनाकडे डायरेक्ट वळतील. त्यांनी वेगळे पैसे भरण्याची आवश्यकता नाही. त्यांनी १०० रुपये भरल्यानंतर तुमच्या लोनच्या रेशिओ प्रमाणे जी काही रक्कम ठरेल ती स्क्रो मॅकनिझमने शासनाच्या खात्यात वळती होईल, अशी सिस्टम केल्यास शासनाची नगरपरिषदा/नगरपालिकांकडे थकबाकी राहणार नाही. अशी सुचना समितीने केली असता प्रधान सचिव नगर विकास विभाग यांनी समितीस सांगितले की, तशीच सिस्टम विभागाकडून करण्यात येत आहे. आज त्यांना पैसे पाहिजे असल्यास आज त्यांना लोन उपलब्ध करून देण्यात येईल. परंतु, परतफेडीच्या १०-१५ वर्षांत शासनाचे पैसे खात्रीने (रिकव्हर) वसुल होतील यानुसार एक मॅकनिझम (करणार आहोत) करण्यात येणार आहे.

फलटण नगर परिषद :

३.१२० फलटण येथे नगरपरिषदेने १० टक्के लोकवर्गणीची रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत विलंबाने भरली, त्यामुळे त्यांना शासनाकडून निधी प्राप्त होण्यास विलंब झाला. त्याकरिता किती विलंब झाला अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी समितीस सागितले की,सदर लोकवर्गणी सप्टेंबर, २०१६ मध्ये भरली आहे.

३.१२१ पण ती लोकवर्गणी सन २०१२ मध्ये भरावयाची होती. ती सन २०१६ मध्ये भरली याचा अर्थ यामध्ये ४ वर्षांचा विलंब झालेला आहे. हे पैसे इतक्या उशिरा का भरले, ते पैसे (कलेक्ट) जमा कधी झाले होते यावर प्रधान सचिव, पाणीवुरवठा विभाग यांनी सांगितले की,

सुरुवातीला जेव्हा जी.आर. इशु होतो त्यावेळेस निधी देण्यात येतो. येथे सन २०१२ मध्ये जी.आर. इशु झालेला आहे म्हणजे सन २०१२ मध्ये त्यांनी प्रथम आपली टक्केवारी भरली असेल. ते जेव्हा पुढच्या हप्त्यासाठी शासनाकडे येतात, त्यावेळेस त्यांना विचारणाा केली जाते की, तुम्ही तुमचा पुढचा हप्ता, शेअर भरला आहे काय ? तसेच त्यामध्ये त्यांनी पहिल्या वर्षाचे काम करायचे आहे. सन २०१३ मध्ये ते काम कमीत कमी अर्धे तरी पूर्ण करून शासनाकडे पैशाची मागणी करणे अपेक्षित होते. त्यांच्याकडून ते न झाल्याने ३ वर्षे उशीर झालेला आहे.

३.१२२ लोकवर्गणी शासनाकडे सप्टेंबर, २०१६ मध्ये जमा झाली. परंतू सदर लोकवर्गणी नगरपरिषदाकडे जमा झाली. लोकवर्गणी भरावयास जो विलंब झाला आहे ती रक्कम किती होती. असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता सदर माहिती बैठकीच्या वेळी सचिवाकडे असल्यामुळे त्यांना ती माहिती समितीस सादर करता आली नाही याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली.

३.१२३ सदर निधी किती होता, नगरपरिषदेने तो निधी ट्रेझरीला दिलेला नाही मग त्यांनी तो कोठे ठेवला होता ? नगरपरिषदेच्या कोणत्या अकाऊंटमध्ये तो निधी दाखविण्यात येतो. याबाबत विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नाही पण त्यांची एकूण ७० लाख रुपयांची मंजूर अमाऊंट आहे. एकूण ७० लाख रुपयांच्या योजना आहेत आणि त्यापैकी ५३ लाख रुपये वितरित झाले आहेत.असे विभागाकडून सांगण्यात आले.

३.१२४ नगरपालिकेने पैसे भरले नाहीत त्यामुळे शासनाकडून पैसे उशिरा मिळाले, परिणामी ते काम उशिरा झाले. त्या ३-४ वर्षांत प्राईस एस्कलेशन होते यामुळे एकंदर नुकसान होते. पैसे वेळेवर कलेक्ट केले होते मात्र ते शासनाकडे वेळेवर भरले नाहीत त्यामुळे शासनाकडचा निधी आला नाही, त्यामुळे ३-४ वर्षे कामास उशीर झाला, कामाला उशीर झाला की, प्राईस एस्कलेशन होते. यासाठी जे अधिकारी जबाबदार होते, त्यांना जबाबदार धरले पाहिजे, त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

३.१२५ यामध्ये अशा अडचणी येतात की, मुळात ही योजना मंजूर झाल्यानंतर केंद्र शासनाचा निधी मिळणे हा एक विषय झाला. राज्य शासनाचे कॉन्ट्रिब्युशन लवकर मिळत नाही, तेही विलंबाने मिळाले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता सदर योजना ही राज्य शासनाची आहे. असे पाणीपुरवठा विभागाकडून सांगण्यात आले

३.१२६ स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात असे नमूद केले आहे की, नगर परिषदेने लोकवर्गणीचे पैसे विलंबाने भरल्यामुळे त्यामुळे शासनाचा निधी विलंबाने उपलब्ध झाला. लोकवर्गणी वेळेत भरली असती तर, शासनाचा निधी त्यांना वेळेत मिळाला असता. आता प्रकल्पाची सद्यस्थिती काय आहे, काम पूर्ण झाले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी सांगितले की, फलटण येथील काम पूर्ण झालेले नाही.

३.१२७ सन २०१६ मध्ये पैसे भरले असून देखील काम पूर्ण झालेले नाही. त्यामुळे आता किती प्राईस एस्कलेशन झालेले आहे, प्रकल्पाची किंमत किती वाढली आहे.अशी विचारणा समितीने केली असता ही माहिती ही माहिती बैठकीच्या वेळी विभागीय सचिवानकडे उपलब्ध नव्हती. परंतू विभागीय सचिवांनी असे सांगितले की, कदाचित यात एस्कलेशन नसेल. बऱ्याच योजनेत आपण एस्कलेशनची तरतूद ठेवत नाही.

३.१२८ त्या दरामध्ये एक तर विभागाला कंत्राटदार मिळत नाहीत. आणि कंत्राटदार मिळाल्यानंतर त्यामध्ये प्राईस एस्कलेशनची कंडिशन नसेल तर, क्वालिटी ऑफ वर्क काय होणार, लोकवर्गणीचे पैसे उशिरा जमा केले आहेत, विभागाला ती रक्कम माहीत नाही, किती उशीर झाला ते माहीत नाही, प्राईस एस्कलेशन किती झाले ते माहीत नाही. निधी भरण्यास जो तीन वर्षाचा विलंब झाला आहे. त्या तीन वर्षात नगर परिषदेने कोणत्या अकाऊंटमध्ये पैसे सेव्ह करून ठेवले होते ? असे मुद्दे समितीने उपस्थित केले असता प्रधान सचिव, पाणीपुरवठा विभाग यांनी सांगितले की, नगर परिषदेने हे पैसे लोकांकडून गोळा केले होते की, आपल्या स्वनिधीतून दिलेले आहेत हे देखील स्पष्ट होत नाही. लोकवर्गणीचा निधी त्यांनी कसा उभारला याची माहिती उपलब्ध नाही. तसेच यासंदर्भात नगर विकास विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले की, फलटण नगरपरिषदे बाबत माहिती घेऊनच सांगता येईल कारण आजच्या बैठकीतील साक्ष सुजल निर्मल अभियानांतर्गत झालेल्या योजनांची आहे. त्यांची कार्यान्वित यंत्रणा पाणीपुरवठा विभाग आहे.

३.१२९ प्राईस इस्कलेशन झाले, त्यामुळे कॉस्ट किती वाढली ? टेंडर नगरपरिषद काढते त्यामुळे टेंडरची कॉस्टही नगरपरिषद देणार. त्यामध्ये किती एस्कलेशन झाले याबाबतची सविस्तर अहवाल समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासन नगर विकास विभागाकडून देण्यात आले.

३.१३० साक्षीच्या बैठकीत ज्या विषयाची चर्चा करायची आहे त्या विषयाबाबत विभागाला जर माहिती नसेल तर साक्ष घेण्यास काहीच अर्थ राहणार नाही. कारण प्राईस एस्कलेशन झाल्यास शासनाचे नुकसान होणार आहे. नगरपरिषदा पैसे गोळा करून ते शासनाकडे जमा न करता स्वत:कडे ठेवणार असतील, तर शासनाचे पैसे वेळेवर येणार नाहीत. कंत्राटदाराला टेंडर कंडिशनमध्ये प्राईस फिक्सिंगला बांधून ठेवले तर त्याला एस्कलेशन मिळणार नाही मग क्वालिटी ऑफ वर्क मिळणार नाही. याला जबाबदार अधिकारी कोण आहे, हे पैसे कशासाठी अडवून ठेवले, ते दुसऱ्या कामासाठी खर्च केले काय असे प्रश्न समितीने वारंवार उपस्थित केले परंतू विभागाकडून उत्तर प्राप्त झाले नसल्यामुळे समितीला सदर साक्ष नाईलाजाने प्रलंबित ठेवावी लागली ही खेदाची बाब आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले ?

घनकचऱ्याचे व्यवस्थापन :

३.१३१ उक्त परिच्छेदामध्ये एमएसडब्ल्यू नियमांप्रमाणे कचऱ्याचे विलग्नीकरण न करणे याकरिता वजन यंत्र उपलब्ध नाही हे कारण देण्यात आले आहे. उमरखेड, यवतमाळ, चाळीसगाव, कुळगाव-बदलापूर, सिन्नर, लोणावळा, जालना, नरखेड, गोंदिया, खामगाव वगैरे ठिकाणी वजन यंत्र उपलब्ध नव्हते, याबाबत विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले की, सर्वप्रथम विभागाला ही वस्तुस्थिती मान्य करावयाची आहे की, ज्यावेळेस लेखा परीक्षण झाले त्यावेळेस विलग्नीकरण किंवा सेग्रिगेशन काही फार मोठ्या प्रमाणात होत नव्हते. केवळ या ३६ नगरपरिषदांमध्ये नाही तर, महाराष्ट्रात किंवा भारतभरातच कचऱ्याच्या प्रश्नाला प्राधान्य दिलेले नव्हते, त्यामुळे नगरविकास विभागाला आदरणीय पंतप्रधान महोदयांनी एक स्वच्छ भारत अभियान दिले. या स्वच्छ भारत अभियानामध्ये सर्वात महत्त्वाचा बेंच मार्क हा सेग्रिगेशन ट सोर्स किंवा कचऱ्याचे विलग्नीकरण हा आहे. विभागाने आता स्वच्छ भारत अभियानांतर्गत कारवाई सुरू केलेली आहे. आता ५० नगरपरिषदांमध्ये कचऱ्याचे विलग्नीकरण सुरू झालेले आहे. हे अद्याप मुंबई शहरातही झालेले नाही. मात्र पाचगणी, वेंगुर्ला येथे ते १०० टक्के झाले आहे. हे आता सगळीकडेच करावयाचे असून त्यासाठीचा अवधी हा दिनांक २ ऑक्टोबर, २०१९ पर्यंतचा आहे. दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत सर्व नगरपालिकांनी कचऱ्याचे १०० टक्के विलग्नीकरण करावे. मुंबईत बऱ्याचदा जो विषय बोलायचो की, एकदा सेग्रिगेशन केले की, त्याची वाहतूकही सेग्रिगेट झाली पाहिजे. ॲट सोर्सला सेग्रिगेशन करून जर वाहतूक एकत्रित झाली तर, त्याचा काही उपयोग नाही. हे बेंच मार्क आपण सर्व नगरपरिषदांना दिलेले आहेत.

३.१३२ या प्रकरणात एमएसडब्ल्यूच्या नियमांप्रमाणे कचऱ्याचे विलग्नीकरण न करण्याबाबत ज्या गोष्टी नमूद करण्यात आल्या आहेत, त्याबाबतची माहिती देताना असे सांगितले आहे की, ५० नगरपालिकांमध्ये आता सुक्या व ओल्या कचऱ्याचे विलग्नीकरण वेगवेगळ्या पद्धतीने होत आहे. मात्र आतापर्यंत ते जेथे झालेले नाही त्या संदर्भात शासनाने काय पावले उचलली किंवा जबाबदारी घेतली किंवा जबाबदार अधिकाऱ्यांना त्या संदर्भात जाब विचारला का याचा आढावा घ्यावा लागेल. कारण केंद्र शासनाचा पैसा आता येत आहे असे नाही आणि राज्य सरकार या संदर्भात पहिल्यापासून पैसे देत आहे. त्या पैशांचा जो उपयोग झाला पाहिजे तो करून घेतलेला नाही. शासनाला पुढच्या काळात जर हे करून घ्यायचे असेल तर शासनाने कठोर कारवाई केलीच पाहिजे, त्याशिवाय हे होऊ शकणार नाही. यामध्ये कोट्यवधी रुपये खर्च करण्यात येणार आहे असे मत समितीने व्यक्त केले.

३.१३३ विभागाच्या उत्तरामध्ये काही ठिकाणी वजन यंत्र उपलब्ध नव्हते असे नमूद केले आहे. मग किती कचरा गेला याचे मेजरमेंट कसे करणार ? वजनावर पेमेंट करण्यात येते. एवढ्या नगरपरिषदांना त्या काळी वजन यंत्र न मिळण्याचे कारण काय होते ? काही ठिकाणी खाजगी ठेकेदारांनी स्वतःच्या हिशोबाने वजनाचे यंत्र करून घेतले आहे. लोणावळा येथे कचऱ्याचे वजन ठेकेदारामार्फत करण्यात येते व ४० टक्के विलग्नीकरण केले जाते हा त्या काळातील रिपोर्ट आहे. ठेकेदाराने वजन केले तर तो स्वतः साठीच वजन करणार ना ? वजन यंत्र उपलब्ध न होण्याचे कारण काय आहे, शासनाची या संदर्भात काय जबाबदारी आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सागितले की, कचऱ्याचे विलग्नीकरण आणि इव्हन ट्रान्सपोर्टेशन व प्रोसेसिंगशी संबंधित परिच्छेद देखील पुढे आहेत ते झालेले नाही. ही वस्तुस्थिती आहे व ती मान्य केली पाहिजे. परंतु, आता शासन पंरतू आता शासनाकडून नगरपरिषदांना विचारले तर काही नगरपरिषदांनी असे उत्तर दिलेले आहे की, त्या नगरपरिषदांनकडे पर्याप्त निधी नव्हता म्हणून हे वजन यंत्र वगैरे घेता आले नाहीत. आता नगरपरिषदांना जो हक्काचा चौदाव्या वित्त आयोगाचा निधी मिळतो त्यातील ५० टक्के निधी केवळ स्वच्छ भारत अभियानावर खर्च करण्याबाबत निर्णय घेतलेला आहे.

३.१३४ वजन यंत्राबाबतची सद्यःस्थिती काय आहे, आता किती नगरपरिषदांकडे वजन यंत्र आहे व किती नगरपरिषदांकडे वजन यंत्र नाही. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १४ व्या वित्त आयोगातून निधी उपलब्ध करून दिलेला आहे, त्यामुळे आता वजन काटे घेण्यासाठी निधी उपलब्ध आहे. महालेखाकारांच्या परिच्छेदा मध्ये ज्या ३६ नगरपालिकांचा उल्लेख आहे. त्यापैकी पनवेल, लोनावळा, चाळीसगांव, इचलकरंजी व नंदूरबार या पाच नगरपालिकांकडे वजन काटे आहेत अशी माहिती उपलब्ध आहे.

३.१३५ म्हणजे ३१ नगरपालिकांकडे वजन काटे उपलब्ध नाहीत. १४ व्या वित्त आयोगाचा निधी या नगरपालिकांना केव्हा उपलब्ध करून देण्यात आला आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सप्टेंबर किंवा ऑक्टोबर, २०१५ मध्ये या नगरपालिकांना १४ व्या वित्त आयोगाचा निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

३.१३६ एक वर्ष झाले तरी त्या नगरपालिकांकडे वजन काटा नसेल तर याबाबत विभाग कोणाला जबाबदार धरणार आहे. स्वच्छ भारत योजनेची पहिली टर्म आहे. स्वच्छ भारत मोहिम राबवितांना हातात झाडू पाहिजे, स्वच्छ भारत ही मोहिम रिझल्ट ओरिएंटेड आहे, हे काम दररोज होणारे आहे. सादरीकरणातून एखादा एरिया स्वच्छ करून तो संगणकावर दाखविता येऊ शकतो. नगरपालिका परिसरात वजन काट्याची व्यवस्था नसेल तर नगर विकास विभागाने याबाबत गांभीर्याने विचार केला पाहिजे. १४ व्या वित्त आयोगाचा निधी याच कामासाठी दिला होता. तो त्या कामासाठी वापरला नसेल तर त्या नगरपालिकांवर कोणती कठोर कारवाई करणार येणार आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या नगरपालिकेत वजन काटे नसतील त्या ठिकाणी त्यांनी उपलब्ध निधीतून पुढील तीन महिन्यात वजन काटे घ्यावेत अशा

प्रकारच्या सूचना डीएमए यांना देण्यात येतील. डीएमए हे त्यांच्या स्तरावरून सर्व नगरपरिषदांचा आढावा घेत असतात. तसेच १४ व्या वित्त आयोगाचा निधी देतांना वजन काटे व त्यासाठी लागणारे सर्व साहित्य घ्यावे अशी कडीशन १४ व्या वित्त आयोगाच्या नोटिफिकेशनमध्ये आहे.

३.१३७ १४ व्या वित्त आयोगाचा निधी नगरपालिकांना विभागाकडून ऑक्टोबर महिन्यात रिलिज केल्यावर या योजनेचा फिडबॅक आतापर्यंत विभागाने का घेतला नाही. मार्च अखेरपर्यंत त्यांनी किती निधी खर्च केला आहे, याची माहिती विभागाने का घेतली नाही. असे प्रश्न समितीने उपस्थित केले असता अनेक नगरपरिषदांमध्ये आता वजन काटे उपलब्ध झाले आहेत, या ३६ नगरपरिषदांपैकी ५ ठिकाणी वजन काटे उपलब्ध झाले असून ५० नगरपरिषदांची यादी विभागाकडून समितीस सादर करण्यात येणार आहे. त्यानुसार या नगरपालिकांमध्ये स्वच्छ भारत अभियान अंतर्गत अत्यंत चांगले काम सुरू आहे. ज्या ठिकाणी वजन काटे व इतर काही साहित्य वाहतुकीसाठी पाहिजे असेल, कोठे कॉम्पेक्टर पाहिजे असेल, असे सर्व साहित्य त्यांनी खरेदी केले आहे.

३.१३८ नगरपरिषदांनी १४ व्या वित्त आयोगाचा निधी घेतल्यानंतर ज्याची प्राथमिक आवश्यकता आहे, ज्यांचा अकाऊंटशी संबंध आहे, त्यांचे कॅल्क्युलेशन, वजन व पेमेंट यांचा डायरेक्ट संबंध असल्यामुळे यामध्ये भ्रष्टाचार होण्यास मोठा वाव आहे, हे वजन ठेकेदाराच्या काट्याने केले तर त्याचा काही अर्थ राहणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले व ज्या नगरपालिकेने वजन काटे खरेदी केले नसतील त्यांच्यावर कठोर कारवाई करावी व त्यांना यानंतर किंवा यापूर्वीचे जे पैसे निर्गमित करायचे आहे ते थांबविण्यात यावेत. त्यांना त्यांच्या निधीमधून हे साहित्य अगोदर घेऊ द्यावे व नंतर त्यांना तो निधी रिअर्ब्समेंट करण्यात यावा. तसेच याबाबत समितीकडे तीन महिन्यात सविस्तर अहवाल सादर करावा. असे निदेश समितीन दिले असता विभागीय सचिवांनी त्यास संमती दर्शविली परंतू विभागाकडून अद्याप पर्यत माहिती अप्राप्त आहे.

३.१३९ जिथे कचरा टाकण्यात येतो त्या जागेला डंम्पिग ग्राऊंड न म्हणता त्याठिकाणी घन कचरा व्यवस्थापन केंद्र सुरू केले आहे असे म्हणण्यात येते, याबाबत नगरपरिषदांमध्ये काय व्यवस्था आहे, मुंबई शहरात कोर्टाच्या आदेशानुसार ही सर्व कामे बंद आहेत, ही जबाबदारी फक्त महानगरपालिकेची नसून नगर विकास विभागाची देखील आहे. मुंबई शहरात या कारणामुळे विकासाची कामे थांबली असतील तर परिस्थिती गंभीर होईल याबाबत माहिती देताना विभागिय सिचिवांनी सांगितले की, सन २००१ पासून ज्याला लॅन्डफिल्ड साईट म्हणत होतो, त्या लॅन्डफिल्ड साईटवर डंम्पिंग करण्यात येत होते. ही वस्तुस्थिती आहे. मुंबई तसेच इतर अनेक शहरांची वस्तुस्थिती सारखीच आहे. मुंबईबाबत सांगायचे झाले तर मुंबईतील देवनार डंम्पिंग ग्राऊंडसाठी वेस्ट टू एनर्जीचे टेंडर काढण्यात आले आहे. वेस्ट एनर्जी बाबत देखील कल्पना आहे, साधारण १० लाख लोकसंख्या किंवा अधिक लोकसंख्येच्या समुहाकरिता तो लागू होतो. शासनाने असे पाच समूह म्हणजे क्लस्टर निश्चित केले आहे. त्यांची लोकसंख्या १० लाख किंवा त्यापेक्षा जास्त आहे. या ठिकाणी एक वर्षात वेस्ट टू एनर्जी प्रोजेक्ट करण्याचा शासनाचा मानस आहे. पुढील चार आठवड्यात हा विषय कॅबिनेटसमोर सादर करण्यात येणार आहे. छोट्या शहरांबाबत शासनाकडून असा विचार करण्यात आला आहे की, १ लाख ते २ लाख लोकसंख्या असणाऱ्या नगरपालिकांच्या संदर्भात त्यांनी कचऱ्याचे विलगीकरण करावे. ओला कचऱ्यातून त्यांनी कंम्पोस्ट खत तयार करावे. जो कचरा रिसायक्लेबल आहे त्यामध्ये कागद, काच, प्लॉस्टीक, मेटल यांना बाजारात किंमत आहे, या चार बाबी छोट्या नगरपरिषदांनी बाजारात विकाव्यात. छोट्या नगरपालिकांनी प्लॉस्टिकवर प्रक्रिया करण्याच्या भानगडीत पडू नये. अशा स्पष्ट सूचना छोट्या नगरपालिकांना दिल्या आहेत. त्यांनी ओल्या कचऱ्यापासून खत तयार करावे. शुद्ध ओल्या कचऱ्यातून खत तयार केले तर त्या खताला देखील चांगली मागणी आहे. आता मिक्स कचऱ्यातून खत तयार करण्यात येत असल्यामुळे त्या खताला मागणी नाही. आता या खतामध्ये काचा, प्लॉस्टिक असल्यामुळे मागणी नसते. जो कचरा रिसायक्लेबल आहे तो मार्केटमध्ये विकावा. जो निव्वळ इनर्ट कचरा राहतो तो डंम्पिंग किंवा लॅन्डफिल्ड साईटवर टाकण्यात यावा. ३ लाख लोकसंख्येपर्यंत ज्या नगरपालिका आहेत त्यांना अशा सूचना देण्यात आल्या आहेत. महानगरपालिका थोड्या जास्त सक्षम आहेत, जो सुका कचरा आहे त्यामधून ते आरडीएफ किंवा ब्रिकेट वगैरे अशा काही गोष्टी करू शकतात. महानगरपालिकांनी ओल्या कचऱ्यापासून खत तयार करावेत. सुक्या कचऱ्यातून ब्रिकेट वगैरे करू शकता. १० लाख लोकसंख्येच्या शहरांमध्ये वेस्ट टू एनर्जी करण्याची परवानगी दिली आहे.

३.१४० मुंबई शहराचा प्रश्न आणखी वर्षभर सुटणार नाही. कारण यासाठी अजून कॅबिनेटसमोर हा प्रस्ताव सादर करावयाचा आहे. या गतीने ही कामे होत असतील तर उच्च न्यायालयाने जी कन्स्ट्रक्शन थांबवून ठेवली आहेत, त्यामुळे ते प्रश्न एक वर्षभर आणखी सुटणार नाहीत. त्यांना रिझल्ट ओरिएंटेशन पाहिजे, उच्च न्यायालय सरकारची कोणतीही बाजू ऐकून घेण्यास तयार नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मुंबई महानगरपालिकेने देवनार साठी टेंडर काढले आहे. त्यांनी त्यांची टेंडर प्रक्रिया थांबविलेली नाही. ते टेंडर आता पब्लिक डोमेनमध्ये आहे. मुंबई व्यतिरिक्त जे पाच क्लस्टर आहेत, त्यासंदर्भातील पॉलिसी कॅबिनेटसमोर सादर करण्यात येणार आहे. विभागाने बऱ्याच वेस्ट एनर्जी प्लॅन्टचा अभ्यास केला आहे, त्यावेळी असे दिसून आले की, जो कंत्राटदार प्लॅन्ट चालवितो त्यांनी कचरा आणला तर त्याला चांगला कचरा मिळेल. देवनार येथील कंत्राटदाराला प्रोसेसिंगच्या अगोदर सर्व फी दिली होती. त्यामुळे कंत्राटदाराला प्रोसेसिंग इन्सेन्टीव्हवाईज झाले नाही. त्यांना सर्व टीपीन फी अगोदर दिली होती. शासनाच्या पॉलिसी अशी असणार आहे की, अफफ्रंन्ड टीफीन फी द्यावयाची नाही. जेवढी एनर्जी कन्व्हर्ट करेल त्या एनर्जीला त्यांची मिनिमम प्राईज आहे, तेवढा पुरक इन्सेंटीव्ह द्यावयाचा आहे. आपण कंत्राटदाराला कचऱ्याच्या स्टेजला पैसा देणार नाही. एनर्जी निर्माण झाल्यावर पैसा देण्यात येणार आहे. अशी ही शासनाची पॉलिसी आहे.

३.१४१ महालेखाकारांच्या असे निदर्शनास आले होते की, अगोदरच्या दरात स्टोअरेज, हॅन्डलिंग आणि ट्रान्सपोर्टटेशन ॲन्ड वेस्ट आहे, कंत्राटदार पर्सनल प्रोटेक्टीव्ह पेअर (PPP) तेथील मजुरांना कचरा सेग्रीकेट करताना व्यवस्थित स्टूल्स व ग्लोज देत नाहीत. त्यामुळे आता यामध्ये शासन म्हणून काय उपाययोजना करण्यात आली आहे. कंत्राटदारांकडून नियमांचे पालन होईल व मजुरांना त्याचा फायदा होईल, याबाबत काय करण्यात आले आहे. अशी विचारणा महालेखाकाराने समितीच्या माध्यमातून केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, हा मुद्दा महत्त्वाचा आहे, याबाबत शासन सहमत आहे, जे लोक वेस्ट हॅन्डल करतात जो काही पीपीपी आहे, पसर्नल प्रोटेक्टीव्ह पेअर तो त्यांना दिला पाहिजे. याबाबत शासनाने सूचना दिलेल्या आहेत, विभागाकडे दोन प्रकारच्या यंत्रणा आहेत, त्या यावर मॉनिटरिंग करीत आहेत. डीएमए हे सर्व नगरपालिकांचे डायरेक्टर आहेत. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत एक मिशन डायरेक्टोरेट प्राप्त झालेला आहे. वजन काट्याचा अहवाल येत्या तीन महिन्यात विभाग समितीला सादर करणार आहोत, त्याचप्रमाणे वेस्ट हॅन्डल करणाऱ्या लोकांसाठी पसर्नल प्रोटेक्टीव्ह इक्विपमेंट आहे यामध्ये मास्क, गमबुट हातमोजे इ. साहित्यांबाबत सविस्तर अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात येईल.

३.१४२ ज्या एनजीओ या फिल्डमध्ये काम करीत आहेत त्यांना काही मानधन देऊन मॉनिटरिंग व ऑब्झर्वेशन करण्याचे काम द्यावे. त्याचा फार मोठा उपयोग शासनाला होईल. आपल्या यंत्रणेमार्फत ही कामे केली तर त्यामध्ये पुन्हा हातमिळवणी, रिपोर्टींग व तेच लॉकबुक भरुन देतील, त्यामुळे ज्या प्रामाणिक एनजीओ या फिल्डमध्ये काम करीत आहेत त्यांना मानधन ठरवून ही कामे द्यावीत. Because it is a question related with human being. याचा फार काळजीने विचार केला तर यंत्रणा काम करणार आहे, जे रेप्युटेड एनजीओ आहेत. या फिल्डमध्ये काम करतात त्यांना मानधन ठरवून मॉनिटरिंग करण्याचे काम द्यावे. अशी सुचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी समितीच्या सुचनेची नोंद घेण्यात येईल व त्यानुसार ज्या सूचना द्यावयाच्या आहेत त्या देण्यात येतील. असे समितीस अश्वस्त केले.

३.१४३ We have raised some objections about the issues of cover vehicles for garbage transportation. The garbage is still transported in open vehicles and it is not covered in Muncipal Corporations. ही बाब महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी याबाबत खुलासा केला की, आता चार नगरपरिषदांमध्ये एमएसडब्ल्युची वाहतूक उघड्यावरून होते असे लक्षात आले आहे, आता या चारही नगरपरिषदांमध्ये आच्छादित वाहनातून वाहतूक केली जाते. जास्तीत जास्त नगरपरिषदांमध्ये आता बंद वाहनाने वाहतूक केली जात आहे. कॉम्पॅक्टर नसेल तरी वाहनांवर आच्छादन करून वाहतूक केली जाते.

३.१४४ या अनुषंगाने महालेखाकारानी विचारणा केली की, Hav you gave them grants from 14th Finance Commission for this vehicle यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, या ग्रॅन्ट दोन प्रकारे मिळतात स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पूर्ण डीपीआर केला तर डीपीआरच्या १५ टक्के ग्रॅन्ट केंद्र सरकार देते. २५ टक्के मॅचिंग ग्रॅन्ट राज्य शासन देते. ५० टक्के निधी चिन्हांकित केला आहे त्यामध्ये स्वच्छ भारत अभियानाशी निगडीत बाबींवर ते खर्च करू शकतात. याची प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. Therefore the concerned Municipal Council has to go to the Collector and convince the Collector about the gaps in present system of Garbage collection, transportation and segregation. Then they can use our 14th finance Commission amount on any of the gaps in the whole Solid Waste Management.

बंद पडलेले बायोगॅस प्रकल्प :

३.१४५ माहे मे, २००६ ते ऑगस्ट, २०१३ च्या दरम्यान २ कोटी २६ लाख किंमतीचे बायोगॅस प्रकल्प ३६ नगरपालिकांमध्ये प्रस्तावित करण्यात आले होते. या बायोगॅस प्रकल्पांची सद्य:स्थिती काय आहे. या रकमेत ३६ नगरपालिकांचे बायोगॅस प्रकल्प होतात काय ? कारण त्यांना टेक्नॉलॉजी इनोव्हेशन देत नाही. एकेकाळी विनोबा भावे यांनी जे केले होते तेच करीत आहोत. यामध्ये आज लोक फार पुढे गेले आहेत. जगात आपण करतो असे नसून अनेक देश ही कामे करीत आहेत. युरोपीयन देशात बायोगॅस प्रॉडक्ट सुरू आहेत, तेथील गाई म्हशीच्या गोबरचा उपयोग करून कार्यवाही केली जाते. २ कोटी २६ लाख रुपयांमध्ये ३६ नगरपालिकांचा बायोगॅस प्रकल्प कसा काय उभारण्यात आला आहे. अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, बायोगॅस प्रकल्पाची आजची स्थिती फारशी समाधान कारक नाही. आता सिस्टीम इम्प्रुमेंट करण्यासाठी असे केले आहे की, यामध्ये निरीसारख्या तज्ज्ञ संस्थेचे इन्क्लुजन होते, आता निरी या संस्थेला शासनाने इन्पॅन्ल केले आहे. जेथे प्रक्रियेच्या टेक्नॉलॉजीचा विषय आहे, तेथे ती टेक्नॉलॉजी निरीकडून व्हेट करून घेण्यात येत आहे. नगरपरिषदांकडे कोणी तरी येते व अमुक टेक्नॉलॉजी चांगली आहे, असे सांगते परंतु एखाद्या तज्ज्ञ संस्थेने ती व्हेट करून घेणे आवश्यक असते.

३.१४६ पनवेल, कुळगाव-बदलापूर, उरण, पंढरपूर व वाशिम या नगर परिषदांपैकी पनवेल नगरपरिषदेमध्ये २००८ पासून २०१४ पर्यंत बायोगॅस प्रकल्प सुरू होता. प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या गॅसचा वापर नागरिकांना स्वयंपाकाच्या वापरासाठी देण्याचा प्रयत्न होता. परंतु मागणी

नसल्यामुळे हा प्रकल्प सुरू होऊ शकला नाही. आता त्या प्रकल्पाची काय परिस्थती आहे. असे विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पनवेल भागातील दिवाबत्तीसाठी या प्रकल्पातील बायोगॅसचा वापर करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहेत. पनवेल येथील बायोगॅस प्लॅनमधून निर्माण होणार गॅस ते प्लेअर करीत आहेत, बायोगॅस वाया जाऊ नये याकरीता पथ दिव्यांसाठी तो वापरावा यासंदर्भातील प्रक्रिया ते तपासून पाहत आहेत.

३.१४७ पण पनवेल येथील बायोगॅस प्रकल्प सन २०१४ पासून बंद आहे. ही बाब महालेखाकारानी निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

३.१४८ कुळगांव बदलापूर नगरपालिकेत बायोगॅस वापरण्यासाठी टेंडरींग प्रोसेस सुरू आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले की, Biogas project was completed in July 2015. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, बायोगॅसपासून वीज निर्मिती करून ती वीज पथदिव्यांकरीता वापरण्याची कार्यवाही सुरू आहे.

३.१४९ जुलै, २०१५ मध्ये कुळगाव-बदलापूर येथील बायोगॅस प्रकल्प पूर्ण झालेला असून जनरेटरद्वारा स्ट्रीट लाईट करता बायोगॅस वापरण्याबाबत कार्यवाही सुरू आहे. सद्यस्थिती तेथील टेंडर प्रोसेसिंग कोणत्या स्टेजला आहे. अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांकडे सदर माहिती उपलब्ध नसल्यामुळे कुळगाव-बदलापूर बायोगॅस प्रकल्प संदर्भातील संपूर्ण अहवाल समितीला तीन महिन्यात सादर करण्यात येईल असे आश्वासित केले उरणमध्येही तसेच झालेले आहे. ठेकेदार लोअेस्ट बीड करून ॲग्रीमेंटप्रमाणे कामे करीत नाहीत, त्यामुळे कॉन्ट्रॅक्ट रद्द होत आहेत, प्रकल्पाची किंमत वाढत आहे. यामध्ये नेमक्या कोणत्या अडचणी आल्या ? काही कारणामुळे यापैकी काही शहरांमध्ये ग्रीमेंटही झालेले नाही. यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, सदर निविदा धारकांनी प्रतिसाद दिला नाही, म्हणून उरणमध्ये त्याप्रमाणे काही घडले नाही. या पाच शहरांमधील बायोगॅस प्रकल्पासंदर्भात शासनही समाधान व्यक्त करीत नाही. बायोगॅस प्रकल्पांकरिता शासनाचा काही प्रमाणात निधी खर्च होऊनही त्या माध्यमातून समाधानकारक अशा प्रकारची प्रगती झालेली नाही. सदर निविदाधारकांनी प्रतिसाद दिला नाही.

३.१५० तीन महिन्यांच्या आत या संदर्भातील माहिती अहवाल प्राप्त करून घेऊन समितीला सादर करण्यात येईल. असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले. पण या प्रकल्पास झालेली वर्षे पाहता यासंदर्भातील माहितीकरिता तीन महिन्यांचा कालावधी खूप जास्त होईल. विभागाने समितीला या संदर्भातील माहिती एका महिन्याच्या आत सादर करावी. असे निदेश समितीने दिले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवली. तथापि, सदर माहिती अद्याप पर्यंत समितीस प्राप्त झाली नाही.

३.१५१ वाशिम नगरपरिषदेंतर्गत कंत्राटदाराने दुर्लक्ष केल्यामुळे, प्रकल्पाचे काम पूर्ण होऊ शकले नव्हते आणि ऑक्टोबर,२०१४ पर्यंत प्रकल्पाची सुरुवात झाली नव्हती. याच कारणास्तव कंत्राट फेब्रुवारी, २०१३ मध्येच रद्द करण्यात आले होते. या शहरातील या प्रकल्पाचे ठेके रद्द केल्यानंतर आता या प्रकल्पाची काय स्थिती आहे ? हा प्रकल्प आता कोणत्या स्टेजला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पुन्हा या प्रकल्पाचे पुनरुज्जीविकरण केलेले नाही. हे प्रकल्प बंद आहेत. ठेके रद्द करण्यात आलेले आहेत.

३.१५२ बायोगॅसचे प्रकल्प बंद पडलेले आहेत. ठेके, करारनामे ठेकेदारांनी विहित मुदतीत कामे न आटोपल्यामुळे बंद पडलेले आहेत, यामुळे प्रकल्पाची किंमत वाढलेली आहे. या प्रकल्पांमध्ये शासनाचे काही पैसेही अडकलेले आहेत, जर प्रकल्प पूर्ण झाले नाहीत तर खर्च झालेले पैसे वाया जातील. त्यामुळे यासंदर्भात शासनाचा नेमका मानस काय आहे. यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती दिली की, या पाच शहरांमधील वेस्ट प्रोसेसिंग प्रोजेक्टच्या कामाबाबत डीएमए अहवाल प्राप्त करून घेऊन समितीला सादर करण्यात येईल. या प्रकल्पांमधून तयार झालेला बायोगॅस रिजुवेनाईट करून अन्य कोणत्यातरी वापराकरिता उपयुक्त कसा करता येईल, याची उपयुक्त माहिती घेण्यात येईल. याकरिता विभागाने " निरी " या संस्थेला अपॉईंट केलेले आहे. या संदर्भातील तांत्रिक माहिती देण्याकरिता शासनाने निरी या संस्थेसमवेत करारनामा केलेला आहे. कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक प्रश्नांबाबतची माहिती व उत्तरे निरी ही संस्था शासनाला देत असते.

३.१५३ पनवेल, कुळगाव-बदलापूर, उरण ही मुंबई नजीक असलेले भाग असून येथील वेस्ट प्रोसेसिंग प्रकल्प समितीला पहावयास आवडेल असा मानस समितीने व्यक्त केला असता विभागीय सचिवांनी सांगितले की, वेंगुर्ला येथील वेस्ट प्रोसेसिंग प्रोजेक्ट हा अतिशय चांगल्या पद्धतीने चालू असून, तेथेही पाहणीकरिता व माहिती घेण्याकरिता समितीने जरुर भेट दयावी.

३.१५४ टेंडर प्रक्रियेमध्ये ठेकेदार लोअेस्ट बीड करून विहित मुदतीत कामे न करता वॉकआऊट होतात किंवा बॅकअप होता,त्यांना दिलेल्या टेंडरिंग वॉर्डविषयी शासनाने कोणती भूमिका घेतलेली आहे ? निरीकडून आपल्याला तांत्रिक मार्गदर्शन मिळेल, असे आपण सांगत आहात. नगरपरिषदा टेंडरिंग प्रक्रिया करतात, त्यांचे ठेकेदार बिडिंग करतात, नंतर ते बॅकआऊट होतात. या प्रकाराबाबत शासनाने कोणती भूमिका स्वीकारलेली आहे ? The process of tendering and awarding contract for Biogas project will continue to be done by the Municipal Councils. There is a problem that many a times you don't get contractor for these projects. If you get contractor they will back-out in the middle of the process. They don't do the work. ही बाब महालेखाकरांनी समितीच्या निदर्शनास आणली.

येथे केवळ उदाहरणादाखल मॉडेल म्हणून पाच नगरपरिषदांमधील प्रोजेक्टची माहिती दिलेली आहे. यामध्ये उल्लेखिल्याप्रमाणे ३६ नगरपरिषदांमध्ये या प्रकल्पांची काय स्थिती आहे, यावर शासनाने निधी खर्च केलेला आहे का ? याकरिता शासनाने या नगरपरिषदांना निधी ॲलॉट केलेला आहे का? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नगरपरिषदांना शासनाने बायोगॅसकरिता वेगळे पैसे दिलेले नाहीत. नगरपरिषदांना शासनाने याबाबत अशा सूचना दिलेल्या आहेत की, जेवढे तंत्र अवघड तेवढे त्याची अंमलबजावणी करणे अवघड होते. त्यामुळे नगरपरिषदांना वेस्ट प्रोसेसिंगकरिता सिम्प्लेस्ट तंत्र वापरावे, जेणेकरून त्याची अंमलबजावणी क्लिष्ट होणार नाही. ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याचे कंपोस्ट करावे. सुका कचरा असेल तर त्याचे मटेरियल रिकव्हरी करून विकण्यात यावी, यासंदर्भात छोट्या छोट्या नगरपरिषदांना, नगरपालिकांना अधिकार देण्यात आलेले आहेत. पाणीपुरवठ्यासंदर्भातही आम्हाला हा प्रॉब्लेम आढळून आला होता. मॉडेल टेंडर काढून एमजेपीला पीएमसी केले.

३.१५५ ठेकेदार निविदा भरतात, कामे विहित कालावधीमध्ये पूर्ण करीत नाहीत. त्यामुळे करारनामे रद्द होतात. करारनामे रद्द झाल्यानंतर हे ठेकेदार मध्ये वॉकआऊट करतात. प्रकल्पाची किंमत वाढते. प्रकल्पामध्ये शासनाने पैसे खर्च केलेले असतात. ते पैसे प्रकल्प पूर्ण झाला नाही तर वाया जातात. यासंदर्भात शासनाचे ठोस धोरण असणे आवश्यक आहे. या संदर्भात ठोस मंजुरी घेणे आवश्यक आहे. हा विषय इतर नगरपालिकेसंदर्भातही जोडणे आवश्यक आहे. या संदर्भात इतर मोठमोठ्या तंत्रज्ञांचे मत व मार्गदर्शन घेऊन पुर्नविचार करणे आवश्यक आहे. अशी सुचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, या संदर्भात पाणीपुरवठ्याबाबत जी सिस्टम स्वीकारली, तीच सिस्टम आता या वेस्ट प्रोसेसिंगबाबत स्वीकारावी लागणार आहे.

३.१५६ कचरा व्यवस्थापनातून जी ऊर्जा निर्माण होते, त्यासंबंधीची कामे अपारंपारिक ऊर्जा उत्पादनाशी जोडणे आवश्यक आहे. या खात्याला माननीय मंत्री महोदय जे आहेत, तेही या संदर्भात उत्साही आहेत. निरी या संस्थेकडूनही याबाबत आवश्यक माहिती मागवून त्याप्रमाणे हा विषय अपारंपारिक ऊर्जा उत्पादनाशी जोडणे आवश्यक आहे. तसेच, या संदर्भातील अहवाल एका महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावा. तसेच असे निदेश समितीने विभागास दिले.

व्हर्मी/मेकॅनिकल कंपोस्टींगच्या प्रकल्पांचा कमी उपयोग :

३.१५७ निवड केलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी ६ नगर परिषदांमध्ये व्हर्मी / मेकॅनिकल कंपोस्टींगचा प्रकल्प राबविण्यात आले आहेत. नगरपरिषदांचे अत्यल्प उत्पन्न, देखभाल दुरुस्ती करिता निधी उपलब्ध न होणे, प्रक्रियेनंतर उपलब्ध होणाऱ्या खतास मागणी नसणे, यामुळे व्हर्मी मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्पांचे कार्यचलन करण्यास नगरपरिषदा असमर्थ असल्याचे दिसून येते. यातून निघालेले खत शुद्ध असतेच असे नाही. यामध्ये देखील मॉडेल म्हणून केवळ सहा नगरपरिषदांची माहिती पुरविलेली आहे, उर्वरित नगरपरिषद क्षेत्रातील प्रकल्पासंदर्भातील माहिती सादर आवश्यक आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी या बाबत अवगत केले की, चाळीसगाव, पंढरपूर, नंदुरबार या शहरांमध्ये या योजना सुरू आहेत. या शहरांमध्ये ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जाऊन ते व्यवस्थित कंपोस्ट होत आहे, तेथे उर्वरित बाबींचीही विल्हेवाट योग्य पद्धतीने लावली जात आहे. सावंतवाडी, फलटण, यवतमाळ येथे या संदर्भातील कचरा व्यवस्थापन व प्रक्रियेचे प्रकल्प सुरू नाहीत. याबाबत रहिवासी आक्षेप घेत आहेत. कचऱ्यावर प्रक्रिया करीत असताना रहिवासी आक्षेप घेतात कारण काही वेळा ओल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी व माशांचा उद्‌भव अशा प्रकारच्या समस्या निर्माण होतात. कचऱ्यावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे, कचरा डंप करता येणार नाही. हे जे काही निकष कचरा व्यवस्थापनासंदर्भातील आहेत, ते सर्व यवतमाळ या जिल्हयाला लागू आहेत. यवतमाळ जिल्हा अमृत शहर योजनेमध्ये अंतर्भूत आहे.

३.१५८ चाळीसगाव येथील एका ठेकेदाराला ७० लाख रुपये अतिरिक्त प्रदानन केले होते. त्याने विलिंग्ली करण्याचे २५ मेट्रिक टनचे काम दिले होते. ४० मेट्रिक टनच्या तुलनेत विलिग्निकरण केले होते, संपूर्ण एमएसडब्ल्यूचे विलिग्निकरण कंत्राटदार करू शकला नाही तर मोबदल्यातील वजावटीसंदर्भात कोणतीही तरतूद नव्हती. कंत्राटानुसार विलिग्निकरण करणे आवश्यक होते. कंत्राटानुसार विलिग्निकरण करावयाचे एमएसडब्ल्यूच्या तुलनेत विलिग्निकरण केलेल्या कंपोस्टींग करिता वापरलेल्या एमएसडब्ल्यू लक्षात घेता महानगरपालिकेने कंत्राटदाराला ७०.८ लाख रुपयांचे अतिरिक्त प्रदान केले होते. अंतिम बैठकीत सचिव, नगरविकास यांनी असे नमूद केले की, कंत्राटदाराला केलेले अतिरिक्त प्रदान वसूल करण्याची कारवाई करण्यात येईल.ल ती कारवाई केली का ? अशी विचारणा समितीने केली असता याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, एक्झिट कॉन्फरन्सनंतर महालेखाकारांनी महोदयांना याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. यवतमाळ नगरपालिकेलाही सूचना दिल्या गेल्या होत्या. याबाबत सर्व नगरपरिषदांनी लेखी अहवालही दिला होता. यामध्ये त्यांनी असे म्हटलेले आहे की, या संदर्भात कंत्राटदाराला अतिरिक्त रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे, असे म्हणता येणार नाही. यवतमाळ येथे कंत्राटदाराला अतिरिक्त रक्कम दिली असेल तर ती वसूल करण्यात यावी. नेमकी कंत्राटदाराला किती रक्कम अतिरिक्त देण्यात आली,याचीही चौकशी करून समितीला अहवाल सादर केला जाईल. या अहवालाचे सिनॉप्सिस माझ्याकडे असून याबाबतची सविस्तर माहिती मी समितीला नंतर सादर करीन. निविदा, करारनाम्यानुसार कंत्राटदाराला रकमेचे प्रदान केले, असे म्हणता येणार नाही.

३.१५९ सदंर्भात महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणले की, या प्रकल्पामध्ये प्रतिदिन ४०मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाईल, असा उल्लेख केलेला आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र या प्रकल्पांतर्गत प्रतिदिन केवळ २५ मेट्रिक टन कचऱ्यावरच प्रक्रिया केली जाते. करारनाम्याप्रमाणे प्रतिदिन रोज पंधरा टन कमी कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते. या संदर्भातील एमपीसीबीच्या कन्सेंट ऑर्डरमध्ये ४० मेट्रिक टन कचऱ्यावरील प्रक्रियेबाबत दिलेले आहे. It is not happening as per the Consent order यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, महोदय, या संदर्भात एमपीसीबीने प्रतिदिन ४० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यास परवानगी दिलेली आहे. परंतु ठेकेदाराने प्रतिदिन ४० मेट्रिक टन कचऱ्यावरच प्रक्रिया केली पाहिजे, असे करारनाम्यामध्ये उल्लेखिलेले नाही.

३.१६० करारनाम्यामध्ये असे दिलेले नाही परंतु कन्सेंट ऑर्डरमध्ये ४० मेट्रिक टन प्रतिदिन कचऱ्यावरील प्रक्रियेबाबत स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. असे महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, एमपीसीबीने प्रतिदिन ४० लाख मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यास परवानगी दिलेली आहे. सदरहू प्रकल्पाची क्षमता प्रतिदिन ४०मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया होऊ शकेल इतकी आहे. परंतु प्रत्यक्षात मात्र त्या ठिकाणी जर केवळ २०-२५ मेट्रिक टन कचरा गोळा होत असेल तर प्रतिदिन केवळ २०-२५ मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाईल. भविष्यकाळातील वाढत्या गरजेनुसार आधीच वाढीव कॅपॅसिटीचा कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. या प्रकल्पाची अपर कॅपॅसिटी ही ४० मेट्रिक टन कचऱ्यावरील प्रतिक्रिया प्रतिदिन अशा प्रकारची आहे. आता सध्याच्या परिस्थितीत प्रतिदिन जेवढा कचरा जनरेट होत आहे, तेवढयावरच रोजच्या रोज प्रक्रिया होत आहे. जेवढया कचऱ्यावर प्रक्रिया केली जात होती, तेवढेच पेमेंट रोजच्या रोज होत होते. या भागामध्ये प्रतिदिन केवळ २०-२५ मेट्रिक टन कचरा जनरेट होत होता, त्यामुळे प्रतिदिन या प्रकल्पांतर्गत जेवढया कचऱ्यावर प्रक्रिया केली जात होती, तेवढयाच प्रमाणात पेमेंटही दिले जात होते.

३.१६१ मासिक हिशोब १ ,२० हजार रुपये असे निश्चित केलेले आहे. या चार्जेसमध्ये २०-२५ मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने पेमेंट ठरलेले होते. या पेमेंटमध्ये ग्रॅज्युअली वाढही दाखविण्यात आलेली आहे. या संदर्भात प्रकल्पाच्या कॅपॅसिटीनुसार मंथली चार्जही ठरलेला आहे असे महालेखाकरांनी विदित केले.

३.१६२ कॉन्ट्रॅक्टमध्ये प्रकल्पाच्या अतिरिक्त क्षमतेबाबत व दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्याबाबत उल्लेख असणे आवश्यक होते. या संदर्भात संचालक नगर पालिका प्रशासन (डीएमए) यांचेकडून माहिती अहवाल प्राप्त करून समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

३.१६३ कचऱ्याच्या विल्हेवाटीबाबतच्या कॉन्ट्रॅक्टरला दिलेल्या पेमेंटबाबत माहिती समितीस सादर करावी असे निदेश दिले असता विभागीय सचिवांनी सदर माहिती सादर करण्यात येईल असे आश्वासित केले.

पर्यावरण अनुकूल पद्धतीने एमएसडब्ल्यूची विल्हेवाट :

३.१६४ लेखापरीक्षेला असे निदर्शनास आले की, सर्वच्या सर्व ३५ एमसीएस प्रक्रिया न केलेल्या एमएसडब्ल्यू केचे उपलब्ध असलेल्या लॅण्डफिल साईट्सवर किंवा परस्पर खड्डयांमध्ये किंवा रस्त्याच्या कडांना किंवा जलसाठ्याजवळ अनधिकृतपणे डंपींग करीत होत्या. यापैकी केवळ ८ एमसीएस कडे निर्देशित लॅण्डफिल क्षेत्रांमध्ये प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा उभारण्यासाठी वैध अधिकृतता होती. या संदर्भात एमपीसीबीलाही बोलावून त्यांच्याकडून यासंबंधीची माहिती घेऊन याबाबतचे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले पाहिजे. कत्तलखान्यासंदर्भातही एमपीसीबीला बोलाविले पाहिजे. नगरविकास विभागाचा यासंदर्भात केवळ नगरपालिकांकडून कचरा व्यवस्थापनाचे प्रकल्प राबवून घेण्यासंदर्भातच मर्यादित आहे. यामध्ये एमपीसीबीचाही पार्ट मोठा आहे.

३.१६५ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचा The consent given to many of the Municipal Councils have been lapsed from long time. It is difficult to know that how these Municipal Councils are dumping the waste without the consent orders of MPCB. कन्सर्न काही महानगरपालिकेचे लॅप्स झालेले आहेत. The consent orders are having a period of year. But these consent orders have not been renewed by the Municipal Councils. त्यांनी याकरिता अप्लाय केले होते, ते त्यांनी रिन्यू केले नाही. त्यांनी हे रिन्यू का केले नाही? याबाबतही चौकशी करणे आवश्यक आहे. एमपीसीबी ही विविध प्रकारे बिल व इतर बाबींच्या माध्यमातून सेस गोळा करीत असते. They are just collecting the money and investing in FD's. ही बाब महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत शासनाने या संदर्भातील कौन्सिल्संना बेंचमार्क्स दिलेले आहेत.

३.१६६ यासंदर्भात महाराष्ट्र प्रदूषण मंडळाचा देखील भाग असल्यामुळे त्याचे म्हणणे ऐकून घेणे आवश्यक आहे. असे मत समितीने व्यक्त केले व पुढील बैठकी करिता महाराष्ट्र नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींना साक्षी करिता बोलवावे असा निर्णय समितीने घेतला.

३.१६७ त्यानंतर संचालक, डीएमए यांनी नगरपालिका प्रशासन विभागाचे सादरीकरण करताना समितीस सांगितले की, जे मॉनिटेरिंग मेकॅनिझम आहे, त्यामध्ये जशी नगरपालिका प्रशासनाची परवानगी लॅप्स झाली आहे. Neither the MPCB nor the Councils following the rules. म्हणून कुठे तरी हे मॉनिटेरिंग करण्यामध्ये कमी पडत आहे. त्यामुळे मॉनिटेरिंग मेकॅनिझम बळकट करण्यासाठी आता आय.टी. विभागाचा फार मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने ई गव्हर्नन्सचे सर्व टेंडर्स होत आहेत. या संदर्भात जे बेंचमार्क आहेत. मग ते एमएसडब्ल्यूच्या संबंधी असेल किंवा सांडपाणी व्यवस्थापनासंबंधी असेल तर त्या बेंचमार्चला व्यवस्थितरित्या मॉनिटेरिंग करण्याची व्यवस्था उभारण्यात येत आहे. कोणत्याही नगरपालिकेची परमिशन लॅप्स झाली असेल तर विभागाला विचारावे लागते. ॲटोमॅटिकली काहीच कळत नाही. त्यामुळे आता ही प्रोसेस टोमेटेड करण्यात येणार आहे. त्यामुळे विभागतील कोणत्याही व्यक्तीला हे कळू शकेल की, हे लॅप्स झाले आहे. पण आता ते लॅप्स होण्यापूर्वी कळणार असल्यामुळे We will inform the concern Municipal Councils to get it renewed within time. याबद्दल एकदा पाठपुरावा सुरू झाला तर जे पॉईन्ट आता निघतात ते निघणे कमी होईल.ल जसा वजनकाट्याचा किंवा १४ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या वापराचा प्रश्न असो, त्याबद्दल नगरपालिकांनी हा निधी कोणकोणत्या कारणासाठी वापरला हे विभागाला विचारावे लागते. त्याबद्दल सुद्धा आता टोमेशन प्रोसेस करण्यात येत आहे. हे काम ३ किंवा ४ महिन्यात होईल किंवा कसे हे आता सांगता येणार नाही. कारण यामध्ये खूप मोठा अभ्यास आहे आज जरी ही प्रक्रिया सुरू केली तरी याला किमान दीड वर्ष ही प्रोसेस व्यवस्थित टोमॅटेड करण्यास लागेल. पण आता सुरुवात केली आहे. हे काम फेझवाईज करण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यामध्ये कोणत्या ५ बाबी असतील ते निश्चित केले जाईल आणि पुढच्या टप्प्यात काय असेल ते निश्चित केले जाईल. जेथे महसूल आणि पर्यावरणाचा प्रश्न असेल तेथे प्राधान्य देण्यात येणार आहे.

३.१६८ या संदर्भात समितीने विभागास सूचना केली की, आता सॅटेलाईट आणि जीपीएस यंत्रणेद्वारे प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये मॉनिटेरिंग कंट्रोल यंत्रणा उभारावी. त्या जिल्ह्यातील प्रत्येक नगरपालिकेच्या कचऱ्याची विल्हेवाट कोणत्या डंम्पिग ग्राऊंडवर किंवा त्या स्पॉटवर सॅग्रीगेशनची काय परिस्थिती आहे हे जिल्हा परिषद, नगरपंचायत किंवा नगरपरिषद यांच्या ठिकाणी वेगळे युनिट स्थापन करून मॉनिटेरिंग करू शकता येईल.ल असे केले तर तेथील सी.सी.टी.व्ही.च्या माध्यमातून तेथे सध्या काय सुरू आहे हे येथे बसून बघता येईल. जिल्हाधिकारी कार्यालयात कंट्रोल करून हे खालच्या लोकांवर भितीचा अंकूश असला पाहिजे की, आपल्यावर कोणी तरी वॉच ठेवतो आहे.यांची जाणीव त्यांना झाली पाहिजे. समितीच्या या सुचनेशी विभागाने सहमती दर्शविली व समितीस विधीत केले की, विभागाचा सुद्धा असाच प्लॅन आहे. each and everything shall be centrally monitored.

३.१६९ यासंदर्भात विभागाने एक मॉडेल तयार करून तो उपक्रम ५-६ जिल्ह्यांमध्ये राबवावा आणि त्याचे जर रिझल्ट ओरिएन्टेड आले तर या कामी विभागाला केंद्र सरकार कधीच निधी कमी पडू देणार नाही. त्यामुळे यासंबंधी फक्त मॉडेल तयार करावे. त्यासाठी खर्च सुद्धा जास्त येणार नाही. अगदी शुल्लक खर्च त्या कामी येणार आहे. अशी देखील सुचना समितीने केली.

३.१७० सध्या कोणत्या प्रकल्पावर विभागाचे काम चालू आहे अशी विचारणा समितीने केली असता संचालक, डीएमए यांनी सांगितले की, नगरपरिषदांच्या ज्या सेवा आहेत त्यांच्यासाठी पूर्णतः सेंट्रलाईज ॲटोमेशनचा प्रोजेक्ट हाती घेतला आहे. त्या संदर्भातील एच.पी.सी.ची मान्यता पुढील एक दोन दिवसात मिळून त्या कामास सुरुवात होईल. Each an every service whichever is delivered across the state shall be uniformed and it will be centrally monitor. त्यामध्ये नगरपालिकेच्या कामकाजाचे सुद्धा सेंट्रली मॉनिटरींग होईल. त्यामध्ये कोणते पत्र आले, कोठे गेले किंवा कोणती फाईल कोठे आली आणि कोठे गेली हे सुद्धा मॉनिटरींग होईल. या प्रकल्पाची माहिती एच.पी.सी.समोर जायची आहे, ते येत्या २-५ दिवसात जाऊन त्याचे काम सुरू होईल.लदुसरा मुद्दा असा आहे की, जी.आय.एस. बेस प्रॉपर्टी मॅपिंग सर्व्हेचा आहे. त्या बाबतीत देखील कार्यवाही करीत असून पुढील आठवड्यात त्यासंबंधी टेंडर निघेल. We are expecting that work will start from first week of January. हा मोठा प्रकल्प असून त्यामुळे नगरपालिकांचे उत्पन्न वाढविण्यास मदत होईल. ई गव्हर्नन्समध्ये जे पाणीपट्टीचे टॅक्सेशन आहे त्याचे सेंट्रलाईज मॉनिटेरिंग करण्यात येईल. तसेच रिव्हीजन आणि रेट रिव्हीजनच्या बाबतीत सुद्धा आम्ही मेकॅनिझम निश्चित करणार आहोत. कारण बऱ्याच नगरपालिकांमध्ये आजचे मालमत्ता कराचे रिव्हीजन होत नाही. दर ४ वर्षानंतर ते रिव्हीजन झाले पाहिजे. पाणीपट्टी कर हा विषय अगदी शुल्लक आहे. It is not very practical. ते सुद्धा येथून सेंट्रलाईज करण्यात येणार आहे.

३.१७१ काही महापालिकेमध्ये प्रशासन अधिकाऱ्यांनी लोकप्रतिनिधींकडून दरवर्षी ८ टक्क्यांनी मंजूर करून घेतले आहे. तशा पद्धतीने आपण काही तरी मेकॅनिझम करावे. अशी सुचना समितीने केली असता तशा पद्धतीने काम करण्यात येत आहे असे विभागाकडून सांगण्यात आले.

३.१७२ It is very high in Mumbai Corporation. सध्या लोक या निर्णयास चालेन्ज करीत आहेत. पण तसे मेकॅनिझम करणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे प्रत्येक वेळा महापालिकेच्या बॉडीकडे जाण्याची गरज पडणार नाही. काही वेळेस निवडणुकीचे वर्ष असल्यामुळे महापालिकेची बॉडी म्हणते की, जरा थांबा. पुढील वेळेस रिसेशन पिरीएड आहे म्हणून थांबावे, अशी कारणे पुढे येतात. पण हे

मेकॅनिझम केल्यामुळे असे काही करता येणार नाही. ही बाब समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिली असता संचालक, डीएमए यांनी सांगितले की, We will establish a mechanism at the level of the Director, Municipal Administration. यामुळे महापालिकेची बॉडी निवडणुकीची कारणे सांगून विषय पुढे ढकलण्याचा प्रयत्न करेल असे काही करता येणार नाही. त्यासाठी प्रयत्नशील आहोत. आता ही प्लॅनिंगची स्टेज आहे आणि त्यानंतर इम्प्लिमेंटेशन सुद्धा सुरू होईल.ल We will try and make everything very very systematic and transparent.

३.१७३ समितीच्या पुढील बैठकीत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना देखील बोलावून त्यांची या संदर्भात काय जबाबदारी आहे हे समजून घेण्यात येईल. ते नुसते कलेक्शन सेंटर आहेत. It is revenue side of the Government. पण त्यांची तेवढ्यापुरतीच जबाबदारी असता कामा नये. त्यांची जबाबदारी या प्रकल्पामधील ज्या इम्प्लीमेंटींग थॉरिटीज आहेत त्यांना कशी मदत करता येईल हे पाहिले पाहिजे. मॉनिटेरिंगमध्ये त्यांचा काय हिस्सा असेल ते सुद्धा यामध्ये इन्व्हॉल्व्ह केले पाहिजे. त्यामुळे महालेखाकाराचे म्हणणे ते बरोबर आहे की, त्याशिवाय हे योग्य पद्धतीने होणार नाही. तसेच वेस्ट टू एनर्जीमध्ये आपण नॉन-कन्व्हेंशनल एनर्जी विभागाच्या लोकांची मदत घ्यावी. ते निरीपर्यंत करायचे म्हटले तर फार लांब होईल आणि त्या निरीच्या अधिकाऱ्यांचे गावचे लोक ऐकून घेणार नाहीत. एक तर भाषेचा मोठा प्रश्न निर्माण होईल. निरीमध्ये स्थानिक लोकांचा सहभाग फार नसतो. त्यांची बॉडी राष्ट्रीय स्तरावर असते. त्यामुळे त्यांना स्थानिक पातळीवर काम करताना अडचण निर्माण होईल. त्यामुळे हे काम लोकल नॉन-कन्व्हेंशनल एनर्जी विभागाच्या मदतीने हे काम करावे.असे मत समितीने व्यक्त केले.

पर्यावरण अनुकूल पद्धतीने MSW ची विल्हेवाट न लावणे :

३.१७४ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संदर्भात जो मुद्दा प्रलंबित होता त्यासंदर्भात पर्यावरण अनुकूल पद्धतीने MSW ची विल्हेवाट न लावणे या अंतर्गत नगरपालिकांनी MSW ची विल्हेवाट लावायची आहे. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून किती नगरपालिकांचे नुतनीकरण झाले? किती नगरपालिका प्रलंबित आहेत? किती नगरपालिकांनी अर्ज केले आहेत? याबाबत समितीने विचारणा केली असता पर्यावरण विभागाच्या प्रतिनिधींनी खुलासा केला की, या अनुषंगाने ३६ नगरपरिषदांची यादी तयार करण्यात आली आहे. यातील ४ नगरपरिषदांकडे संमती पत्रे आहेत, संमतीपत्रासाठी अर्ज केलेल्या नगरपरिषदांची संख्या ६ आहे. २६ नगरपरिषदांनी अद्याप संमती पत्र मिळावे यासाठी अर्ज केलेले नाहीत. यासंदर्भातील सूचना वॉटर ॲक्ट व एआर ॲक्टनुसार, तसेच MSW नुसार २८ नगरपरिषदांवर कारवाई करण्यात येईल अशा सूचना दिल्या आहेत. ३६ पैकी २९ नगरपरिषदांमध्ये कचऱ्याचे सेग्रीगेशन व मॅकेनिकल कंपोस्टींगचे काम होत नाही अशी परिस्थिती आहे.

३.१७५ एखाद्या कारखान्याकडून प्रदूषण होते असे निदर्शनास आले तर प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदर कारखान्याला नोटीस देऊन तो बंद केला जातो, नगरपरिषदांच्या विरोधात कारवाई करण्याची तरतूद नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या पद्धतीने राज्यात आता कारवाई करण्यात आली आहे, पूर्वी आयसोलेटेड पद्धतीने कारवाई करण्यात येत होती. आता वॉटर ॲक्ट, MSW ॲक्ट, पर्यावरण प्रोटेक्शन क्टच्या कलम १५ नुसार कारवाई करण्यात येते. राज्यातील ३६ नगरपरिषदांवर फौजदारी गुन्हा दाखल केलेला आहे. या संदर्भातील न्यायालयीन प्रकरणे सुरू असतात व संबंधित नगरपालिकांना वित्तीय पुरवठा होत नाही म्हणून ही कार्यवाही तातडीने होत नाही. याबाबत केंद्र शासनाच्या नगर विकास विभागाचे १३०० पानांचे सविस्तर मॅन्युअल आहे, कोणत्या प्रकारे कार्यवाही करावी, त्यासंदर्भातील कार्यपद्धती त्यात नमूद केली आहे. या नगरपरिषदांना निधी उपलब्ध व्हावा म्हणून प्रत्येक नगरपरिषदेने २५ टक्के निधी सांडपाणी व्यवस्थापन व कचऱ्याची विल्हेवाट लावणे यासाठी राखून ठेवावा अशा सूचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिल्या आहेत. २६ महानगरपालिकेच्या सर्वसाधारण मंडळाने (जनरल बॉडी) स्थायी समितीमध्ये ठराव मंजूर करून तशा प्रकारची तरतूद त्यांच्या अर्थसंकल्पामध्ये केली आहे. राज्यात छोट्या-मोठ्या नागरी स्थानिक संस्था व कन्टॉन्मेट क्षेत्र पकडून २६२ संस्था आहेत. या सर्वांना वैधानिक दिशा (स्टॅटयूटरी डायरेक्शन्स) दिल्या आहेत. पहिल्या टप्प्यात घनकचरा (सॉलिड वेस्ट) मध्ये ८६ टक्के नगरपालिका येतात. ए,बी,सी क्लास मधील १४ टक्के नगरपालिका व नगरपंचायती आहेत. या सर्व महानगरपालिकांना निधी उपलब्ध करून द्यायचा आहे. त्यांच्यावर नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येत आहे, लोणावळा व परभणी या नगरपरिषदांवर फौजदारी कारवाई करण्यात आली आहे. ही प्रक्रिया सतत सुरू आहे, प्रक्रिया करण्यासाठी दोन दोन वर्षाचा कालावधी लागतो, परंतु नगरपालिकांनी गुणवत्तापूर्ण हस्तक्षेप (क्वॉलिटी इंटरव्हेशन) केला पाहिजे. त्यामुळे एमपीसीबीने पुढाकार घेऊन सुरुवातीला कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात यावे अशा सूचना दिलेल्या आहेत. त्यामुळे सर्वसाधारण मंडळाने (जनरल बॉडी) या कामासाठी निधी उपलब्ध करून देण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

३.१७६ यासंदर्भात समितीने सूचित केले की, २५ टक्के निधी या कामांसाठी आरक्षित ठेवावा, त्यानंतर नगरपरिषदांनी काय करावे याबाबत विभागाने सूचना दिल्या आहेत. यासंदर्भातील अंमलबजावणी मुख्याधिकारी यांच्याकडून करून घेण्याची जबाबदारी शासनाची आहे. शासनाचा प्रतिनिधी म्हणून मुख्याधिकारी आहे, मुख्याधिकारी ऐकत नसेल तर नगरपालिकांचा प्रमुख जिल्हाधिकारी आहे, जिल्हाधिकाऱ्यांना सांगून मुख्याधिकारी यांची बैठक घेऊन त्यांनी कामे केली नाही तर त्यांच्या विरोधात कारवाई करावी. असे केले तरच याबाबत अंमलबजावणी होईल. नगरपालिकांच्या

सर्वसाधारण मंडळांना (जनरल बॉडी) या कामात स्वारस्य नसते, त्यांना नाले, गटारे, सिमेंट रस्ते बांधण्यात स्वारस्य असतो. गाव स्वच्छ आहे किंवा नाही याबाबत त्यांना काही देणेघेणे नाही. उद्योगाने प्रदूषण नियंत्रण मंडळाचे नियम पाळले नाही तर त्यांच्यावर तातडीने कारवाई करण्यात येते. जिल्हाधिकारी यांना सांगून व मुख्याधिकारी यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कारवाई करण्याची भूमिका प्रदूषण नियंत्रण मंडळाला घ्यावी लागेल. विभागाने फक्त पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केल्यावर विभागाचे काम संपत नाही.

३.१७७ शासन निर्णयाची किंवा प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या सूचनांचे नगरपालिकांकडून अंमलबजावणी होत नाही. यासंदर्भात समितीने विचारणा केली की, ही अंमलबजावणी करून घेण्यासाठी मंडळांने काय उपाययोजना केल्या आहेत. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, यामध्ये सकारात्मक हस्तक्षेपाचा (पॉझीटीव्ह इंटरव्हेशन) मुद्दा आहे. विभागाकडून कारवाई करण्यात येते. ईपीएच्या नियम १५ नुसार त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येतो. ३६ पैकी चार नगरपालिकांवर फौजदारी खटला दाखल करण्यात आलेला आहे.

३.१७८ समितीने विचारणा केली की, १० नगरपरिषदांकडे अर्ज प्रलंबित आहेत, इतर नगरपालिकांनी संमतीपत्रासाठी अर्ज केलेला नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळाने उद्योगाला ना-हरकत प्रमाणपत्र दिले व त्या उद्योगाने ती कार्यवाही वेळेत केली नाही तर २ वर्षे ५ वर्षे त्यासाठी वाट पाहण्यात येते काय ? सर्व सामान्य माणसांच्या आरोग्याशी निगडीत हा विषय आहे, यामध्ये विभागाकडून दुर्लक्ष का केले जाते? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, त्या नगरपरिषदांचा प्रतिसाद पहाण्यात येतो. ज्या नगरपालिकांनी एकदाही अर्ज केले नाही, संमती पत्र घेतले नाही, त्या नगरपालिकांवर कारवाई करण्यात येते यासंदर्भात कार्यशाळा घेऊन व त्यांना टेक्नॉलॉजीची माहिती देऊन महानगरपालिका व नगरपालिकांच्या प्रशासनाचे सहकार्य घेऊन हे काम करणे शक्य आहे. प्रदूषणाच्या संदर्भात महानगरपालिका व नगरपालिकांमध्ये नियामक मंडळ आहे, अंमलबजावणीचे अधिकार प्रदूषण नियंत्रण मंडळाला नाहीत. नियामक मंडळाला प्रदूषण नियंत्रण मंडळ तांत्रिक मार्गदर्शन करू शकते. याबाबतच्या जागरुकतेसाठी काही पैसा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उपलब्ध करून देणे शक्य आहे.

३.१७९ ज्या नगरपालिकांनी कोणताही अर्ज केला नाही त्यांच्यावर १५ दिवसात गुन्हा दाखल केला पाहिजे असे समितीला अपेक्षित आहे. तसेच नगरविकास विभागाच्या सचिवांना प्रदूषण नियंत्रण मंडळाने कळविले आहे काय की, त्याच्या अखत्यारितील नगरपालिका अशा वागतात, त्या प्रतिसाद देत नाहीत, मुख्याधिकारी प्रतिसाद देत नाहीत. नगर विकास विभागाने या विषयाबाबत काय कार्यवाही केली आहे ? नगर विकास विभागाला प्रदूषण नियंत्रण मंडळाने केंव्हा कळविले आहे? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की नगर विकास विभाग, जिल्हाधिकारी यांनी संबंधित मुख्याधिकारी यांना कळविले आहे. या विशिष्ट प्रकरणी कळविले नाही. संपूर्ण सॉलिड वेस्ट अंमलबजावणीच्या संदर्भात उच्च न्यायालय आणि महाराष्ट्र जल प्राधिसनाच्या खंडपीठासोमर एक प्रकरण सुरू आहे. या विशिष्ट विषयाबाबत नगरपालिकांच्या मुख्याधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कळविण्यात आले नाही. कळवायला पाहिजे होते. याबाबत आठ दिवसात कारवाई करण्यात येईल.

ज्या नगरपालिकांनी व त्यांचे मुख्याधिकारी यांनी कारवाई केली नाही, याबाबत प्रदूषण नियंत्रण मंडळाने नगरविकास विभागाच्या सचिवांना कळविले आहे काय ? आतापर्यंत कळविले नाही, आता किती दिवसात कळविण्यात येणार आहे. अशी विचारणा करून प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त केली.

३.१८० मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प ३७ हजार कोटी रुपयांचा आहे. पैसा असून कामे होतात काय? निधी उपलब्ध करून देऊन कामे झाली असती तर नगरपालिकांना दिलेल्या निधीबाबत आता काय परिस्थिती आहे याची विचारणा केली तर काय होईल. सेग्रीगेशन आणि निधीचा काय संबंध आहे? सेग्रीगेशन करण्यासाठी किती रुपये लागतात? अधिकाऱ्यांची मानसिकता काम करण्याची नाही. कारखान्यातून रोडवर पाणी आले तरी दुसऱ्या दिवशी प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी त्यांच्याकडे जातात. कारखाना बंद करण्याची नोटीस देतात. मंडळाने आरटीआय कार्यकर्ते पाळले आहेत. त्यांना सर्व गोष्टी कळतात, ते तेथे जातात, अधिकारी सांगतात की, आरटीआय कार्यकर्ते आमच्या मागे लागले आहेत, मग तो आरटीआय कार्यकर्ता कसा शांत होतो?ो सर्व कारभार कसा व्यवस्थित चालतो. त्यानंतर काहीही केले तरी कोणताही प्रश्न निर्माण होत नाही. कारखानदाराने लाच दिली नाही तर त्या कारखान्याचे लायसन्स ३,६ किंवा १२ महिने सस्पेंड केले जाते.

३.१८१ महानगरपालिका व नगरपालिकेचे सर्वसाधारण मंडळ कोणतीच कामे करीत नाही. ३६ नगरपालिकांपैकी फक्त ७ नगरपालिकांनी लायसन्सचे नुतनीकरण करून घेतले आहे, २९ नगरपालिका काहीच करायला तयार नाहीत. सदस्य सचिव नगरपालिकांचे समुपदेश करणार आहे. असे मत व्यक्त करून समितीने सूचित केले की, २९ नगरपालिकांच्या विरोधात केव्हा गुन्हा दाखल करण्यात येणार याची माहिती समितीला देण्यात यावी. नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्यावर गुन्हा दाखल करावा, त्यांनी कारवाई केली नाही, तर जिल्हाधिकारी यांना सूचना देऊन कार्यवाही करावी, जिल्हाधिकारी यांनी कारवाई केली नाही तर त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी. याबाबत किती दिवसात फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. दाखल केलेल्या गुन्ह्यांची माहिती समितीला केव्हा देण्यात येईल ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, द्वसन २०१६ मध्ये यासंदर्भात कायदा संमत करण्यात आला आहे. यासंदर्भातील जबाबदारी स्थानिक सस्थांची असून सर्वस्वी जबाबदारी नगर विकास विभागाच्या सचिवांची आहे. ज्या ठिकाणी महानगरपालिका नाही तेथे जिल्हाधिकारी कायद्यानुसार समन्वय करतात. सर्वस्वी जबाबदारी स्थानिक संस्थांची आहे, जी स्थानिक संस्था कार्यवाही करणार नाही त्यांच्यावर १५ दिवसात कारवाई करावयाची आहे. याप्रकरणी संबंधित स्थानिक संस्था वर कारवाई करण्यात येईल.

३.१८२ यावर समितीने सूचविले की, यासदंर्भात प्रदूषण नियंत्रण मंडळाला प्रशासकीय अधिकार आहेत, त्यानुसार मुख्याधिकारी व संबंधित लोकल बॉडीवर कारवाई करण्यात यावी. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींवर दबाव येऊ शकतो, मागील काळात कोणती स्थानिक संस्था होती याचा विचार करून कारवाई करण्यात येईल.

३.१८३ ३६ नगरपालिकासंदर्भात हे प्रकरण आहे, राज्यात एकूण २६२ स्थानिक संस्था आहेत त्यापैकी किती नगरपालिकांचे नुतनीकरण झाले, किती नगरपालिकांनी अर्ज केले, किती नगरपालिकांनी अर्ज केले नाहीत. यासंदर्भातील एकूण किती संख्या आहे? आता २३८ नगरपालिकांकडे सर्व प्रकारच्या परवानग्या आहेत काय ? त्यांनी नुतनीकरणासाठी अर्ज केले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, २६२ नगरपालिकांपैकी २३८ नगरपालिकांनी कोणती ना कोणती परवानगी घेतली आहे. २६२ पैकी २४ नगरपालिकांनी कधीही अर्ज केलेले नाहीत. या २४ नगरपालिकांवर कारवाई करण्यात येईल. ४५ नगरपालिकांनी नुतनीकरण करून घेतले आहे. ३३ नगरपालिकांनी अर्ज केले आहेत.

३.१८४ यासंदर्भात उर्वरित नगरपालिकांवर कारवाई करण्यात यावी. उर्वरित सर्व मुख्याधिकारी यांच्यावर कारवाई करण्यासाठी नगर विकास विभागाच्या सचिवांना पत्र पाठविण्यात यावे लोकलेखा समितीच्या सूचनांनुसार ही कार्यवाही करण्यात आली असे पत्रात नमूद करावे. मुख्याधिकारी व नगरपरिषदेच्या सर्वसाधारण मंडळाला जबाबदार धरण्यात यावे. सदस्य सचिव यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला कळविण्यात यावी. असे समितीने सूचित केले. (याबाबतची माहिती अप्राप्त आहे).

३.१८५ मुंबई महानगरपालिकेकडे ३७ हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प आहे, अद्यापही तेथील सेग्रीगेशन होत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या ठिकाणी निधीचा प्रश्न नाही, तर या विषयी जनजागृती करणे, तसेच समाजामध्ये या विषयी माहिती असावी, तसेच सोर्सच्या ठिकाणीच त्यावर नियंत्रण आणावे यासाठी मोहिम राबविण्यात येते. यासाठी महानगरपालिकेला प्रदूषण नियंत्रण मंडळ निधी देत नाही, तर आयईसी ॲक्टीव्हीटीसाठी मदत करणे शक्य आहे. प्रबोधन करणे हे एक माध्यम आहे, कायद्यानुसार नगरपरिषदांवर कारवाई करण्यात येईल.

कत्तलखान्याचे अवैध कार्यचालन :

३.१८६ यासंदर्भात राज्यात महानगरपालिका व नगरपालिका क्षेत्रात एकूण किती कत्तलखाने आहेत, किती कत्तलखान्यांना प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता आहे ? मान्यता घेण्यासाठी किती लोकांनी अर्ज केलेले नाहीत. किती कत्तलखान्यांच्या मालकांवर प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारवाई केली आहे. किती कत्तलखान्यांना प्रदूषण नियंत्रण मंडळाने परवानगी दिली आहे. ज्या कत्तलखान्यांनी अर्ज केले नाहीत त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मागील एक वर्षाअगोदरच्या महानगरपालिका व नगरपालिकांच्या हद्दीत असलेल्या कत्तलखान्यांचे सर्व्हेक्षण केला आहे. कत्तलखाना चालविण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने नियमावली तयार केलेली आहे. ज्या कत्तलखान्यात १० पेक्षा जास्त जनावरांची कत्तल होते त्यांना प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियंत्रणाखाली आणण्यात आले आहे. १० पेक्षा कमी जनावरांची कत्तल ज्या कत्तलखान्यात होते त्यांचे नियंत्रण नगरपालिकांकडे देण्यात आले आहे. राज्यात एकूण ३६ कत्तलखाने कार्यरत आहेत, ७८ कारखान्यांनी नियमावली पाळली नाही म्हणून काही कारखाने नगरपालिकांनी स्वतःहून बंद केले व काही कारखाने प्रदूषण नियंत्रण मंडळाने बंद केले आहेत. नवीन १९ कत्तलखाने मंजूर करण्यात आले आहेत. १० पेक्षा कमी जनावरांची कत्तल होते असे ४७ कत्तलखाने नगरपालिका क्षेत्रात आहेत. मागील एक वर्षात ७८ कत्तलखाने बंद करण्यात आले आहेत. ईटीपी व इतर नियमांचे पालन न केल्यामुळे ते कत्तलखाने बंद करण्यात आले आहेत.

३.१८७ विभागाच्या स्पष्टीकरणात नमूद केले आहे की, ७ नगरपरिषदांचे कत्तलखाने अवैध आहेत, ३६ नगरपालिकांपैकी ७ नगरपरिषदांमधील कत्तलखाने अवैध आहे. असे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ही राज्याची परिस्थिती आहे. ३६ नगरपरिषदांपैकी कार्यरत असलेल्या कत्तलखान्यांची संख्या ७ आहे. १९ कत्तलखाने नगरपरिषदांनी बंद केले आहेत. ३६ पैकी ९ नगरपरिषदा कार्यक्षेत्रात कत्तलखाने नाहीत.

३.१८८ ३६ पैकी ७ नगरपरिषदांकडील कत्तलखाने अवैध आहेत, त्यांच्यावर कारवाई करण्यात आली नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली व समितीला विभाग किती गांभीर्याने घेत आहेत हा एक प्रश्न आहे, असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ७ नगरपालिकांच्या कत्तलखान्यांना परवानगी घेण्यात आली आहे. ३६ पैकी १९ अवैध कत्तलखाने बंद करण्यात आले आहेत.

३.१८९ तथापि, समितीने विभागीय प्रतिनिधींच्या निदर्शनास आणून दिले की, विभागाकडून जे स्पष्टीकरण आले त्यामध्ये असे नमूद केले आहे की, ६ नगरपरिषदांचे कत्तलखाने वैध आहेत, ८ नगरपरिषदांनी कत्तलखान्याचे वैधता प्रमाणपत्र नुतनीकरण करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्रस्ताव सादर केला आहे. उर्वरित ७ नगरपरिषदांचे कत्तलखाने अवैध आहेत. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की,

एकूण १९ कत्तलखाने बंद करण्यात आले आहेत, ७ कत्तलखाने कार्यरत आहेत, त्यापैकी ६ कत्तलखाने वैध असतील व एक अवैध असेल तर त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात येईल. जे कत्तलखाने अवैध आहेत त्यांच्यावर यापूर्वीच कारवाई केलेली आहे.

३.१९० सदर विषय नगरविकास विभागाशी संबंधित असल्याने या साक्षीच्या बैठकीला नगर विकास विभागाचे सचिव उपस्थित नसतील तर काहीही अर्थ राहत नाही, असे मत समितीने व्यक्त केले.

३.१९१ ३६ नगरपरिषदांपैकी २१ नगरपरिषदांमध्ये कत्तलखाने आहेत, असे विभागाच्या स्पष्टीकरणामध्ये नमूद केलेले आहे. ३६ नगरपरिषदांचा आढावा घेण्यात येत आहे. काही नगरपरिषदांमध्ये कत्तलखाने नसतील. २१ नगरपरिषदांपैकी ७ नगरपरिषदांमध्ये असलेले कत्तलखाने वैध आहेत, असे नगरविकास विभागाचे म्हणणे आहे. ३६ नगरपरिषदामधील कत्तलखान्यांची काय परिस्थिती आहे याबाबत समितीने माहिती विचारली असता, विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आरओच्या रिपोर्ट प्रमाणे आज ३६ नगरपरिषदांपैकी ७ नगरपरिषदांमध्ये कत्तलखाने कार्यरत आहेत. १९ कत्तलखाने बंद केलेले आहेत आणि ९ नगरपरिषदांमध्ये कत्तलखानेच नाहीत. जे कत्तलखाने कार्यरत आहेत ते कत्तलखाने वैध आहेत.

३.१९२ काही कत्तलखाने बंद केलले आहेत. ते कत्तलखाने का बंद आहेत? ते केव्हा सुरू करण्यात येणार आहेत? गावांमध्ये अनेक समस्या आहेत. ते लोक रस्त्यावर विक्री करतात. पूर्वी जे उद्योग कत्तलखान्यात होत होते ते आता अनधिकृत जागेवर सुरू आहेत. तो व्यवसाय बंद झालेला नाही, खाणे-पिणे बंद झालेले नाही. म्हणून नगर विकास विभागाचे प्रधान सचिव आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी या दोघांनीही साक्षीसाठी उपस्थित असणे आवश्यक आहे.

३.१९३ महानगरपालिकेने कत्तलखान्यात कर्मचारीवर्ग नियुक्त केला असेल किंवा कंत्राटांवर कर्मचारी वर्गाची नियुक्ती केली असेल, मशिनरी लाँच केली असेल, त्यासाठी जागा डिमार्क करून तेथे कन्स्ट्रक्शन केले असेल. १९ कत्तलखाने बंद आहेत, हे बरोबर आहे. असे मत व्यक्त करून समितीने विचारणा केली की, ते कारखाने बंद झालेले आहेत, की विभागाने ते बंद केलेले आहेत ? ते कारखाने बंद करण्याचे कारण काय आहे ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ते कारखाने विभागाने बंद कलेले आहेत.बेसिकली यासाठी एफ्लुएंट ट्रिटमेंट प्लँट (ETP) असला पाहिजे आणि मोठा प्लँट असेल तर रेंडरिंग प्लँट किंवा इंटिग्रेट प्लँट असला पाहिजे. नॉर्मली नगरपालिकांनी एफ्लुएंट बाहेर पाठविणे अभिप्रेत नाही. जे प्लँट प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमावलीमध्ये बसत नाहीत ते बंद केलेले आहेत. जोपर्यंत नगरपालिका अशा प्रकारची व्यवस्था करीत नाहीत तोपर्यंत प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नगरपालिकांना व्हॉलेंटरी क्लोजर देण्यात येते. त्यामुळे नगरपालिकाक्षेत्रातील लोक स्वतः कत्तलखाना बंद करतात.

३.१९४ कत्तलखाने बंद झाल्यामुळे रस्त्यावर मांस विक्री करण्यात येते. आजही रस्त्यावर सर्रास विक्री सुरू आहे. कत्तलखाने चालविण्यासाठी आवश्यक असणाऱ्या लायसन्सची विगतवारी बघितली तर ते कत्तलखाने सरकारला सुद्धा चालविणे शक्य होईल, एवढ्या एमपीसीबीच्या अटी कडक नाहीत असे मत व्यक्त करून ते कत्तलखाने सुरू करण्यासाठी संबंधित नगरपालिका काही कार्यवाही करीत आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ईदसाठी तात्पुरती परवानगी घेतली जाते. त्याच प्रमाणे जे लोक न्यायालयामध्ये जाऊन परवानगी मागतात त्यांना परवानगी देण्यात येते. ETP करण्यासाठी त्यांना तांत्रिक सल्ला देखील देणे शक्य आहे. ETP करणे खूप सोपे काम आहे. कारण यामध्ये डिग्रेडेबल, केमिकल्स नाहीत, असे असून सुद्धा ते ETP न करता रस्त्यावर सोडतात म्हणून ते बंद करण्यात येते.

३.१९५ प्रदूषण नियंत्रण मडळांने कत्तलखाने बंद केलेले असले तरी त्या गावांमध्ये हा सर्व व्यवसाय सुरू आहे. परंतु, विभागामार्फत त्यांच्यावर कारवाई केली जात नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, या संदर्भात विशिष्ट तक्रार आली तर संबंधितांविरुद्ध फौजदारी स्वरुपाची कारवाई करणे शक्य आहे. यासाठी जास्त पाणी किंवा वीज लागत नाही. त्यामुळे कारवाई म्हणून त्यांची पाणी जोडणी किंवा वीज तोडली तरी त्यांना काही फरक पडत नाही. कत्तलखाना मोठा असेल तर पाणी आणि वीज तोडण्यात येते. विभागाने भिवंडी येथे वीज तोडली होती. परंतु, कत्तलखाने रात्री जनरेटरचा वापर करून पुन्हा चालू केले होते. त्यानंतर पुन्हा त्यांच्यावर कारवाई केलेली आहे. याबाबत तक्रार आली तर संबंधितांवर कारवाई करणे शक्य आहे.

३.१९६ नगर विकास विभागाच्या सचिवांनी बैठकीस उपस्थित असणे आवश्यक आहे. कारण, हे सर्व व्यवस्थित सुरू झाले पाहिजे. कोणत्याही शहरात रस्त्यावर विक्री सुरू असल्याचे दिसते. असे मत समितीने व्यक्त केले.

MSNA अंतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी :

३.१९७ या परिच्छेदाबाबत, विभागाने रिफॉर्मचे काम न करता ऑग्मेंटेशनचे काम सुरू केलेले आहे. कारण, सर्व नगरपरिषदांमध्ये रिफॉर्मचे काम झालेले नाही. रिफॉर्म केल्यानंतर ऑग्मेंटेशनचे काम हाती घ्यावयास पाहिजे, अशी विभागाची मूळ भूमिका आहे. विभागाने रिफॉर्म निश्चित केले. परंतु, अनेक नगरपरिषदांनी रिफॉर्मचे काम केलेले नाही. विभागाने या योजनेंतर्गत काम सुरू केलेले आहे. या संदर्भात समितीने विभागीय सचिवांना माहिती देण्यास सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सन २००८-०९ मध्ये महाराष्ट्र सुजल निर्मल योजना सुरू करण्यात

आली होती. मुख्यतः हा विभाग ग्रामीण पाणी पुरवठ्याबद्दल कार्यवाही करीत असतो. परंतु, त्यावर्षी नगरपालिका क्षेत्रात विशेषतः " क " वर्ग नगरपालिका क्षेत्रात पाणी पुरवठ्याच्या साधनांमध्ये UIDSSMT किंवा JNNURM मधून ग्रॅन्ट मिळत नव्हती. त्यावेळी ही योजना हाती घेण्यात आली होती. विभागाने मार्च, २०१५ मध्ये ही योजना बंद केलेली आहे. त्यावेळी एकूण २५८ योजना मंजूर करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये सुधारणांची कामे आणि भांडवली कामे असे दोन भाग होते. विभागाकडे याबाबतची आकडेवारी आहे. २५८ योजनांमध्ये जवळपास ८० टक्के सुधारणांची कामे होती आणि असे अपेक्षित होते की, सुधारणांची कामे केल्यानंतर त्या अनुषंगाने जे भांडवली कामाचे प्रोजेक्ट तयार होतील त्यांचा वेगवेगळ्या योजनांमध्ये समावेश करता येईल. यामध्ये एवढ्या प्रमाणावर भांडवली कामांसाठी काही स्किम नव्हती. समितीचे म्हणणे आहे की, सुधारणांची कामे करण्यापूर्वी सुद्धा काही कामे झाली होती. याबाबत विभागीय सचिवांनी स्पष्टीकरण केले की, सुधारणांची कामे केल्यानंतर बऱ्याच ठिकाणी भागभांडवलाची कामे झालेली आहेत. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे फक्त सुजलची योजना होती. परंतु, बऱ्याच नगरपालिकांमध्ये त्यापूर्वी नगरोत्थानमध्ये काही कामे झालेली होती. त्यामुळे तशा प्रकारे पाईप लाईनचे काम झालेले आहे किंवा नंतर UIDSSMT किंवा JNNURM मधून काही कामे झालेली आहेत. त्यावर विभागाचे नियंत्रण नव्हते. परंतु, कोठेही सुधारणांची कामे वाया गेलेली नाहीत. मनमाड येथील कामाच्या संदर्भात विशिष्ट प्रश्न होता. मनमाडमध्ये १६ किलो मीटर पाईप लाईनचे काम सुधारणा कामाच्या अगोदर झालले आहे. त्यामुळे सुधारणा कामांचा उपयोग झालेला नाही, असा प्रश्न होता. नंतर त्याची तपासणी केली असता तेथे ८६ किलो मिटरची पाईप लाईन होती. परंतु, त्यापैकी राहिलेले ७६ आणि १६ असे सर्व मिळून हायड्रोलिक मॉडेलिंग केले आणि नंतर ते भांडवली काम नगरोत्थानमध्ये घेतले गेले. त्यामध्ये नगरपालिकांना फायदा झालेला आहे. ती ७० एलपीसीडीची स्किम त्याच सुधारणा कामामुळे किंवा हायड्रोलिक मॉडेलिंगमुळे १३५ एलपीसीडीची करता आली. विभागाकडून ४-५ प्रकारची सुधारणांची कामे करण्यात येत होती. बऱ्याच ठिकाणी पूर्वी काम झाले असले तरी फक्त कन्झ्युमर सर्वे करण्यात आला. त्यामुळे अवैध कनेक्शन्स किती आहेत हे कळले. ते नियमित करणे किंवा बंद करणे, एनर्जी ऑडिट किंवा वॉटर ऑडिट अशा प्रकारची कामे आहेत.

३.१९८ हिंगणघाट येथील कामाची परिस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सीडीओच्या प्रतिनिधींनी तपासणी केलेली आहे. पुरामुळे फ्लँक वाहून गेलेले आहे. विभागाने त्यांच्याकडे तांत्रिक डिझाईनची मागणी केलेली आहे. सीडीओच्या प्रतिनिधींना पाहणी केली. परंतु, किती पैसे भरावयाचे आहात हे अद्याप कळविलेले नाही. हिंगणघाट नगरपरिषद त्यांचे जे दर आहेत ते भरण्यास तयार आहे. तेथे संरक्षक भिंत बांधावयाची आहे.

३.१९९ सर्वप्रथम सीडीओ यांनी सूचविले होते की, तेथे संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सीडीओ यांनी फक्त गाईड वॉल बांधावी असे सुचविले होते. तेथे गाईड वॉल बांधण्यात आलेली आहे. जे आऊट प्लँकिंग झाले किंवा जे पाणी वाहून गेले त्यानंतर जे आहे ते रिटेनिंग वॉल बद्दल आहे. द्वतेथे रिटेनिंग वॉल नव्हती आणि ओरिजनल प्लॅनमध्ये सुद्धा नव्हती. सुरुवातीला डिझाईन प्रमाणे काम झालेले आहे त्याबाबतचे फोटोग्राफ्स आहेत. तसीडीओ यांनी बंधारा प्रस्तावित केला होता. बंधारा हा नेहमी गाईडिंग वॉलसह असतो. त्याप्रमाणे काम झालेले आहे. त्यावर्षी अति पावसामुळे त्याच्याही पलीकडे म्हणजे २०-२५ किलो मीटर साईडने पाणी वाहून गेलेले आहे. त्यामुळे नंतर असा मुद्दा उपस्थित करण्यात आला की, तेथे रिटेनिंग वॉल आवश्यक होती. रिटेनिंग वॉल ओरिजनल प्लॅनमध्ये किंवा सीडीओ यांच्या डिझाईनमध्ये सुद्धा प्रस्तावित केलेली नव्हती. आता दुरुस्ती करावयाची असेल तर त्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे.

३.२०० त्या ठिकाणी संरक्षक भिंत बांधणे आवश्यक आहे असे कोणी सुचविले ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्या ठिकाणी इंजिनिअर्स जाऊन आलेले आहेत. त्यांचे असे म्हणणे आहे की, तो बंधारा २० किलो मीटर वाढवावा लागेल आणि तेथे संरक्षक भिंत बांधावी लागेल.

३.२०१ महालेखापरीक्षकांचा आक्षेप आहे की, " मध्यवर्ती " संकल्पचित्र संस्था, नाशिक (सीडीओ) यांनी केटी वेअरचे संकल्पचित्र तयार केले होते आणि केटी वेअरच्या शिरावर नदीच्या बंधाऱ्याला बळकटी आणण्यासाठी पुरेशा दगडाच्या तुकड्याचा थर असलेली संरक्षक भिंत बांधण्याचे सुचविले होते." दगड लावून संरक्षक भिंत मजबूत करावी असे सीडीओ यांनी सुचविले होते. ते काम झालेले आहे. मग महालेखापरीक्षकांनी हा मुद्दा का काढला विभागाच्या मते, सीडीओ यांच्या डिझाईन प्रमाणे काम केले आणि महालेखापरीक्षकांचे म्हणणे आहे की, सीडीओ यांच्या डिझाईन प्रमाणे काम झालेले नाही. यासंदर्भातील फाईलमध्ये नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी दिनांक ३०.१.२०१३ रोजी दिलेली नोट आहे. त्यामध्ये नमूद केलेले आहे की, "यामुळे नदीच्या पात्रात पाणी साठा राहू शकत नाही. त्यामुळे सदर निर्माण झालेली गॅप बंद करणे आवश्यक आहे. याकरिता दोन्ही बाजूला गाईड वॉल बांधून फिलिंग व पिचिंग करणे आवश्यक आहे. याविषयी दिनांक २४ जानेवारी, २०१३ रोजीच्या सहाव्या सभेत चर्चा करण्यात आली असून सदरचे काम नगरोत्थान योजनेत समाविष्ट करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे." तसेच सन २००८ मध्ये याचा डिझाईनमध्ये समावेश होता काय आणि जे बांधकाम केले ते वाहून गेलेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, मातीची थड वाहून गेल्यानंतर हा निर्णय घेण्यात आलेला आहे. याबाबतचे फोटोग्राफ्स आहेत. ते समितीला दाखविण्यात आले.

३.२०२ विभागाने ज्ञापनात नमूद केलेले आहे की, " अंदाजपत्रकाला तांत्रिक मान्यता दिली होती ज्यात संरक्षक भिंतीचा समावेश नव्हता." तांत्रिक मंजुरीमध्ये संरक्षक भिंतीचा समावेश होता काय ? विभागीय प्रतिनिधीकडे या संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध आहेत काय ? गाईड वॉलच्या बाजूला दगडाचे पिचिंग करावयास पाहिजे होते. परंतु, ते केलेले नाही. असे मत समितीने व्यक्त केले.

३.२०३ गाईड वॉल बांधलेली नाही असे महालेखापरीक्षकांचे म्हणणे आहे. अंदाजपत्रकामध्ये गाईड वॉलचा समावेश नव्हता असे विभागाचे म्हणणे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, गाईड वॉल रिइन्टॅक्ट आहे. अंदाजपत्रकामध्ये गाईड वॉलचा समावेश होता. परंतु, संरक्षक भिंतीचा समावेश नव्हता. संरक्षक भिंत बांधण्यात यावी असे सुचविण्यात आले होते आणि त्याचा अंदाजपत्रकात समावेश केलेला नाही, असे महालेखापालांचा आक्षेप असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जे ओरिजनल केटी वेअरचे डिझाईन होते त्यामध्ये संरक्षक भिंतीचा समावेश नव्हता.

३.२०४ महालेखापरीक्षकांचे आक्षेपानुसार त्यामध्ये संरक्षक भिंतीचा समावेश होता. परंतु, तांत्रिक मान्यतेमध्ये ती घेतलेली नाही. डिझाईनमध्ये संरक्षक भिंतीचा समावेश नव्हता तर मग विभागाकडून संरक्षक भिंतीचे काम कसे करण्यात येणार.रपुरामुळे नदीच्या एका बाजूची मातीची थड वाहून गेल्यामुळे आता संरक्षक भिंतीची आवश्यकता वाटते आहे. त्याच वेळी संरक्षक भिंत बांधण्याबाबत सुचविण्यात आले होते, असे महालेखाकारांचा आक्षेप आहे. परंतु, तसा उल्लेख रेकॉर्डवर कोठेही दिसत नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जे डिझाईन दिलेले आहे त्याप्रमाणे काम झालेले आहे.

३.२०५ संरक्षक भिंत बांधण्यात यावी असे सुचविण्यात आले होते. परंतु, ती बांधण्यात आली नाही, ती तांत्रिक मान्यतेमध्ये घेतली गेलेली नाही, या महालेखापालांच्या मुद्दयाबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, केटी वेअरचे जे अंदाजपत्रक असते त्यामध्ये गाईड वॉलचा अंतर्भाव केलेला असतो. एकूण ४ कोटी ३४ लाख रुपयांचे हे काम आहे.

३.२०६ समितीने असे मत व्यक्त केले की, याबाबत सीडीओकडे विचारणा करण्यात यावी की, ॲज पर स्पेसिफीकेशन काम झालेले आहे काय ? यावर विभागीय सचिवांनी सांगितले की, जे काम झालेले आहे ते डिझाईन प्रमाणे झालेले आहे.

३.२०७ महालेखापरीक्षकांनी परिच्छेदामध्ये असे नमूद केलेले आहे की, "मध्यवर्ती संकल्पचित्र संस्था नाशिक (सीडीओ) यांनी केटी वेअरचे संकल्पचित्र तयार केले होते (एप्रिल, २००८) आणि केटी वेअरच्या शिरावर नदीच्या बंधाऱ्याला बळकटी आणण्यासाठी पुरेशा दगडाच्या तुकड्याचा थर असलेली संरक्षक भिंत बांधण्याचे सुचविले होते. परंतु, सीडीओ यांनी सुचविल्याप्रमाणे संरक्षक भिंत बांधण्याची बाब विचारात न घेता हिंगणघाट नगरपरिषदेने कामाचे अंदाजपत्रक तयार केले." केटी वेअर, गाईड वॉल बांधण्यात आली परंतु, महालेखाकारांच्या आक्षेपानुसार सीडीओ यांनी हे सुद्धा दगडाची संरक्षक भिंत बांधण्याचे सुचविले होते. याबाबत महालेखापरीक्षकांनी शेरा दिलेला आहे. त्यामुळे महालेखापरीक्षकांनी समितीला माहिती देण्याबाबत समितीने सूचविले असता महालेखापालांनी सांगितले की, गाईड वॉल बांधावयास पाहिजे होती.

३.२०८ यावर समितीने सूचित केले की, येथे गाईड वॉलचा मुद्दाच नाही. संरक्षक भिंत आणि गाईड वॉल वेगळी आहे. याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, हे काम पूर्ण करणे खूप महत्वाचे आहे. त्यांचा सल्ला घेऊन डिझाईन घेऊन हे काम पूर्ण करण्यात येईल.

३.२०९ विभागाने पीएमसी नियुक्त केली होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींना सांगितले की, महाराष्ट्र जलप्राधिकरण फक्त अंदाजपत्रक तयार करण्यापुरते होती. त्यानंतर नगरपालिकेने पीएमसी नियुक्त केली होती.

३.२१० हिंगणघाट येथील रिफॉर्मबद्दल माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, हिंगणघाट येथील रिफॉर्मचा प्रकल्प मंजूर करण्यात आला होता परंतु ते काम होऊ न शकल्यामुळे १४ लाख रुपये निधी शासनास परत करण्यात येणार आहे.

३.२११ नगरपरिषदेकडून दोन बाबींसंबंधी मागविण्यात आलेला माहितीचा अहवाल प्राप्त झाला आहे. तथापि, विभागाने स्पष्टीकरणामध्ये अहवाल प्राप्त झाला नाही, असे नमूद केले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, दोन बाबींच्या संदर्भात अहवाल मागविण्यात आला होता. सीडीओ यांनी सदरहू कामाचा पाहणी केलेली असून अद्याप अहवाल सादर केला नाही.

३.२१२ स्टॅबिलिटी तपासून अहवाल सादर करण्यात आला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सीडीओ यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी पाहणी केली असून ते नगरपालिकेस अहवाल सादर करतील व त्यांच्याकडून तो पाणीपुरवठा व स्वच्छता विभागास सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील कामाची डिझाईन तयार करावयाची आहे. सदरहू कामासंबंधी अद्याप अभिप्राय सादर करण्यात आला नाही.

३.२१३ सीडीओ यांनी संरक्षक भिंत बांधण्यासंदर्भात सूचविले होते, या महालेखाकार यांच्या लेखापरिच्छेदासंदर्भात सीडीओ यांना समितीसमोर साक्षीसाठी बोलविले पाहिजे.असे मत व्यक्त करून समितीने महालेखाकार यांच्याकडे विचारणा केली की, on what basis they have raised this objection?

३.२१४ यासंदर्भात गाईड वॉल व संरक्षक भिंत ही दोन्ही कामे एकच आहेत असे महालेखाकार समजत असतील त्यामुळे गल्लत होत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता महालेखाकार यांनी सांगितले की, हमारी एग्जामिन में हमने यह पाया था कि सीडीओ ने गाईड वॉल का रिक्वॉयरमेंट किया था और इनके टेक्निकल सँक्शन में गाईड वॉल इन्क्लूड नहीं था. यह ऑब्जरवेशन है, जिसके बेस पर हमने कहा कि जो प्लॉटींग हुआ है, वह गाईड वॉल न बनाने के कारण हुआ है इसके बारे में जो रिपोर्ट बनायी है उसकी काफी महालेखाकार को दि जाए.

३.२१५ यावर समितीने असे मत व्यक्त केले की, गाईड वॉल अलग मुद्दा है और संरक्षण दीवार का अलग मुद्दा है. ये दोनों अलग अलग चीजें हैं. साईड की जो दीवार होती है उसको मजबूत करना, सेफ्टी वॉल के बारे में सीडीओ ने रेकमेंड की थी. महालेखापालजीने यह कहा कि एस्टीमेट बनाते समय नगरपालिका ने उसको कंसिडर नहीं किया है. इस कारण से समस्या निर्माण हो सकती है, यह महालेखापालजी का ऑब्जेक्शन है.

३.२१६ प्रोटेक्शन वॉल व गाईड वॉल एकच आहेत, असा महालेखाकारांचा समज झाला आहे. त्यांच्या अंदाजपत्रकामध्ये दोन्ही वॉल नसल्याने महालेखाकारांनी आक्षेप घेतला. महालेखाकारांचा आक्षेप बरोबर आहे. गाईड वॉलच्या वरील बाजूस बंधाऱ्याला बळकटी आणण्यासाठी दगडाच्या तुकड्याचा थर असलेली संरक्षक भिंत बांधणे आवश्यक होते, महालेखाकारांचे म्हणणे स्पष्ट आहे, त्यांनी गाईड वॉलला संरक्षक भिंत समजले. परंतु दगडाचा थर असलेली संरक्षक भिंत बांधावी, ही बाब कशाच्या आधारे नमूद करण्यात आली आहे ? गाईड वॉल दगडाची असू शकत नाही. महालेखाकारांच्या लेखा आक्षेपामध्ये पुढे नमूद करण्यात आले आहे की, " संरक्षक भिंत बांधण्याबाबतची सीडीओ यांची सूचना नजरेआड केल्यामुळे जवळपास ७.२० कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च करावा लागला. दगडाची संरक्षक भिंत असावी, असे सीडीओ यांनी सूचविले होते का ? ड्रॉईंगमध्ये तसे नमूद करण्यात आले नाही. सीडीओ यांचा अहवाल महालेखाकार यांचेकडे आहे. असे नमूद करून समितीने असे मत व्यक्त केले की, सीडीओ यांच्या अहवालातील १७० क्रमांकाच्या मुद्यामध्ये नमूद करण्यात आले आहे की, "On both banks of the Weir, on U.S. and D.S. side, guide walls are proposed tentatively. The length shall be finalised at field level depending on the site condition. These guide walls will guide the flow of water in the river portion. The guide wall shall retain the embankement river banks behind that. The guide walls are not designed for any surcharge. Care shall be taken not to develop any surcharge on that side of guide wall. Guide walls are proposed on weather drop-type, foundation for guide wall is proposed. Guide walls are proposed to be constructed in plinth cement concrete of grade N-१५ with १५% as per CDO norms." महालेखाकारांनी गाईड वॉलचा उल्लेख केला आहे, संरक्षक भिंतीचा उल्लेख कोठेच केला नाही. यावर महालेखाकार यांनी सांगितले की, Primarily guide wall shall retain the embankement. अगर एम्बाकमेंट को रिटेन करेगा तो फ्लडींग होने का रिस्क नहीं था, फ्लड होने की जरुरत नहीं होती. यह महालेखापालजी का कन्क्लूजन था.

३.२१७ याबाबत विभागाच्या अधिकाऱ्यांचे मत समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, गाईड वॉल तयार केली आहे, ती डिझाईनमध्ये दर्शविण्यात आली आहे. गाईड वॉल जिथे संपते त्याच्या २० मीटर पुढून पाणी गेले आहे.तो किनारा २० मीटर भागात गेला आहे. धरणामुळे संरक्षण भिंतीची आवश्यकता पडते.

३.२१८ दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या साक्षीमध्ये विभागीय प्रतीनिधींनी सांगितले होते की, " साईड वॉलचे काम करण्यात आलेले असून त्याचे फोटो व ब्लाईंड दाखविण्यात आलेले आहे." या संदर्भात साईड वॉलचे काम पूर्ण केले आहे काय ? साईड, गाईड व प्रोटेक्शन या तिन्ही वॉल वेगवेगळ्या आहेतत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, साईड वालचे काम पूर्ण केले आहे तसेच साईड, गाईड व प्रोटेक्शन या तीनही भिंती वेगवेगळ्या आहेत.

३.२१९ दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या साक्षीच्या वेळी त्यावेळचे समिती प्रमुख यांनी सांगितले होते की, " पुराचे पाणी आले तर केलेले काम वाहून जाईल, त्यामुळे संरक्षण भिंत करावयास पाहिजे होती, त्याचा उल्लेख डिझाईनमध्ये करणे आवश्यक होते. विभागाचे डिझाईन फॉल्टी आहे. त्यामुळे फॉल्टी डिझाईन तयार करणाऱ्यांवर विभागाकडून कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पुढील कालावधीत काळजी घेण्यात येईल. तसेच, " सदरहू प्रकरणी नगरपालिकेच्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करून तीन महिन्यांच्या आत इस्टॅबिलिटी सर्टिफिकेटचे पैसे भरुन त्याची माहिती समितीला सादर करावी." असे निर्देश समितीने दिले होते त्यानुसार कोणती कारवाई केली ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू कारवाई नगर विकास विभागाच्या सचिवांनी करावयाची आहे, असे म्हटले होते.

३.२२० तीन महिन्यांच्या आत इस्टॅबिलिटी सर्टिफिकेटचे पैसे भरण्याची कार्यवाही नगर विकास विभागाची आहे.

३.२२१ इस्टॅबिलिटी सर्टिफिकेटचे पैसे भरुन त्याची माहिती समितीला सादर करावी, असे समितीने निर्देश दिले होते. या संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, नगरपरिषदेमार्फत सदरहू रक्कम भरण्यात येणार होती. सदरहू साक्षीनंतर सीडीओ यांनी दिनांक २० डिसेंबर, २०१६ रोजी

कामाची पाहणी केली. त्यावेळी त्यांनी इस्टॅबिलिटी चेकिंगसाठी काही बोअरवेल घेण्यास सांगितले आहे. त्यानंतर ते आपला अहवाल सादर करतील. नगरपरिषदेकडून अद्याप पैसे भरण्यात आले नाही. पंरतु सीडीओ यांनी पाहणी केली आहे व त्यावेळी स्थानिक लोकप्रतिनिधींनी चर्चा झाली आहे.

३.२२२ फॉल्टी डिझाईन संदर्भात केलेल्या कारवाई संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, सीडीओ हे पाटबंधारे (जलसंपदा) खात्याच्या अख्त्यारित येत नाहीत. द्वयावर समितीने असे मत व्यक्त केले की, सीडीओ यांचा अहवाल प्राप्त झाल्या शिवाय सदरहू प्रकरणी अतिंम निर्णय घेता येणार नाही.

३.२२३ महालेखाकार यांनी काढलेल्या लेखा परिच्छेदामध्ये म्हटले आहे की, अक्कलकोट एमसी मधील पाणी पुरवठ्याच्या १३,००३ rmt चे ४.६८ कोटी रुपये प्रदान केले असून त्यामध्ये १७७४४ rmt साठी ६३.७९ लाख रुपये अतिरिक्त प्रदान केलेले आहेत. एकूण किती मिटरचे पैसे देण्यात आले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सदरहू कामासाठी देण्यात आलेल्या पाईपचा वापर १०० टक्के झाला आहे. अगोदर ११ हजार काही मिटरचे पैसे वापरण्यात आले त्यावेळी कन्सट्रक्शन सुरू होते. त्यानंतर १२, ८५० इतक्या लांबीचे पाईप अंथरण्यात आले व ५२८ मीटर पाईप शिल्लक राहिला. सदरहू पाईप सोलापूर येथील " घोसे " योजनेसाठी ट्रान्स्फर एन्ट्री करून वापरण्यात आला असून आता एक मीटरही पाईप शिल्लक नाही.

३.२२४ अशा प्रकारे एका ठिकाणच्या कामाचा शिल्लक पाईपचा वापर करता येऊ शकतो काा ? सदरहू पाईपचे पैसे संबंधित नगरपालिकेने ट्रान्स्फर केले आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, एका ठिकाणीच्या कामाचा शिल्लक पाईपचा वापर करता येतो, सदरहू पैसे त्यांच्याकडून ट्रान्स्फर करण्यात येतील.

३.२२५ एमसीएस अंतर्गत फलटण येथील कामाच्या स्थितीबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की , सदरहू काम ९० टक्के पूर्ण झाले असून ते सन २०१७ मध्ये पूर्ण होईल.

३.२२६ एमसीएस अंतर्गत उस्मानाबाद येथीलललकाम पूर्ण झाले आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले असता, विभागाने स्पष्टीकरणामध्ये ६० टक्के काम पूर्ण झाले असून ४० टक्के काम शिल्लक आहे, असे नमूद केले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उस्मानाबाद येथील महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडून ग्राहक सर्वेक्षण, हायड्रोलिक मॉडेलिंग व जीआयएस मॅपिंगचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. सदरहू कामे ७५ टक्के करण्यात आली होती ती आता १०० टक्के पूर्ण करण्यात आली आहेत.

३.२२७ यावर समितीने विचारणा केली की, उर्वरित कामांपैकी ४० टक्के काम पूर्ण झालेल्या कामांची परिस्थिती काय आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सुधारणा कामांसाठी नगरपरिषदेकडून ४ निविदा मागविण्यात आल्या होत्या परंतु त्यास प्रतिसाद मिळाला नाही.

३.२२८ विभागीय सचिवांनी काम सुरू असल्याचे सांगितले हे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, द्वहायड्रोलिक मॉडेलिंगमध्ये ४-५ प्रकारची कामे असून फ्लो मीटर बसविण्याचे काम ९० पूर्ण झाले आहे. ग्राहक संरक्षण व जीआयएस मॅपिंगचे काममम १०० टक्के पूर्ण झाले आहे.

३.२२९ विभागाच्या लेखी स्पष्टीकरनानुसार " उर्वरीत कामे नगरपरिषदेकडून मागविण्यात आलेल्या निविदाधारकाकडून ४० टक्के पूर्ण करण्यात आलेली आहेत." असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू कामे ९० टक्के पूर्ण झालेली असून उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून वाढीव कालावधीत काम पूर्ण करण्यात येईल.

३.२३० पंढरपूर येथील कामांच्या संदर्भात नमूद करण्यात आले आहे की, " मॅकनिकल फ्लो मीटर ऐवजी इलेक्ट्रिक मॅग्नेटिक फ्लो मीटर बसविल्यास अंदाजपत्रकीय किंमती मध्ये बचत होईल." सदरहू बचत किती होईल ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, सदरहू कामाच्या अंदाजपत्रकामध्ये ९.९५ लक्ष रुपये बचत झाली आहे. ज्या गावांना पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आल्या आहेत त्या योजना नगरपरिषदेमार्फत चालविण्यात येतात. उदगीर येथील कामासंदर्भात जीआयएस मॅपिंग प्राप्त होण्यास विलंब झाला होता. परंतु सदरहू काम आता पूर्ण झाले आहे.

३.२३१ खामगाव व जालना येथील कामांची काय परिस्थिती आहे ? योजनेचे काम एकूण किती रुपयांचे आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, जालना येथील कामांबाबत नगरपालिकेने लोक वर्गणीचा वाटा अद्याप भरलेला नाही. योजनेची एकूण रक्कम २१५ लक्ष रुपये होती व त्यास १७२ लाख रुपये अनुज्ञेय अनुदान होते व आतापर्यंत ५७ लाख रुपये देण्यात आले आहेत.

३.२३२ उर्वरित अनुदान नगरपालिका स्वीकारत नाही व लोक वर्गणी भरत नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, १० टक्के हिस्सा भरल्यानंतर अनुदानाची रक्कम मुक्त करण्यात येते. परंतु अद्याप नगरपालिकांनी लोक वर्गणीचा वाटा भरलेला नाही.

३.२३३ सन २००९ मध्ये योजनेस मान्यता देण्यात आली होती आता सन २०१७ सुरू असून योजनेचे भवितव्य पुढे काय आहे ? लोक वर्गणी भरण्यात येत नसल्याने योजना थांबविण्यात येणार आहे काय ? याबाबत विभागीय सचिवांनी खुलासा केला की, सदरहू कामासाठी जो निधी खर्च केला आहे तो वगळून उर्वरित निधी शासन तिजोरीत जमा करण्याच्या सूचना देण्यात येत असतात. ज्या ठिकाणी काम झाले नव्हते अशा ७-८ ठिकाणचा निधी शासन तिजोरीमध्ये जमा करण्याच्या सूचना देऊन तो जमा करून घेण्यात आला आहे.

३.२३४ सदर बाब नगर विकास विभागाच्या निदर्शनास आणून देऊन वित्त आयोगातून पैसे वळते करून काम पूर्ण केले पाहिजे. सदरहू योजनेकरिता आपण ५७ लाख रुपये निधी दिला आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, नगरपालिकेने भरावयाच्या १० टक्के लोक वर्गणीच्या हिस्स्यासंदर्भात नगर विकास विभागासमवेत बैठक घेण्यात आली आहे. या संदर्भात समितीने सूचित केले की, नगर विकास विभागास वित्त आयोगाकडून निधी प्राप्त होतो त्यामधून सदरहू रक्कम देणे शक्य आहे.

३.२३५ बऱ्याचशा ठिकाणांच्या संदर्भात सरकारमध्ये वेगळा पक्ष व नगरपालिका पक्षाच्या दुसऱ्यांच्या ताब्यात असेल अशा वेळी लोकांचे मरण होते. अशा ठिकाणी वित्त आयोगातून पैसे वळती करून लोकांना सुविधा उपलब्ध करून देता येणे शक्य आहे. यासंदर्भात समितीने शिफारस करावी असे समितीने एक मताने ठरविले.

३.२३६ मनमाडबाबत विभागाने हायड्रोलिक मॉडेलिंगबाबत उत्तर दिलेले आहे. हायड्रोलिक मॉडेलिंगमध्ये रिफॉर्मचाही एक पार्ट होता. सन २०१२ पर्यंत विभागाची ९५ टक्के डिस्ट्रिब्युशन सिस्टम पूर्ण झालेली आहे. डिस्ट्रिब्युशन वर्कमध्ये रिफॉर्मचा काही उपयोग झाला नाही. "...report on reform work could not be utilised for improvement in efficiency of distribution network", असे महालेखापालांचे म्हणणे आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत विभागीय प्रतिनिधींनी तांत्रिक माहिती देताना सांगितले की, रिफॉर्मचा फायदा झालेलाच आहे. ७० एलपीसीडीने विभागाने २२ कि.मी. लाईन टाकून घेतली. ७० एलपीसीडीनेसुद्धा विभागाला तेथे जास्त हेड मिळत होता. त्याच लाईनमध्ये विभागाने १३५ एलपीसीडीने १८३ कि.मी. साठी एक नवीन हायड्रोलिक मॉडेलिंग केले. तरी सुद्धा ही लाईन सफिशिअंट राहिली कारण यावरचा दाब जास्त असल्याने म्हणजे व्हेलेबल हेड जास्त असल्याने १३५ चा फ्लो देखील त्यातून पास झाला. ज्या डायामीटर्स प्रदूषण नियंत्रण मंडळाला १७० एलपीसीडीला आल्या होता, त्याच १३५ ने देखील पुरेसा झाल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा निधी वाया गेला नाही.

३.२३७ ७० एलपीसीडीची पाईपलाईन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १३५ मध्ये वापरली आणि ते वापरल्यामुळे प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे हेड उपलब्ध होता व हेड उपलब्ध आहे म्हणून प्रदूषण नियंत्रण मंडळाने १३५ एलपीसीडीचे काम करून घेतले, असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी समितीला सांगितले की, तेवढा फ्लो त्यातून पास होऊ शकला. याबाबत टोटल १८३ कि.मी. ची हायड्रोलिक मॉडेलिंग केली. याबाबत असा आक्षेप घेण्यात आला आहे की, २३ कि.मी. ची लाईन हायड्रोलिक मॉडेलिंगच्या आधी टाकण्यात आली होती. ती केवळ २३ कि.मी. होती आणि ती देखील याच हायड्रोलिक मॉडेलिंगमध्ये कामी आली. ती २३ कि.मी. देखील कामी आली त्यामुळे तो खर्च वाया गेलेला नाही.

३.२३८ याबाबत महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, ये सारा काम पूरा होने के बाद ही नियमित काम का अवार्ड करा सकते है. हायड्रोलिक टेस्टिंग का मॉडेलिंग होने से पहले काम अवार्ड कर दिया गया है. याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, हायड्रोलिक मॉडेलिंग से पहले जो काम अवार्ड हुआ था, वह केवल २३ किलोमीटर का हुआ था. हायड्रोलिक मॉडेलिंग के बाद जो काम हुआ है वह १८३ किलोमीटर का हुआ है.

३.२३९ महालेखापालांच्या आक्षेपानुसार, कार्यपद्धतीनुसार हायड्रोलिक मॉडेलिंगचे अवॉर्ड झाल्याशिवाय काम सुरू करू नये. असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, ते काम सुजल योजनेतही नव्हते. ते काम वेगळ्या योजनेतून झालेले आहे. त्यांना यापूर्वीच पैसे मिळालेले होते,

३.२४० याबाबत समितीने मत व्यक्त केले की १८३ कि.मी. ची योजना दुसऱ्या योजनेंतर्गत आली. २३ कि.मी. चे काम वेगळ्या योजनेंतर्गत केले. शेवटी प्रदूषण नियंत्रण मंडळाने एकूण २०६ कि.मी. चे हायड्रोलिक मॉडेलिंग करून घेतले, त्याला हेड उपलब्ध होता आणि प्रदूषण नियंत्रण मंडळाने १३५ एलपीसीडीला वापरणे सुरू केले आहे. सिस्टम चुकीची आहे हे मान्य करता येईल, शेवटी ते वापरण्यात आलेले आहे, समितीच्या या मतास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली व सांगितले की, आयडली अगोदर हायड्रोलिक मॉडेलिंगच व्हायला पाहिजे हे स्वीकारण्यायोग्य आहे.

३.२४१ या संदर्भात महालेखापालांनी मत व्यक्त केले की, पहली बात तो यह है कि इसमें प्रोसिजर फालो नहीं की जा रही है. दूसरी बात यह है कि उस रिपोर्ट के कारण यदि डिजाईन में कोई बदलाव करना हों, तो उनको मालूम ही नहीं हैं कि रिपोर्ट के कारण डिजाईन में बदलाव करना भी है या नहीं. हमारा फाईनल डिजाईन जो डिस्ट्रीब्युशन नेटवर्क लग रहा है, वह सही ढ़ंग से लग रहा है या नहीं, यह भी हमको मालूम नहीं है.

३.२४२ याबाबत समितीने विचारणा केली की, ओपिनियन क्या है ? आज की पोजिशन में क्या २२०६ किलोमीटर के लिए वह डिजाईन प्रॉपर हैं ? यास विभागीय प्रतिनिधींनी सहमती दर्शविली व सांगितले की, सुदैवाने ते झाले, ते बदलावे लागले नाही.

३.२४३ System is not proper. चूक झालेली आहे त्यामुळे हायड्रोलिक मॉडेलिंग प्रथम करावे व नंतरच पाईपलाईन बसवावी अशी सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वे विभागाने निर्गमित केली पाहिजेत. असे मत समितीने व्यक्त केले आता विभागीय सचिवांनी सांगितले की, नगरविकासमध्ये ही समस्या आहेच. विभागाने सुधारणांचे प्रकल्प दिले होते. सुधारणाच्या प्रकल्पांना सुजलमध्ये समाविष्ट केले जाते. परंतु, तेथे जेएनयुआरएम मधून, नगरोत्थान मधून काही प्रोजेक्ट मंजूर झाले आणि नगरपालिकांनी ते ताबडतोब करून घेतले. त्यात सुधारणा नव्हती.

३.२४४ उमरखेड, काटोल, नरखेड, सिल्लोड या ठिकाणी केडीएमसीचे मॉडेल उशिरा एम्लिमेंट झाले. याची कारणे काय, याला जबाबदार कोण आहे ? ३-३ वर्षे डेटा एंट्री ऑपरेटर नाही म्हणून पैसे नंतर घेणार, अशाप्रकारे करणे शक्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की काही ठिकाणी डेटा एंट्री ऑपरेटरची अडचण होती. काही बिलिंग मॉड्यूलला वेळ लागला. सर्व नगरपालिकांना विभागाने पैसे, प्रोजेक्ट दिले होते. सॉफ्टवेअर फ्री होते. मात्र डेटा ऑपरेटर ट्रेनिंग, त्यांचे मॉडेल ६ महिने चालविणे, काही ठिकाणी बिलिंग मॉड्यूलचे ट्रायल रन घेणे असे करीत करीत आता सर्व ठिकाणी हे सुरू झालेले आहे.

३.२४५ नगरविकास विभागाच्या सचिवांना विचारले पाहिजे. लहान लहान कारणांमुळे ३-३, ४-४ वर्षे उशीर करणे असे कसे चालणार ? असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, त्यामुळेच विभागाने निर्णय घेतला आणि नगरपालिकेतून पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग बाहेर पडला. विभागाकडून फक्त ग्रामीणची योजना राबविण्यात येते. ही स्कीम बंद केली. नगरविकास विभागाच्या या विभागाबाबत कोणतीही स्कीम आता पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाकडे नाही.

३.२४६ एमएसएनएच्या अंतर्गत आपण ३३ कोटी ५७ लक्ष रुपये ३६ नगरपालिकांना दिले. ऑक्टोबर, २०१४ पर्यंत २७ नगरपालिकेमध्ये १० कोटी रुपये खर्च झालेले आहेत. याबाबत सद्यःस्थितीची विचारणा समितीने केली. तेथील ३३ कोटी ५७ लक्ष रुपये खर्च झालेले आहेत काय, त्यांनी सर्व रिफॉर्म्स अचिव केलेले आहेत काय ? कारण समितीकडे त्या वर्षीचा तक्ता आलेला आहे.

३.२४७ असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबतची सद्यःस्थिती सांगताना विभागीय सचिवांनी सांगितले की, २५८ योजनांची टोटल एस्टिमेटेड कॉस्ट १२३१ कोटी रुपये होती. त्यामध्ये शासकीय अनुदान १०६७ कोटी रुपये होते, बाकी १० टक्के त्यांचा हिस्सा होता. त्या १०६७ कोटी रुपयांच्या अगेन्स्ट ८३०.७७ कोटी रुपये प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून त्या त्या नगरपालिकांना आता वितरित केलेले आहेत. आता अजूनही शासकीय अनुदान देताना त्यांनी १० टक्के हिस्सा भरुन मग मागणी करावयाची आहे. हि माहिती ओव्हरऑल २५८ योजनांबाबतची आहे.

३.२४८ समितीचा मुद्दा रिफॉर्मबद्दल, ऑगमेंटेशेनबद्दल आहे. उपभोक्ता सर्वेक्षण, पाणी व वीज लेखा परीक्षण, जीआयएस नकाशे तयार करणे, मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठ्यासाठी मीटर बसविणे हे जे काही रिफॉर्म प्रदूषण नियंत्रण मंडळाला करावयाचे होते, त्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ? तसेच या रिफॉम्र्ससाठी शासनाने या ३६ नगरपालिकांना ३३ कोटी ५७ लक्ष रुपये दिले होते आणि त्यांनी उद्दिष्ट पूर्ण केले नाही. याबाबतची सद्यःस्थितीबाबत समितीने विचारणा केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, बाबनिहाय पाहिले तर उपभोक्ता सर्वेक्षण टोटल ९ ठिकाणी देण्यात आले होते. त्यातील ४ नगरपरिषदेची कामे पूर्ण झाली. २ नगरपरिषदांची कामे रद्द केली. तर २ नगरपरिषदांचे काम सध्या ९५ टक्के इतके पूर्ण आहे. एका नगरपरिषदेने काम पूर्ण केले मात्र स्वहिस्सा भरलेला नसल्याने तिला पैसे देता आले नाहीत.

३.२४९ पाणी व वीज लेखा परीक्षण, जीआयएस नकाशे तयारर करणे असे जे ५-६ मुद्दे आहेत त्याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, तशीच परिस्थिती आहे ? जीआयएस मध्ये त्या ३० पैकी एकूण ८ नगरपरिषदा होत्या. त्यापैकी ५ नगरपरिषदांचे काम पूर्ण झालेले आहे. २ नगरपरिषदांचे काम आपण रद्द केलेले आहे आणि एका नगरपरिषदेचे काम ७५ टक्के इतके पूर्ण झालेले आहे.

३.२५० सुधारणांमध्ये जीआयएस नकाशे हा आयटम २४ पैकी आठच ठिकाणी होता. या सर्व विषयावर उद्दीष्ट साध्य केलेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, पाणी, वीज लेखा परीक्षण ही बाब एकूण १० नगरपरिषदांमध्ये होता. त्यातील ५ नगरपरिषदांमध्ये तो पूर्ण झालेला आहे. २ ठिकाणी रद्द केला. २ ठिकाणी लोकहिस्सा भरलेला नाही. एका नगरपरिषदेचे काम ४० टक्के इतके झाले असून उर्वरित काम सुरू आहे.

३.२५१ मीटर बसविण्याची बाब १४ नगरपालिकांच्या अंदाजपत्रकामध्ये होतो. त्यातील ७ ठिकाणी कामे पूर्ण झालेली आहेत. दोन काम रद्द झाली. ३ नगरपरिषदांमध्ये कामे सुरू आहेत. २ ठिकाणाहून अद्याप लोकहिस्सा भरलेला नाही. अशाप्रकारे बाबनिहाय अहवाल विभागीय प्रतिनिधींनी सादर केला.

३.२५२ विभागाने जितक्या नगरपालिका निवडल्या त्यातील काही लोकांनी पैसे भरले नाहीत, काही नगरपालिकांनी काम सुरुच केले नाही याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, आता विभाग ज्या नगरपालिकांनी विभाग जे काही काम पूर्ण केलेले आहे ते अतिंम करून त्या नगरपालिकांना यापुढचे राहिलेले पैसे देणारच नाही. जास्त पैसे दिले गेले असल्यास विभाग त्यांना ते परत भरायला लावणार आहे.

पर्यावरण अनुकूल पद्धतीने MSW ची विल्हेवाट न लावणे :

३.२५३ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक २८ फेब्रुवारी,२०१७ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी समितीने कत्तलखान्यातून निर्माण होणारा कचरा तसेच घनकचऱ्याची पर्यावरण अनुकूल पद्धतीने विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने नगरपालिकांमध्ये मोठ्या प्रमाणात उदासिनता असुन अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांनी अद्याप अर्ज केलेला नाही किंवा कन्सेन्ट घेतलेली नाही त्याची यादी समितीसमोर असल्याचे समितीने नमूद केले. या स्थानिक स्वराज्य संस्थांवर कारवाई का केली जात नाही अशी विचारणा समितीने केली तसेच याबाबत सदस्य सचिवांनी असे मंडळाकडून नगरविकास विभागाला कळविले जाते व त्यांच्यामार्फत पाठपुरावा केला जातो असे उत्तर दिल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. सदस्य सचिवांनी पाठविलेल्या अहवालावरून असे दिसून येते की, उल्हासनगर व अकोला महानगरपालिकेने घनकचरा व्यवस्थापन नियमाच्या अंतर्गत प्राधिकार पत्र घेतलेले नाही. त्याचबरोबर उल्हासनगर, भिवंडी, अहमदनगर, मालेगाव, धुळे, औरंगाबाद, नांदेड या महानगरपालिकांनी अद्याप नुतनीकरणाचा अर्ज दाखल केलेला नसुन या स्थानिक स्वराज्य संस्थांवर विभागातर्फे कोणती कारवाई करणार आहात विभागाने याबाबत कोणता आढावा घेतला आहे अशी विचारणा समितीने केली. तसेच या राज्यामध्ये एकूण २६५ स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. त्यापैकी २३८ संस्थांनी घनकचरा व्यवस्थापन नियमांतर्गत एकदा तरी प्राधिकार पत्र घेतले आहे. विभागाने दिलेल्या माहितीमध्ये ९० स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकाही नुतनीकरण करण्यासाठी अर्ज दिलेला नाही. तसेच २४ स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकदाही प्राधिकार पत्र घेतले नाही. एखादी कंपनी सुरू केल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून एनओसी घेतल्याशिवाय त्या कंपनीतून उत्पन्न होणाऱ्या घनकचऱ्याची सार्वजनिक ठिकाणी विल्हेवाट लावली तर त्यांच्याविरुद्ध कोणती कारवाई करण्यात येते तशी कारवाई या स्थानिक स्वराज्य संस्थांविरुद्ध का घेतली नाही अशी विचारणाही समितीने केली.

३.२५४ या अनुषंगाने प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती समितीस अवगत केली की, अगोदर समितीस दिलेल्या माहितीमध्ये २६५ पैकी २४ स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकदाही प्राधिकार पत्र घेतले नाही. ५ स्थानिक स्वराज्य संस्थांनी मध्यंतरीच्या काळात प्राधिकार पत्र घेतले आहे. २१ तारखेला सर्व १२ प्रादेशिक अधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत त्यात दोन मुद्दे होते. एकदा तरी प्राधिकार पत्र घेतले आहे की नाही याची खात्री करून प्रासिक्यूशनची कार्यवाही सुरू करावी. महालेखाकारांनी असा आक्षेप घेतला होता की, ३६ नगरपालिकांनी नुतनीकरण केलेले नाही त्यांचे दोन ग्रूप करावेत असे निर्देश दिले आहेत. २६५ पैकी १९ स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकदाही प्राधिकार पत्र घेतले नाही त्यासाठी प्रासिक्यूशनची कार्यवाही केली आहे. ऑगस्ट महिन्यामध्ये सीआरपीसी कलम १५४ व १९७ मध्ये सुधारणा झाली आहे. त्यानुसार आजी व माजी लोकसेवकांवर त्यांच्या कारकिर्दीतील प्रकरण असेल तर त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यासाठी शासनाची परवानगी आवश्यक आहे. त्याकरिता १९ स्थानिक स्वराज्य संस्थांबाबतचा प्रस्ताव शासनाला दिला आहे. त्यामध्ये विनंती केली आहे की, ज्यांनी एकदाही प्राधिकार पत्र घेतले नाही त्यांच्यावर कारवाई करण्यास अनुमती द्यावी. आजच्या तारखेला १९ नगरपालिकांचे मुख्याधिकारी आणि इतर संबंधितांची नावे सचिव, नगरविकास विभाग यांना कळवावयाची आहेत. तसेच काही नगरपालिकांवर कारवाई केली आहे असेही समितीस अवगत केले.

३.२५५ कायद्याप्रमाणे पोलीस कारवाई का केली नाही? परवाना निलंबित केला जातो कंपनी सील केली जाते. स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी कंपन्यांकरिता वेगळी वागणूक असे आहे का अशी समितीने विचारणा केली असता वॉटर ॲक्ट आणि एअर ॲक्टप्रमाणे कारवाई केली जात असून उल्हासनगर महापालिकेविरुद्ध प्रॉसिक्युशन केले असल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

३.२५६ २४ स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकदाही प्राधिकार पत्र घेतले नाही, ९० स्थानिक स्वराज्य संस्थांनी नुतनीकरण अर्ज केला नाही. त्यांच्याविरुद्ध कारवाई सुरू करावी असे समितीने सूचित केले असता कारवाई प्रस्तावित केली आहे.प्रॉसिक्यूशन करण्यासाठी शासनाची मान्यता लागते नवीन कायद्यामध्ये सुधारणा झालेली आहे ऑगस्टपूर्वी ही तरतूद नव्हती विभागीय स्तरावर स्तरावर कारवाई करीत होतो. कायद्यात सुधारणा झाल्यानंतर कॉम्पिटण्ट ॲथॉरिटीची परवानगी घेतल्याशिवाय मॅजिस्ट्रेट प्रॉसिक्यूशन करीत नसल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विभागीय प्रतिनिधींनी समितीस अवगत केले.

३.२५७ विभागाने किती लोकांविरुद्ध प्रॉसिक्यूशन करण्याकरिता सचिव महोदयांकडून परवानगी मागितली आहे, ती किती दिवसात दिली जाणार आहे अशी पृच्छा समितीने केली असता १९ स्थानिक स्वराज्य संस्थांची यादी दिली आहे ज्यांनी नुतनीकरणाचा अर्ज केला नाही त्यांचा सुद्धा प्रस्ताव पाठविला आहे.सदर प्रस्ताव आज म्हणजे दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ ला पाठविला असून २६५ स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थिती सचिवांना दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या पत्राने कळविली आहे. ज्यांनी नुतनीकरणासाठी अर्ज केला त्यांच्या बाबतीत प्राधान्याने कार्यवाही करू असे प्रदूषण नियंत्रण विभागाच्या प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

३.२५८ अर्ज केला त्यांना मंजुरी देण्याचे काम विभागाचेच असून नुतनीकरणाचा अर्ज दिला नाही त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे ज्यांनी कधीच अर्ज केला नाही त्यांच्यावर कारवाई करावी. शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे असे सदस्य सचिवांनी सांगितले आहे. शासनाकडून परवानगी मिळणार नाही तोपर्यंत प्रासिक्यूशन करणार नाही. ज्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाणार आहे ती कोणत्या ॲक्टखाली व कोणत्या नियमानुसार करणार आहात अशी विचारणा समितीने केली.

३.२५९ महानगरपालिकेचे नियम आणि पर्यावरण कायद्यानुसार कारवाई करणार असल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विभागीय प्रतिनिधींची समितीस अवगत केले.

३.२६० कोणाविरुद्ध कारवाई करणार आहात या समितीच्या प्रश्नाला मुख्याधिकाऱ्यांची नावे पहिल्या टप्प्यात कळविली असून अध्यक्ष देखील जबाबदार असतात, त्यांचेही नाव समाविष्ट करण्यात येईल असा खुलासा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विभागीय प्रतिनिधींनी केला.

३.२६१ याला प्रशासन जबाबदार असून अध्यक्षांनी विरोध केला आहे का? बॉडीला का जबाबदार धरता विभागाकडे कोणाच्या सहीने अर्ज येतो? अर्ज मुख्याधिकारी करू शकतो अध्यक्ष करीत नाही मग अध्यक्षांविरुद्ध कारवाई का करीत आहात? अशी पृच्छा समितीने केली असता मुख्याधिकाऱ्यांना संमती देत नाही, बॉडीला देतो मुख्याधिकारी किंवा त्यांचे प्राधिकृत अधिकारी अर्ज करतात अर्बन बॉडीला मान्यता देण्यात येते असा खुलासा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विभागीय प्रतिनिधींनी केला.

३.२६२ या अनुषंगाने नगरविकास विभागाच्या सचिवांनी समितीस असे अवगत केले की प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आज दिवसभरात नगरविकास विभागाला प्रस्ताव प्राप्त होईल त्यानंतर हा प्रस्ताव शासनाला, मंत्री महोदयांना सादर करू. सदस्य सचिवांनी सांगितल्याप्रमाणे सीआरपीसीमध्ये सुधारणा झाल्यानुसार नावानिशी प्रस्ताव द्यावा लागेल आणि अ, ब, क किंवा ड ला मंजुरी द्यायची की नाही हे शासन ठरवेल. नगरपरिषदेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष या दोघांची जबाबदारी आहे. नगरपरिषदेशी संबंधीत सेक्शन पाहिले तर अध्यक्ष परिषदेचे प्रमुख आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी हे त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असतात. त्यामुळे विभागाला दोघांकडे प्रस्ताव सादर करावा लागेल व त्यावर शासन निर्णय घेईल.तसेच समितीचा दुसरा प्रश्न महानगरपालिकेबाबतचा होता महानगरपालिकेमध्ये अध्यक्षांची तुलना महापौरांबरोबर होऊ शकत नाही त्यामध्ये आयुक्त आणि स्टॅन्डींग कमिटी यांची ती जबाबदारी असेल असे शासनाचे मत असल्याचेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

३.२६३ न्यायालयात किंवा उच्च न्यायालयात जेवढया केसेस आहेत त्यांच्या नोटीसा महापौरांना किंवा स्टॅन्डींग कमिटीच्या चेअरमनला जात नाहीत. त्या नोटीसा महानगरपालिकेच्या आयुक्ताच्या नावाने जातात शपथपत्र सुद्धा आयुक्तांना फाईल करावे लागते. स्टॅन्डींग कमिटीच्या चेअरमनचे शपथपत्र कोर्टात चालत नाही समजा पी.आय.एल. फाईल झाली तर त्याला कोण जबाबदार असेल ? प्रशासनाचा प्रमुख म्हणून आयुक्त जबाबदार असतो. विभागाचे सचिव म्हणून विषयाला मान्यता देण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे पाठवणार ? या प्रस्तावाला शासन किती दिवसात मान्यता देईल याबाबत समितीला माहिती द्यावी असे समितीने नमूद केले.

३.२६४ एम.पी.सी.बी. चा प्रस्ताव प्राप्त झाल्यावर त्यावर शासन ३० दिवसातत निर्णय घेईल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली. पंधरा दिवसांच्या आत या प्रस्तावावर निर्णय घ्यावा अशी सूचना समितीने केली. काही ठिकाणी महापालिकेची वैधता सन २०१४ मध्ये संपली आहे काही ठिकाणी वैधतेची मुदत सनन २००३, २००६ साली संपली आहे. सन २००३ पासून ज्याची वैधता संपली आहे त्यावर शासनाने प्रशासन म्हणून काय कार्यवाही केली आहे ? द्वएम.पी.सी.बी.ला समितीला असे विचारावयाचे आहे की, ज्याची सन २००३, २००४, २००६ मध्ये वैधता संपली आहे. सुमारे बारा वर्षे झाली तरी ते व्हॅलिडीटी करून घेत नाहीत कोणत्याही प्रकारे नियमाची पुर्तता करीत नाहीत हा लोकांच्या जीवाशी खेळ असल्याचेही समितीने नमूद केले.

३.२६५ या अनुषंगाने महालेखाकार यांनी असे मत व्यक्त केले की, ज्यावेळेस कायदेशीर परवानगी देण्यात येते ती किती कालावधीसाठी देण्यात येते, परवान्याबद्दलची विभागाची प्रक्रिया स्पष्ट करावी तसेच जेव्हा विभागाकडून परवानगी देण्यात येते ती किती कालावधीसाठी देण्यात येते विभागाकडून त्यांच्या ॲप्लीकेशनची वाट पाहण्यात येते का, परवाना संपुष्टात आल्यानंतर काय करायचे असते हे विभागाला माहित आहे प्रॉसिक्युशन ही शेवटची प्रक्रिया आहे.

३.२६६ एक सिस्टम म्हणून त्यांना पाच वर्षाची व्हॅलिडीटी दिली जाते. सर्वसाधारपणे कोणत्याही प्रकारच्या परवान्याची मुदत संपण्याआधी ६० दिवस अगोदर ॲप्लीकेशन करणे अभिप्रेत असून कारखान्यांवर एम.पी.सी.बी.ची देखरेख असते अशी माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी समितीस दिली.

३.२६७ सन २००३ पासूनन व्हॅलिडीटी दिलेली नसल्याची बाब समितीने निदर्शनास आणली असता सरकारी यंत्रणा म्हणून यापूर्वी ही बाब मान्य केली आहे की, ८, १३ व २७ फेब्रुवारी तीन कार्यशाळांचे आयोजन करून सर्व नगरपालिकांना बोलावले होते असा खुलासा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी केला.

३.२६८ आता ते कायद्याचा उल्लेख करीत आहेत शासनाची परवानगी लागेल शासनाच्या परवानगीनंतर कारवाई करता येईल हया कायद्यात कधी सुधारणा झाली या अगोदर शासनाची परवानगी लागत नसून त्याकाळात तुम्ही का प्रॉसिक्युशन केले नाही ? त्यावेळच्या जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांची नावे समितीस अवगत करावी त्यावर कोणती कारवाई करायची ते समिती ठरवेल. सद्यस्थितीत हा कायदा अमेंड झाला म्हणून शासनाची परवानगी लागते. जोपर्यंत कायदा अंमलात नव्हता तेव्हा सन २००३ पासून व्हॅलिडीटी करण्यात आलेल्या नाहीत तरी सुद्धा काम करीत आहेत. त्यावर कारवाई का करण्यात आलेली नाही यासाठी एमपीसीबीचे अधिकारी जबाबदार आहेत ? हा कायदा अस्तित्त्वात यायच्या आधी ॲक्शन घेतली नाही त्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात येणार आहे अशी समितीने विचारणा केली.

३.२६९ ज्या महानगरपालिकांनी घनकचरा व्यवस्थापन एकदाही घेतलेले नाही. बैठकीमध्ये २५ लोक आले होते त्यांच्यावर स्थानिक पातळीवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल असा खुलासा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी केला.

३.२७० शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवलेला आहे असे विभागाचे म्हणणे आहे तथापि या अगोदरच्या नियमानुसार शासनाकडे जाण्याची आवश्यकता नव्हती, त्यावेळेस कारवाई करण्यात आली नाही. ज्या विभागीय अधिकाऱ्यांनी कारवाई केली नाही किंवा प्रस्तावित केली नाही त्यांच्यावर कारवाई करण्यात येणार आहे काय अशी विचारणा समितीने केली असता कारवाई केली नाही असे नसून उल्हासनगरमध्ये कारवाई केलेली आहे. तसेच बऱ्याच प्रकरणांमध्ये कारवाई करण्यात आलेली असून या सर्वांची यादी समितीला सादर करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले तथापि माहिती अद्याप अप्राप्त आहे.

३.२७१ अनेक ठिकाणी नदी काठावर कचरा टाकण्यात येऊन सर्व नद्या प्रदूषित केलेल्या आहेत राज्यात कोणत्याही रेल्वे स्टेशनवरून शहरात प्रवेश केला तर चारही बाजूला बकाल परिस्थिती निर्माण झालेली आहे या विषयावर कधीही कारवाई करण्याचे काम शासनाकडून झालेले नसल्याचे समितीने सांगितले असता स्थानिक अधिकाऱ्यांवर परभणी, लातूर येथे कारवाई केलेली आहे. यासंदर्भात मंडळाच्या अध्यक्षांसमवेत बैठक घेऊन याबाबत निर्णय घेण्यात येईल असा खुलासा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी केला.

३.२७२ ज्या मुख्याधिकाऱ्यांनी हे काम केलेले नाही त्यांच्या गोपनीय अहवालात याची नोंद करण्यात यावी. तसेच २१ हजार ८०० टनपैकी फक्त ६ हजार ९०० टन कचऱ्याची विल्हेवाट नियमानुसार लावण्यात येते. १५ टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची कारवाई नगरपालिकांनी केलेली नसून घनकचरा व्यवस्थापन, स्वच्छता अभियान लागू करण्यात आले तरी सुद्धा याचा समर्पक रिझल्ट अजून दिसत नसल्याचेही समितीने विभागास अवगत केले.

३.२७३ ज्याप्रमाणे समितीने निर्देश दिले त्यानुसार आज एमपीसीबीकडून प्रस्ताव प्राप्त होईल त्यावर १५ दिवसाच्या आत निर्णय घेण्यात येईल. त्यानंतर समितीला त्याची माहिती सादर करण्यात येईल. सॉलिड वेस्ट नियमाच्या अंतर्गत जी काही कारवाई करायची आहे त्यात घनकचरा व्यवस्थापनाचे आधी दोन नियम होते आता स्वच्छ भारत योजनेअंतर्गत सन २०१६ चे नवीन नियम आलेले आहेत त्यानुसार कारवाई करणे अपेक्षित आहे. नगरविकास विभागामार्फत स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येते याचे दोन भाग होते. यात एक म्हणजे शहराला हगणदारीमुक्त करणे आणि दुसरे शहराला घनकचरा व्यवस्थापनावर तांत्रिक पद्धतीने काम करणे. आज महाराष्ट्रातील जवळपास १५० शहरे हगणदारीमुक्त झालेली आहेत. जी शहरे ओडीएफ झालेली आहेत त्यांच्यासाठी स्वच्छ भारत अभियान अंतर्गत घनकचरा व्यवस्थापनाचा कार्यक्रम शासनाने हाती घेतलेला आहे. सन २०१६ च्या नियमामध्ये सर्व युएलबीएसना साधारणपणे दोन वर्षाचा कालावधी देण्यात आलेला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.२७४ या अनुषंगाने प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी अशी माहिती अवगत केली की, एक लाखाच्या आत लोकसंख्या असेल त्यांना तीन वर्षे देण्यात आलेली असून ज्या एक लाख लोकसंख्येच्या वरील नगरपालिका आणि महानगरपालिका आहेत त्यांना दोन वर्षे दिलेली आहेत.

३.२७५ उपरोक्त च्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस अशी माहिती दिली की, या कालावधीकरिता टप्प्याटप्प्याने काय कालबद्ध कार्यक्रम असावा याचे एक परिपत्रक काढण्यात येत आहे. याची माहिती सुद्धा समितीला दोन आठवड्याच्या आत सादर करण्यात येईल मागील साक्षीच्या वेळेस समितीने डीपीआरचा विषय काढला होता की, नगरपरिषद स्वतःच्या लेव्हलवर डीपीआर एजन्सी नेमते आणि जर डीपीआर नेमायची एजन्सीच व्यवस्थित नसेल तर कुठल्याही प्रकारचा डीपीआर बनतो मग काही होत नाही. स्वच्छ भारत अभियानाचे संचालनालय आहे त्यांच्या धर्तीवर निविदा प्रक्रिया पार पाडून तीन एजन्सी नेमलेल्या आहेत आणि त्यांना डीपीआर करायचा एक टेम्पलेट दिलेला आहे. त्या शास्त्रोक्त पद्धतीने डीपीआर करणे अपेक्षित आहे. ही कामे करीत असताना अनेक नगरपालिका म्हणतात की, आमच्याकडे निधी नाही. पोटीन्स फायनांन्स कमिशनचा ५० टक्के निधी स्वच्छ भारत अभियानासाठी ठेवलेला आहे. दोन वर्षाच्या कालावधीमध्ये १४ व्या वित्त आयोगातून महाराष्ट्राला ३ हजार ३२६ कोटी रुपये मिळाले. युएलबीला मिळालेल्या निधीच्या ५० टक्के निधी खर्च करायला लागणार आहे. यामध्ये तीन भाग असून यात डीपीआरकरिता एजन्सी नेमलेली आहे, निधीची सोय केलेली आहे आणि तिसरे म्हणजे कालबद्ध कार्यक्रमाचे परिपत्रक अंतिम टप्प्यात आलेले आहे. मुख्यमंत्री महोदयांनी दोन वर्षापूर्वी सांगितले होते की, जे शहर दिनांक १ मे पर्यंत ओडीएफ होणार नाही त्याला दिनांक १ मे च्या पुढच्या डिस्क्रीशनरी ग्रँन्ट मिळणार नाहीत. याचा जीआर सुद्धा याच आठवड्यात निर्गमित करीत आहोत. सर्वसाधारणपणे प्रत्येक शहराला एक वर्षाचा वाव देऊन दिनांक १ मे, २०१७ पासून जर शहर ओडीएफ झाले नाही तर ज्या विभागाच्या डिस्क्रीशनरी ग्रॅन्ट आहेत त्या शहराला मिळणार नाहीत. सन २०१८ मध्ये एक विशिष्ट दिवस घेऊन ज्या शहरांनी स्वच्छ भारत अभियानमध्ये प्रगती दाखवली नाही तर शासन ज्या डिस्क्रीशनरी ग्रॅन्ड देते त्याबद्दल सुद्धा असाच निर्णय घ्यायचा असा शासनाचा मानस आहे.

३.२७६ यामध्ये ५० टक्के पैसे १४ व्या वित्त आयोगाचे आहेत ते वापरण्याचा अधिकार दिला. परंतु महानगरपालिकांनी स्वच्छतेसाठी गावातील कचरा उचलण्यासाठी ज्या गाड्या लावलेल्या आहेत त्यात ५० टक्के पैसे वापरुन संपविले जात आहेत. या पैशांनी काय करायचे आहे

तो मूळ उद्देश साध्य होत नाही. ज्याप्रमाणे विभागाने डीपीआरची काळजी घेतली त्याचप्रमाणे या पैशांची सुद्धा कोणत्या कामावर विल्हेवाट लावायची हे ठरविले पाहिजे असे समितीने विभागास सूचित केले असता याबाबत लगेच निर्णय घेण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला याअनुषंगाने समितीने सध्या ७० टक्के घनकचऱ्याचे व्यवस्थापनाची विल्हेवाट होत नाही असे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नविन अहवालात आहे यादृष्टीने जो काही प्रोग्राम ठरविण्यात येत आहे त्याप्रमाणे ज्याठिकाणी काहीच झालेले नाही त्याबाबत विशेष लक्ष दिले पाहिजे असेही समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात सकारात्मक असल्याचे सांगितले.

३.२७७ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचा काहीही वचक नाही किंवा त्यांच्याकडून काही कारवाई करण्यात येत नाही. केवळ प्रायव्हेट लिमिटेड कंपन्या आहेत त्यांच्यासाठी हा बोर्ड अस्तित्त्वात आहे. सार्वजनिक हिताच्या ज्या काही बाबी आहेत, सरकारी किंवा निम सरकारी माध्यमातून ज्या कचऱ्याची विल्हेवाट लावली जाते त्यावर महाराष्ट्र प्रदूषण मंडळ गंभीर नाही. महाराष्ट्राचे शहरीकरण ५२ टक्क्यांपर्यंत पाहोचलेले आहे. हा विषय फार गंभीर आहे जो रिपोर्ट देण्यात आलेला तो जर तपासला तर असे लक्षात येईल की, याचा परिणाम कोट्यावधी लोकांच्या आरोग्यावर होत असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

३.२७८ समितीच्या उपरोक्त मताच्या अनुषंगाने महालेखाकार यांनी असे विदित केले की, ॲथॉरायझेशन कशासाठी देण्यात येते ? जोपर्यंत प्रोसेसिंग फॅसिलिटीसाठी ॲथॉरायझेशन देत नाही याचा अर्थ असा होतो की, युएलबी सदर कचरा कुठेतरी टाकत आहे. या कार्यवाहीला रोख कोण लावणार ? १२ युएलबीचा रेकॉर्ड नाही की, आपण त्यांना ॲथॉरायझेशन दिले किंवा नाही. You don't give authorisation and dumping will continue. आळंदी बल्लाळपूर, भुसावल, चाळीसगाव, गोंदिया, जालना, कुलाबा, बदलापूर, लोणावळा, फलटन, शिर्डी, उमरखेडा आणि रत्नागिरी ही १२ नगरपालिकांची नावे आहेत.

३.२७९ यासंदर्भात आज रिकन्साइल केले. Totally 19 people have never taken an authorisation. ज्यांनी एकदाही घेतलेले नाही त्यांची नावे तपासण्यात येतील मंडळाकडे याचा तपशील असून आम्ही सर्व नगरपालिकांचा रेकॉर्ड तपासतो.ो Only 19 people had not taken the authorisation असा खुलासा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी केला.

३.२८० जोपर्यंत आपण ॲथॉरायझेशन देत नाही. Means the ULB is continuing to dump the solid waste on unauthorised site. You are saying that you have neither given authorisation but you are also turning your blind eye to this unauthorised dumping असा खुलासा महालेखाकार यांनी केला.

३.२८१ इंडस्ट्रीच्या कार्यपद्धतीमध्ये आणि युएलबीच्या कार्यपद्धतीमध्ये खूप फरक आहे. एमएसडब्ल्यूच्या नियमामध्ये काय कारवाई करावी एमपीसीबीमध्ये काय कारवाई करावी हे अभिप्रेत आहे. याची संपूर्ण जबाबदारी नगरविकास विभाग आणि युएलबीची आहे. यामध्ये आपण प्रॉसिक्युशन करू शकतो. जास्तीत जास्त त्यांना बोलावून फायनिंग आणि टेक्नॉलॉजी इनपुट देऊ शकतो. जिल्हाधिकाऱ्यांना विनंती करून पब्लीक न्युसेन्स थांबवावे लागेल असा खुलासा प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी केला.

३.२८२ यामध्ये गुन्हे दाखल करण्याची जी प्रोव्हीजन आहे ती जामीनपात्र आहे की अजामीनपात्र आहे ?अशी विचारणा समितीने केली असता हा गुन्हा म्हणू शकत नाही तर चार्जशीट म्हणू शकतो यामध्ये पोलीस येतच नसल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

३.२८३ एमपीसीबी चार्जशीट कुठे दाखल करते असा प्रश्न समितीने केला असता मॅजिस्ट्रेट सारखे डायरेक्ट कोर्टामध्ये केस करतो असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

३.२८४ प्रायव्हेट केससारखी कोर्टात केस दाखल करण्यात येते यामुळे स्वच्छ भारत किंवा स्वच्छ महाराष्ट्र कधीच होणार नाही. मुख्याधिकाऱ्यांनी जर कारवाई केली नाही तर त्याच्यावर शिस्तभंगाची किंवा बाकीची सर्व कारवाई करायला पाहिजे.एवढ्या सरळ पद्धतीने चाललो तर स्वच्छ भारत कधीच होणार नाही शासनाच्या पैशांचीही विल्हेवाट लागेल आणि निष्पन्न काहीच होणार नाही ज्याप्रमाणे देवनारमध्ये झाले ९ हजार टनचे ८ हजार टन झाले त्याप्रमाणे होईल असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. समितीने पुढे असे नमूद केले की,हा विषय कोर्टामध्ये गेला तर विभागाला उत्तर देण्यास अडचणीचे होईल. रस्त्यावर थुकल्यानंतर २०० रुपये दंड ही उपविधीमध्ये तरतूद असून जरी कायदा नसला तरी त्याप्रमाणे उपविधी आहेत. महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये थुकल्यानंतर न्यूसन्स डिटेक्टर लगेच २०० रुपये दंड आकारतात. नगरविकास विभागाने अपार्ट फॉर्म धिस क्रिमिनल प्रोसिजर याबद्दल काही तरी गांभीर्याने पावले उचलली पाहिजेत. नगरविकास विभागाने सु-मोटो असा निर्णय घेतला पाहिजे की, ज्या ज्या लोकांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांची अवहेलना केली असेल तर त्या त्या लोकांना प्रमोशन देण्याऐवजी डिमोशन होईल.ल

३.२८५ विभागाला यासंबंधी कायदा केल्याशिवाय कोणतीही केस टिकणार नाही. सार्वजनिक आरोग्य विभाग आणि मुख्याधिकारी यांना जबाबदार धरले तरच याची अंमलबजावणी होऊ शकेल अन्यथा काही होणार नाही. विभागाने यासंबंधी पुढील १५ दिवसात समितीला अहवाल द्यावा दक्षता अभियानांतर्गत १५ हजार टन कचरा जो आपण डंम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकतो त्याची सुद्धा विल्हेवाट १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून

व्यवस्थितपणे झाली पाहिजे. या दृष्टीने आपण जिल्हाधिकारी यांना काही तरी मार्गदर्शक सूचना द्याव्यात अशी सूचना समितीने विभागास केली. तसेच १४ व्या वित्त आयोगानुसार आपण प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार बॉडीला दिले आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता तीन गोष्टी येत्या १५ दिवसात आपल्याला देतो तसेचच हे अधिकार जिल्हाधिकारी यांच्याकडे आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.२८६ कत्तलखान्यासंबंधी माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने विभागास सांगितले तसेच मागच्या वेळी माहिती देताना विभागाने असे सांगितले होते की, १९ कत्तलखाने बंद करण्यात आले आहेत ७ कत्तलखाने कार्यरत आहेत. पण त्यापैकी ६ कत्तलखाने वैध व १ कत्तलखाना अवैध आहे त्यामुळे त्यांच्यावरही कार्यवाही करण्यात येईल. आता या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे अशी पृच्छा समितीने केली असता यामध्ये यवतमाळ आणि फलटण येथील कत्तलखाने बंद केले आहेत. आता ३६ पैकी फक्त ५ ठिकाणी कत्तलखाने सुरू आहेत. समितीने सूचना दिल्याप्रमाणे जेथे १० जनावरांपेक्षा कमी जनावरे असतील तेथील शहरी स्थानिक संस्थांना आपण मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत आणि शहरी स्थानिक संस्थांनी अंमलबजावणी करायची आहे आणि १० च्या वर जे मोठे कत्तलखाने असतात ते आपण एमपीसीबी मार्फत मॉनिटर करतो अशी माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींनी दिली.

३.२८७ दहाच्या वरचे आपण मॉनिटर करता आणि त्या १० च्या खालचे युएलबीने मॉनिटर केले पाहिजेत पण ते काही बघत नाहीत. मुंबईमध्ये सुद्धा ते उघड्यावर सुरू आहे त्यामुळे युएलबीने सुद्धा कारवाई केली पाहिजे. स्वच्छता अभियानामध्ये सुद्धा याचा विचार करू शकता की, जे ५० टक्क्यांपेक्षा कमी आहेत त्याच्यातील ५ टक्क्यांपेक्षा जे मटन मार्केट आहेत त्याच्यासाठी सुद्धा तरतूद करण्याचा विचार करू शकता. तसेच १० जनावरांच्या खाली जे लोक काम करतात त्यांच्यासाठी सुद्धा एक वेगळा विचार करावा असे समितीने विभागास सुचविले असता सदरहू बाब विभागाच्या गाईडलाईन्समध्ये नाही पण समिती ज्याप्रमाणे सूचविते त्यानुसार कत्तलखान्याकरिता तरतूद करू असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

३.२८८ यासाठी शासनाकडून मान्यता घेऊन लवकरात लवकर कार्यवाही करावी आणि अशा प्रकारे हा निधी व्यपगत होऊ नये. कारण यासंबंधी दहा दहा आणि पंधरा पंधरा वर्षापासून नूतनीकरण झाले नसल्याची चिंता समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. ज्यांनी ६ महिन्याच्या आत नूतनीकरण केले नाही त्यांच्यावर कार्यवाही प्रस्तावित करावी असे समितीने सूचित केले तसेच कित्येक नगरपालिकांमध्ये लोकसंख्येच्या आधारावर सफाई कामगारांची भरती झालेली नाही. बेसिक पायाभूत सुविधा पुरविण्यासाठी शासनाकडून परवानगी दिली जात नाही. कर्मचारी भरतीची बंदी आहे सफाई कर्मचारी नसतील तर साफसफाई कोण करणार ? कंत्राटी स्वरुपात कामगार नेमायचे तर त्यासाठी अनेक नियम आहेत. तसेच कचरा भरण्यासाठी गाड्या खरेदीचे वेगवेगळे नियम आहेत. एका बाजूला एवढे निर्बंध लावायचे आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्याकडून स्वच्छतेची अपेक्षा व्यक्त करायची हे काही योग्य नसल्याचेही समितीने नमूद करत यासंबंधी कुठे तरी चर्चा करणे आवश्यक आहे की त्यांना अमेनिटीज दिल्या पाहिजेत व त्यानंतर त्यांच्याकडून अपेक्षा व्यक्त केल्या पाहिजेत. आपण नगरपालिकांना अमेनिटीज देत नाही त्यांच्याकडे सफाई कामगार नाहीत, त्यासंबंधी साहित्य नाहीत किंवा गाड्या नाहीतत मग ते स्वच्छता कशी करतील. कत्तलखाने उभारण्यासाठी जर नगरपालिकांना पुरेसा निधी दिला तर ते बाहेर उघड्यावर विकले जाणार नाही. सर्व नगरपालिका आणि महानगरपालिकांमध्ये ज्या प्रकारे आपण सिवरेजच्या विल्हेवाटीसाठी लागणाऱ्या निधीसंबंधी पाणीपट्टीच्या कराच्या बिलामध्ये मलनिःस्सारण कराचा समावेश करून तो कर आकारतो त्याप्रमाणे या घनकचऱ्या व्यवस्थापन विभागाचे मालमत्ता कराचे बिल बनते. त्यामध्ये घनकचऱ्याचे बिल आकारले तर त्या नगरपालिकेला उत्पन्न मिळू शकेल. कारण ज्या पद्धतीने आपण पाण्याचा संदर्भ सांडपाणी प्रक्रिया केंद्र किंवा त्याचा सिवरेज कर लावतो, शिक्षण कर किंवा ट्री सेस लावतो त्यामध्ये घनकचरा व्यवस्थापन कर आकारण्याचे प्रस्तावित करायला पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

३.२८९ समितीचे म्हणणे बरोबर असून मालमत्ता करामध्ये घनकचरा व्यवस्थापन कराचा समावेश केला पाहिजे असे मत विभागीय सचिवांनी व्यक्त कले.

३.२९० घनकचरा व्यवस्थापन कर प्रशासनाच्या नावाने प्रस्तावित करावा अशी सूचनाही समितीने केली असता विभागातर्फे करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

३.२९१ हे करीत असताना जो निधी ज्या हेडखाली जमा होईल तो निधी त्याच कामाकरिता खर्च झाला पाहिजे याचीही दक्षता घेण्यात यावी असे समितीने सूचित केले असता समितीने सूचित केले त्याप्रमाणेच करू अशी ग्वाही विभागीय सचिवांनी केली.

३.२९२ समितीने जी सूचना केली आहे की, यूजर चार्जेस लावण्यात यावेत प्रत्येक नगरपालिकेने हे यूजर चार्जेस आकारावेत असे सन २०१६ च्या उपविधीमध्येच म्हणजे मार्गदर्शक सूचनांमध्ये समाविष्ट आहे. त्याचे मॉडेल उपविधी (बाय-लॉज) तयार करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. त्यासाठी शासनाला जो दोन महिन्यांचा किंवा काही कालावधी लागेल ते आम्ही करून राज्यातील सर्व महानगरपालिका किंवा नगरपालिकांना यूजर चार्जेस आकारण्याचे मॉडेल उपविधी (बाय-लॉज) वितरीत करण्यात येतील. घनकचरा व्यवस्थापन किंवा कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी जो निधी लागतो त्याला यूजर चार्ज म्हणून संबोधण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.२९३ विभागाने हे कर आकारताना ते वसूल करण्याची जबाबदारी अधिकाऱ्यांवर सुद्धा बंधनकारक करण्यात यावी. त्यामुळे नुसते कर लावत बसल्यापेक्षा अधिकाऱ्यांनी ते वसूल केले नाही तर त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करण्याची तरतूद करावी. तसेच त्यासाठी प्रत्येक विषयाचे शीर्ष वेगवेगळे करावेत अशी सूचना समितीने विभागाला केली असता ते सुद्धा त्यामध्ये समाविष्ट करू व हे संपूर्णपणे मान्य असल्याचे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

३.२९४ घनकचरा व्यवस्थापनासंबंधी राज्यातील संपूर्ण नगरपालिकांनी केलेल्या व्यवस्थेची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने निदेश दिले त्याअनुषंगाने विभागाकडून माहिती प्राप्त झाली आहे ती **(विवरण पत्र- १)** मध्ये समाविष्ट आहे.

जैव वैद्यकीय कचऱ्याचे व्यवस्थापन :

३.२९५ जैव वैद्यकीय कचऱ्याचे व्यवस्थापन या मुद्याच्या अनुषंगाने राज्यातील ३६ नगरपालिकांची सद्यःस्थिती काय आहे याची माहिती अवगत करावे. विभागाने असे म्हटले होते की, ८ नगरपालिकांमध्ये ते खासगी स्वरुपात करतात याची आपण माहिती दिली होती आणि इतर २८ नगपालिकांमध्ये ११६१ आरोग्य केंद्रांपैकी ७१२ चीच प्रक्रिया होत आहे. स्पष्टीकरणामध्ये आपण नमूद केले आहे की, सर्व ठिकाणी सुरू आहे यासंदर्भात आता विभागाने माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता यामध्ये ज्या १७ नगरपरिषदा होत्या आणि त्यांचे पार्ट कम्प्लायन्स होत होते तिथे आता १०० टक्के कम्प्लायन्स होते. त्यानंतर ८ नगरपालिका अशा होत्या की त्यांच्याकडे आरोग्य केंद्रांची माहिती उपलब्ध नव्हती तर त्या ८ नगरपालिकांकडे आरोग्य केंद्रांची माहिती आता उपलब्ध झालेली आहे आणि त्यानुसार ते जैव कचऱ्याची ते विल्हेवाट लावत असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.२९६ नगरपालिका मुख्याधिकाऱ्याने फिडबॅक दिला आणि त्यानुसार विभागाने समितीला माहिती दिली की, हे सर्व ठिकाणी सुरू झाले आहे. द्वपण आपण डी.एम.ए. यांना सांगून त्या ठिकाणी भेट देऊन एक अहवाल मागवून घ्यावा की नेमकी वस्तुस्थिती काय आहे. विभागाला जो अहवाल मिळालेला आहे तो कागदावरच आहे. प्रत्यक्षात खाली काही झालेले नाही सी.ओ. यांनी कागदावर अहवाल दिलेला आहे त्यामुळे आपण डी.एम.ओ. यांना सूचना द्याव्यात की, साईट व्हीजिट करून मुख्याधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालाप्रमाणे ते आहे काय याची माहिती घ्यावी अशी समितीने सूचना केली. तसेच ज्या ३६ नगरपालिकांची चर्चा करताना तेथे कशाप्रकारे डेव्हलपमेंट झाली आहे हे विभागीय सचिवांनी सांगितले मात्र संपूर्ण राज्याची परिस्थिती कशी आहे आणि यासंबंधी डी.एम.ए.ची भूमिका काय आहे ते देखील समितीस सांगावे असेही समितीने निदेश दिले.

३.२९७ महालेखाकारांनी विभागाकडे अशी विचारणा केली की, विभागाने असे आश्वासन दिले होते की, महापालिका आयुक्तांना या जैव वैद्यकिय कचऱ्याबाबत विशिष्ट मार्गदर्शक तत्वे जारी करू ती मार्गदर्शक तत्वे विभागाने जारी केली आहेत काय?

३.२९८ जैव वैद्यकिय कचरा हाताळण्याबाबतची मार्गदर्शक तत्वे अस्तित्वात आहेत. ज्या पद्धतीने त्यांनी इतर कचऱ्याची विल्हेवाट करणे सन २०१८-१९ पर्यंत अपेक्षित आहे त्याबरोबरच बायो-मेडिकल वेस्ट हॅन्डलिंगची जबाबदारी त्यांच्याकडून याच कालावधीत करून घेण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.२९९ हा तर कालावधी फार जास्त होईल यासाठी इतका कालावधी देण्याचे कारण नसून हे फार धोकादायक असल्याने समितीने नमूद केले.

या जैव वैद्यकिय कचऱ्यावर प्रक्रिया स्वतः नगरपालिका करीत नाहीत.त पण बहूतेक ठिकाणी ते पी.पी.पी. टाईप काम करतात आणि एक एजन्सीला ते कंत्राट देतात आणि ती एजन्सी सर्वांकडून जैव वैद्यकिय कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावते. डी.एम.ए.मार्फत अशा सूचना देऊ की, पुढील एका वर्षाच्या आत अशा प्रकारची यंत्रणा प्रत्येक नगरपरिषदेमध्ये करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३०० महालेखाकारांनी विभागाला पुनश्च अशी विचारणा केली की, ४ वर्षापूर्वी आश्वासन दिले होते की, जैव वैद्यकिय कचऱ्यासाठी विशिष्ट मार्गदर्शक तत्वे जारी करू ती मार्गदर्शक तत्वे विभागाने जारी केली आहेत की नाहीत.

३.३०१ त्या संदर्भातील गाईडलाईन्स असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला असता महालेखाकारांनी असे विदित केले की, Not these guidelines. You are going to issue specific guidelines to the Municipal Councils. यावर विभागीय सचिवांनी त्याचे रुल्स असल्याचे समितीस अवगत केले.

३.३०२ विभागाने तीन महिन्यांमध्ये गाईड लाईन्स केल्या तरी हे काम शक्य आहे. विभागास फक्त आदेशच काढायचे असल्याचे समितीने नमूद केले तसेच संबंधित आरोग्य संस्थेस फक्त यंत्रणा उभी करण्याबाबत सांगायचे आहे आणि ती यंत्रणा उभी करण्यासाठी काहीही खर्च नसल्याचेही समितीने सांगितले असता एका एजन्शीबरोबर टायअप करून द्यायचे असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

३.३०३ याअनुषंगाने समितीने असे नमूद केले की, Their agencies are everywhere. They should implement, they should serious about these issue it is more important.

३.३०४ यावर विभागीय सचिवांनी Next six months...असे नमूद केले असता You haven't taken any action on this para. असे महालेखाकारांनी विदित केले.

३.३०५ यापुढे नगर विकास विभागाने नर्सिंग होम रुग्णालयासाठी लायसन्स देताना जैविक कचऱ्याची रुग्णालयाच्या परिसरात विल्हेवाट लावावी या अटीवरच त्यांना लायसन्स द्यावे. रुग्णालयाच्या परिसरातच जैव कचऱ्याची विल्हेवाट लावायची आहे तो कचरा उचलण्याची जबाबदारी महानगरपालिकेने घेऊ नये अशी सूचना समितीने केली असता अनेक महानगरपालिकेमार्फत नियुक्त केलेल्या ठेकेदारामार्फत जैव वैद्यकीय कचरा गोळा करण्यात येतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३०६ इनडोअर रुग्णालयातून जैव कचरा जास्त निघतो तेव्हा जिल्हा शल्य चिकित्सकांनी सर्व रुग्णालयास सहा महिन्यात स्वतःची जैव सिस्टीम उभी करण्याबाबत सांगावे. जर सहा महिन्यात ही सिस्टीम उभी केली नाही त्यांच्या रुग्णालयाची मान्यता रद्द कराव्यात असे समितीने सांगितले विभागाने लवकर गाईड लाईन्सस इश्यू कराव्यात असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी याबाबत सकारात्मक असल्याचे सांगितले.

SLBs साध्य न करणे :

३.३०७ उपरोक्त परिच्छेदा संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, ज्या नगरपरिषदांनी एसएलबी साध्य केलेले नाही त्या नगरपरिषदांची यादी दिलेली आहे. वाशिम नगरपरिषदेच्या संदर्भात लेखी उत्तरामध्ये असे नमूद केलेले आहे की, "कत्रारदाराने काम पूर्ण करणेबाबत आवश्यक तो प्रतिसाद न दिल्याने त्याचे कंत्राट रद्द करून नव्याने निविदा काढून कंपोस्टींग प्लँट उभारण्यात येत आहे." सन २०१३-२०१४ मध्ये महालेखाकार कार्यालयाने हे आक्षेप घेतले होते. आता सन २०१७ सुरू आहे परंतु अजूनही त्या संदर्भात कार्यवाही झालेली नाही. महालेखाकार कार्यालयाकडून आक्षेप नोंदविण्यात आले ते त्या त्या नगरपरिषदांना कळविण्यात आले. परंतु सर्व नगरपरिषदांनी आम्ही कार्यवाही करीत आहोत, प्रकरण अमुक एका स्तरावर आहे असे सांगितलेले आहे. परंतु प्रत्यक्षात कोणत्याही नगरपरिषदांनी नियमांची अंमलबजावणी केलेली नाही सर्व नगरपरिषदांमध्ये हीच परिस्थिती असल्याचे समितीने नमूद केले असता स्वच्छ भारत अभियानांतर्गत शासनाने ओडीएफवर लक्ष केंद्रीत करण्याचा कॉन्शस डिसीजन घेतला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३०८ शहरी भागात ओडीएफफ खूप कमी असल्याचे समितीने नमूद केले असता विभागाकडे बरेच होते. आता घनकचरा व्यवस्थापन प्राधान्याने घेण्यात येत असून विभागाने आता डीपीआर निधी आणि टाईम बाऊंड प्रोग्रामचे नियोजन केलेले आहे. शासनाच्या टाईम बाऊंड प्रोग्रामनुसार जे मुख्य कार्यकारी अधिकारी घनकचरा व्यवस्थापनाबाबत प्रगती दाखविणार नाहीत त्यांच्या गोपनीय अहवालात तशी नोंद घेण्यात येईल अशाप्रकारच्या गाईडलाईन्स काढण्यात येणार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

३.३०९ महालेखाकार कार्यालयाने ३६ नगरपरिषदांचा सर्व्हे करून त्याप्रमाणे एक-दोन वर्षापूर्वी तसा अहवाल सादर केला परंतु त्याबाबत कोणत्याही नगरपालिकेने काळजी घेतलेली दिसत नसल्याचे मत समितिने व्यक्त केले.

३.३१० महालेखाकारांनी अशी विचारणा केली की, How much things are improved between २०१३ to २०१७? यावर विभागीय सचिवांनी असे विदित केले की, घनकचरा व्यवस्थापनाबाबत जे नियम आहेत जसे की, पहिल्यांदा कचऱ्याचे वर्गीकरण करणे, ओल्या कचऱ्याचे कंपोस्ट करावे आणि सुका कचरा बाजारात विकणे किंवा पेलेटस् करावे. या पद्धतीप्रमाणे २० नगरपरिषदांमध्ये काम करण्यात येत आहे त्या नगरपरिषदांची यादी विभागाकडे आहे. तसेच विभागाला कल्पना आहे की २५० नगरपालिकेच्या तुलनेत ही संख्या फार कमी आहे.

३.३११ महालेखाकार कार्यालयाने ज्या ३६ नगरपरिषदांचा सर्व्हे करून जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये २० नगरपरिषदांचा समावेश आहे काय या समितीच्या प्रश्नाला त्या २० नगरपरिषदांमध्ये शिर्डी नगरपरिषदेचा समावेश असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३१२ शिर्डी नगरपरिषदेमध्ये फक्त सांडपाण्याची व्यवस्था झालेली आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल नगरपालिकेमध्ये घनकचऱ्याची व्यवस्था आणि विल्हेवाट अतिशय चांगल्या पद्धतीने लावण्यात येते. जर तेथे चांगल्या प्रकारे कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येत असेल तर त्याचे अनुकरण इतर नगरपरिषदांनी केले पाहिजे. तेथे कचऱ्याची कशाप्रकारे विल्हेवाट कशाप्रकारे लावली जाते याची पाहणी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना तेथे पाठवावे असे समितीने विभागास सूचित केले.

३.३१३ कागल नगरपालिकेने अतिशय चांगले काम केलेले आहे. तसेच वेंगुर्ले नगरपालिका, देवळाली प्रवराने देखील चांगले काम केलेले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३१४ महालेखाकार कार्यालयाने आक्षेप नोंदविल्यानुसार आळंदी नगरपरिषदेने काही सुधारणा केली आहे काय ? "Households covered under MSW, Segregation of MSW, Scientific Disposal of MSW"?? तीन बाबींवर विभागाने स्पष्टीकरण द्यावे असे मत महालेखाकारांनी व्यक्त केले.

३.३१५ विभागाच्या यादीत चाळीसगाव नगरपरिषदेचा समावेश असून चाळीसगाव नगरपरिषदेने ८३ टक्क्यापर्यंत सेग्रीगेशन केलेले आहे विभागाकडील यादीमध्ये हिंगणघाट नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३१६ महालेखाकार कार्यालयाने ज्या ३६ नगरपरिषदांबाबत आक्षेप नोंदविलेला आहे त्यासंदर्भातील माहिती द्यावी असे समितीने सांगितले असता महालेखाकार कार्यालयाने आक्षेप घेतलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी विभागाने सांगितलेल्या २० नगरपरिषदांमध्ये चाळीसगाव आणि शिर्डी नगरपरिषदेचा समावेश आहे. उर्वरित नगरपरिषदांबद्दल नियोजन करीत असून त्याप्रमाणे प्रगती दिसेल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

३.३१७ विभागाने जो चार्ट दिलेला आहे त्यामध्ये एसएलबी साध्य केलेली एकही नगरपरिषद नसल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले. तसेचच घंटा गाड्यांचा प्रस्ताव बऱ्याच वर्षापूर्वी सादर केलेला आहे अजून त्या गाड्या घेतलेल्या नाहीत व कर्मचारी वर्ग नसल्यामुळे काम होत नाही असेही समितीने विभागास अवगत केले.

३.३१८ घंटा गाड्यांचा प्रस्ताव मार्गी लागावयास पाहिजे कारण १४ व्या वित्त आयोगातून घंटा गाडी खरेदी करण्यासाठी स्पेसिफीक परवानगी दिलेली आहे. जिल्हाधिकारी पातळीवर यास मान्यता देण्यात येते हा विषय शासनाकडे येत नसल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

३.३१९ घनकचरा व्यवस्थापनाकरिता कर्मचारी वर्ग कमी पडत असल्याने हे काम होऊ शकत नाही त्याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे अशी पृच्छा समितीने केली असता कंत्राटी कामगारांची नियुक्ती करण्यास परवानगी असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३२० १०० टक्के बेंचमार्क म्हणून एकही नगरपरिषद नाही एमएसडब्ल्युची वसुली शून्य आहे असे समितीने निदर्शनास आणून दिले असता प्रत्येक नगरपरिषदेने वसुलीकरिता त्यांचा बायलॉज करणे अपेक्षित आहे. आता शासनच बायलॉज करून देते त्याप्रमाणे त्यांनी अंमलबजावणी करावयाची आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३२१ एसडब्ल्यूएम आणि एमएसडब्ल्यू बाबत समितीने विचारणा केली असता एसडब्ल्यूएम म्हणजे युझर चार्जेस हे युझर चार्जेसशी संबंधित भाग असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

३.३२२ युझर चार्जेसचे बील विभागाकडून आणण्यात येणार आहे तो वेगळा मुद्दा आहे परंतु सध्या जो काही नियम आहे त्या अंतर्गत त्यांची वसुली शून्य असल्याचे समितीने नमूद केले असता नगरपरिषदेने त्यांचे नियम करणे अपेक्षित असून जर नगरपरिषदेला नियम करण्यास सांगितले तर त्यांच्यामध्ये एकवाक्यता येत नाही आणि अनेक नगरपरिषदांनी असे नियम केलेले नाहीत. हा अनुभव लक्षात घेता शासन स्तरावर बायलॉजचे एक मॉडेल तयार करून ते सर्व नगरपरिषदांना वितरित करणार असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३२३ बेंच मार्कचा विचार केला तर ती कामगिरी फक्त दहा टक्क्यांवर असल्याचे समितीने विभागास अवगत केले असता सन २००० पासून २०१६ पर्यंत घनकचरा व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष झालेले आहे हे शासनाला मान्य आहे. ज्या पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन करणे आवश्यक आहे म्हणजे पहिल्यांदा कचऱ्याचे वर्गीकरण करणे, ओल्या कचऱ्याचे खत करणे आणि ड्राय वेस्टचे मटेरिअल रिकव्हरी करणे त्याप्रमाणे ते झालेले नाही. परंतु यामध्ये चांगली प्रगती करण्याचे शासनाचे नियोजन आहे. कागल येथे कचऱ्यापासून बायोगॅस करतात तेथे सेप्टीक टँक आणि ओला कचरा एकत्रित करून बायोगॅस करतात आणि त्या बायोगॅसवर वीज निर्मिती केली जाते त्यांचा प्रकल्प उत्तम सुरू आहे आणि कागल नगरपरिषद आजूबाजूच्या नगरपरिषदांचा ओला कचरा घेण्यास तयार असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले तसेच बायोगॅसवर जी वीज निर्मिती करण्यात येते ती रस्त्यांवरील दिव्यांसाठी वापरण्यात येते असाही खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३२४ नगरविकास विभागामार्फत अमूक अमूक बाबी करणार असल्याचे विभागीय सचिवांकडून समितीस सांगण्यात येत आहे तथापि समितीचा नगरविकास विभागासंबंधी अनुभव आहे तो लक्षात घेता विभागाने कितीही कमिटमेंट केली तरी त्याची कितपत अंमलबजावणी याबद्दल समिती साशंक असल्याचे समितीने मत व्यक्त केले असता It is not going to be easy It is a challenge. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३२५ यासाठी विभागास पूर्ण सिस्टीममध्ये सुधारणा करावी लागेल हे काम इतके सोपे नसल्याचे समितीने मत व्यक्त केले. तसेच बल्लारपूर नगरपरिषदेच्या बाबतीत नमूद करण्यात आले आहे की, "कचेऱ्यांच्या विलग्नीकरणाकरिता कंत्राटदाराने पुरविलेले सेग्रीगेशन मशीन निकृष्ट दर्जाचे असल्याने ते स्वीकारण्यात आले नाही. याबाबत पुढील कार्यवाही सुरू नाही." तसेच उदगीर नगरपरिषदेच्या बाबतीत नमूद केलेले आहे की, " जागा नसल्यामुळे प्रकल्प राबविणे शक्य नाही " याबाबत विभागाचे काय म्हणणे आहे अशी पृच्छा समितीने केली.

३.३२६ तसेच इतक्या नगरपरिषदांच्या कामाबद्दल आक्षेप घेण्यात आलेले असताना ना कंत्राटदारावर कारवाई करण्यात आली ना संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली कोणालाच कसलीच भीती नसल्याची बाब समितीने खेदाने विभागासमोर व्यक्त केली.घनकचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी कोट्यवधी रुपये देतो परंतु त्याचा कुठेही योग्य उपयोग होत नसल्याचेही मत व्यक्त केले.नगरविकास विभागाचे खूप मोठे बजेट आहे परंतु घनकचरा आणि सांडपाण्याच्या व्यवस्थेमध्ये बदल झालेला दिसत नाही. अनेक ठिकाणी कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. त्याबाबत शासन

कोणताही निर्णय घेत नाही. आपण कंत्राटी पद्धतीवर कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली तर त्याचे पैसे कोण देणार अशी विचारणा समितीने केली असता कंत्राटी पद्धतीवर कर्मचारी घेण्यास मुभा असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस पुनश्च दिली.

३.३२७ सफाई कामगार संवर्गचा आकृतिबंध निश्चित केलेला असेल परंतु लोकसंख्येच्या आधारावर त्याचा आढावा घेणे आवश्यक असल्याचे समितीने विभागास अवगत केले.

३.३२८ या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, जर लोकसंख्येच्या आधारावर आकृतिबंधाचा आढावा घेण्याची आवश्यकता असेल तर डीएमएला तशा सूचना देण्यात येतील.

सांडपाणी व्यवस्थापन :

३.३२९ सांडपाणी व्यवस्थापन या मुद्यासंदर्भात समितीने गोंदिया जिल्हाबद्दल विभागातर्फे काय करण्यात येणार आहे अशी विचारणा केली असता गोंदिया जिल्हा सॅपमध्ये घेतलेला आहे. सन २०१७-२०१८ मध्ये अमृत योजनेचा जो तिसरा सॅप आहे त्यामध्ये गोंदिया जिल्हा असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३३० अमृत योजनेमध्ये नगरपरिषदांना १० टक्के रक्कम द्यावी लागत होती, ती आता ५० टक्के द्यावी लागत आहे असे समितीने नमूद केले असता २५ टक्के रक्कम द्यावी लागत असून शासन त्यांना सुलभ कर्ज देते. अमृत योजनेमध्ये सुरुवातीपासून २५ टक्के रकमेची अट होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३३१ युआयडीएसएमटीला दहा टक्के होते अमृत योजनेसाठी २५ टक्के होती अशी विचारणा समितीने केली असता २५ टक्केच असून महानगरपालिकेला ५० टक्के आहे. त्यांनी विभागाला ७६ कोटी रुपये परत करावयास पाहिजे होते परंतु त्या ७२ कोटी रुपये परत केले. विभागाला चार कोटी रुपये कमी केले होते म्हणून जेथे जेथे युएलबीचे दायीत्त्व होते तेथे शासनस्तरावर आदेश काढून चौदाव्या वित्त आयोगाचा निधी त्या त्या खात्यामध्ये जमा केला. अनेक ठिकाणी युएलबी कॉन्ट्रीब्युशनचे आदेश नगरविकास विभागाच्या पातळीवर काढले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३३२ आपणास जो काही पैसा त्यांच्याकडून घ्यायचा आहे तो चौदाव्या वित्त आयोगा मधून कापणार का अशी पृच्छा समितीने केली असता तो निधी विभागाने कापला असून त्याची ऑर्डर काढली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

३.३३३ केंद्र सरकारकडूनराज्य शासनाकडे पैसे आले यामध्ये शासनाचे देखील पैसे होते हे सर्व पैसे कोणत्या फंडामध्ये जाणार असल्याबाबत समितीने विचारणा केली असता त्यांनी हे पैसे डीएमएकडे जमा केलेले आहेत. राज्यात युआयडीएसएसएमटीचे तीन प्रकल्प सुरू झाले आहेत. केंद्रशासन ते सॅपशी डजेस्ट करतील. राज्य शासनला ते पैसे परत करायला लागतील आणि केंद्र सरकार राज्य शासनाला सॅपचा पूर्ण निधी देईल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

३.३३४ मागच्या वेळेस ही योजना १० टक्क्यावर होती आता विभागाने २५ टक्क्यावर आणली आहे त्यामुळे यातून मार्ग कसा काढणार आहात अशी विचारणा समितीने केली.

३.३३५ यासंदर्भात सुलभ कर्ज उपलब्ध करून देऊ विभागही १४ व्या वित्त आयोगातून कर्ज वसूल करीत असतो अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३३६ या कामाला कधीपर्यंत सुरुवात होणार आहे या समितीच्या प्रश्नाला विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, हा सन २०१७-१८ चा हा सॅप असून तो दिनांक ३१ मार्च पर्यंत मंजूर होईल अशी अपेक्षा असून माहे एप्रिल किंवा माहे मे महिन्यात कामाची निविदा लागलीच काढता येईल.

३.३३७ ३८ शहरातील योजनेची काय परिस्थिती आहे ? पंढरपूर आणि शिर्डीचे काम पूर्ण झाले असून वाशिमची काय परिस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता वाशिमचे काम ९५ टक्के झालेले आहे.कुळगाव-बदलापूर या ठिकाणचे काम ९६ टक्के झाले आहे. पनवेलचा प्रकल्प पूर्ण झालेला आहे. नंदूरबारचे काम ९० ते ९५ टक्के झालेले आहे. इचलकरंजी येथे एसटीपीसाठी अद्यापि जागा मिळालेली नाही जोपर्यंत डब्ल्यूटीपी आणि एसटीपीच्या जागा युएसबीच्या ताब्यात येत नाही तोपर्यंत प्रकल्पाचे काम हाती घ्यावयाचे नाही असे विभागाने सांगितलेले आहे. पूर्ण प्रकल्प करून एसटीपीला जागा मिळाली नाही तर काहीच अर्थ राहत नाही. परंतु आता इचलकरंजी येथे जागेचे नियोजन होत आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३३८ गोंदिया येथे अद्यापि एसटीपीची कोणतीही व्यवस्था झालेली नसल्याचे समितीने निदर्शनास आणले असता अमृत योजनेच्या चेकलिस्टमध्ये जोपर्यंत एसटीपी आणि डब्ल्यूटीपी किंवा इएसआर असेल तर इएसआरच्या जागा महानगरपालिका किंवा नगरपालिकेच्या ताब्यात नसेल तोपर्यंत टेंडर जरी काढले तरी वर्क ऑर्डर द्यावयाची नाही असा निर्णय झालेला असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

३.३३९ गोंदिया येथे एसटीपी किंवा इएसआर जो काही असेल त्यासाठी लवकरात लवकर जागा उपलब्ध करून द्यावी. यासंदर्भात तुम्ही आतापासूनच कार्यवाही सुरू केली तर एप्रिलपर्यंत काम सुरू करता येईल असे मत समितीने व्यक्त केले असता एप्रिल,मे महिन्यात निविदा काढता येतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३४० गोंदिया नगरपालिकेने जागा घेतलेली नसून विभागाला जागा खरेदी करावी लागणार आहे. खरे म्हणजे यासाठीची जागा नगरपालिकेने उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी याबाबत सकारात्मक असल्याचे सांगितले.

३.३४१ गोंदिया येथे जागा उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात नगरविकास विभागाने गोंदिया नगरपालिकेला तसे सांगावे अलाँग विथ एमजीपी एमजीपीनेच हा सर्व प्लॅन तयार केलेला आहे. जागा नसेल तर एप्रिल मे महिन्यात टेंडर काढता येणार नसल्याचे समितीने विभागास अवगत केले.

३.३४२ नगरपालिकेत सिव्हरेज अभियंत्याची पदे निर्माण करून देणे आवश्यक आहे. प्रोजेक्ट तयार झाला तर तो चालवणार कोण ? राज्यस्तरावर पद निर्माण केली नाही तर पैसे वाया जातील असे समितीने सूचित केले असताा यासंदर्भात १५०० पदे भरण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिलेली आहे. यामध्ये एक सिव्हील इंजिनिअर असून एक पाणीपुरवठा कम सिव्हरेज म्हणजे जास्त इलेक्ट्रीकल मेकॅनिक असलेला इंजिनिअर असणार आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

३.३४३ सिव्हरेज सिस्टीम फार मोजक्या गावांमध्ये असल्यामुळे त्या ठिकाणी सिव्हरेज अभियंता स्पेशल द्यावयास पाहिजे हे काम फार क्लिष्ट आहे. विभागाने जर सिव्हरेज अभियंता दिला नाही तर खर्च केलेल्या पैशाचा काही एक उपयोग होणार नाही. ज्या ठिकाणी सिव्हरेज प्रकल्प पूर्ण झालेला आहे त्या ठिकाणी सिव्हरेज अभियंता दिला गेला पाहिजे. महापालिकेमध्ये सिव्हरेज अभियंते असल्यामुळे महापालिकेला देण्याची आवश्यकता नाही. नगरपालिकेला सिव्हरेज अभियंता देण्याची आवश्यकता असल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता सिस्टम इज कंपलिट ॲन्ड ऑपरेश्नल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३४४ ३६ पैकी किती ठिकाणी योजना मंजूर केल्या, किती ठिकाणच्या योजना पूर्ण झाल्या व किती ठिकाणी कामे सुरू आहेत याची माहिती द्यावी असे समितीने निदेश दिले असता पंढरपूर येथील प्रकल्पाचे काम पूर्ण झाले असून जालना येथे अमृत योजनेमधून प्रकल्प हाती घेतला जाणार आहे, हिंगोली येथे युआयडीएसएसएमटीचा प्रकल्प होता परंतु तो रद्द झालेला आहे. मागच्या वर्षी हिंगोली येथे नगरोत्थान अभियानामधून मंजुरी मिळालेली असून त्याचे काम सुरू आहे. वाशिम येथील काम ९५ टक्के झाले असून गोंदिया शहरातील योजनेची माहिती समितीला आहेच, काटोल येथे गोंदिया सारखाच युआयडीएसएसएमटीचा प्रकल्प होता परंतु तो झाला नसल्यामुळे त्याचे पैसे परत घेण्यात आलेले असून काटोल येथे नगरोत्थानमधून अभियानातून देण्याचे प्रस्तावित आहे. सिन्नर येथे नगरोत्थान अभियानामधून प्रस्तावित आहे,यवतमाळ व हिंगणघाट येथे अमृत योजनेमधून प्रस्तावित आहेत. लोणावळा येथे मोबिलायझेशन डव्हान्सचा मुद्दा उपस्थित झाला होता अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली.

३.३४५ ज्यांनी पैसे दिले त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे काय या समितीच्या प्रश्नाला होय मागच्याच महिन्यामध्ये विभागाला मा.मुख्यमंत्र्याची मान्यता मिळाली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३४६ विदाऊट सफिशिअंट बँक गॅरंटीचा विषय तर आहेच परंतु त्या ॲग्रीमेंटमध्ये मोबिलायझेशन ॲडव्हान्स दिला पाहिजे अशी अट नव्हती असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता संबंधितांची विभागीय चौकशी सुरू केली असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

३.३४७ नगरपालिकेमध्ये मोबिलायझेशन ॲडव्हान्स देण्याची तरतूद नाही अशी तरतूद कायद्यातच नाही. ज्या मुख्याधिकाऱ्यांनी मोबिलायझेशन डव्हान्स दिलेला आहे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याकडून वसुली सुरू केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता मोबिलायझेशनची वसुली मुख्याधिकाऱ्याकडून करण्यासाठी विभागीय चौकशीमध्ये ते सिद्ध होण्यासाठी विभागीय चौकशीचे काम सुरू करण्यात आलेले आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३४८ फौजदारी कारवाईसाठी विभागीय चौकशीची गरज लागत नाही. खरे म्हटले तर हा एक प्रकारचा अपहारच आहे व त्यासाठी विभागाने संबंधितांविरुद्ध पोलीस केस करावयास पाहिजे होती. नगरपालिकेला कोणत्याही कामासाठी मोबिलायझेशन ॲडव्हान्स देता येणार नाही अशी कायद्यामध्ये तरतूद असल्याचे समितीने अवगत केले असता नो मोबिलायझेशन ॲडव्हान्स यासंदर्भात नगरविकास विभागाने शासननिर्णय काढलेला असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली. या विषयाच्या संदर्भात विभागाला मागच्या महिन्यात मंजुरी मिळालेली आहे अशी माहितीही विभागीय सचिवांनी दिली.

३.३४९ लोणावळयामध्ये मुख्याधिकाऱ्यांनी मोबिलायझेशनचा ॲडव्हान्स देण्याचा अधिकार नसताना त्यांनी दीड कोटी रुपये दिलेले आहेत. खरे म्हणजे संबंधितावर फौजदारी गुन्हा दाखल करावयास पाहिजे होता लोणावळयाची सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असतालोणावळयासाठी पाणीपुरवठा योजना नुकतीच मंजूर केलेली आहे. या ठिकाणची पाणीपुरवठा योजना अंतिम टप्प्यात आल्यानंतर भुयारी गटार योजना मंजूर केली जाईल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. तसेच या ठिकाणच्या भुयारी गटार योजनेला दि. ३१/३/२०१० रोजी मान्यता मिळालेली होती तथापि सदर मान्यता रद्द झालेली असल्याचेही विभागीय सचिवांनी सांगितले.

३.३५० पहिल्यांदा पाणीपुरवठा योजना पूर्ण केल्याशिवाय भुयारी गटार योजना करताच येत नसल्याची बाब समितीने विभागास अवगत केली असता लोणावळयाच्या पाणीपुरवठा योजनेस या महिन्यात नगरोत्थान अभियानामधून मान्यता देण्यात आलेली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. जुने कंत्राट रद्द करून तांत्रिक मान्यता घेऊन सदर प्रस्ताव संमतीसाठी माहे नोव्हेंबर,२०१५ मध्ये आयआयटी, मुंबईला सादर करण्यात आलेला आहे अशी माहिती विभागाच्या उत्तरात नमूद केली आहे परंतु आता सन २०१७ सुरू आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता त्यांचे पहिले प्राधान्य पाणी पुरवठ्यासाठी होते माहे फेब्रुवारी,२०१७ मध्ये त्यांना ऑगमेन्टेशन ऑफ पाणीपुरवठ्यासाठी नगरोत्थान अभियानातून मंजुरी मिळालेली आहे. पाणी पुरवठ्याची योजना मार्गी लागल्यानंतर सिव्हरेज ट्रिटमेंटची मंजुरी मिळेल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३५१ स्थानिक संस्थेला जेथे जास्त मिळेल त्या ठिकाणचा ते प्लँट घेत असतात. आधुनिक तंत्रज्ञानाचा एसटीपी प्लँट कोणता घ्यावा यासंदर्भात अभ्यास करून निर्देश दिले तर बरे होईल असे समितीने विभागास सांगितले असता विभागाची एजन्सी एमजीपी आहे अगोदर कोणताही कन्सलटंट यायचा आणि त्याच्यानुसार सांगायचा जी एमजीपी आहे ती आता विभागाची पीएमसी असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

३.३५२ सर्व काम एमजीपी करते आणि पाईप विकत घेण्याचे काम नगरपालिका करते त्यामुळे असे होऊ देऊ नका. खरे म्हणजे पुर्ण योजना एमजीपीने पूर्ण करावयास पाहिजे. तसेच लोणावळयाच्या प्रकरणामध्ये क्शन घेण्यामध्ये पाच वर्षे लागली त्यामुळे हे प्रकरण पाच वर्षे कोठे रेंगाळत होते यासंदर्भात माहिती द्यावी तसेच विभागीय चौकशीचा निर्णय तीन महिन्याच्या आत समितीला कळविण्यात यावा असे निदेश समितीने दिले.

३.३५३ लोणावळयाच्या प्रकरणाची विभागीय चौकशी डीएमएला करावयास सांगतो यामध्ये एकाच चार्जची डिई होणार आहे. यामध्ये मुद्दा एवढाच आहे की, तुम्हाला अधिकार नसताना मोबिलायझेशनचा ॲडव्हान्स दिलाच कसा डीईसाठी शासनाची मान्यता मिळालेली असून ही डिई डीएमए मार्फत करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली.

३.३५४ ३६ गावांपैकी किती ठिकाणी योजना सुरू आहेत व किती ठिकाणी कामे प्रगतीपथावर आहेत याची समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता १६ गावांमध्ये योजना सुरू आहे किंवा प्रस्तावित आहेत. १७ ते ३६ गावे पाणी पुरवठ्याची मानके पूर्ण करतील आणि शासनाकडे जस जसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे त्यासाठी निधी दिला जाईल. या योजनेसाठी मोठ्या प्रमाणात पैसा लागणार आहे.एका एका शहरासाठी २००-३०० कोटी रुपये लागत असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३५५ शहरीकरण झपाटयाने वाढत आहे त्यामुळे या योजनेचे प्लॅनिंग ३० वर्षाची संभाव्य लोकसंख्या लक्षात घेऊन योजना हाती घेतलेली असल्याचेही सचिवांनी नमूद केले.

SLB साध्य न होणे :

३.३५६ साध्य न होणे या संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, शौचालयांची बांधणी,गटारांच्या सेवांची व्याप्ती,सांडपाणी प्रक्रिया या विषयावर खूपच कमी नगरपालिकेने आपले बेंचमार्क पूर्ण केलेले आहेत. ग्राहक तक्रार निवारणाची कार्यक्षमता बोगस आहे असे समितीस वाटते. २७ नगरपालिकेमध्ये चांगली व्यवस्था आहे असे विभागाचे म्हणणे आहे परंतु समितीला ते मान्य नाही विभागाने जी आकडेवारी दिलेली आहे ती प्रत्यक्षातील दिसत नाही.२७ नगरपालिकेत ग्राहक तक्रार निवारण १०० टक्के होत आहे असे विभाग सांगूच शकत नाही. तुमच्याकडे प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन तपासणी करण्यासाठीची काहीही यंत्रणा नाही. विभागाला सीईओ माहिती देतात व ती माहिती विभागाकडून समितीला देण्यात येते परंतु सिमितीतील सदस्य प्रत्यक्षात फिल्डवर काम करीत असल्यामुळे या वस्तुस्थितीची माहिती असते. परंतु विभागाने जी माहिती दिली ती वस्तुस्थितीला धरुन नाही. विभागाला डिएमए फार मजबूत करावा लागणार आहे नाही तर काहीच होणार नाही. बेंच मार्क पूर्ण करण्यासाठी विभागाला कोणता पाठपुरावा करावा लागणार आहे या ३ वर्षात कोणत्या सुधारणा झालेल्या आहेत अशी विचारणा समितीने केली.

३.३५७ आता जी यादी वाचून दाखवली त्यातील १० प्रकल्प पुर्ण झालेले आहेत,सहा प्रकल्प अमृतम योजनेध्ये मान्य करणार असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३५८ शौचालयाच्या बाबतीत काय परिस्थिती आहे ? या समितीच्या प्रश्नाला या मार्चपर्यंत शौचालयाचे काम १०० टक्के होईल व हे काम हागणदारी मुक्त महाराष्ट्र योजनेतून होईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३५९ अजून मुंबई सुद्धा हगनदारी मुक्त झालेली नसूनन सांडपाण्याचा पुनर्वापर फक्त एकाच महानगरपालिकेत झालेला आहे या चार वर्षांमध्ये कॅटेगरीजमध्ये अजून दुसरी कोणती महानगरपालिका आली आहे काय अशी विचारणा समितीने केली तसेच यामध्ये अजून कोणती कार्यपद्धत अवलंबवावी लागणार आहे याा राबविलेल्या कार्यपद्धतीची माहिती समितीला सादर करण्यात यावी. ग्राहक तक्रार निवारणाच्या संदर्भात केंद्रशासन तसेच राज्य शासन पैसे खर्च करीत असते. परंतु ही सर्व माहिती सीईओच्या माहितीवर आधारीत आहे. आपण जर ग्राहक तक्रारीची फिर्याद कॉलसेंटरवर घेतली तर तीचा चांगला फायदा होईल. महाराष्ट्रातील ग्राहक तक्रार निवारणाच्या संदर्भात कॉल सेंटर्सचे नंबर दिले तर त्यांचा

चांगला उपयोग होईल. गटाराचे झाकण निघाले असेल तर लोक कॉलसेंटरवर कॉल करून तक्रार करू शकतील. यामुळे कोठे काय झाले आहे याची माहिती तुम्हाला तात्काळ मिळेल. अशा प्रकारची तक्रार आली तर ती डायरेक्ट मंत्रालयापर्यंत जाते व कारवाई होते अशी माहिती खालच्या लोकांना राहील व त्याची त्यांना भिती राहील असे समितीने विभागास अवगत केले.

३.३६० मुख्यमंत्री कक्षातून "आपले सरकार" पोर्टलमध्ये नगरविकास विभागाला ज्या तक्रारी प्राप्त होतात त्यातील ५० टक्के तक्रारी या रस्त्यावरील खड्डयाच्या संदर्भातीलच असतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३६१ रस्त्यावर पडलेले खड्डे आणि सांडपाण्याची प्रक्रिया हे जे काही विषय आहेत त्याची तक्रार कॉलसेंटर्सवर केली तर त्याचा चांगला उपयोग होईल असे समितीने सूचित केले.

३.३६२ "आपले सरकार" या पोर्टलवर ज्या तक्रारी येतात त्या अशाच प्रकारच्या येत असतात पोर्टलवर तक्रार टाईप करावी लागते त्याच पद्धतीने लोक कॉलसेंटरवर फोन करतील अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३६३ तक्रारी कॉलसेंटरवर घेतल्या जाव्यात हा मुद्दा समितीच्या शिफारशीमध्ये घेण्याची आवश्यकता असून लोकांच्या तक्रारी डायरेक्ट येऊ द्या खरे म्हणजे खालून वरपर्यंत जी काही सिस्टिम असते ती त्यांना कळत नाही. पोर्टलवर टाईप करण्यासाठी लोकांना तेवढा वेळ सुद्धा नसतो त्यामुळे कॉलसेंटरवर तक्रारी आल्यातर त्याचा चांगला फायदा होऊ शकेल असे समितीने अवगत केले तसेच प्रत्येक माणूस पोर्टलवर जाऊ शकत नाही. कॉलसेंटरवर तक्रार गेली पाहिजे हा मुद्दा बरोबर असल्याचे समितीने विभागास सांगितले.असता पोर्टलवर अशाच प्रकारच्या तक्रारी येत असतात अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सेवा पुरविठ्याचे सनियंत्रण :

३.३६४ उपरोक्त परिच्छेदासंदर्भात चर्चा करताना समितीने असे मत व्यक्त केले की, सर्व MCs च्या व्यवस्थेची अंमलबजावणी डिएमएच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करीत आहे तथापि खरे म्हणजे डिएमए सक्षम नाही अशी स्थिती आहे. "आम्ही वेळोवेळी आढावा घेतो,विहित माहिती घेतो तांत्रिक कक्षामार्फत वेळोवेळी भेट देऊन मार्गदर्शन करतो" एवढाच विभागाचा रिप्लाय आहे. डिएमए कार्यालयाकडून महानगरपालिकेच्या कारभारावर मध्यवर्ती संनियंत्रण ठेवले जाते, प्रशासकीय व तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या अपुऱ्या संख्येमुळे नियंत्रण ठेवले जात नाही. डिएमए कार्यालयाला कर्मचारी आणि बाकीचे रिसोर्सेस नाही. डीएमए कार्यालयात प्रकल्पांचे प्रस्ताव तसेच डीपीआरच्या मंजुरीसाठी विलंब लागतो यामुळे कामांमध्ये वाढ होते. तसेच पाणीपुरवठा, घनकचरा व सांडपाणी याबाबत महानगरपालिकेकडून एसएलबी निश्चित न करण्याची कारणे व तो कमी साध्य केल्याबाबतची निर्धारणा डीएमए कार्यालयाकडून वेळेवर होत नाही. यादृष्टीने डीएमएला कार्यक्षम करावयास पाहिजे. परंतु सध्या तशी परिस्थिती नसल्याचे महालेखाकार यांचे यांचे निरीक्षण आहे असा खुलासा समितीने केला असता मागील वर्षी समितीने जेएनएनयुआरएमच्या संदर्भात साक्ष घेतली होती तेव्हा असे निदर्शनास आले होते की, शासनाचे जवळपास १३० ते १४० जुने प्रकल्प अपूर्णावस्थेत आहेत. जुने प्रकल्प पूर्ण करण्यासाठी विभागाने ओल्ड एड पेंडींग प्रोजेक्टस सेल निर्माण केला आहे. चालू वर्षी आणि पुढील वर्षाच्या काळात जुने प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून विभागाचे एक पोर्टल आहे. यावर्षी ५० प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असून ते पूर्ण करणार आहोत. पुढील वर्षी उर्वरित ८० ते ९० जुने प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले तसेच डीएमए आपल्याला माहिती देऊ शकतील की, त्यांनी पुढील वर्षी कशाप्रकारे री-ऑर्गेनाईझ केलेले आहे. एसएलबीचा मुद्दा अतिशय महत्वाचा असून ज्या नगरपालिकांनी एसएलबी प्रकाशित केले आहेत त्यांना चौदाव्या वित्त आयोगाची इन्सेंटिव्ह ग्रँट मिळते यामुळे २ वर्षांमध्ये ९० ते ९५ टक्के युएलबी हे एसएलबी प्रकाशित करीत असतात. अशाप्रकारे एसएलबी प्रकाशनामध्ये मोठी सुधारणा झाली आहे. जुने प्रकल्प पूर्ण करणे व त्यावर देखरेख करण्यासाठी विभागाकडे पूर्ण यंत्रणा आहे. डीएमए कशाप्रकारे कार्यक्षमपणे काम करीत आहेत याबाबत ते समितीला माहिती देतील अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३६५ शहरी भागामध्ये ५२ टक्के लोकसंख्या असल्यामुळे विभागाने डीएमए यांना री-ऑर्गेनाईझ करून देणे अत्यावश्यक आहे असल्याचे मत समितीने व्यक्त केले असता समितीने जो मुद्दा वेळोवेळी सांगितला होता तोच मुद्दा डीएमए यांनी विभागाला सांगितला आहे. विभागाने मागील काळात ५ राज्यस्तरीय संवर्ग तयार केले आहेत. त्यात २ प्रकारचे इंजिनिअर्स आणि ऑडिटर असे तीन संवर्ग महत्वाचे आहेत. १५०० पदे रिक्त असल्यामुळे युएलबीला सक्षम करायचे असल्यास रिक्त पदे भरणे अत्यावश्यक आहे. पूर्वीच्या शासन निर्णयानुसार सदर पदे जिल्हा स्तरावर भरली जात होती. परंतु राज्यस्तरीय संवर्ग असल्यास तो डीएमए स्तरावर भरला गेला पाहिजे. आर्थिक वर्षे संपल्यानंतर साधारणतः माहे मे ते जून महिन्यात डीएमए स्तरावर सर्व पदांची भरती हाती घेऊन सर्व नगरपालिकांना २ प्रकारचे इंजिनिअर्स आणि ऑडिटर असे तीन संवर्ग देण्याचा प्रयत्न करणार असल्याची माहिती विभागीय सचिवांनी समितीस अवगत केली.

३.३६६ समितीच्या अनुभवानुसार ऑडिटर तसेच लेखापाल वित्त विभागाकडून घेणे आवश्यक आहे जेणेकरून मोठा अपहार थांबण्यास मदत होईल असे समितीने सांगितले असताआसमितीचे म्हणणे बरोबर आहे परंतु वित्त विभागाचे असे म्हणणे आहे की, एकाच वेळी त्यांना एवढे अधिकारी देणे शक्य नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३.३६७ नगरपालिकेमध्ये नेमणूक दिलेले लोक ऑडिटर तसेच अकांऊटंटची कामे योग्य प्रकारे करीत नाहीत. त्यादृष्टीने किमान अमृत शहरांना वित्त विभागाकडून ऑडिटर तसेच अकांऊटंट देणे आवश्यक आहे. आपल्याकडे डीएमए कार्यरत आहेत परंतु आरडीएमएचे संपूर्ण अधिकार आयुक्तांकडे असतात. विभागीय कार्यालयांमध्ये आयुक्तांकडे अनेक कामे असतात अशी माहिती समितीने विभागास दिली असता विभागाचा यासंबंधी प्रस्ताव आहे परंतु अद्याप तो मंजूर झालेला नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला तसेच समितीने यासंबंधी शिफारस करावी असे मतही सचिवांनी व्यक्त केले.

३.३६८ समिती सदर विषयावर चर्चा करीत असल्यामुळे ती शिफारसच असून आरडीएमएचे बळकटीकरण करावे तसेच त्याकरिता स्वतंत्र रिजनल डायरेक्टर असला पाहिजे अशी विभागाने भूमिका घेतली पाहिजे. The Regional Director should be independent person. सांडपाण्याचे प्रकल्प करीत असताना त्याकरिता इटीसी, इएसआर किंवा इतर प्लांटकरिता आवश्यक असलेली जागा जिल्हाधिकाऱ्यांनी उपलब्ध करून देण्यासंबंधी विभागाने शासन निर्णय काढावा अशी महालेखाकार यांची सूचना असून ती अतिशय रास्त असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

३.३६९ सॉलिड वेस्ट, डिस्पोझल फॅसीलिटीजकरिता जागा उपलब्ध नसल्यामुळे ते होऊ शकले नाहीत अशा परिस्थितीत विभागाकडून त्यांना निधी कामासाठी देण्यात येत आहे Unless they have land, they will not be able to establish sewage disposal plant विचारणा महालेखाकारांनी केली. तसेच ४ वर्षांपासून योजना मंजूर असताना सुद्धा आतापर्यंत इटीपीकरिता जागा निश्चित केली नसल्याचेही समितीने विभागाच्या निदर्शनास आणले.

३.३७० विभागाने आता यात सुधारणा केली आहे आता निविदा काढल्यानंतर जोपर्यंत जागा ताब्यात नाही तोपर्यंत वर्कऑर्डर देता येत नाही अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

३.३७१ गोंदियाच्या संदर्भात सांगायचे झाल्यास सर्व निधी आल्यानंतर सुद्धा इटीपीकरिता जागा उपलब्ध होऊ शकली नाही हे मोठे दुर्दैव असल्याचे समितीने खेदाने मत व्यक्त केले. तसेच नवीन डीपी करीत असताना शासनाची जागा नसल्यास तेथे आरक्षण करण्यासंबंधीच्या मुद्याचा सुद्धा समावेश करावा. यासंबंधी त्यांना लेखी पत्र द्यावे जेणेकरून भविष्यात नवीन डीपी तयार करताना खाजगी जागा असल्यास ती संपादित करता येईल असे समितीने विदित केले.

अभिप्राय व शिफारशी :

निवडक नगरपरिषदांमध्ये मूलभूत नागरी सेवांचा पुरवठा :

४.१ राज्यात नागरी क्षेत्रासाठी नगरपरिषदा निर्माण करण्यात आलेल्या असून या महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायत आणि औद्योगिक वसाहती अधिनियम, १९६५ (MMC अधिनियम) द्वारे शासित केल्या जातात. सामाजिक व आर्थिक विकासासाठी नियोजन करणे तसेच पेयजल पुरवठा, सांडपाण्याची विल्हेवाट आणि घनकचरा व्यवस्थापन, पथदिवे, अग्निशमन सेवा पुरविणे, जन्म मृत्युची नोंद ठेवणे, इमारतींचे विनियमन, रस्ते, उद्याने व बगीचे इत्यादींची देखभाल या सारख्या नागरी सेवा पुरविणे हे नगरपरिषदांचे प्रमुख कर्तव्य असून ते बंधनकारक आहे. माहे मार्च, २०१५ मध्ये राज्यात २३८ नगरपरिषदा कार्यरत होत्या. नगरपरिषदांना अधिनियमांतर्गत मालमत्ता कर, पाणी आकार, भाडे पट्टी आणि भाडे उत्पन्न आणि इतर किरकोळ शुल्क आकारण्याचे व संकलित करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. महाराष्ट्र शासनाकडून भरपाई अनुदाने (रद्द केलेल्या जकाती ऐवजी), यात्रेकरुंवरील कर आणि अन्य अनुदाने देखील नगरपरिषदांना वितरीत करण्यात येतात. या शिवाय नागरी पायाभुत सुविधांची निर्मिती व वाढ यासाठी नगरपरिषदांना केंद्र व राज्य शासनाकडून भांडवली सहाय्य अनुदान देखील प्राप्त होतात. महालेखापालांनी नगरपरिषदांकडून पुरविल्या जाणाऱ्या ३ मुलभूत नागरी सेवा जसे पाणी पुरवठा, घनकचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी व्यवस्थापन यांची तपशिलवार छाननी केली. नगरपरिषदांकडून पुरविण्यात येणाऱ्या या ३ नागरी मुलभूत सेवांचे सन २०११ ते २०१४ या कालावधीसाठी माहे फेब्रुवारी ते ऑगस्ट, २०१४ दरम्यान लेखापरिक्षण करण्यात आले. यासाठी संचालक, नगरपालिका प्रशासन (DMA) यांचे अभिलेखे तपासण्यात आले व राज्यातील २३८ नगरपरिषदांपैकी ३६ नगरपरिषदांची सखोल तपासणीसाठी निवड करण्यात आली. महालेखापालांनी सदर लेखापरिक्षणामध्ये पाणी पुरवठा सेवा, निर्धारीत मात्रेत पाणी पुरवठा न होणे, पाणी पुरवठा वाढ करण्यासाठी योजना पूर्ण होण्यातील विलंब, लहान व मध्यम घरांसाठी नागरी मुलभूत सेवा विकास योजने (UIDSSMT) अंतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी, MSJNA अंतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी, सेवास्तरीय बेंच मार्क, पाणी पुरवठा सेवांवरील खर्चाची कमी वसुली, घनकचरा व्यवस्थापन, कत्तल खान्यांचे अवैध कार्यचलन, जैव वैद्यकीय कचऱ्याचे व्यवस्थापन, सेवास्तराच्या बेंचमार्क (SLB's) साध्य न करणे, सांडपाणी व्यवस्थापन या शिर्षाखाली विविध आक्षेप नोंदविलेले आहेत. या संदर्भात लोकलेखा समितीसमोर विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली.

"निर्धारीत मात्रेत पाणीपुरवठा न होणे"

४.२ महाराष्ट्र नगरपालिका, नगरपंचायत आणि औद्योगिक कायद्यानुसार प्रत्येक नागरिकाला ७० प्रती व्यक्ती प्रती दिवस (LPCD) पाणीपुरवठा करण्याचे बंधनकारक होते. तथापि, लेखापरिक्षणात असे आढळून आले की, निवड केलेल्या ३६ पैकी १७ नगरपरिषदांमध्ये सन २०१३-२०१४ दरम्यान सरासरी पाणी पुरवठा २५ ते ६९ LPCD दरम्यान होता. त्यापैकी १२ नगरपरिषदांनी पाणी पुरवठा वाढविण्याचे काम हाती घेतले होते. उर्वरीत ५ नगरपरिषदांनी पाणीपुरवठा वाढविण्यासाठी कोणताही विस्तृत प्रकल्प अहवाल,(DPR) संचालक, नगरपालिका प्रशासन यांना (DMA) सादर केला नव्हता. या १७ नगरपरिषदांमध्ये निर्धारीत प्रमाणात पाणीपुरवठा न होण्याचे मुख्य कारण म्हणजे पाणी वितरण संयंत्रणेतून मोठ्या प्रमाणात गळती होणे, पाणी प्रक्रिया संयंत्राचे (WTP) आणि प्रस्थापित केलेल्या पंपींग यंत्राची कार्यक्षमता कमी होणे, अनियमित विद्युत पुरवठा होणे हे होते असे लेखापरिक्षकांच्या निदर्शनास आले. या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. **विभागीय सचिवांनी आक्षेपाधीन १७ नगरपरिषदांमध्ये होत असलेल्या पाणीपुरवठ्याबाबत सादर केलेली आकडेवारी ही वस्तुस्थितीवर आधारीत नाही. सदर आकडेवारीची विभागाने फेरतपासणी करणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे. त्याकरीता धरणातून उचललेले पाणी, लोकसंख्या, त्या ठिकाणी झालेला विजेचा वापर (Consumption) या बाबी विचारात घेवून फेरतपासणी करावी. ज्या मुध्याधिकाऱ्यांनी चुकीची आकडेवारी शासनाला सादर केली आणि शासनाच्या माध्यमातून समितीला सादर करण्यात आली त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. पाणीपुरवठा संदर्भात जी आकडेवारी विभागाने सादर केलेली आहे. त्यानुसार प्रत्यक्ष स्त्रोतामधून (Source) किती पाण्याची उचल केली आणि वाटप किती पाण्याचे होते आहे, या आकडेवारीत तफावत आहे. टाकीपासून मुख्य वाहिनीने प्रत्यक्ष किती पाणीपुरवठा केला जातो ती आकडेवारी महत्वाची आहे. टाकीपासून वितरणापर्यंत पाण्याची प्रत्यक्ष गणना केली पाहिजे. मुळ स्त्रोतापासून उचलण्यात आलेल्या प्रक्रिया न केलेल्या पाण्याच्या गणनेनुसार (Raw Water) पाणीपुरवठ्याच्या आकडेवारीची गणना करणे संयुक्तिक नाही. या उपलब्ध पाण्याचा साठा, पाण्याचे वितरण, येणारा खर्च, त्याचा नागरिकांना होणारा लाभ व या सर्व माध्यमातून प्राप्त होणारा महसूल याचे प्रत्यक्ष नियोजन व ताळमेळ हे अचूक करणे पूर्णतः शक्य असतांना अशा नियोजनाचा अभाव दिसून येतो. याबाबत शासनाने ठोस उपाययोजना करावी तसेच नगरपरिषदेची आर्थिक स्थिती विचारात घेता स्थानिक स्वराज्य संस्थांना पाणीपुरवठा योजनेचा खर्च व इतर विकास योजनांमधील २५ टक्के निधीचा हिस्सा भरण्याची त्यांची आर्थिक क्षमता नाही. त्यामुळे सदर हिस्स्याची रक्कम २५ टक्के वरुन अमृत शहर योजनेकरीता ही १० टक्के वर आणण्याबाबत शासन स्तरावरुन विचार व्हावा, जेणेकरुन नगरपरिषदांना या योजनेचा लाभ घेणे शक्य होईल अशी समितीची शिफारस आहे.**

४.३ विभागीय सचिवांनी सादर केलेल्या खुलाशानुसार **सर्व नगरपरिषदांना सॉफ्ट लोन उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच मुख्याधिकाऱ्यांनी शासनाने ठरवून दिलेल्या दरानुसारच पाणीपट्टी वसुल करणे अत्यावश्यक आहे. सदर पाणीपट्टी नियमित वसुल झाल्यास योजनेची देखभाल दुरुस्ती, विद्युत देयकांची अदायगी या बाबींकरीता निधी उपलब्ध होवू शकेल. योजना मंजूर झाल्यानंतर नगरपरिषदा त्यांच्या योजना मंजुरीपूर्वी मान्य केलेल्या ठरावाचे पालन करीत नाही ही गंभीर बाब आहे व त्यामुळेच योजनेचे ऑपरेशन**

व देखरेख (मेंटेनन्स) होवू शकत नाही, परिणामी नागरिकांना निर्धारीत पाणीपुरवठा केला जात नाही. नगरपरिषदा आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवायच्या असतील तर त्या नगरपरिषदांना वेगवेगळया माध्यमातून प्राप्त होणाऱ्या महसूलाबाबत प्रशासन स्तरावरुन सातत्य ठेवणे अत्यंत आवश्यक असून अशा प्रकारच्या महसूलात खंड पडल्यास या नगरपरिषदांची आर्थिक शिस्त व व्यवस्था ढासळण्याची पूर्ण शक्यता आहे. यास्तव मुख्याधिकाऱ्यांनी योजना मंजुरीपूर्वी मान्य केलेल्या ठरावानुसार पाणीपट्टी वसुली करण्याबाबत विभागाकडून नगरपरिषदांना सक्ती करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

४.४ राज्यातील बहुतांश नगरपरिषदांमध्ये पाणी मीटर बसविण्यात आलेले नाहीत. राज्यातील सर्वच नगरपरिषदांमध्ये पाणी मीटर बसविण्याची व्यवस्था करण्यात यावी अशी सूचना समितीने केल्यानंतर दि. ०१ एप्रिल २०१७ पासून याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले होते. त्यानुसार विभागाने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

४.५ महालेखापालांनी काढलेल्या अनेक आक्षेपांत विस्तृत चर्चा सुरू असतांना या नगरपरिषदांच्या कामाच्या पद्धतीबाबत उदाहरणादाखल चर्चा करताना समितीने निदर्शनास आणून दिले की, विभागाने गोंदीया नगरपरिषदेमध्ये १३५ LPCD पाणी पुरवठा होत असल्याचा अहवाल समितीस सादर केला. सदरची माहिती वस्तुस्थितीवर आधारीत नाही. गोंदिया नगरपरिषदेतील पाणीपुरवठा योजनेकरीता १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून रु. १८ कोटीची प्रशासकीय मान्यता दिली असतानासुद्धा काम अद्यापही पूर्ण झालेले नाही. अद्यापही ३२ कि.मी. ची पाईपलाईन पूर्ण झालेली नाही. परिणामी १० ते १५ टक्के लोकांना अद्यापही पाणी मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. विभागास ज्या अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती दिलेली आहे त्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे व त्यांचेविरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी सूचना साक्षी दरम्यान समितीने दिली असता विभागीय सचिवांनी याबाबत सहमती दर्शविली. तथापि, त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अद्यापही समितीस सादर केलेला नाही. विभागाने संबंधित महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांवर केलेल्या कारवाईचा अहवाल तसेच कार्यवाहीस विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सुद्धा कारवाई करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

"पाणीपुरवठ्यात वाढ करण्यासाठीच्या योजना पूर्ण होण्यातील विलंब" :

४.६ महालेखापालांनी निवड केलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी २० नगरपरिषदा अस्तित्वात असलेल्या पाणीपुरवठा क्षमतेच्या ७० प्रती व्यक्ती प्रती दिवस (LPCD) किंवा १३५ LPCD इतकी वाढ करण्यासाठी लहान व मध्यम शहरांसाठी नागरी मुलभूत सेवा विकास योजनेअंतर्गत (UIDSSMT), महाराष्ट्र सुजल विकास अभियान (MSNA) आणि महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (MSJNA) अंतर्गत २१ प्रकल्पांची माहिती आक्षेपात नमूद केलेली आहे. त्यानुसार मंजूर २१ प्रकल्पांपैकी फक्त ७ प्रकल्प पूर्ण झाले असून १४ प्रकल्प प्रगतीपथावर असल्याचे लेखापरीक्षणात दिसून आले. या संदर्भात महालेखापालांनी खालील आक्षेप नोंदविला :—

४.७ UIDSSMT अंतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी.—लहान व मध्यम शहरांसाठी नागरी मुलभूत सेवा विकास योजनेअंतर्गत (UIDSSMT) १३ प्रकल्पांचा खर्च विस्तृत प्रकल्प (DPR) प्रमाणे एकूण रु.५६३.८२ कोटी एवढा असून त्यातील केंद्र शासन, राज्य शासन आणि नगरपरिषदांनी अनुक्रमे ८०:१०:१० या प्रमाणात खर्च करावयाचा होता. परंतु प्रकल्पांना मंजुरी देण्याकरीता नोडल एजन्सीचा (DMA) आणि राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या (SLSC) स्तरावर विलंब झाल्यामुळे अंदाजित किंमत रु.५६३.८२ कोटी वरुन वाढून रु.८५२.५६ कोटी इतकी झाली. विलंबामुळे झालेल्या या वाढीव रक्कम रु.२८८.७४ कोटीचा भार केवळ राज्य शासन व नगरपरिषदांना सोसावा लागला. राज्य शासनास रु.१४४.३७ कोटी व नगरपरिषदांना रु.१४४.३७ कोटी या प्रमाणात हा भार सोसावयाचा होता. संचालक, नगरपालिका प्रशासन (DMA) आणि राज्यस्तरीय सुकाणू समिती (SLSC) च्या स्तरावरील मंजुरीच्या प्रक्रियेतून विलंब टाळून सदर अतिरिक्त आर्थिक भार टाळता आला असता व सदर निधी अन्य विकास कामांकरीता वापरता आला असता. या शिवाय नगरपरिषदांनी हाती घेतलेल्या १३ प्रकल्पांपैकी ५ प्रकल्प पूर्ण करण्यास १० ते ४० महिन्यांचा विलंब झाला होता असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. या संदर्भात लोकलेखा समितीच्या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. चर्चे दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, नगरपरिषदांमध्ये राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनेतील पाईप खरेदीची योजना कार्यान्वयनाची कार्यवाही वेगवेगळ्या स्तरावरुन करण्यात येते. **नगरपरिषदा दर करारानुसार पाईपची खरेदी करुन टाकतात, योजना वेळीच पूर्ण होवू न शकल्यामुळे खरेदी केलेले पाईप दीर्घकाळ पडून राहतात, या शिवाय दर कराराने खरेदी केलेल्या पाईपची किंमत खुल्या बाजारातील पाईपच्या किंमतीपेक्षा जास्त असते. सद्यःस्थितीत बाजारातील पाईपच्या किंमतीत होणारी घट विचारात घेता अशाप्रकारची खरेदी ही जुन्याच जिल्हादरसूचीप्रमाणे (DSR) करण्यात येत असेल तर ती बाब योग्य नाही. शासनाचे आर्थिक हित कशात आहे हे पाहण्याची पूर्ण जबाबदारी ही प्रशासनाचीच आहे. विभागाने वेळोवेळी बाजारातील किंमतीचा अंदाज घेवून तसेच सुधारीत जिल्हादरसूचीच्या DSR च्या आधारे तीन-तीन महिन्यांकरिता आवश्यक पाईपच्या खरेदीबाबत कार्यवाही करावी. राज्य शासनाच्या अमृत शहर पाणीपुरवठा योजनेमध्ये उपलब्ध होणारा सर्वसाधारणतः रु. ७००० कोटी निधी विचारात घेता त्यामधील पाईप खरेदीसाठी शासनाकडून प्रचलित निविदा पद्धतीचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. विभागाने समितीच्या निदेशानुसार पाईपच्या खरेदीकरिता निविदा पद्धतीबाबत ठोस उपाययोजना करावी संचालक, नगरपालिका प्रशासन (DMA) आणि राज्यस्तरीय सुकाणू समिती (SLSC) च्या स्तरावर ज्या अधिकाऱ्यांच्या कामकाजातील हलगर्जीपणामुळे विलंब झाला व राज्य शासन आणि नगरपरिषदांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागला त्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

"महाराष्ट्र सुजल निर्माण अभियान (MSNA) अंतर्गत प्रकल्पाची अंमलबजावणी"

४.८ हिंगणघाट नगरपरिषदेमधील पाणीपुरवठा प्रकल्प क्षमतेत वाढ.—हिंगणघाट नगरपरिषदेसाठी साध्या पाण्याचा मुख्य स्त्रोत म्हणजे वना नदी होती. त्यासाठी सन १८८३ पासून केटीवेअर अस्तित्वात होते. पुरामुळे केटीवेअरला हानी पोहचल्यामुळे पाण्याची गरज भागविण्यासाठी नदीतील पाण्याची आवश्यक पातळी कायम राखण्यासाठी दरवर्षी उना नदीवर तात्पुरते बंधारे बांधण्यात येतात. हिंगणघाट नगरपरिषदेकरिता १३५ प्रती व्यक्ती प्रती दिवस (LPCD) इतक्या पाण्याची मागणी पूर्ण करण्याकरीता महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र सुजल निर्माण अभियान (MSNA) अंतर्गत रु.५.१८ कोटी रकमेच्या प्रकल्पास मंजुरी दिली. ज्यामध्ये क्षतीग्रस्त केटीवेअर ऐवजी नवीन केटीवेअर बांधणे, नवीन विहिर व निरिक्षण कक्ष बांधणे या बाबी अंतर्भूत होत्या. मध्यवर्ती संकल्पचित्र संस्था, नाशिक (CDO) यांनी केटीवेअरचे संकल्पचित्र माहे एप्रिल, २००८ मध्ये तयार केले होते आणि केटीवेअरच्या शिरावा नदीच्या बंधाऱ्याला बळकटी आणण्यासाठी पुरेशा दगडाच्या तुकड्याचा भार असलेली संरक्षण भिंत बांधण्याचे सुचविले होते. परंतु मध्यवर्ती संकल्पचित्र संस्था, नाशिक (CDO) नी सुचविल्याप्रमाणे संरक्षण भिंत बांधण्याची बाब विचारात न घेता हिंगणघाट नगरपरिषदेने कामाचे अंदाजपत्रक तयार केले आणि माहे जुलै, २००९ मध्ये अंदाजपत्रकाला तांत्रिक मान्यता दिली. ज्यामध्ये संरक्षण भिंतीचा समावेश नव्हता. हिंगणघाट नगरपरिषदेने माहे एप्रिल, २०१० मध्ये केटीवेअरच्या बांधकामाचे कंत्राट रु.४.९२ कोटीस दिले व माहे ऑक्टोंबर, २०११ पर्यंत हे काम पूर्ण करावयाचे होते. सदर कामासाठी माहे मे, २०१३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. परंतु बांधकाम सुरू असतानाच माहे जून, २०१२ मध्ये अतिपर्जन्यवृष्टी झाल्यामुळे केटीवेअरच्या उर्ध्व भागावरील नदीच्या काठावरील ३० ते ४० मीटरचा भाग वाहून गेला. माहे जून, २०१२ पर्यंत नवीन केटीवेअरचे ९० टक्के काम पूर्ण झाले होते व त्यासाठी कंत्राटदाराला रु.५.३४ कोटी प्रदान करण्यात आले होते. उर्वरीत १० टक्के काम पूर्ण करण्यासाठी नगरपरिषदेने राज्य शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाला संरक्षण भिंत आणि भारामुळे आवश्यक झालेल्या अतिरिक्त कामासाठी रु.१०.३७ कोटीचे नवीन अंदाजपत्रक सादर केले. अशाप्रकारे नदीचा काठ बळकट करण्यासाठी संरक्षण भिंत बांधण्याबाबत मध्यवर्ती संकल्पचित्र संस्था, नाशिक (CDO) नी केलेली सूचना नजरेआड केल्यामुळे रु.७.२० कोटीचा अतिरिक्त खर्च आणि १७ महिन्याचा विलंब तर झालाच शिवाय हिंगणघाट नगरपरिषदेमधील १.०२ लाख नागरिकांना १३५ LPCD इतक्या वाढीव पाणीपुरवठ्याच्या लाभापासून १७ महिने वंचित राहावे लागले असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला. याबाबत समितीने विचारणा केली की, हिंगणघाट नगरपरिषदेत पाणीपुरवठा क्षेत्राची वाढ करण्याबाबत कंत्राटदाराशी नगरपरिषदेने केलेल्या करारातील अटी शर्ती नुसार काम झालेले नाही. याबाबत विभागाने खुलासा करावा. सद्य:स्थितीत हिंगणघाट येथील कामाची परिस्थिती काय आहे, मध्यवर्ती संकल्पचित्र संस्था, नाशिक (CDO) नी सुचविल्याप्रमाणे संरक्षण भिंत बांधणे आवश्यक असताना ती का बांधण्यात आली नाही या संदर्भात खुलासा करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, मध्यवर्ती संकल्पचित्र संस्था, नाशिक (CDO) यांनी फक्त गाईड वॉल बांधावी असे सुचविले होते. त्यानुसार गाईड वॉल बांधण्यात आली आहे. तेथे अस्तराची भिंत (रिटेनिंग वॉल) बांधण्यात आलेली नव्हती. मूळ आराखड्यामध्ये सुद्धा अस्तराची भिंत (रिटेनिंग वॉल) बांधणे प्रस्तावित नव्हते. यापूर्वी पुर्ण झालेले काम हे आराखड्याप्रमाणेच केलेले होते. त्या संदर्भातील छायाचित्रे विभागाकडे उपलब्ध आहेत. माहे जून, २०१२ च्या अतिवृष्टीमुळे केटीवेअरच्या उर्ध्व भागावरील नदीच्या काठावरील ३० ते ४० मीटरचा भाग वाहून गेला. त्यानंतर विभागाच्या अभियंत्यांनी तपासणी केली व संरक्षण भिंत बांधावी असे सूचित केलेले होते. या संदर्भात समितीने स्पष्ट केले की, महालेखापालांनी उपस्थित केलेले मुद्दे व विभागीय सचिवांनी सादर केलेला खुलासा विचारात घेता संरक्षण भिंत आणि गाईड वॉल या दोन्ही बाबी भिन्न आहेत. पुराचे पाणी आले तर त्यापासून संरक्षण करण्याकरिता संरक्षण भिंत मुळ आराखड्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक होते. **विभागाचा आराखडा सदोष असल्याचे दिसून येते. सदोष आराखडा (फॉल्टी डिझाईन) बनविणाऱ्या अधिकाऱ्यांवर अद्यापपावेतो कोणतीही कारवाई केलेली नाही. सदर चुकीच्या आराखड्यामुळे शासनास जवळपास रु.७.२० कोटी एवढा अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. तसेच हिंगणघाट नगरपरिषदेमधील १.०२ लाख नागरिक १३५ LPCD इतक्या वाढीव पाणीपुरवठ्याच्या लाभापासून १७ महिने वंचित राहिलेले आहेत ही वस्तुस्थिती विचारात घेता सदोष आराखडा बनविणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी तसेच सदरहू प्रकरणी नगरपालिकांच्या अधिकाऱ्यांविरुद्धही कारवाई करण्यात यावी व बंधाऱ्यासाठी ३ महिन्यांच्या आत स्थिरता प्रमाणपत्राचे (Stability Certificate) पैसे भरुन ते प्रमाणपत्र प्राप्त करावे अशा सुचना समितीने साक्षी दरम्यान दिलेल्या होत्या. तथापि, नगरपरिषदेने स्थिरता (Stability) तपासणीचे पैसे अद्याप भरलेले नाहीत व प्रमाणपत्र देखील प्राप्त केलेले नाही ही बाब समितीच्या नंतरच्या बैठकीत निदर्शनास आली. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त करुन विभागाने देय रक्कम त्वरीत भरुन मध्यवर्ती संकल्पचित्र संस्था, नाशिक (CDO) चा अहवाल प्राप्त करावा व त्यानुसार पुढील कार्यवाही करावी व हिंगणघाट नगरपरिषदेअंतर्गत नागरिकांना १३५ LPCD चा पाणीपुरवठा होईल याची दक्षता घ्यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

"अक्कलकोट नगरपरिषदेमधील पाणीपुरवठा क्षमतेची वाढ" - निरंक

"MSNA अंतर्गत केलेली सुधारणांची कामे"

४.९ MSNA हा सुधारणांना प्राधान्य देणारा कार्यक्रम आहे. सुधारणात्मक उपाययोजनांच्या मानकांवर भर देवून अखंड पाणीपुरवठा करण्याबरोबरच उत्कृष्ट जल व्यवस्थापनासाठी शाश्वत संस्थात्मक व्यवस्था करण्याचे अंतिम लक्ष या कार्यक्रमाद्वारे साध्य करावयाचे आहे. सुधारणा कामांमध्ये (१) पाण्याच्या गरजेचा आढावा घेण्यासाठी आणि अवैध जोडण्यांचा शोध लावण्यासाठी उपभोक्ता संरक्षण करणे, (२) पाणी आणि विजेचे लेखापरिक्षण, (३) डिजिटल माहितीशी जोडलेल्या भौगोलिक माहिती यंत्रणेमार्फत (GIS) जलविद्युत नकाशा तयार करणे जो

डिजिटल डेटाबेसशी जोडला असेल, (४) कार्यक्षम पाणी वितरण जाळे प्रस्थापित करण्यासाठी जल व्यवस्थापनाचा नमुना तयार करणे आणि (५) घाऊक प्रमाणात वापरलेल्या पाण्यासाठी मीटर बसविणे/प्रवाह मीटर बसविणे यांचा समावेश होतो. लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले की, ३६ नगरपरिषदांपैकी २७ नगरपरिषदांमध्ये माहे जुलै, २००९ ते माहे मार्च, २०१३ या कालावधीत महाराष्ट्र सुजल निर्माण अभियान (MSNA) अंतर्गत रु.३३.५७ कोटींची सुधारणा कामे मंजूर करण्यात आली होती. माहे ऑक्टोबर, २०१२ पर्यंत २७ नगरपरिषदांमध्ये रु.१०.८० कोटी खर्च करण्यात आला. तथापि, २४ नगरपरिषदांपैकी ९ नगरपरिषदांमध्ये उपभोक्ता संरक्षण झालेले नव्हते, १० नगरपरिषदांमध्ये पाणी व वीज लेखापरिक्षण झाले नाही. ८ नगरपरिषदांमध्ये भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) नकाशे तयार केलेले नव्हते व १४ नगरपरिषदांमध्ये जल व्यवस्थेचा नमुना तयार करण्यात आलेला नव्हता. मनमाड नगरपरिषदेमध्ये पाणी वितरण जाळे वाढविण्यासाठीचा प्रकल्प महाराष्ट्र शासनाने माहे फेब्रुवारी, २००९ मध्ये मंजूर केला होता. सदर प्रकल्पास रु.४.७९ कोटी एवढा खर्च अपेक्षित होता. तथापि, महाराष्ट्र शासनाने रु.१.४१ कोटींची विविध सुधारणांची कामे माहे ऑगस्ट, २००९ मध्ये मंजूर केली होती. मनमाड नगरपरिषदेने माहे ऑगस्ट, २००९ मध्ये रु.४.१० कोटीचे नवीन वितरण जाळे (१६.२९ कि.मी.) प्रस्थापित करण्याचे काम हाती घेतले होते तर जल व्यवस्थेचा नमुना करण्यासंबंधातील सुधारणा अहवाल मात्र ३२ महिन्यानंतर म्हणजे माहे मार्च, २०१२ मध्ये आला. माहे जानेवारी, २०१२ मध्ये वितरण जाळ्याचे काम ९५ टक्के पूर्ण झाले होते. अशाप्रकारे महाराष्ट्र शासनाने सुधारणांची कामे पूर्ण होण्याआधीच वितरण जाळ्याचे काम हाती घेणे हे योजनेच्या मार्गदर्शक तत्वाशी विसंगत होते. असे नाही तर सुधारणा अहवालातील वितरण जाळ्याच्या कार्यक्षमतेच्या सुधारणेसाठी जल व्यवस्थेच्या नमुना संबंधातील विनिर्दीष्ट केलेल्या शिफारशीचा नगरपरिषद वापर करू शकली नाही. तसेच माहे डिसेंबर, २०१४ पर्यंत सुधारणा कामावर केलेला रु.२० लाखांचा खर्च निष्फळ ठरला. याशिवाय बिलींग मॉड्युलची उपलब्धता असताना सुद्धा उमरखेड, काटोल, नरखेड, सिल्लोड या चार नगरपरिषदांनी सुधारणा कामांच्या अंतर्गत माहे ऑगस्ट, २००९ ते माहे ऑक्टोबर, २०१३ दरम्यान पाण्याचे संगणकीकृत देयक जारी करुन व संकलित करुन यासाठी संगणक आज्ञावली प्राप्त करण्यासाठीचा रु.३२ लाखांचा खर्च निष्फळ ठरला. सुधारणा कामांसंदर्भात महालेखापालांनी नमूद केलेल्या उपरोक्त आक्षेपाबाबत समितीच्या बैठकीत विभागीय सचिवांनी अद्ययावत अहवाल सादर केला व उस्मानाबाद, पंढरपूर, फलटण, उदगीर, उरण, खामगांव, जालना, अकोट, हिंगोली, अक्कलकोट, सावंतवाडी, शिर्डी, चाळीसगाव, रत्नागिरी येथील कामांची सद्यःस्थिती समितीच्या निदर्शनास आणली. याशिवाय येथील वितरण व्यवस्थेचे हायड्रॉलिक मॉडेलींगबाबतही वस्तुस्थिती समितीच्या निदर्शनास आणली. भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) मध्ये ८ नगरपरिषदांपैकी ५ नगरपरिषदांचे काम पूर्ण झालेले असून २ नगरपरिषदांचे काम रद्द केलेले आहे. उर्वरीत १ नगरपरिषदेचे कामही ७५ टक्के पूर्ण झालेले आहे. पाणी, वीज, लेखापरिक्षण ही बाब १० नगरपरिषदांमध्ये होती. त्यातील ५ नगरपरिषदांमध्ये लेखापरिक्षणाची कार्यवाही पूर्ण झालेली आहे, २ ठिकाणी रद्द करण्यात आलेली आहे व २ ठिकाणी लोकहिस्सा भरलेला नाही. उर्वरीत १ नगरपरिषदेचे ४० टक्के काम पूर्ण झालेले असून उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे. उपभोक्ता संरक्षण सुद्धा ९ पैकी ४ नगरपरिषदेत काम पूर्ण झालेले आहे. २ नगरपरिषदेत कामे रद्द केलेली आहेत. तर उर्वरीत २ नगरपरिषदेत काम ९५ टक्के पूर्ण झालेले आहे. एका नगरपरिषदेने काम पूर्ण केलेले आहे. परंतु स्वहिस्सा भरलेला नसल्याने त्या नगरपरिषदेला पैसे देता आलेले नव्हते. उमरखेड, काटोल, नरखेड व सिल्लोड या नगरपरिषदांमध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे (KDMC) मॉडेल उशिराने क्रियान्वीत (Implement) झाले. याबाबत खुलासा सादर करताना विभागीय सचिवांनी स्पष्ट केले की, काही ठिकाणी माहिती भरण्याकरिता यंत्रचालकाची (Data Entry Operator) अडचण होती, काही बिलींग मॉड्युलला वेळ लागला, त्यामुळे विलंब झालेला आहे. परंतु, आता सर्व ठिकाणी ही कामे सुरू आहेत. विभागीय सचिवांच्या उपरोक्त खुलाशाअंती समितीने सूचित केले की, **लेखापरिक्षणाने आक्षेप नमूद केल्यानंतर जवळपास २ वर्षांचा कालावधी झालेला असतानाही महालेखापालांनी निदर्शनास आणलेल्या ३६ नगरपरिषदांमध्ये सुधारणांची कामे विविध स्तरावर प्रलंबित असल्याचे दिसून येते. ही बाब निश्चितच योग्य नाही. वास्तविक विभागाने लेखापरिक्षणातील आक्षेपाबाबत तातडीने कार्यवाही करुन सर्व सुधारणांची कामे पूर्ण करणे आवश्यक होते. याशिवाय राज्यातील अन्य नगरपरिषदांमधील सुधारणा कामांचाही आढावा घेवून ती पूर्ण करणे आवश्यक होते. परंतु अशी कार्यवाही विभागाने केलेली नाही असे खेदाने नमूद करण्यात येत आहे. विभागाने प्रलंबित सर्व कामे तातडीने पूर्ण करावी व राज्यातील अन्य नगरपरिषदांतील सुधारणा कामांचा आढावा घ्यावा व ज्या ज्या ठिकाणी कामे पूर्ण झालेली नाहीत ती सुद्धा तातडीने पूर्ण करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

"सेवास्तरीय बेंच मार्कींग (SLB)" :

४.१० केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाने नागरी क्षेत्रातील प्रमुख ४ क्षेत्रांमध्ये पाणीपुरवठा, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन आणि वादळी जलनिःस्सारण (SWD) सेवास्तरीय बेंच मार्कींग पद्धत माहे जुलै, २००८ मध्ये जाहीर केली. महाराष्ट्र शासनाने नागरी स्थानिक संस्थांकडून ध्येय साध्य करण्यासाठी माहे फेब्रुवारी, २०१० पासून राष्ट्रीय बेंच मार्कचा अंगीकार केला. सन २०१३-१४ दरम्यान पाणीपुरवठ्याच्या बाबतीत ज्या ३६ नगरपरिषदांनी केंद्र शासनाच्या ९ निर्देशांकाच्या बाबतीत विहित केलेली सेवास्तराच्या बेंचमार्क (SLB) मानके साध्य केली नव्हती किंवा त्या ९ मानकांच्या बाबतीत नगरपरिषदांनी स्वतः ठरविलेले लक्ष साध्य केलेले नव्हते. त्याबाबतची आकडेवारी लेखा आक्षेपात नमूद केली आहे. या संदर्भात महालेखापालांनी बाबनिहाय आक्षेप पुढीलप्रमाणे नोंदविलेले आहेत :–

पाणी पुरवठा सेवांवरील खर्चाची कमी वसुली

४.११ केंद्र शासनाच्या सेवास्तराच्या बेंचमार्क (SLB) मध्ये पाणी पुरवठा सेवेच्या खर्चाची १००% वसुली करण्याचे विहित केले आहे. महाराष्ट्र शासनाने सध्या पाण्याच्या किंमती, आस्थापना खर्च वजा असल्यास तो भांडवलात समाविष्ट करणे, घसारा शुल्क इ. विचारात घेवून वेगवेगळ्या प्रवर्गातील उपभोक्त्यांसाठी पाणी शुल्काचे दर निश्चित करण्यासाठी माहे ऑगस्ट, २०१० मध्ये विशिष्ट मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली होती, जेणेकरुन कार्यचालन आणि देखभालीचा पूर्ण खर्च किंवा आवर्ती खर्च वसुल केला जाईल. तथापि, लेखापरिक्षणात असे आढळून आले की, निवडलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी सन २०११-१२ दरम्यान २८ नगरपरिषदा, सन २०१२-१३ मध्ये २५ नगरपरिषदा आणि सन २०१३-१४ मध्ये २४ नगरपरिषदा पाणी पुरवठा सेवांवरील १००% खर्च वसुल करण्याचे राष्ट्रीय बेंच मार्क साध्य करण्यास असमर्थ ठरल्या. परिणामी एकूण रु.१३०.४५ कोटीची कार्यचालन हानी सहन करावी लागली. सदर कार्यचालन हानीचे मुख्य कारण प्रत्यक्ष खर्च भागविण्यासाठी नगरपरिषदांनी पाणी पुरवठा सेवेचे दर सुधारीत न करणे, Non-Revenue Water ची अधिक टक्केवारी, पाणी आकाराचे निकृष्ट संकलन इ. असल्याचे लेखापरिक्षणाच्या निदर्शनास आले. या संदर्भात विभागीय सचिवांनी समितीसमोर खुलासा केला की, नगरपरिषदेला लहान व मध्यम शहरांसाठी नागरी मुलभूत सेवा विकास योजना (UIDSSMT), नगरोत्थान आणि आता अमृत शहर योजनेअंतर्गत योजना मंजूर करताना नगरपरिषदांनी केलेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्याची सर्वस्वी जबाबदारी नगरपरिषदांवर असते. विभागामार्फत सर्व नगरपरिषदांना या संदर्भात पुनःश्च सुचना निर्गमित करण्यात येत आहे. केंद्र शासनाकडून राज्यसरकारला १४ व्या वित्त आयोगाच्या माध्यमातून जो निधी दिला जातो त्या एकूण रक्कमेपैकी ९०% निधी प्रथम राज्यास दिला जातो व उर्वरीत १०% निधी केंद्र शासनाने सुचविलेल्या विविध बेंच मार्कनुसार कार्यवाही झाल्यानंतर वितरीत केला जातो. केंद्र शासनाच्या बेंच मार्कनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी राज्यातील नगरपरिषदांची आहे. संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी बेंच मार्कची पुर्तता करुन घेण्याबाबत सर्व नगरपरिषदांकडे पाठपुरावा करावा अशी सूचना विभागाने दिलेली आहे. नगरपरिषदांना आवश्यक प्रमाणात पाणी पुरवठा होत नसल्यामुळे पाणी पुरवठ्याच्या देयकांची वसुली करणे अवघड होत आहे. यापूर्वीच्या काळात नगरपरिषदांची सखोल तपासणी होत नव्हती ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मागील काळात नगरपरिषदांची कामगिरी (performance) योग्य नसल्याचे दिसून येते. तथापि, पुढील काळात पुर्तता होण्याच्या दृष्टीकोनातून विभाग नियोजन करीत आहे, त्याकरिता विभागातील काही वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या सक्षम गटाची निर्मिती करण्यात आलेली आहे. केंद्र शासनाच्या बेंच मार्कची पुर्तता करण्याच्या दृष्टीने करावयाच्या कार्यवाहीबाबत सदर सक्षम गट विचार करणार असून याबाबत त्यांचे कामकाज यापूर्वीच सुरू झालेले आहे. त्यानुसार पुढील काळात नगरपरिषदांची चांगली कामगिरी दिसू शकेल, अशी अपेक्षा विभागीय सचिवांनी समितीसमोर व्यक्त केली. विभागाने सादर केलेल्या खुलाशाने समितीचे समाधान झाले नाही. शासनाच्या निर्देशांचे पालन करण्याची जबाबदारी मुख्याधिकाऱ्यांची आहे, मुख्याधिकाऱ्यांना या संदर्भाचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे, मुख्याधिकारी हे शासनाचे प्रतिनिधी आहेत, त्यांनी शासन निर्देशाचे पालन करणे हे त्यांचे कर्तव्य आणि जबाबदारी आहे. तथापि, सदर अधिकारी फक्त शासनाकडून वेतन घेतात, परंतु शासन निर्देशांचे पालन करीत नाहीत. ९०% मुख्याधिकारी अध्यक्षांचे रबरी शिक्के (रबर स्टॅम्प) झालेले आहेत असे समितीने खेदाने नमूद केले. नगरपरिषदा केंद्र व राज्याचे निर्देशाचे पालन करीत नसतील तर मुख्याधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तसेच संचालक, नगरपालिका प्रशासनाकडे ही बाब निदर्शनास आणली पाहिजे, आवश्यक त्या ठिकाणी गुन्हे दाखल केले पाहिजेत. परंतु असे न करता मौन राखण्याचा पवित्रा मुख्याधिकारी स्विकारतात. त्यामुळे मुख्याधिकाऱ्यांची सुद्धा त्या सिस्टिमला सहमती आहे असे दिसून येते. काही ठिकाणी नगरपरिषदा स्थानिक आमदार, खासदार यांना सुद्धा विश्वासात न घेता निर्णय घेतात. **लेखापरिक्षकांनी दोन वर्षापूर्वी नमूद केलेल्या आक्षेपाची अद्यापही पुर्तता न होणे ही बाब गंभीर आहे. राज्यातील नगरपरिषदांचा एकूण कारभार विचारात घेता संचालक, नगरपालिका प्रशासन यांनी राज्यातील नगरपरिषदांना भेटी देवून त्यांच्या कामकाजाचा आढावा घ्यावा व केंद्र शासनाच्या सुचनेनुसार सर्व बेंच मार्कची पुर्तता होईल याची दक्षता घ्यावी. केंद्र शासनाकडून नगरपरिषदांना आणि पर्यायाने राज्यांना मिळणाऱ्या निधीसंदर्भात ही बाब अत्यंत महत्वाची आहे. केंद्र शासनाच्या निर्देशाची पुर्तता केली नाही तर केंद्र शासन निधी वितरीत करणार नाही, परिणामी राज्याचे नुकसान होईल अशी चिंता समितीने व्यक्त केली. बेंच मार्कची पुर्तता करण्याच्या दृष्टीकोनातून नगरविकास विभागाने सर्व नगरपरिषदांना कालबद्ध कार्यक्रम निश्चित करुन द्यावा व संचालक नगरपालिका प्रशासन यांनी सदर कालबद्ध कार्यक्रमाची विहित वेळेत अंमलबजावणी होईल याबाबत दक्षता घ्यावी. तसेच विभागाने जे बेंच मार्क निश्चित केलेले आहेत त्यानुसार २४ तास पाणी पुरवठा करावयाचा असल्याने सद्यःस्थितीत सुरू असलेले stand post वर बंदी आणली पाहिजे असे समितीचे मत आहे. या शिवाय ज्या भागामध्ये पाणीपट्टीची वसुली सुरळीत होते त्याच ठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत नसतो व ज्या भागामध्ये पाणीपट्टी वसुलीचे प्रमाण अगदी नगण्य असते त्या ठिकाणी २४ तास पाणी पुरवठा केला जातो ही बाब नागरिकांचे मनोधैर्य खचविणारी असून हा विरोधाभास दुर करणेही आवश्यक आहे. कर वसुलीचे प्रमाण ज्या ठिकाणी चांगले आहे, त्या ठिकाणी शाश्वत पाणी पुरवठा देणे आवश्यक आहे. या शिवाय यापूर्वीच सुचित केल्याप्रमाणे १००% मीटर बसविण्याची कार्यवाही नगरपरिषदांनी करावी तसेच तेथील पाण्याचे लेखापरिक्षण (Water Audit) बंधनकारक करावे. जर नगरपरिषदांनी स्वतः मीटर बसविले तर त्यांना शासन स्तरावरुन प्रोत्साहन देण्यात यावे. मीटर बसविण्याचा खर्च नागरिकांकडून वसुल करता येईल. तसेच पाणीपट्टीची वसुली सुरळीत व सातत्याने होईल या सर्व**

बाबतीत विभागाने विशेष मोहिम (Special Drive) घेवून समितीने सूचित केल्यानुसार कार्यवाही करावी. भविष्यात नगरपरिषदांनी वेळीच कार्यवाही न केल्यामुळे केंद्र शासनाकडून निधी प्राप्त झाला नाही अशी स्थिती उद्‌भवणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी व केलेल्या उपाययोजनांची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

४.१२ नगरपरिषदांचे मुख्याधिकारी हे प्रशासकीय प्रमुख आहेत. शासनाचे परिपत्रक, आदेश व अध्यादेशातील तरतूदीनुसार नगरपरिषदांच्या कामांचे नियोजन करुन कार्यवाही करणे हे त्यांचे प्राथमिक कर्तव्य असताना बहुतांश मुख्याधिकारी शासनाच्या सुचना व आदेशानुसार कार्यवाही करीत नसल्याचे वेळोवेळी समितीच्या निदर्शनास आले आहे. या बाबींची अधिक खोलात जाऊन समितीने छाननी केली असता अनेक कारणांपैकी एक महत्वाचे कारण समितीच्या असे लक्षात आले की, नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांचे वार्षिक गोपनीय अहवाल अध्यक्ष, नगरपरिषदा हे लिहितात. अशा परिस्थितीत अनेकदा असे अधिकारी स्वतःच्या गोपनिय अहवालांना प्रतिकूल शेरे टाळण्यासाठी शासनाच्या प्रस्थापित तरतूदींनुसार काम करताना दबावाखाली काम करीत असल्याचे वेळोवेळी दिसून येते. व त्यामुळेच घेण्यात येणाऱ्या निर्णयात तफावत दिसून येते व मुख्याधिकाऱ्यांच्या अशा वेगवेगळ्या भूमिकांचा थेट परिणाम निर्णयांवर होऊन नगरपरिषदांच्या कामांवर याचा थेट परिणाम होतो. स्वतःचे प्रशासकीय हित जपण्यासाठी ही परिस्थिती थोड्याफार प्रमाणात कमी जास्त पण सर्वच नगरपरिषदांमध्ये आढळून येते, ज्याचा गंभिर परिणाम या नगरपरिषदांच्या कामाच्या गुणवत्तेवर होतो व त्यातून बरीच नियमबाह्य कामे त्यांच्याकडून केली जातात. परिणामी **महालेखापालांनी आक्षेपात नमूद केलेल्या आक्षेपार्ह बाबी घडतात. अशा परिस्थितीत तेथील प्रशासकीय यंत्रणा अधिक सक्षम बनविण्याच्या सद्‌हेतूने यासंदर्भात समिती शिफारस करीत आहे की, ज्या प्रमाणे राज्यातील आयुक्त, महानगरपालिका व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे वार्षिक गोपनीय अहवाल लिहीणेबाबत कार्यपद्धती अवलंबिण्यात येते तीच कार्यपद्धती नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांचे वार्षिक गोपनीय अहवाल लिहीण्याबाबत अवलंबिण्यात यावी. व विभागाने याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा व उपरोक्तपणे कार्यवाही केल्यानंतर मात्र जर प्रशासकीय स्तरावर काही अनियमितता, त्रुटी, बेजबाबदारपणा व नियमबाह्य व आक्षेपार्ह बाबी निदर्शनास आल्यास अशा जबाबदार मुख्याधिकाऱ्यांवर अत्यंत कठोर कारवाई करण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.**

"घन कचरा व्यवस्थापन" :

MSW नियमाप्रमाणे कचऱ्याचे विलग्नीकरण न करणे :

महानगर घनकचरा (MSW) नियमांचे उल्लंघन करुन कचऱ्याची साठवणूक हाताळणी आणि वाहतूक :—

४.१३ घनकचरा व्यवस्थापनात नगरपालिका किंवा अधिसूचित क्षेत्रात निर्माण होणाऱ्या कोणत्याही कचऱ्याचे संकलन, विलग्नीकरण, साठवणूक, वाहतूक प्रक्रिया आणि विल्हेवाट या बाबींचा समावेश होतो. भारत सरकारच्या पर्यावरण आणि वन खात्याने सप्टेंबर, २००० मध्ये महानगर घन कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम २००० महानगर घनकचरा (MSW नियम) अधिसूचित केला आहे ज्या द्वारे नगरपालिकांना तिच्या भौगोलिक अखत्यारितील घन कचरा व्यवस्थापन हाताळण्यास जबाबदार धरण्यात येतात. महालेखापालांनी राज्यातील २३८ नगरपरिषदेपैकी निवडलेल्या ३६ नगरपरिषदेमध्ये महानगर घनकचरा (MSW) च्या विलग्नीकरण्याची उपलब्धता पर्यावरण अनुकूल पद्धतीने लँड फिलींगसाठी दिलेल्या क्षेत्रात महानगर घनकचरा (MSW) प्रक्रिया करुन त्याची विल्हेवाट लावणे या बाबींची तपासणी केली.

४.१४ जैविक विघटन होणे, रासायनिक प्रक्रिया होवू न शकल्याने पुनःचक्र करण्याची किंवा जैविक प्रक्रिया करण्याचे योग्य नसताना कचरा भरणा जागेवर टाकण्यासाठी प्रतिबंध करायला हवा. जेणेकरुन भरणा जागेवरील भार कमी करता येईल. भरणा जमिनीसह कचरा प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी सुविधा प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येक नगरपालिकेने राज्य प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून मंजुरी मिळविणे बंधनकारक आहे.

४.१५ महानगर घनकचरा (MSW) नियमानुसार दोन स्वतंत्र कचरा कुंड्यांची (नागरिकांच्या वापरासाठी आणि घरगुती वापरासाठी) पुनःचक्रीय कचरा (ओला आणि सुका) आणि पुनःचक्रिय न होणाराकचरा (रासायनिक प्रक्रिया करता येऊ न शकणारे पदार्थ जसे दगड, डेब्रीस इत्यादी) संकलित करण्यासाठी स्त्रोताच्या जागीच व्यवस्था करावयास पाहिजे. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या (MPCB) अटीनुसार लँड फिल साईटसवर वाहून आणलेल्या /नेलेल्या कचऱ्याचे पुनः विलग्नीकरण करण्यासाठी पायाच्या जागी न झीरपणाऱ्या वाहिन्या बांधून प्रक्रियेनंतर उरलेल्या घन कचऱ्याचे जमिनीवर विसर्जनासाठी निर्धारित केलेल्या जागेवर विसर्जित करणे जेथे भू-पृष्ठावरील पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी, वाऱ्याबरोबर पसरणारा कचरा, वाऱ्याबरोबर वाहणारी उत्सर्जने दुर्गंधी नियंत्रित करण्यासाठी, आग प्रतिबंधासाठी उपाययोजना असतील, पक्ष्यांचा उपद्रव रोखण्यासाठी केलेली योजना, कीटक व कृतक प्रतिबंधात्मक उपाययोजना, कचऱ्याची विल्हेवाट लावावयाच्या जागी भिंती बांधणे (लँडफिल) संकलनासाठी तरतूद करणे, लँडफिल वायुनियंत्रण व्यवस्था बसविणे इत्यादींचे पालन करावयास हवे होते. लेखा परिक्षणात असे निदर्शनास आले की, ३६ निवडलेल्या नगरपरिषदेपैकी पनवेल नगरपरिषदेस वगळता इतर कुठल्याही नगरपरिषदेत निर्देशित केलेले लॅडफिल साइटवर अनुकुल पर्यावरणीय पद्धतीने घरांमधून किंवा व्यावसायिक प्रतिष्ठानामधून दररोज संकलीत केलेले MSW कचऱ्याचे वजन करण्यासाठी किंवा विल्हेवाट लावण्याचे कार्यतंत्र उपलब्ध नव्हते.

४.१६ लेखापरिक्षणाने केलेल्या अंदाजाप्रमाणे ३६ नगरपरिषदांमध्ये प्रतिदिवस ८२९ मॅट्रीक टन घनकचऱ्याची (MSW) किंवा ३.०३ लाख मेट्रीक टन घनकचऱ्याची (MSW) प्रतिवर्षी निर्मिती होते तथापि ३५ पैकी एकाही नगरपरिषदेत घनकचऱ्याचे (MSW) निर्मितीच्या जागेतच विलग्नीकरण होत नव्हते आणि लँडफिल साईट वर पुढील विलग्नीकरण होत नव्हते, लँड फिल साईटच्या विकासासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) च्या अटींचे पालनही होत नव्हते. परिणामी या नगरपरिषदांकडून लँड फिल साईट्सवर पुढील विलग्नीकरण न करता संकलित केलेला कचरा तसाच लँडफिल साईट वर साठवला जातो. अशास्त्रीय पद्धतीने घनकचऱ्याची (MSW) विल्हेवाट लावण्यामुळे भूजल पातळीवर विपरित परिणाम होऊ शकतो आणि हवेचे प्रदूषण होऊ शकते. असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. या संदर्भात समितीने नगर विकास विभागाच्या विभागीय सचिवांची व प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधींची साक्ष घेतली. विभागीय सचिवांनी खुलासा केला की विभागाला ही वस्तुस्थिती मान्यच आहे की ज्यावेळी लेखापरिक्षण झाले त्यावेळेस विलग्नीकरण किंवा सेग्रिगेशन मोठ्या प्रमाणात होत नव्हते केवळ महाराष्ट्रातच नाही तर देशात यास प्राधान्य दिले नव्हते. परंतू सद्यःस्थितीत स्वच्छ भारत अभियानामध्ये सर्वात महत्वाच्या बेंच मार्क हा सेग्रिगेशन किंवा कचऱ्याचे विलग्नीकरण हा आहे. आता स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत कार्यवाही सुरू करुन राज्यातील ५० नगरपरिषदांमध्ये कचऱ्याचे विलग्नीकरण सुरू झाले होते. पाचगणी, वेंगुर्ला, येथे १००% विलग्नीकरण होत होते परंतू राज्यातील अन्य सर्व नगर पालिकांमध्ये दिनांक २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत १००% विलग्नीकरण करण्याचे विभागाचा मानस आहे.

४.१७ या संदर्भात समितीने सूचित केले की **राज्यातील ज्या नगरपरिषदांमध्ये कचऱ्याचे विलग्नीकरण होत नाही याबाबत विभागाने पुनःश्च आढावा घ्यावा. यासंदर्भात अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपविण्यात यावी. ज्या नगरपरिषदा कचऱ्यांची विल्हेवाट योग्य पद्धतीने करतात अशा नगरपरिषदांना काही प्रोत्साहनपर रक्कम (Incentive) देणेबाबतही शासनाने विचार करावा. केंद्र शासन देत असलेला पैसा व राज्य शासनाच्या निधीचा योग्य वापर करण्यासाठी शासनाने कठोर कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्यानुसार विभागाने कार्यवाही करावी व दिनांक २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत राज्यातील सर्व नगरपरिषदांमध्ये विलग्नीकरण करण्यासाठी कार्यवाही होईल याची दक्षता घ्यावी. विभागाने याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

४.१८ नगरपरिषदेत कचऱ्याचे वजन करण्यासाठी वजन यंत्र नसल्यामुळे खाजगी ठेकेदारांनी स्वतःचे वजनाचे यंत्र वापरलेले आहे. यासंदर्भात समितीने विचारणा केली की ठेकेदारांनी स्वतःची वजन यंत्रे वापरल्याने भ्रष्टाचाराला वाव मिळतो. **ठेकेदार यांनी स्वतःचे वजन यंत्रे वापरणे निश्चितच योग्य नाही. ठेकेदार त्यांच्या सोयीनुसार वजन करुन देयके सादर करेल यासाठी नगरपरिषदेकडे वजन यंत्र असणे आवश्यक आहे. ज्या नगरपालिकांनी अशी वजन यंत्रे खरेदी केलेली नाहीत त्यांना १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. व सर्व नगरपरिषदेमधील वजन यंत्रे खरेदीचा आढावा घ्यावा निधी उपलब्ध करुनही ज्या नगरपालिकांनी अशी यंत्रे खरेदी केली नाहीत त्या नगरपालिकांवर कठोर कारवाई करण्यात यावी व जोपर्यंत अशी वजनयंत्रे नगरपरिषदा खरेदी करीत नाही तोपर्यंत अशा नगरपरिषदांना १४ व्या वित्त आयोगामार्फत वितरित करावयाचा अन्य निधी थांबविण्यात यावा असे निर्देश समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर २०१६ रोजीच्या बैठकीत देण्यात आले होते व तीन महिन्यात अहवाल सादर करण्याबाबतही निर्देश देण्यात आले होते. तथापि, विभागाने अद्याप अहवाल सादर केला नाही ही बाब गंभीर स्वरुपाची आहे. विभागाने समितीच्या निर्देशानुसार वजन यंत्रे खरेदीचा अहवाल त्वरीत सादर करावा व अहवाल सादर करण्याच्या विलंबास जबाबदार अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे. याशिवाय समितीने नगरपरिषदांतील कामगारांसाठी हातमोजे, गमबुट इ.साहित्य उपलब्धतेबाबतही कार्यवाही करुन तीन महिन्यात अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिले होते. त्याबाबतही अद्याप अहवाल अप्राप्त आहे. विभागाने याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवालही त्वरीत समितीस सादर करावा.**

४.१९ नगरपरिषदांतील कचऱ्याची वाहतूक आच्छादित वाहनामध्ये (कव्हर्ड व्हेईकलमध्ये) होत नसल्यास परिसरात दुर्गंधी पसरते व प्रदूषणात देखील त्यामुळे वाढ होते. व त्यामुळेच स्थानिक नागरिकांचा या कचरा वाहतुकीला विरोध होतो. त्याबाबतही सर्व नगरपालिकांचा आढावा घ्यावा. सर्व नगरपालिका आच्छादित वाहनामध्ये (कव्हर्ड व्हेईकलमध्ये) कचरा वाहतूक करतील याबाबत विभागाने ठोस उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.

"घन कचऱ्याचे व्यवस्थापन" :

बंद पडलेले बायोगॅस प्रकल्प :

४.२० महालेखापालांनी निवडलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी ५ नगरपरिषदांमध्ये मार्च, २००६ ते ऑगस्ट, २०१३ या कालावधीत २.२६ कोटी खर्च करून उभारण्यात आलेल्या/अंशतः उभारलेल्या ५ बायोगॅस प्रकल्प दुरुस्ती आणि देखभालींच्या अडचणीमुळे तसेच कुकींग गॅसला मागणी नसल्यामुळे पूर्ण क्षमतेने वापरण्यात येऊ शकले नाहीत. नगरपरिषदांनी स्वयंपाकाच्या गॅससाठी असलेल्या मागणीवर योग्य उपाययोजना करण्यासाठी कारणे शोधली नाहीत तसेच, कचऱ्यावर प्रक्रिया करून त्याद्वारे कचरा टाकण्याच्या जागेचा भार हलका करण्याचे मूळ उद्दिष्टही साध्य होऊ शकले नाही असा आक्षेप पाच प्रकल्पांच्या तपशीलासह महालेखाकारांनी नोंदविला आहे. यासंदर्भात विभागीय सचिवांना विचारणा केली असता विभागीय सचिवांनी मान्य केले की बायोगॅस प्रकल्पाची आजची स्थिती फारशी समाधानकारक नाही. परंतु या सिस्टीममध्ये सुधारणा करण्यासाठी निरी (NIRI) या सारख्या तज्ज्ञ संस्थेचा समावेश शासनाच्या पॅनलमध्ये करण्यात आलेला आहे. त्यामुळे प्रकल्पातील तांत्रिक बाबींची तपासणी निरी (NIRI) या संस्थेकडून करण्यात येईल.

४.२१ पनवेल नगरपरिषदेमध्ये २००८ ते २०१४ पर्यंत बायोगॅस प्रकल्प सुरू होता, परंतु निर्माण होणारा गॅस स्वयंपाकाच्या वापरासाठी नागरिकांना देण्याचा प्रयत्न होता. परंतु मागणी नसल्यामुळे हा प्रकल्प पुढे सुरू राहू शकला नाही. सद्यःस्थितीत पनवेल भागातील दिवा बत्तीसाठी बायोगॅसचा वापर करण्याची प्रक्रिया तपासून पाहिली जात आहे. चर्चेअंती समितीने निर्देश दिले की, पनवेलसह कुळगाव, बदलापूर, उरण, पंढरपूर व वाशिम या नगरपारिषदांमध्ये बायोगॅसप्रकल्पांकरिता शासनाने या पूर्वीच निधी खर्च केला आहे. तथापि समाधानकारक प्रगती झालेली नाही. **विभागाने या पाचही प्रकल्पांचा अद्ययावत अहवाल प्राप्त करून एक महिन्याच्या आत समितीस सादर करावा असे निर्देश समितीच्या दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या बैठकीत देण्यात आले होते. तथापि, तसा अहवाल अद्यापही अप्राप्त आहे. विभागाने पाचही प्रकल्पांचा अद्ययावत अहवाल समितीस सादर करावा. सदर अहवालाबाबत संचालक, नगरपालिका प्रशासन यांचे अभिप्राय प्राप्त करावेत. सदर प्रकल्पाअंतर्गत निर्माण होणारा बायोगॅस पथदिवे किंवा अन्य कोणत्या कारणास्तव वापरता येईल काय ? याची देखील व्यवहार्यता तपासण्यात यावी. या संदर्भात निरी (NIRI) या संस्थेकडून तांत्रिक सल्ला घेण्यात यावा व त्यानुसार बायोगॅसच्या वापराचे नियोजन करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यात समितीस सादर करावा. नगरपरिषदांमार्फत पुरविण्यात येणाऱ्या सर्व मुलभूत नागरी सेवांचा विचार करता तसेच याबाबत महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप विचारात घेता काही नगरपरिषदा अनेक कारणांमुळे अशा मुलभूत सुविधा नागरिकांना सक्षमरित्या पुरवू न शकल्यास त्याचा थेट परिणाम हा तेथील स्थानिक नागरिकांवर पडणारा असल्यामुळे भविष्यात बायोगॅस प्रकल्प, कचरा व्यवस्थापन तसेच अन्य मुलभूत सुविधा सार्वजनिक-खाजगी भागीदारी प्रकल्प (PPP) किंवा बांधा, वापरा व हस्तांतरित (BOT) या तत्वावर राबविता येईल का हे तपासून आवश्यक ती कार्यवाही विभागाने करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

व्हर्मी/मेकॅनिकल कंपोस्टींगच्या प्रकल्पाचा कमी उपयोग :

४.२२ महालेखापालांनी निवडलेल्या ३६ नगरपारिषदांपैकी ६ नगरपरिषदांमध्ये कंपोस्ट तयार करण्यासाठी व्हर्मी मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्प राबविण्यात आले आहेत. ६ नगरपरिषदांमध्ये व्हर्मी/मेकॅनिकल कंपोस्टींगसाठी रुपये ४.०३ कोटी गुंतवणूक करुनही ऑक्टोबर, २०१४ पर्यंत अपेक्षित ४९२६ मॅट्रीक टन कंपोस्टच्या तुलनेत फक्त ७१४ मॅट्रीक टन कंपोस्ट तयार झाले होते. प्रकल्पाचा उपयोग कमी केला गेल्यामुळे जैव विघटनशील कचरा लँडफिल साईटवर प्रक्रिया केल्याविना तसाच पडला होता.

४.२३ यवतमाळ येथील व्हर्मी/मेकॅनिकल कंपोस्टींग प्रकल्पावर रुपये १६३.७९ लाख एवढा खर्च जानेवारी, २००९ मध्ये करण्यात आला. त्याद्वारे ४० मॅट्रीक टन घन कचऱ्यावर (MSWB) प्रक्रिया करणे अपेक्षित होते. सदर प्रकल्पाच्या कार्यचालन आणि देखभालीचे काम खाजगी ठेकेदारांना देण्यात आले होते. लेखापरिक्षणात असे निदर्शनास आले की, एप्रिल, २००९ ते ऑगस्ट, २०१४ दरम्यान नगरपरिषदेच्या कंत्राटदारांनी दररोज आवश्यक असलेल्या २५ मॅट्रीक टन च्या (मार्च, २०१२ पर्यंत) आणि ४० मॅट्रीक टन च्या (ऑगस्ट, २०१५ पर्यंतच्या) तुलनेत घनकचऱ्याच्या (MSW) पाच मॅट्रीक टनचे विलग्नीकरण केले होते. परंतु कंत्राटानुसार संपूर्ण घनकचऱ्याचे (MSW) विलग्नीकरण जर कंत्राटदार करू शकला नाही तर, मोबदल्यातून करावयाच्या वजावटी विषयी कोणतीही तरतूद कंत्राटात नव्हती. कंत्राटानुसार विलग्नीकरण करावयास घनकचऱ्याच्या (MSW) तुलनेत विलग्नीकरण केलेल्या आणि कंपोस्टींगसाठी वापरलेला घनकचरा (MSW) लक्षात घेता, नगरपरिषदेने कंत्राटदारांला रुपये ७०.०८ लाख अतिरिक्त प्रदान केले असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी खुलासा करून स्पष्ट केले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) ने प्रतिदिन ४० मॅट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी परवानगी दिली आहे. परंतु ठेकेदारांनी प्रतिदिन ४० मॅट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली पाहिजे असा करारनाम्यामध्ये उल्लेख नाही. सदरहू प्रकल्पाची क्षमता प्रतिदिन ४० मॅट्रीक टन कचऱ्याची प्रक्रिया होऊ शकेल इतकी आहे. परंतु प्रत्यक्ष क्षमतेनुसार मात्र त्या ठिकाणी जर केवळ २०-२५ मॅट्रीक टन कचरा गोळा होत

असल्यामुळे प्रतिदिन केवळ २०-२५ मॅट्रीक टन कचऱ्यावर प्रक्रिया केली गेली. भविष्यातील वाढत्या गरजेनुसार वाढीव क्षमतेचा कचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणे आवश्यक असल्यामुळे ४० मॅट्रीक टन प्रतिदिन क्षमता ठेवण्यात आली होती. सद्य:स्थितीत जेवढ्या कचऱ्यावर प्रक्रिया केली जात होती तेवढेच दररोज प्रदान होत होते. **यासंदर्भात समितीने निर्देश दिले होते की, विभागाने संचालक, नगरपालिका प्रशासन यांच्यामार्फत ठेकेदाराला अदा केलेल्या देयकांची चौकशी करावी व तशी माहिती समितीस सादर करावी याबाबत विभागीय सचिवांनी समितीस माहिती देणेबाबत आश्वासित केले होते. तथापि, विभागाने आश्वासित केलेली माहिती अद्यापही सादर केलेली नाही, ही अतिशय गंभीर बाब आहे. विभागाने यासंदर्भात तातडीने कार्यवाही करावी. तसेच ठेकेदारांना अतिरिक्त प्रदान केले असल्यास ते वसूल करण्यात यावे व या संपूर्ण प्रकरणास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर आवश्यक ती कारवाई करून त्याचा अहवाल समितीस एक महिन्यात सादर करावा, अशी समितीची शिफारस आहे.**

"पर्यावरण अनुकुल पद्धतीने महानगर घनकचऱ्याची (MSW) विल्हेवाट न लावणे" :

४.२४ लेखापरिक्षणावेळी असे निदर्शनास आले की, सर्वच्या सर्व ३५ नगरपरिषदांनी प्रक्रिया न केलेल्या घनकचऱ्याचे (MSW) उपलब्ध असलेले लॅन्ड फिल साईटसवर किंवा परस्पर खड्डयामध्ये किंवा रस्त्याच्या कडांना किंवा जलसाठ्याजवळ अनधिकृतपणे डंपिंग करीत होते. तसेच ३५ नगरपरिषदांपैकी फक्त ८ नगरपरिषदांकडे निर्धारीत लॅन्ड फिल क्षेत्रामध्ये प्रक्रिया आणि विल्हेवाट सुविधा उभारण्यासाठी वैध अधिकृतता होती. सुरूवातीला १५ नगरपरिषदांना दिलेली अधिकृतता नगरपरिषदांनी नुतनीकरणासाठी आवेदन पत्र सादर न केल्यामुळे माहे डिसेंबर, २००३ ते माहे सप्टेंबर,२०१४ या दरम्यान रद्द झाली होती व उर्वरित १२ नगरपरिषदांमध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने अधिकृत केल्यामुळेच कुठलेही दस्तऐवज उपलब्ध नव्हते असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला. समितीसमोर याबाबत सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांच्या साक्षी दरम्यान समितीने विचारणा केली की, कत्तलखान्यातून निर्माण होणारा कचरा तसेच घनकचऱ्याची पर्यावरण अनुकुल पद्धतीने विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीने नगरपरिषदांमध्ये मोठ्या प्रमाणात उदासिनता असून स्थानिक स्वराज्य संस्थांनी अद्यापही अर्ज केलेले नाहीत किंवा महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून परवानगी अथवा संमती घेतलेली नाही, अशी माहिती समितीसमोर प्राप्त झालेली आहे. या संदर्भात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली, ज्या नगरपरिषदांनी एकदाही प्राधिकार पत्र घेतलेले नाही त्यांचेवर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्रॉसिक्युशनची कार्यवाही करण्यात आली आहे काय ? या संदर्भात खुलासा सादर करताना सदस्य सचिवांनी स्पष्ट केले की, या संदर्भात महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून नगरविकास विभागाला कळविण्यात येते. राज्यातील एकूण २६५ स्थानिक स्वराज्य संस्थांपैकी २३८ संस्थांनी घनकचरा व्यवस्थापन नियमांतर्गत एकदा तरी प्राधिकार पत्र घेतले आहे, ९० स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकदाही नुतनीकरण करण्यासाठी अर्ज दिलेला नाही, तसेच २४ स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकदाही प्राधिकार पत्र घेतले नाही. माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता (CRPC) कलम १५४ व १९७ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार आजी व माजी लोकसेवकांवर त्यांच्या कारकिर्दीतील प्रकरणे असतील तर त्यांचेविरुद्ध कार्यवाही करण्यासाठी शासनाची परवानगी आवश्यक आहे. त्याकरिता १९ स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रस्ताव शासनास सादर केले आहेत. १९ नगरपालिका मुख्याधिकारी आणि इतर संबंधितांची नावे सचिव, नगरविकास विभागाना कळविण्यात येत आहेत. ज्या ९० स्थानिक स्वराज्य संस्थांनी नुतनीकरणासाठी अर्ज केलेला नाही त्यांचेविरुद्धही कार्यवाही प्रस्तावित आहे. याशिवाय नगरपरिषदांना कायद्याची माहिती व्हावी, त्यांनी वेळोवेळी नुतनीकरण करावे याबाबत माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये एका कार्यशाळेचे आयोजन करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. यासंदर्भात नगरविकास विभागाच्या सचिवांना देखील समितीच्या बैठकीत बोलाविण्यात आले होते. नगरविकास विभागाच्या सचिवांनी सुद्धा खुलासा केला की, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून आजच प्रस्ताव प्राप्त होत आहे. सदर प्रस्तावाला शासन स्तरावरुन मंत्री महोदयांकडे मान्यतेस सादर करण्यात येईल. शासनाने फौजदारी प्रक्रिया संहिता (CRPC) मध्ये केलेल्या सुधारणांनुसार नावानिशी प्रस्ताव द्यावा लागेल आणि अ, ब, क किंवा ड प्रमाणे मंजूरी द्यायची की नाही हे शासन ठरवेल. नगरपरिषदांमध्ये मुख्याधिकारी आणि अध्यक्ष या दोघांची जबाबदारी आहे. नगरपरिषदेशी संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार नगराध्यक्ष हे नगरपरिषदेचे प्रमुख आहेत व मुख्याधिकारी त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करीत असतात. त्यामुळे या संदर्भात दोघांचाही प्रस्ताव सादर करावा लागेल. याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात येईल. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व सचिव, नगरविकास विभाग यांनी सादर केलेल्या खुलाशाने समितीचे समाधान झाले नाही व समितीने सूचित केले की, स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी कंपन्यांकरीता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून वेगळी वागणूक दिली जात आहे. खाजगी कंपन्यांतून उत्पन्न होणाऱ्या घनकचऱ्याची सार्वजनिक ठिकाणी विल्हेवाट लावली नाही तर त्यांचेविरुद्ध तातडीने कार्यवाही करण्यात येते. कंपनीला सील लावण्यात येते. परंतु त्याच कायद्यान्वये कार्यवाही करताना स्थानिक स्वराज्य संस्थांवर कार्यवाही झालेली नाही. वास्तविक ज्या १९ स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकदाही प्राधिकार पत्र घेतले नाही त्यांचेवर प्रॉसिक्युशनची कार्यवाही करणे आवश्यक होते. ज्या ९० स्थानिक स्वराज्य संस्थांनी नुतनीकरणासाठी अर्ज केले नाही त्यांचेविरुद्धही कठोर कार्यवाही करणे आवश्यक होते. ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी नुतनीकरणासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे अर्ज केलेला आहे परंतु महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने अद्यापही नुतनीकरण करून दिलेले नाही ही अतिशय गंभीर बाब आहे. या संदर्भात

महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी जबाबदार आहेत. त्यांचेवर सुद्धा कार्यवाही केलेली नाही. राज्यातील २१८०० मेट्रीक टन कचऱ्यापैकी फक्त ६९०० मेट्रीक टन कचऱ्याची विल्हेवाट नियमानुसार लावण्यात येते म्हणजेच साधारण १५००० मेट्रीक टन कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची कार्यवाही नगरपरिषदांनी केलेली नाही. केंद्र शासनामार्फत स्वच्छ भारत अभियान व शहराला हागणदारीमुक्त करणे असे प्रकल्प राबविले जात असताना राज्यातील नगरपरिषदांची स्थिती निश्चितच समाधानकारक नाही. **तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळानेही हा विषय गांभीर्याने हाताळलेला दिसत नाही. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. विभागाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर १५ दिवसांत नियमानुसार निर्णय घेऊन संबंधित दोषींवर तातडीने कार्यवाही करण्यात यावी, ज्या १९ नगरपरिषदांनी एकदाही प्राधिकार पत्र घेतलेले नाही त्यांचेवर ३ महिन्याच्या आत खटला दाखल करण्याची (प्रॉसिक्युशनची) कार्यवाही करावी, ज्या ९० नगरपरिषदांनी नुतनीकरणासाठी यापूर्वीच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे निवेदन सादर केलेले आहे त्यावर तातडीने नियमानुसार कार्यवाही करून त्यांना प्राधिकार पत्र देण्यात यावे व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या ज्या अधिकाऱ्यांमुळे प्राधिकार पत्र देण्यास विलंब झालेला आहे त्या अधिकाऱ्यांची चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. राज्यातील सर्व नगरपरिषदा घनकचऱ्याची (MSW) ची विल्हेवाट लावण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करतील याची महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने व नगरविकास विभागाने दक्षता घ्यावी. स्वच्छ भारत अभियानांतर्गत नागरी संस्थांना निधी वितरीत करताना ज्या नगरपरिषदांनी घनकचऱ्याच्या (MSW) विल्हेवाटी संदर्भात कार्यवाही केली नाही तर त्यांना वितरीत करावयाचा स्वेच्छा निधी वितरीत केला जाणार नाही याबाबतच्या सूचना संबंधित संस्थांना देण्यात याव्यात. ज्या नगरपरिषदा स्वच्छतेच्या कामास प्रतिसाद व प्राथमिकता देणार नाहीत त्या नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही करण्यात यावी. राज्यातील १५००० मेट्रीक टन कचरा जो सद्यःस्थितीत क्षेपण भूमीवर (डंपिंग ग्राऊंडमध्ये) टाकला जातो त्याची विल्हेवाट १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून व्यवस्थितरित्या होईल याची विभागाने दक्षता घ्यावी. नगरपरिषदांमध्ये ज्याप्रमाणे शिक्षण कर किंवा वृक्ष कर लावण्यात येतो त्याचप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन कर आकारणीबाबत विभागाने विचार करावा. सदर जमा केलेला कर स्वतंत्र लेखा शिर्षाखाली जमा करावा व घनकचरा व्यवस्थापनावर खर्च होईल याबाबत सर्व नगरपरिषदांना सूचना देण्यात याव्यात. कर आकारणी व वसुलीची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर आहे त्यांनी ती वेळीच पार पाडली नाही तर त्याचेवर देखील कारवाई करण्याची तरतूद करण्यात यावी. नगरपालिका क्षेत्रातील नवीन बांधकामाचे नकाशे मंजूर करताना प्राप्त होणारा विकास निधी हा एकत्रित निधीमध्ये जमा होत असल्यामुळे तो त्याच भागासाठी प्राधान्याने खर्च केला जात नाही ही बाब समितीच्या निदर्शनास आली. अतः असा विकास निधी नगरपालिकांना प्राप्त झाल्यानंतर तो ज्या क्षेत्रातील बांधकामाचे नकाशे मंजूरी देताना प्राप्त झाला त्याच क्षेत्रातील विकास कामासाठी खर्च करायला प्राधान्य द्यावे. अशा सर्व नगरपरिषदांना विभागामार्फत सूचना देण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे. तसेच विभागाने घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित राज्यातील संपूर्ण नगरपरिषदांनी उपरोक्त शिफारशीनुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

कत्तलखान्याचे अवैध कार्यचालन :

४.२५ पाणी (प्रदूषण, प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ आणि वायू (प्रदूषण, प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९८१ मधील तरतुदीनुसार कत्तलखाने सुरू करण्यासाठी, कत्तलखाने चालविण्यासाठी राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेणे आवश्यक आहे. आणि प्राण्यांच्या कत्तलीमुळे निर्माण होणाऱ्या उत्सर्जनावर प्रक्रिया करण्यासाठी उत्सर्जन प्रक्रिया प्रकल्प (ETPs) स्थापन करणे बंधनकारक होते.

४.२६ महालेखापालांनी निवडलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी १६ नगरपरिषदांमध्ये कत्तलखाने चालत होते. त्यातील फक्त सात नगरपरिषदांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची परवानगी घेतली होती. व त्यापैकी चार नगरपरिषदांना सुरूवातीला महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने दिलेली परवानगी मार्च, २०१० ते ऑक्टोबर, २०१४ दरम्यान रद्द झाली होती. या चार नगरपरिषदांपैकी तीन नगरपरिषदांनी परवानगी नुतनीकरणासाठी आवेदन केले नव्हते. तर एका नगरपरिषदेने नुतनीकरणासाठी (बल्लारपूर) जरी आवेदन २०१३ मध्ये केले होते. तरी, ऑक्टोबर, २०१४ पर्यंत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून नुतनीकरण करून दिले नव्हते. अशाप्रकारे १३ नगरपरिषदांमध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या परवावनगीशिवाय अनधिकृत कत्तलखाने चालविले जात होते. परिणामी कत्तलखान्यातून होणारे उत्सर्जन उघड्या गटारामध्ये सोडले जात होते. जे अंतिमतः जलाशयांना जाऊन मिळत असल्यामुळे जलाशये प्रदूषित होत होती असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे. यासंदर्भात सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी साक्षी दरम्यान समितीस खुलासा केला की, एक वर्षापूर्वी महानगरपालिका व नगरपालिकांच्या हद्दीत असलेल्या कत्तलखान्यांचे सर्व्हेक्षण केले आहे. कत्तलखाने चालविण्यासाठी प्रदुषण नियंत्रण मंडळाने नियमावली तयार केली आहे. ज्या कत्तलखान्यात १० पेक्षा जास्त जनावरांची कत्तल होते त्यांना प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या नियंत्रणाखाली आणण्यात आले आहे. १० पेक्षा कमी जनावरांची कत्तल ज्या कत्तलखान्यात होते त्यांचे नियंत्रण नगरपालिकांना देण्यात आले आहे. मागील वर्षात ७८ कत्तलखाने उत्सर्जन प्रक्रिया प्रकल्प (ETP)व इतर

नियमांचे पालन करीत नाहीत म्हणून बंद करण्यात आले आहेत. यापैकी काही कत्तलखाने नगरपालिकांनी स्वतःहून बंद केले व काही कत्तलखाने प्रदुषण नियंत्रण मंडळांने बंद केले आहेत. नवीन १९ कत्तलखाने मंजूर करण्यात आले आहेत.

४.२७ लेखापरिक्षण आक्षेपातील ३६ नगरपरिषदांपैकी सात नगरपरिषदांमध्ये कत्तलखाने कार्यरत आहेत व १९ नगरपरिषदांतील कत्तलखाने बंद केलेले आहेत आणि ९ नगरपरिषदांमध्ये कत्तलखानेच नाहीत. केवळ ७ नगरपरिषदांमध्ये कत्तलखाने कार्यरत आहेत या सात पैकी ज्या कत्तलखान्यात अवैध काम चालू असते त्यांच्यावर करवाई करण्यात येईल असे विभागाने नमूद केले असता **या संदर्भात समितीने मत व्यक्त केले की, कत्तलखान्यासाठी आवश्यक उत्सर्जन प्रक्रिया प्रकल्प (ETP)** असला पाहिजे. **ज्या नगरपालिकांकडे ETP नाही त्यामुळे ते कत्तलखाने प्रदूषण नियंत्रण मंडळ नियमावलीनुसार नसल्यामुळे ते कत्तलखाने बंद केलेले आहेत. कत्तलखाने बंद झाल्यामुळे रस्त्यांवर मांस विक्री करण्यात येते. आजही रस्त्यावर मांस विक्री सर्रास सुरू आहे. ईदसाठी तात्पुरती परवानगी घेतली जाते. काही लोकांनी न्यायालयातून परवानगी मिळविली आहे ही वस्तुस्थिती आहे. विभागाने यासंदर्भात कठोर उपाययोजना करावी व कोणत्याही परिस्थितीत रस्त्यावर मांस विक्री होणार नाही याची विभागाने दक्षता घ्यावी. ज्या नगरपालिकांना ETP करण्यासाठी तांत्रिक सल्ल्याची आवश्यकता आहे, तो त्यांना देण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत प्रक्रिया न करता सांडपाणी रस्त्यावर सोडू नये, याबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. या व्यतिरिक्त नगरपालिकांकडून अथवा महाराष्ट्र प्रदूषण मंडळाकडून कुठलीही परवानगी न घेता अनधिकृतरित्या अनेक कत्तलखाने ठिकठिकाणी सुरू आहेत, त्यांचेवरही कठोर कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे व नगरविकास विभागाने व प्रदूषण नियंत्रण मंडळाने संयुक्तरित्या ठोस उपाययोजना करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तात्काळ सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

"जैव वैद्यकीय कचऱ्याचे व्यवस्थापन" :—

४.२८ भारत सरकारने माहे जुलै, १९९८ मध्ये जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) अधिनियम, १९९८ जैव वैद्यकीय कचरा नियम (BMW नियम) अधिसूचित केला होता. जो नियम सर्व व्यक्तींना, जो असा कचरा कुठल्याही स्वरुपात निर्माण करतात, संकलित करतात, प्राप्त करतात, साठवणूक करतात, वाहतूक करतात, प्रक्रिया करतात, विल्हेवाट लावतात किंवा हाताळतात या सर्वांना लागू होता. जैव वैद्यकीय कचऱ्याच्या (BMW) नियमानुसार नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रातील आरोग्य केंद्र जसे प्रत्येक रुग्णालय, चिकित्सालय, प्रयोगशाळा, रक्तपेढी यांनी त्यांच्याकडे निर्माण झालेला जैव वैद्यकीय कचरा (जसे की, रक्त, वापरलेला कापूस, सिरींज, कॅथरेटर इ.) स्वतः किंवा इतर संस्थांमार्फत शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करणे आवश्यक आहे अन्यथा इतर सजीवांना रोगाचा प्रादुर्भाव/लागण होऊ शकते. संबंधित संस्थांकडून आवेदन प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ शासकीय किंवा खाजगी संस्थांना जैव वैद्यकीय कचऱ्यावर (BMW) प्रक्रिया करण्यासाठी प्राधिकृत करते. लेखापरिक्षणावेळी असे निदर्शनास आले की, ३६ नगरपरिषदांपैकी ८ नगरपरिषदांमधील सर्व आरोग्य केंद्र जैव वैद्यकीय कचऱ्यावर (BMW) विहित केलेल्या नियमानुसार प्रक्रिया करीत होती. उर्वरीत २८ नगरपरिषदांपैकी १७ नगरपरिषदांमध्ये नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रात एकूण ११६१ आरोग्य केंद्रे कार्यरत होती. त्यापैकी फक्त ७१२ आरोग्य केंद्रे (६१%) जैव वैद्यकीय कचऱ्यावर (BMW) प्रक्रिया करीत होती. उर्वरीत ३९% आरोग्य केंद्रे जैव वैद्यकीय कचऱ्यावर (BMW) प्रक्रिया करीत नव्हती. ज्यामुळे व्यक्ती आणि प्राण्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत होता, असा आक्षेप महालेखापालांनी केलेला होता. ज्या १७ नगरपरिषदा होत्या व ज्यांचा काही प्रमाणात पुर्तता होत होत्या त्याठिकाणी १००% पूर्तता (कम्प्लायन्स) झालेली आहे. ज्या ८ नगरपरिषदांकडे आरोग्य केंद्रांची माहिती उपलब्ध नव्हती त्यांच्याकडे सदर माहिती उपलब्ध आहे व त्यानुसार जैव कचऱ्याची ते विल्हेवाट लावीत आहेत. जैव वैद्यकीय कचऱ्यावर प्रक्रिया स्वतः नगरपालिका करीत नाहीत पण बहुतेक ठिकाणी त्या सार्वजनिक खाजगी-भागीदारी प्रकल्प (PPP) पद्धतीने एका संस्थेची निवड करतात. सदर संस्था सर्व केंद्राकडून जैव वैद्यकीय कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावते. या संदर्भात विभागाच्या गाईड लाईन असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. **याबाबत समितीने निर्देश दिले की, नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर विभागाने खुलासा सादर केलेला आहे. सदर माहितीची सत्यता पडताळण्यासाठी संचालक, नगरपालिका प्रशासन यांना सुचना देण्यात याव्यात व वस्तुनिष्ठ अहवाल विभागाने प्राप्त करावा. विभागाने राज्यातील सर्वच रुग्णालयांसाठी परवाना देताना, जैविक कचऱ्याची विल्हेवाट ही योग्य पद्धतीने केली जाईल या अटीवरच परवाना द्यावा. तसेच ज्या रुग्णालयांना अशा जैविक कचऱ्याची स्वतंत्ररित्या विल्हेवाट लावणे शक्य नाही, अशा रुग्णालयांकरिता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळ व संबंधित महानगरपालिका किंवा नगरपालिकांनी नियमानुसार प्राधिकृत केलेल्या खाजगी संस्थांची अशा प्रकारच्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी नियुक्ती करावी व नेमण्यात आलेल्या संस्थांनी संबंधित क्षेत्रातील सर्व रुग्णालयात निर्माण होणारा जैविक कचरा जमा करुन, त्यावर प्रक्रिया करुन, त्याची योग्यरित्या विल्हेवाट लावावी. अशा प्रकारच्या सुधारित मार्गदर्शक सूचना विभागाने त्वरीत निर्गमित कराव्यात व समितीच्या शिफारशीनुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

" SLB's साध्य न करणे " :

४.२९ भारत सरकारने महानगरातील घनकचरा (MSW) संबंधातील माहे जुलै,२००८ मध्ये विहित केलेल्या सेवास्तराचा बेंचमार्क (SLB's) च्या ८ निर्देशांकाबाबत महालेखापालांनी लेखापरिक्षणाअंती तपशिलासह असे नमूद केले की, ३६ नगरपरिषदांपैकी एकाही नगरपरिषदेने घनकचऱ्याचे (MSW) संकलन, विलग्नीकरण, शास्त्रोक्त विल्हेवाट आणि सेवांच्या खर्चाची वसुलीबाबत राष्ट्रीय बेंचमार्क साध्य करू शकले नाहीत. या संदर्भात विभागीय सचिवांच्या साक्षीमध्ये समितीने विचारणा केली की, महालेखापालांनी सन २०१३-१४ मध्ये आक्षेप नमूद केलेले आहेत व आता सन २०१७ सुरू आहे. परंतु अद्यापही विभागाने सेवास्तराचा बेंचमार्क (SLB's) साध्य करण्यासंदर्भात कार्यवाही का केली नाही ? यावर विभागीय सचिवांनी खुलासा केला की, स्वच्छ भारत अभियानांतर्गत हागणदारीमुक्तीवर लक्ष केंद्रीत करण्याचे जाणीवपूर्वक निर्णय घेतले आहे. याशिवाय घनकचरा व्यवस्थापन प्राधान्याने हाती घेण्यात येत असून त्याचे विस्तृत प्रकल्प अहवाल (DPR) तयार करुन कालबद्ध कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येत आहे. जे मुख्याधिकारी कालबद्ध कार्यक्रमानुसार कार्यवाही करणार नाहीत त्यांच्या गोपनीय अहवालामध्ये नोंद घेण्यात येणार आहे. राज्यातील २० नगरपरिषदांमध्ये यापूर्वीच कचऱ्याचे वर्गीकरण करणे, ओल्या कचऱ्याचे कंपोस्ट करणे व सुका कचरा बाजारात विकणे किंवा पॅलेस्ट बनविणे अशी कार्यवाही सुरू करण्यात आलेली आहे. यामध्ये लेखापरिक्षणासाठी निवडलेल्या ३६ नगरपरिषदांपैकी शिर्डी या नगरपरिषदेचाही समावेश आहे. शिर्डी नगरपरिषदेने सांडपाण्याची व्यवस्था केलेली आहे. याशिवाय घनकचऱ्याची (MSW) घरगुती पातळीवरील व्याप्ती वाढविण्यासाठी ग्रीन द ग्रेट या संस्थेची नेमणूक केली आहे. घंटागाडीची संख्या वाढविण्यात आली आहे. शास्त्रोक्त विल्हेवाटीकरिता १०५ टन कचरा साईबाबा संस्थांन यांच्या बायोगॅस प्रकल्पासाठी वापरण्यात येत आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल नगरपरिषदेमध्ये घनकचऱ्याची व्यवस्था आणि विल्हेवाट अतिशय चांगल्या पद्धतीने लावण्यात येत आहे. चाळीसगाव नगरपरिषदेनेही ८५% पर्यंत विलगीकरण केलेले आहे. १४ व्या वित्त आयोगातून घंटागाडी खरेदीसाठी शासनास विशेष परवानगी दिलेली आहे. सदर घंटागाडी खरेदीस जिल्हा पातळीवरच मान्यता देण्यात येत आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी सादर केला. याबाबत समितीने सुचित केले की, **महालेखापालांनी आक्षेप नोंदवून जवळपास ४ वर्षाचा कालावधी झाल्यानंतरही विभागाने ३६ नगरपरिषदांपैकी केवळ शिर्डी आणि चाळीसगावमध्ये काही प्रमाणात काम केलेले आहे. परंतु अन्य नगरपरिषदांमध्ये समाधानकारक कार्यवाही झालेली नाही. याशिवाय राज्यातील अन्य नगरपरिषदांबाबतही केलेल्या कार्यवाहीबाबतही समिती साशंक आहे. विभागाच्या या कार्यवाहीबाबत समितीने नाराजी व्यक्त केली व कागल नगरपरिषदेमध्ये घनकचऱ्याची व्यवस्था आणि विल्हेवाट चांगल्या पद्धतीने होत आहे तर अन्य नगरपरिषदांमध्ये का होवू शकली नाही, ही बाब समितीला स्पष्ट होत नाही. अन्य नगरपरिषदांच्या मुख्याधिकाऱ्यांना कागल येथे पाठवून त्यांनी केलेल्या कार्यवाहीचे अनुकरण करण्याच्या सुचना विभागाने द्याव्यात. शासनाने वितरीत केलेल्या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून घंटागाडी खरेदी संदर्भात नगरपालिकांनी केलेल्या कार्यवाहीचा विभागाने आढावा घ्यावा व सर्व नगरपरिषदांमध्ये घंटागाडी खरेदीची कार्यवाही झाली याबाबत खात्री करावी. घनकचऱ्याच्या (MSW) वसुलीची कार्यवाही अत्यंत निराशाजनक असून या संदर्भात विभागाने सादर केल्यानुसार आवश्यक उपविधी (बाय-लॉज) तातडीने तयार करुन सर्व नगरपरिषदांना पाठविण्यात यावेत. सन २००० पासून सन २०१६ पर्यंत घनकचरा व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष होवून कोणत्याही बेंचमार्कची पुर्तता झालेली नाही. याबाबत समितीने नाराजी व्यक्त करत नगरपरिषदांमधील अपुऱ्या कर्मचाऱ्यांबाबतही विभागाने ठोस कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. कायमस्वरुपी कर्मचारी भरणे शक्य नसेल तर कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नियुक्तीबाबत विचार करता येईल काय, याबाबत विभागाने उचित कार्यवाही करावी. कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नियुक्ती करतेवेळी अशा कर्मचाऱ्यांचे वेतन हे त्या नगरपरिषदांना द्यावे लागत असल्यामुळे ज्या नगरपरिषदांची आर्थिक स्थिती चांगली नसेल अशा नगरपरिषदा त्यांच्या निधीमधून अशा कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यास उत्सुक नसतात. त्याचा थेट परिणाम स्थानिक नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या मुलभूत नागरी सुविधांवर होतो. ही बाब विचारात घेता समिती अशी शिफारस करते की, ज्या नगरपरिषदांमध्ये लोकसंख्येच्या आधारावर कर्मचारी नियुक्तीचा बृहत आराखडा मंजूर आहे व बृहत आरखड्यातील जी पदे भरलेली नाहीत त्या पदांवर नगरपरिषदा जर कंत्राटी पद्धतीने कर्मचारी नियुक्ती करीत असेल तर, त्या कंत्राटी कर्मचायांच्या वेतनावरील खर्चाकरिता बृहत आराखड्यातील मंजूर पदाच्या मर्यादेत सहाय्यक अनुदान, अशा नगरपालिकांना शासनामार्फत वितरित करण्याबाबत विचार व्हावा. जेणेकरुन नगरपरिषदेतील रिक्त पदाअभावी तेथील नागरिक मुलभूत नागरी सेवा मिळण्यापासून वंचित राहणार नाहीत. यास्तव विभागाने सामान्य प्रशासन विभागाशी विचार विनिमय करुन आवश्यक ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तातडीने सादर करावा. सेवास्तराचा बेंचमार्क (SLB's) साध्य करण्यासंदर्भात ज्या ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी दुर्लक्ष केलेले आहे त्यांच्यावर तसेच ज्या ठेकेदारांना काम सोपविण्यात आले व त्यांनी ते केले नाही त्यांचेवर देखील कारवाई करण्यात यावी व सेवास्तराचा बेंचमार्क (SLB's) साध्य करण्यासंदर्भात राज्यातील सर्व नगरपरिषदांचा आढावा घेवून सेवास्तराचा बेंचमार्क (SLB) निर्देशांकाची १००% पुर्तता होईल याबाबत विभागाने योग्य ती कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

'सांडपाणी व्यवस्थापन' :

४.३० मुंबई महानगरपालिका (MMC) अधिनियमानुसार नगरपरिषदांमध्ये निर्माण झालेल्या सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी एखाद्या रस्त्यावर किंवा रस्त्याखालील किंवा कोणत्याही ठिकाणी सांडपाणी वाहिनी, झाकलेली गटारे, भोगदे, कलव्हर्टस्, नाले, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) इ. बांधणे आणि ते सांडपाणी समुद्र, नदी इ. मध्ये प्रवाहीत करण्याआधी त्यावर प्रक्रिया करणेही बंधनकारक आहे व याबाबत नगरपरिषदेने कार्यवाही करावयाची आहे. राष्ट्रीय बेंचमार्कमध्ये सर्व स्वच्छतागृहांची व्याप्ती, गटारांच्या जाळ्यांची सेवा आणि सांडपाणी प्रक्रियेची पर्याप्त क्षमता इ. विहित केलेली आहे.

नगरपरिषदेमधील सांडपाण्याचे संकलन आणि विल्हेवाट यासाठी पायाभुत सुविधांची पर्याप्तता :—

४.३१ सांडपाण्याचे योग्यप्रकारे व्यवस्थापन होण्यासाठी स्वच्छतेच्या सुविधा सुधारण्यासाठी स्वच्छतागृह सहज उपलब्ध असणे, गटारास थेट जोडणी उपलब्ध असणे आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP) पर्यंत वाहून आणलेल्या सांडपाण्याचा अंतिम निचरा होण्यासाठी त्यावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची (STP) क्षमता पर्याप्त असणे आवश्यक असते. महालेखापालांनी निवड केलेल्या ३६ नगरपरिषदांमध्ये सन २०१३-१४ दरम्यान २४७.१५ मिलियन लिटर दररोज (MLD) इतके सांडपाणी निर्माण झाले होते. निवडलेल्या काही नगरपरिषदांमध्ये तेथील नागरिकांसाठी घरगुती किंवा सार्वजनिक स्वच्छतागृहांची उपलब्धता १००% नव्हती, ज्या इमारतीसाठी घरगुती किंवा सार्वजनिक स्वच्छतागृह उपलब्ध होती त्यांची व्याप्ती ४७% ते ९८% होती. ३६ नगरपरिषदांपैकी ४ नगरपरिषदांमध्ये इमारतींचे सांडपाणी थेट जमिनीखालील गटारामध्ये अथवा सांडपाणी संकलन वाहिनीमध्ये सोडले जात होते. २ नगरपरिषदांमध्ये गटार खुप जुने होते. त्यामुळे निर्माण झालेले सांडपाणी जवळच्या जलाशयात प्रवाहीत केले जात होते. तर उर्वरीत ३० नगरपरिषदांमध्ये उघड्या गटारात किंवा पुराचे पाणी वाहुन नेणाऱ्या गटारात सांडपाणी सोडले जात होते, जे जवळच्या नदीमध्ये प्रवाहीत होत होते. शोषखड्डयामध्ये जमा झालेले सांडपाणी कोणत्याही प्रक्रियेविना डंपिंग ग्राऊंडमध्ये टाकण्यात येत होते. फक्त शिर्डी व पंढरपूर या २ नगरपालिकांमध्ये निर्माण झालेल्या संपुर्ण सांडपाण्यावर अंतिमतः विल्हेवाट लावण्यापुर्वी संपूर्ण प्रक्रिया करण्यात येत होती. उर्वरीत ३४ नगरपरिषदांमधील दररोज २०८.५१ मिलियन लिटर MLD सांडपाणी, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या (STP अपर्याप्त क्षमतेमुळे किंवा त्या कार्यरत नसल्यामुळे प्रक्रियेविना सोडले जात होते असा गंभीर आक्षेप महालेखापालांनी नमूद केला आहे. सदर आक्षेपाबाबत विभागीय सचिवांनी खुलासा सादर केला की, पंढरपूर व शिर्डीचे काम यापुर्वीच पूर्ण झालेले आहे. नाशिक - ९५%, कुळगाव बदलापूर - ९६%, पनवेल - १००%, नंदुरबार - ९०% ते ९५% काम झालेले असून अन्य ठिकाणी जागा उपलब्धतेची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर खुलाशाअंती समितीने सुचित केले की, **अशा महत्वाच्या बाबींकरीता नगरपालिकांनी तातडीने जागा उपलब्ध करुन घेणे आवश्यक आहे. याबाबत विभागाने आढावा घ्यावा व आवश्यकतेनुसार महसुल विभागाची मदत घ्यावी व सर्व नगरपरिषदांना जागा उपलब्ध करुन द्यावी. जी कामे अद्याप पुर्ण झालेली नाहीत ती तातडीने पुर्ण करावी. महानगरपालिकांच्या धर्तीवर नगरपालिकांमध्ये सिव्हरेज अभियंत्यांची पदे निर्माण करण्याच्या आवश्यकतेबाबत गांभीर्याने विचार करावा व आवश्यक ती पदे निर्माण करण्यात यावीत. विभागाने नगरपरिषदांना सिव्हरेज अभियंता दिला नाही तर, नगरपरिषदेमार्फत योजनांवर होणारा खर्च योग्यप्रकारे उपयोगात येवून योजना तांत्रिकदृष्ट्या कार्यरत होईल किंवा नाही याबाबत समिती साशंक आहे. ज्या ठिकाणी विभागाने यापुर्वीच निधी उपलब्ध करुन दिलेला आहे व नगरपरिषदांनी कार्यवाही केलेली नाही त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी. लोणावळा नगरपरिषदेअंतर्गत सदर कामाकरीता निविदा अटी शर्तीमध्ये तरतूद नसतानाही मुख्याधिकाऱ्यांनी मोबीलायझेशन ॲडव्हान्स दिला आहे. त्याबाबत मुख्याधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचेकडून योग्य त्या रकमेची वसुली करण्यात यावी. विभागाने यापुर्वी त्यांचेविरुद्ध सुरू केलेल्या विभागीय चौकशीचे काम तातडीने पुर्ण करावे. वास्तविक तरतूद नसताना रु. १.५ कोटी एवढा मोबीलायझेशन ॲडव्हान्स देणे हा एक प्रकारचा अपहारच आहे. त्यामुळे संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबतही उचित कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

"SLB's साध्य न करणे" :

४.३२ केंद्र शासनाच्या नगरविकास मंत्रालयाने (MOUD) ने विहित केलेल्या ९ निर्देशांकांचा किंवा नगरपरिषदांनी सांडपाणी व्यवस्थापनाबाबत स्वतः ठरविलेल्या निर्देशांकांच्या तुलनेत निवड केलेल्या ३६ नगरपरिषदांनी साध्य केलेल्या सेवास्तराचा बेंचमार्क (SLB's) च्या तपशिलासह महालेखापालांनी असा आक्षेप नमूद केला आहे की, ग्राहक तक्रार निवारणातील क्षमतेव्यतिरिक्त इतर ८ निर्देशांकांमध्ये नगरपरिषदांनी अत्यल्प साध्य केले आहे. याबाबत समितीच्या साक्षीमध्ये समितीने विचारणा केली की, शौचालयाची बांधणी, गटारांच्या जाळीच्या सेवांची व्याप्ती, सांडपाणी प्रक्रिया व निर्देशांकावर नगरपालिकांनी खुपच कमी बेंचमार्क पूर्ण केलेले आहेत. ग्राहक तक्रार निवारणाबाबत विभागाने सादर केलेली आकडेवारीही वस्तुस्थितीस अनुसरुन नाही असे समितीचे मत आहे. २७ नगरपालिकांमध्ये १००% ग्राहक तक्रार निवारण होते ही बाब समितीस न पटण्यासारखी आहे. **नगरपरिषदांनी विभागास सादर केलेल्या सर्व आकडेवारीची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. विभागाद्वारे संचालक, नगरपालिका प्रशासन यांना अधिक सक्षम करुन सर्व बेंच मार्कची पुर्तता करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्याबाबत निर्देश देण्यात यावेत. लेखापरिक्षणास आक्षेप नोंदवून ३ वर्षाचा कालावधी झालेला आहे. तरीही राष्ट्रीय बेंच मार्कच्या पुर्ततेबाबत विभाग**

समाधानकारक कार्यवाही करू शकले नाही असे खेदाने नमूद करण्यात येत आहे. राज्यातील मुंबईसारखे शहर सुद्धा हागणदारीमुक्त झालेले नाही. सांडपाण्याचा पुनर्वापर फक्त एकाच महानगरपालिकेत होत आहे. ही बाब राज्याच्या दृष्टीने चिंताजनक आहे. महाराष्ट्रातील ग्राहक तक्रार निवारणाच्या संदर्भात कॉल सेंटर उघडून सदर कॉल सेंटरचे क्रमांक राज्यातील जनतेस उपलब्ध करुन दिल्यास कॉल सेंटरवर प्राप्त तक्रारींचा विभागास चांगला फायदा होईल. पोर्टल ऐवजी कॉल सेंटरवर तक्रार करणे जनतेस सोईस्कर ठरेल व त्यानंतर कॉल सेंटरच्या तक्रारी शासनाच्या पोर्टलला आवश्यक त्या कारवाईकरीता पाठविण्यात याव्यात व प्राप्त तक्रारींवर निश्चित स्वरुपाची कार्यवाही करण्यासंदर्भात विभागाने उपाययोजना करावी. तसेच राज्यातील सर्व नगरपरिषदांमध्ये सेवास्तराचा बेंचमार्क (SLB's) निर्देशांकाबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेवून १००% निर्देशांक पूर्ण होतील याबाबत निश्चित स्वरुपाची उपाययोजना करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात सादर करावी अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

विवरण क्रमांक १

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

दूरध्वनी क्र.24010437/24020781

Website : http://mpcb.gov.in

कल्पतरु पॉईंट, तिसरा मजला,
सायन माटुंगा स्कीम रोड नं.८
सिने प्लॅनेटसमोर, सायन (पूर्व),
मुंबई : ४०० ०२२.

जा.क्र.: मप्रनि/प्राका(मुख्यालय)/म-२८

दिनांक : १६/०२/२०१७.

प्रति,

अ) प्रधान सचिव - १
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

ब) प्रधान सचिव - २
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

विषय : घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ ची अंमलबजावणी महानगरपालिका व नगरपालिका यांचेकडून होत नसल्याबाबत.

संदर्भ : दि.१८/०१/२०१७ रोजी लोक लेखा समितीसमोर म.प्र.नि.मंडळाचे सदस्य सचिव यांची झालेली साक्ष.

महोदय,

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या स्थानिक संस्थांच्या अहवालातील परिच्छेद क्र.४.१ निवडक नगरपरिषदांमध्ये मूलभूत सेवांचा पुरवठा या परिच्छेदातील मुदयांच्या संदर्भात दि.१८/०१/२०१७ रोजी मंडळाचे मा.सदस्य सचिव यांची साक्ष लोक लेखा समितीसमोर झाली. या संदर्भात नगरपालिका/महानगरपालिकांनी घनकचरा व्यवस्थापन नियमांतर्गत प्राधिकारपत्र घेतलेले आहे किंवा नाही व घनकचरा व्यवस्थापन नियमांची अंमलबजावणी करण्यात येते किंवा नाही या अनुषंगाने साक्ष नोंदविण्यात आली.

आपणास कळविण्यात येते की, राज्यामध्ये एकूण २१८६७.२७ टन प्रतिदिन घनकचरा तयार होतो त्यापैकी ६९९३.२ टन कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते.

राज्यात एकूण २६२ स्थानिक स्वराज्य संस्था (महानगरपालिका/नगरपालिका) असून त्यापैकी २३८ स्थानिक स्वराज्य संस्थांनी घनकचरा नियमांतर्गत एकदा तरी प्राधिकार पत्र घेतलेले आहे. परंतु त्यापैकी ९० स्थानिक स्वराज्य संस्थांनी नुतनीकरण करण्यासाठी अर्ज केलेले नाहीत. तसेच २४ स्थानिक स्वराज्य संस्थांनी एकदाही प्राधिकारपत्र घेतलेले नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सर्व नगरपालिका/महानगरपालिकांना वेळोवेळी घनकचरा अधिनियम २०१६ अंतर्गत नोटीसा दिलेल्या आहेत तसेच काही नगरपालिका/महानगरपालिकांविरुध्द न्यायालयात खटले दाखल केलेले आहेत.

नगरपालिका/महानगरपालिकांची सविस्तर माहिती उदा.घनकचरा किती निर्माण होतो? घनकचऱ्यावर प्रक्रिया केली जाते किंवा नाही? प्राधिकार पत्राची वैधता इ.बाबतची माहिती सोबत जोडलेल्या तक्त्यात दिलेली आहे.

नियम २०१६ अंतर्गत राज्यस्तरावर धोरण करणेबाबतची जबाबदारी नगर विकास विभागाकडे देण्यात आलेली आहे.

तरी आपणास विनंती करण्यात येते की, सोबत दिलेल्या तक्त्यातील माहितीनुसार ज्या नगरपालिका/महानगरपालिकांनी प्राधिकारपत्र घेणे व घनकचरा प्रक्रिया प्रकल्प राबविणेबाबतची कार्यवाही केलेली नाही अशा नगरपालिका/महानगरपालिकांवर आपल्या स्तरावर कारवाई करावी.

आपला विश्वासु,

(डॉ.पी.अन्बलगन, भाप्रसे)
सदस्य सचिव

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत माहितीसाठी सविनय सादर :

मा.अप्पर मुख्य सचिव, पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीसाठी :

श्री.चु.श्रीरंगम, उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ, सचिवालय

२। सचिवालय कार्यालय केली आहे.

महानगरपालिकांची घनकचरा व्यवस्थापनाबाबतची माहिती.

अ. क्र.	महानगरपालिकेचे नांव	घनकचरा नियमांतर्गत प्राधिकारपत्र घेतले आहे का?	असल्यास त्याची वैधता	नुतनीकरणासाठी अर्ज केला आहे का?	घनकचरा निर्मिती मे.टन प्रतिदिन	सद्यस्थितीत घनकचरा प्रक्रिया केली जाते का? असल्यास किती मे.टन प्रतिदिन व त्याचे स्वरुप (कंपोस्टींग/बायोगॅस इ.)
१.	बृहन्मुंबई महानगरपालिका	होय	३१/१०/२०१६	होय फक्त कांजूरमार्ग क्षेपणभुमीसाठी अर्ज केला असून मुख्यालयास सादर केलेला आहे.	८६००	३००० मे. टन प्रतिदिन बॉयोरिॲक्टर लॅन्डफिल १००० कंपोस्टींग, २५ मे. टन प्रतिदिन गांडूळ खत, १० मे. टन प्रतिदिन बायोगॅस, १५ मे. टन प्रतिदिन पिलेटस, ९० मे. टन प्रतिदिन पुर्नवापर केला जातो.
२.	नवी मुंबई महानगरपालिका	होय	३१.१२.२०१७	वैध आहे.	६७५	होय (कंपोस्टींग-१५०, व्हरमि कंपोस्टींग - ३५०, आरडीफ - १५०)
३.	ठाणे महानगरपालिका	होय	३१.०७.२०१४	नाही	८००	होय, बायोमिथेन गॅस-३५ टन, फयुएल ब्रिकेटस-२० टन, निर्माल्यापासून खतनिर्मिती ५ टन
४.	मिरा- भाईंदर महानगरपालिका	होय	३०/०९/२०१७	वैध आहे.	३९०	नाही
५.	वसई-विरार शहर महानगरपालिका	होय	३१/१२/२०१७	वैध आहे.	३००	नाही

६.	कल्याण डोंबिवली महानगरपालिका १. मांडा, बारवे २. उंबर्डे	होय	३१/०५/२०१६ ३१/०५/२०१६	होय	५१०	नाही
७.	उल्हासनगर महानगरपालिका	नाही	---	नाही	३२०	नाही
८.	भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका	होय	३०/०४/२०१२	नाही	४५०	नाही
९.	पनवेल महानगरपालिका	होय	३१/१२/२००३	होय	४९	नाही
१०.	अहमदनगर महानगरपालिका	होय	३१/१/२०१७	नाही	१२५	नाही
११.	नाशिक महानगरपालिका	होय	३१.१२.२०१५	होय	४००	कम्पोस्टिंग, बायोगस, आरडीएफ,
१२.	मालेगाव महानगरपालिका	होय	३१/१२/२००६	नाही	२५०	संस्थितीत थोड्याप्रमाणात कम्पोस्टिंग करण्यात येते व उर्वरीत डंपिंग करण्यात येते
१३.	धुळे महानगरपालिका	होय	३१/१२/२००६	नाही	१२०	घनकच-यावर व्हर्मी कंपोस्टींग या पध्दतीने २५ मे.टन. प्रति दिन प्रकिया करणे सूरू करण्यात आलेले आहे.
१४.	जळगांव शहर महानगरपालिका	होय	३१/०३/२०१७	वैध आहे.	२२०	घनकचरा प्रक्रिया यंत्रणा बसविण्यात आलेली आहे, परंतु सद्यस्थितीत न्यायालयीन प्रक्रियेमुळे बंद स्थितीत आहे.
१५.	पुणे महानगरपालिका	होय	३१/१२/२०१६	होय	१७००	लॅंडफील - ५००.० थर्मल कंपोस्टिंग - ४२.७

			आणि ३१/०१/२०१७			मेकॅनिकल कंपोस्टिंग -१३.० वर्मी कंपोस्टिंग - २००.० आर. डी. एफ. - २५०.० बायो मिथेनेशन - १०५.० बायोगॅस - ११५.१८
१६.	सोलापूर महानगरपालिका	होय	३१/१२/२०१७	वैध आहे.	३५०	होय, अंदाजे २५० ते ३०० मे.टन कचयापासून बायोगॅस व वीज निर्मिती
१७.	पिंपरी चिंचवड महानगरपालिका	होय	३१/१०/२०१६	होय (२५/०५/२०१६)	८००	७४५ मे. टन. कंपोस्टींग
१८.	सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका	होय.	३१/१०/२०१७	वैध आहे.	१८०	नाही.
१९.	कोल्हापुर महानगरपालिका (कसबा बावडा टाकाळा लेक टोप)	होय	३०/११/२०१६ ३०/०६/२०१५ ३१/१०/२०१५	होय	१६५	नाही.
२०.	औरंगाबाद महानगरपालिका	होय	३१/१२/२००४	नाही	४५०	नाही
२१.	लातूर महानगरपालिका	होय	३१/०३/२०२०	वैध आहे.	१२०	सद्यस्थितीत ५० ते ६० मे. ट घनकचयावर मॅकॅनिकल प्रोसेसिंग प्लँट द्वारे प्रक्रिया केली जाते व उर्वरीत कचरा साईटवा डंप केला जातो तसेच जमा झालेल्या ओल्या कच-याचे कंपोस्टिंग केले जाते.
२२.	परभणी महानगरपालिका	होय	३०.०४.२०१७	वैध आहे.	७५	नाही
२३.	नांदेड वाघेला शहर महानगरपालिका	होय	३१/०१/२०१७	नाही	२५०	नाही.
२४.	अमरावती महानगरपालिका	होय	३१/०१/२०१७	नाही	२७५	नाही

२५.	अकोला महानगरपालिका	नाही	--	नाही	१[illegible]	नाही
२६.	नागपुर महानगरपालिका	होय	३०/०४/२०१७	वैध आहे.	१०००	नागरी घनकचरा वेगवेगळा करण्यात येऊन काही प्रमाणात प्रक्रिया केली जाते. १७० ते १८० टन/दिन कचरा वर्गीकरण करुन ओल्या कचऱ्यावर कंपास्टींग करुन खताची विक्रि केली जाते.
२७.	चंद्रपूर महानगरपालिका	होय	३१/१२/२००३	नाही	१२०	नाही

नगरपालिकांची घनकचरा व्यवस्थापनाबाबतची माहिती.

अ.क्र.	नगरपालिकेचे नांव	घनकचरा नियमांतर्गत प्राधिकारपत्र घेतले आहे का?	असल्यास त्याची वैधता	नुतनीकरणासाठी अर्ज केला आहे का?	घनकचरा निर्मिती मे.टन प्रतिदिन	सद्यस्थितीत घनकचरा प्रक्रिया केली जाते का? असल्यास किती मे.टन प्रतिदिन व त्याचे स्वरुप (कंपोस्टींग/बायोगॅस इ.)
1.	उरण नगरपालिका	होय	31.12.2005	होय	11	नाही. (बायोगॅस प्रकल्प 5 मे. ट्न प्रति दिन क्षमतेचा उभारलेला आहे तथापि कार्यान्वित नाही)
2.	पालघर नगर परिषद, पालघर	होय	31.12.2011	नाही	14	कुठल्याही प्रकारची प्रक्रिया केली जात नाही.
3.	डहाणु नगर परिषद, पालघर	होय	31.03.2011	नाही	11	कुठल्याही प्रकारची प्रक्रिया केली जात नाही
4.	जव्हार नगर परिषद, पालघर	होय	31.12.2005	नाही	3	कुठल्याही प्रकारची प्रक्रिया केली जात नाही
5.	कुळगांव बदलापूर नगरपरिषद	होय	31.12.2014	होय	63	कंपोस्टींग -6 मे.टन, बायोगॅस - 5 मे.टन
6.	अंबरनाथ नगरपरिषद	होय	31.12.2003	होय	98	निरंक
7.	खोपोली नगरपालिका	होय	31/12/2016	होय	25	5 टन ओला कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती केली जाते व उर्वरित 20 टन कचरा घनकचरा प्रक्रिया प्रकल्प मौजे मिल येथे पाठविला जातो. तथापि सध्या हा कंपोस्टिंग प्रकल्प बंद आहे
8.	माथेरान नगरपरिषद	नाही	--	होय	6.5	बायोगॅस उर्वरित घनकचरा विनाप्रक्रिया नगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेवर टाकण्यात येतो
9.	अलिबाग नगरपरिषद	नाही	--	नाही	7	घनकचरा विनाप्रक्रिया नगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेवर टाकण्यात येतो
10.	कर्जत नगरपरिषद	होय	31/12/2018	वैध	6	घनकचरा विनाप्रक्रिया नगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेवर टाकण्यात येतो
11.	पेण नगरपरिषद	होय	31/07/2017	वैध	15	घनकचरा विनाप्रक्रिया नगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेवर टाकण्यात येतो
12.	मुरूड-जंजिरा नगरपरिषद	होय	31/12/2016	नाही.	5	घनकचरा विनाप्रक्रिया नगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेवर टाकण्यात येतो

13.	रोहा नगरपरिषद	होय	31/12/2016	नाही	7.5	बायोगॅस उर्वरित घनकचरा विनाप्रक्रिया नगरपालिकेने निश्चित केलेल्या जागेवर टाकण्यात येतो
14.	महाड नगर पालिका	होय	31/12/2016	होय	6.0	नाही
15.	श्रीवर्धन नगरपालिका	होय	31/8/2017	वैध	1.5	नाही
16.	सटाना नगरपालिका	होय	31.12.2007	नाही	11	संस्थितीत उर्वरीत डंपिंग करण्यात येते
17.	नांदगाव नगरपालिका	होय	31.12.2011	नाही	6	संस्थितीत उर्वरीत डंपिंग करण्यात येते
18.	सिन्नर नगरपालिका	होय	31.12.2011	होय	15.54	संस्थितीत उर्वरीत डंपिंग करण्यात येते
19.	भगूरनगरपालिका	होय	31.12.2007	नाही	4	संस्थितीत उर्वरीत डंपिंग करण्यात येते
20.	त्रिंबक नगरपरिषद	होय	31.12.2015	नाही.	2	संस्थितीत उर्वरीत डंपिंग करण्यात येते
21.	येवला नगरपरिषद	होय	31.12.2010	नाही	11	संस्थितीत उर्वरीत डंपिंग करण्यात येते
22.	मनमाड नगरपरिषद	होय	31.12.2010	होय	20	संस्थितीत उर्वरीत डंपिंग करण्यात येते
23.	इगतपुरी नगरपरिषद	होय	31.12.2012	नाही	6	संस्थितीत उर्वरीत डंपिंग करण्यात येते
24.	देवळाली छावणी परिषद	होय	31.12.2007	नाही	4	संस्थितीत उर्वरीत डंपिंग करण्यात येते
25.	कोपरगांव नगरपालिका, अहमदनगर.	होय	30/12/2014	होय	12	नाही
26.	श्रीरामपुर नगरपालिका, अहमदनगर.	होय	30/12/2014	होय	30	नाही
27.	संगमनेर नगरपालिका, अहमदनगर.	होय	30/12/2014	होय	20	नाही
28.	राहुरी नगरपालिका, अहमदनगर	होय	30/12/2014	होय	6	नाही
29.	श्रीगोंदा नगरपालिका, अहमदनगर.	होय	30/12/2014	होय	4	नाही
30.	पाथर्डी नगरपालिका, अहमदनगर.	होय	30/12/2014	होय	3	नाही
31.	राहाता नगरपालिका, अहमदनगर.	होय	30/12/2014	होय	4	नाही
32.	देवळाली प्रवरा नगरपालिका अहमदनगर.	होय	30/12/2014	होय	6	नाही
33.	भिंगार छावणी, अहमदनगर	होय	30/12/2014	होय	7	नाही

34.	शिर्डीनगरपंचायत, शिर्डी, अहमदनगर.	होय	30/12/2014	होय	10	नाही
35.	दौंडाईचा नगरपरिषद	होय	31/12/2005	होय	22	सदयस्थितीत घनकच-यावर प्रकिया केली जात नाही.
36.	शिरपूर नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	25	सदयस्थितीत 4 मे. टन. घनकच-यावर व्हर्मी कंपोस्टींग पध्दतीने प्रक्रिया केली जाते.
37.	नंदुरबार नगरपरिषद	होय	31/12/2007	होय	40	घनकच-यावर प्रक्रिया केली जात नाही.
38.	नवापूर नगरपरिषद	होय	31/12/2015	होय	6	घनकच-यावर प्रक्रिया केली जात नाही.
39.	शहादा नगरपरिषद	होय	31/12/2007	नाही.	10	घनकच-यावर प्रक्रिया केली जात नाही.
40.	तळोदा नगरपरिषद	होय	31/12/2007	नाही.	6.50	घनकच-यावर प्रक्रिया केली जात नाही.
41.	भुसावळ नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2010	होय	47	कंपोस्टींगसाठीची 70 टक्के मशिनरी बसविलेली आहे, परंतु सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
42.	पाचोरा नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	नाही	10	गांडुळखत निर्मिती प्रकल्पसाठीचे खड्डे तयार आहेत, परंतु सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
43.	एंरडोल नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	नाही	7	गांडुळखत निर्मिती प्रकल्पसाठीचे खड्डे तयार आहेत, परंतु सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
44.	पारोळा नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	नाही	8	सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
45.	अमळनेर नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	नाही	28	सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
46.	चाळीसगांव नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	होय	8	गांडुळखत निर्मिती केली जाते आणि उर्वरीत कचरा उघडयावर टाकला जातो.
47.	सावदा नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2009	होय	5	घनकचरा वेगवेगळा करण्याकरीता यंत्रणा उभारलेली असून सद्यस्थितीत बंद आहे व सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
48.	रावेर नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	नाही	8	सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
49.	फैजपूर नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	नाही	5	घनकचरा वेगवेगळा करण्याकरीता यंत्रणा उभारलेली असून सद्यस्थितीत बंद आहे व सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
50.	यावल नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	नाही	8.4	सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.

51.	चोपडा नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	नाही	18	घनकचरा वेगवेगळा करण्याकरीता यंत्रणा उभारलेली असून सद्यस्थितीत बंद आहे व सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
52.	धरणगांव नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	नाही	6	घनकचरा वेगवेगळा करण्याकरीता यंत्रणा उभारलेली असून सद्यस्थितीत बंद आहे व सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
53.	जामनेर नगरपालिका, जळगांव.	होय	31/12/2007	होय	10	सद्यस्थितीत उघडयावर कचरा टाकला जातो.
54.	भडगांव नगरपालिका, जळगांव.	नाही	--	नाही	7	नाही
55.	इंदापूर नगरपरिषद	होय	31/12/2008 व 31/12/2005	नाही	3.5	केवळ डम्पींग
56.	जेजूरी नगरपरीषद	होय	31/12/2005	नाही	2.0	केवळ डम्पींग
57.	सासवड नगरपरीषद	होय	31/12/2016	नाही	12.0	कंपोस्टिंग-10.0 आर. डी. एफ. -2.0
58.	दौंड नगरपरीषद	होय	31/12/2005	नाही	12.0	केवळ डम्पींग
59.	भोर नगरपरीषद	होय	31/12/2007	नाही	6.0	केवळ डम्पींग
60.	बारामती नगरपरीषद	होय	31/07/2005	नाही	38.0	वर्मी कंपोस्टिंग -2.0 बायो मिथेनेशन /बायोगॅस 5.0
61.	तळेगाव नगरपरिषद	होय	31.12.2015	नाही	8	नाही
62.	लोणावळा नगर परिषद	होय	31.12.2016	होय	35	होय, काही प्रमाणात कंपोस्टींग केले जाते (सुमारे ५ मे.टन/दिन)
63.	आळंदी नगरपरिषद	होय	31.12.2019	वैध	20	होय, काही प्रमाणात कंपोस्टींग केले जाते (सुमारे ३ मे.टन/दिन)
64.	शिरुर नगरपरिषद	नाही	--	नाही	15	होय, काही प्रमाणात कंपोस्टींग केले जाते (सुमारे ३ मे.टन/दिन)
65.	जुन्नर नगरपरिषद	होय	31.12.2016	होय.	6	नाही.
66.	देहु छावणी परिषद	होय	---	होय.	7	नाही
67.	पुणे छावणी परिषद	होय	31.12.2017	वैध	35	होय, काही प्रमाणात कंपोस्टींग केले जाते (सुमारे १० मे.टन/दिन)

68.	खडकी छावणी परिषद	होय	31.12.2014	होय	30	होय, काही प्रमाणात कंपोस्टींग केले जाते (सुमारे १५ मे.टन/दिन)
69.	चाकण नगरपालिका	नाही	---	नाही	3	नाही
70.	राजगुरुनगर नगरपालिका	नाही	--	नाही	6	हिंजवडी येथील खाजगी इसम यांच्या कडे घनकचऱ्यावर प्रक्रीया करण्यासाठी पाठविण्यात येते.
71.	पंढरपूर नगरपालिका, पंढरपूर	होय	31/12/2019	वैध	40	होय, अंशत: 2.0 मे. टन कंपोस्टींग
72.	बार्शी नगरपालिका, बार्शी	होय	31/12/2019	वैध	40	होय, अंशत: 5.0 मे. टन कंपोस्टींग
73.	सांगोला नगरपालिका, सांगोला	होय	31/12/2015	होय	2.0	अंशत: कंपोस्टींग 0.5 मे. टन
74.	मंगळवेढा नगरपालिका, मंगळवेढा	होय	31/12/2015	होय	4.0	अंशत: कंपोस्टींग 5.0 मे. टन
75.	कुर्डूवाडी नगरपालिका, कुर्डूवाडी	होय	31/12/2015	होय	2.5	अंशत: कंपोस्टींग 0.5 मे. टन
76.	करमाळा नगरपालिका, करमाळा	होय	31/12/2015	होय	4.0	अंशत: कंपोस्टींग 0.5 मे. टन
77.	अक्कलकोट नगरपालिका, अक्कलकोट	होय	31/12/2019	वैध	12	अंशत: कंपोस्टींग 1.0 मे. टन
78.	मैंदर्गी नगरपालिका, मैंदर्गी	होय	31/12/2019	वैध	2.5	होय, अंशत: 0.5 मे टन
79.	दुधनी नगरपालिका, दुधनी	होय	31/12/2019	वैध	3.0	होय, अंशत: 0.5 मे टन
80.	कागल नगरपालिका	होय	31.12.2015	नाही	9	कागल घनकचरा प्रक्रीया यंत्रणा बसविण्यात आली असून घनकच-यापासून विजनिर्मीती, खत निर्मीती व गांडून खत निर्मीती सुरु आहे. (5.5 टन)
81.	मलकापर	होय	31.12.2017	वैध	1.25	निरंक
82.	गडहिंग्लज	होय	31.12.2017	वैध	15	खत निर्मिती करणेत येते (1.5 टन)
83.	मुरगुड	होय	31.12.2014	होय	3	नाही, शास्त्रोक्त पध्दतीने भुभरण यंत्रणा प्रस्ताव अंतीम टप्प्यात आहे.
84.	पन्हाळा	होय	31.12.2013	नाही	1	नाही
85.	वडगांव	होय	31.12.2013	नाही	8	नाही
86.	जयसिंगपूर	होय	31.12.2015	नाही	17	ओल्या कच-यावर खत निर्मीती (2 टन)
87.	इचलकरंजी	होय	31.08.2016	नाही	120	निरंक
88.	कुरुंदवाड	होय	31.12.2014	नाही	5.59	कंपोस्टींग (3.39 टन)

89.	इस्मामपूर नगरपरिषद, सांगली.	होय.	31.12.2013	होय	25	सदयस्थितीत सेगरीगेशन व व्हर्मीकंपोस्टिंग अश्या प्रकारे एकूण 18 टन प्रतिदिन. इतक्या कच-यावर प्रक्रिया केली जाते.
90.	आष्टा नगरपरिषद, सांगली.	होय.	31.12.2013	होय	8	सदयस्थितीत सेगरीगेशन व व्हर्मीकंपोस्टिंग अश्या प्रकारे एकूण 4 टन प्रतिदिन. इतक्या कच-यावर प्रक्रिया केली जाते.
91.	तासगांव नगरपरिषद, सांगली.	होय.	31.12.2012	नाही.	17	सदयस्थितीत कंपोस्टिंग च्या माध्यमातून एकूण 7 टन प्रतिदिन. इतक्या कच-यावर प्रक्रिया केली जाते.
92.	विटा नगरपरिषद, सांगली.	होय.	31.12.2013	नाही.	17	सदयस्थितीत सेगरीगेशन, कंपोस्टिंग व व्हर्मीकंपोस्टिंग अश्या प्रकारे एकूण 10 टन प्रतिदिन. इतक्या कच-यावर प्रक्रिया केली जाते.
93.	जत नगरपरिषद, सांगली.	नाही.	--	नाही.	6	प्रकिया केली जात नाही.
94.	छावणी कॅन्टोमेंट बोर्ड छावणी, औरंगाबाद	नाही	----	नाही	4	नाही
95.	गंगापुर नगरपरिषद, औरंगाबाद	होय	31/12/2015	होय	4.5	नाही
96.	वैजापुर नगरपरिषद, औरंगाबाद	होय	26/07/2013	नाही	7.33	नाही
97.	पैठण नगरपरिषद, औरंगाबाद	होय	31/12/2015	होय	17.3	नाही
98.	खुल्ताबाद नगरपरिषद, औरंगाबाद	होय	31/12/2015	होय	1.5	नाही
99.	सिल्लोड नगरपरिषद, औरंगाबद	होय	31/12/2015	होय	12.0	नाही
100.	कन्नड नगरपरिषद, औरंगाबाद	होय	31/12/2015	होय	10.0	नाही
101.	औसा नगरपरिषद	होय	31/12/2009	नाही	12	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
102.	अहमदपूर नगरपरिषद	होय	31/12/2010	होय	16	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
103.	निलंगा नगरपरिषद	होय	31/12/2004	नाही	15	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
104.	उद्‌गगीर नगरपरिषद	होय	31/12/2008	होय	30	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.

105.	उस्मानाबाद नगरपरिषद	होय	30.09.2014	नाही	46.5	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
106.	भूम नगरपरिषद	होय	30.09.2014	नाही	2.5	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
107.	नळदूर्ग नगरपरिषद	होय	30.09.2014	नाही	2	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
108.	परांडा नगरपरिषद	होय	30.09.2014	नाही	2	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
109.	उमरगा नगरपरिषद	होय	30.09.2014	होय	12	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
110.	तुळजापुर नगरपरिषद	होय	30/09/2014	नाही	20	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
111.	मुरुम नगरपरिषद	होय	31/12/2004	नाही	0.5	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
112.	कळंब नगरपरिषद	होय	31/12/2004	नाही	2	सद्यस्थितीत घनकचरा-यावर प्रक्रिया केली जात नाही व जमा झालेल्या कचरा साईटवर डंप केली जातो.
113.	जालना नगरपालिका	होय	31.12.2007	होय	50	सद्यस्थितीत घनकचरा प्रक्रिया केली जात नाही, फक्त डंपींग केला जातो
114.	परतूर नगरपालिका	होय	31.12.2015	होय	02	सद्यस्थितीत घनकचरा प्रक्रिया केली जात नाही, फक्त डंपींग केला जातो
115.	भोकरदन नगरपालिका	होय	31.12.2014	नाही	05	सद्यस्थितीत घनकचरा प्रक्रिया केली जात नाही, फक्त डंपींग केला जातो
116.	अंबड नगरपालिका	होय	31.12.2015	नाही	07	कंपोस्टींग केली जाते
117.	बीड नगरपालिका	होय	31.12.2015	होय	46	सद्यस्थितीत घनकचरा प्रक्रिया केली जात नाही, फक्त डंपींग केला जातो
118.	गेवराई नगरपालिका	होय	31.12.2015	होय	8	कंपोस्टींग केली जाते
119.	धारूर नगरपालिका	होय	31.12.2011	नाही	02	सद्यस्थितीत घनकचरा प्रक्रिया केली जात नाही, फक्त डंपींग केला जातो
120.	अंबाजोगाई नगरपालिका	होय	31.12.2015	नाही	20	कंपोस्टींग केली जाते

121.	माजलगाव नगरपालिका	होय	31.12.2015	नाही	12	सद्यस्थितीत घनकचरा प्रक्रिया केली जात नाही, फक्त डंपींग केला जातो
122.	पूर्णा नगर पालिका पूर्णा	होय	31.12.2015	नाही	12	नाही
123.	सेलू नगरपालिका सेलू	होय	31.12.2008	नाही	10	नाही
124.	गंगाखेड नगरपालिका	होय	31.12.2015	नाही	13	नाही
125.	जिंतूर नगरपालिका	होय	31.12.2015	नाही	15	नाही
126.	पाथरी नगरपालिका	होय	31.12.2009	नाही	8	नाही
127.	मानवत नगर पालिका	होय	31.12.2008	नाही	3.2	नाही
128.	सोनेपेठ नगरपालिका	होय	31.12.2015	नाही	2.1	नाही
129.	हिंगोली नगरपालिका	होय	31.12.2015	होय	25	नाही
130.	वसमत नगरपालिका	होय	31.12.2015	होय	8	नाही
131.	काळमनूरी नगरपालिका	होय	31.12.2008	होय	5	नाही
132.	परळी नगरपालिका	होय	31.12.2015	नाही	28	नाही
133.	देगलुर नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	9	डंम्पींग
134.	लोहा नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	8	डंम्पींग
135.	कंधार नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	6	डंम्पींग
136.	मुखेड नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	6	डंम्पींग
137.	धर्माबाद नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	9	डंम्पींग
138.	भोकर नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	12	डंम्पींग
139.	हदगाव üü नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	5	डंम्पींग
140.	मुदखेड नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	6	डंम्पींग
141.	माहुर नगरपंचायत	नाही	-------	नाही	2.5	डंम्पींग
142.	किनवट नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	6	डंम्पींग
143.	उमरी नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	4.2	डंम्पींग
144.	कुंडलवाडी नगरपरिषद	होय	31/12/2014	नाही	1	डंम्पींग
145.	बिलोली नगरपरिषद	होय	31/12/2014	होय	2.6	डंम्पींग
146.	अचलपूर नगरपरिषद, अमरावती	होय	31.03.2015	होय	30	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा कोणतीही प्रकिया न करता डंमपीग ग्राउंड साईडवर साठविण्यात येतो.

147.	अंजनगांव सुर्जी नगरपरिषद	होय	31/12/2011	होय	13.05	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा कोणतीही प्रकिया न करता डंमपीग ग्राउंड साईडवर साठविण्यात येतो.
148.	चांदुर रेल्वे नगरपरिषद	होय	31/12/2016	नाही	4.5	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा कोणतीही प्रकिया न करता डंमपीग ग्राउंड साईडवर साठविण्यात येतो.
149.	चिखलदरा नगरपरिषद	होय	31.03.2015	होय	2	0.02
150.	चांदुर बाजार नगरपरिषद	होय	31.03.2017	वैध	5	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा अल्पप्रमाणात मशिनीव्दारे वर्गीकरण करून, कोणतीही प्रकिया न करता टाकण्यात येतो.
151.	धामनगांव रेल्वे नगरपरिषद	होय	31.03.2017	वैध	2.4	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा अल्पप्रमाणात वर्गीकरण करून, कोणतीही प्रकिया न करता टाकण्यात येतो.
152.	दर्यापूर नगरपरिषद	होय	31/12/2003	होय	6	नाही, सदर स्थानिक स्वराज्य संस्थेला जिल्हास्तरीय समितीव्दारे घनकच-यासाठी अनुमती मिळालेली नसल्यामुळे सदर स्थानिक स्वराज्य संस्थेला घनकचरा स्थान निश्चिती करीता प्राधिकार पत्र मंडळाकडून नुतनीकरण करून देण्यात आलेले नाही.
153.	शेदुरजना घाट नगरपरिषद	होय	31.03.2017	वैध	4	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा कोणतीही प्रकिया न करता डंमपीग ग्राउंड साईडवर साठविण्यात येतो.
154.	वरूड नगरपरिषद	होय	31.03.2017	वैध	6	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा कोणतीही प्रकिया न करता डंमपीग ग्राउंड साईडवर साठविण्यात येतो.
155.	मोर्शि नगरपरिषद	होय	31.03.2015	होय	6.5	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा कोणतीही प्रकिया न करता डंमपीग ग्राउंड साईडवर साठविण्यात येतो.
156.	वाशिम नरपरिषद	होय	31/08/2016	होय	18	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा कोणतीही प्रकिया न करता डंमपीग ग्राउंड साईडवर साठविण्यात येतो.
157.	रिसोड नरपरिषद	होय	31.12.2015	होय	8	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा कोणतीही प्रकिया न करता डंमपीग ग्राउंड साईडवर साठविण्यात येतो.
158.	मंगरूळपीर नरपरिषद	होय	31.12.2015	होय	7	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा कोणतीही प्रकिया न करता डंमपीग ग्राउंड साईडवर साठविण्यात येतो.
159.	कारंजा लाड नरपरिषद	होय	31/08/2016	होय	14	नाही, सध्यास्थितीत घनकचरा हा कोणतीही प्रकिया न करता डंमपीग ग्राउंड साईडवर साठविण्यात येतो.

160.	अकोट नगरपालिका	होय	31/12/2003	होय	19.45	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
161.	तेल्हारा नगरपालिका	होय	प्राधिकारपत्रात वैधता नमुद केलेली नाही	होय	5	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
162.	पातुर नगरपालिका	होय	31/12/2004	होय	2	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
163.	मुर्तीजापुर नगरपालिका	होय	31/12/2003	होय	15	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
164.	बाळापुर नगरपालिका	होय	31/12/2015	होय	7	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
165.	बुलडाणा नगरपालिका	होय	31/12/2003	होय	15	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
166.	चिखली नगरपालिका	होय	31/03/2015	होय	13	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
167.	मलकापुर नगरपालिका	होय	31/12/2003	होय	14	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
168.	नांदुरा नगरपालिका	होय	31/12/2003	होय	7	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
169.	जळगाव जामोद नगरपालिका	होय	31/12/2003	होय	10	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
170.	खांमगाव नगरपालिका	होय	31/03/2017	वैध	26.05	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
171.	मेहकर नगरपालिका	होय	31/12/2016	होय	10	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
172.	लोणार नगरपालिका	होय	31/12/2003	होय	6.2	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
173.	सिंदखेडराजा नगरपालिका	होय	28/2/2015	होय	5	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.

174.	देऊळगाव राजा नगरपालिका	होय	31/12/2003	होय	6	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
175.	शेगाव नगरपालिका	होय	31/3/2015	होय	12	सद्यस्थितीत घनकच-यावर प्रक्रीया केली जात नाही. घनकच-याचे डम्पिंग केले जाते.
176.	काटोला नगरपरीषद	होय	30/01/2017	होय	10	नागरी घनकचरा वेगवेगळा करण्यात येऊन कोणतीही प्रकिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पींग)
177.	कामठी नगरपरीषद	होय	30/06/2017	वैध आहे.	21	नागरी घनकचरा वेगवेगळा करण्यात येऊन कोणतीही प्रकिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पींग)
178.	खापा नगरपरीषद	होय	30/06/2016	होय	3.3	नागरी घनकचरा वेगवेगळा करण्यात येऊन कचरा वेगवेगळा वर्गीकरण करुन त्यापैकी कंपोस्टींग करण्यात येऊन विक्रि किली जाते.
179.	नरखेड नगरपरीषद	होय	30/06/2014	नाही.	6.0	नागरी घनकचरा वेगवेगळा करण्यात येऊन कोणतीही प्रकिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पींग)
180.	रामटेक नगरपरीषद	होय	30/06/2014	नाही.	7.0	नागरी घनकचरा वेगवेगळा करण्यात येऊन कोणतीही प्रकिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पींग)
181.	कळमेश्वर नगरपरीषद	होय	30/06/2014	नाही.	3.5	नागरी घनकचरा वेगवेगळा करण्यात येऊन कचरा वेगवेगळा वर्गीकरण करुन त्यापैकी कंपोस्टींग करण्यात येऊन विक्रि किली जाते.
182.	सावनेर नगरपरीषद	नाही	--	नाही	10.0	नागरी घनकचरा वेगवेगळा करण्यात येऊन काही प्रमाणात ओल्या कच-यावर कंपास्टींग करुन खताची विक्रि केली जाते.
183.	मोहपा नगरपरीषद	होय	30/06/2016	होय	2.5	नागरी घनकचरा वेगवेगळा करण्यात येऊन कोणतीही प्रकिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पींग)

184.	मोवाड नगरपरीषद	होय	30/06/2014	नाही.	2.5	नागरी घनकचरा वेगवेगळा करण्यात येऊन कोणतीही प्रकिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पींग)
185.	वर्धा	होय	30/06/2014	होय	30	कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पीग)
186.	हिंगणघाट	होय	30/06/2017	वैध	22	कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पीग)
187.	देवळी	होय	30/06/2014	होय	5	कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पीग)
188.	पुलगांव	होय	30/06/2014	होय	10	कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पीग)
189.	आर्वी	होय	30/06/2014	होय	17	कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पीग)डंम्पीग
190.	सिंदी (रेल्वे)	होय	30/06/2014	नाही	2	कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पीग)
191.	उमरेड	होय	30/06/2017	वैध	13	घनकचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे व वर्गीकृत ओल्या कचऱ्यावर कंपोस्टींग करून त्याची विक्री केली जाते. सदर प्रक्रिया भेटी दरम्यान सुरू असल्याचे आढळून आले.
192.	वाडी (नवीन नगर पालिकेचे गठण करण्यात आले आहे.)	नाही	--	नाही	20	कोणतीही प्रक्रिया केली जात नाही. फक्त साठवणुक केली जाते. (फक्त डंम्पीग)
193.	बल्लारपूर नगरपरिषद	होय	31/08/2017	वैध	25	6 टन (कंपोस्टींग)
194.	राजुरा नगरपरिषद	होय	31/12/2013	नाही	7.5	नाही
195.	भद्रावती नगरपरिषद	होय	31/03/2013	नाही	15	9 टन (कंपोस्टींग)
196.	वरोरा नगरपरिषद	होय	31/08/2009	नाही	11	नाही
197.	मुल नगरपरिषद	होय	31/12/2002	नाही	5	नाही
198.	ब्रम्हपुरी नगरपरिषद	नाही	---	नाही	9	नाही
199.	यवतमाळ नगरपरिषद	होय	30/09/2016	होय	28	4 टन (कंपोस्टींग)
200.	वणी नगरपरिषद	होय	31/12/2003	नाही	18	नाही
201.	पुसद नगरपरिषद	होय	31/12/2003	नाही	20	नाही

202.	दिग्रस नगरपरिषद	होय	31/12/2003	नाही	10	नाही
203.	दारव्हा नगरपरिषद	होय	31/12/2003	नाही	5	नाही
204.	उमरखेड नगरपरिषद	होय	31/12/2011	होय	19	नाही
205.	पांढरकवडा नगरपरिषद	होय	31/12/2003	नाही	5	नाही
206.	घाटंजी नगरपरिषद	होय	31/12/2003	नाही	4.5	नाही
207.	मेर-नवाबपुर नगरपरिषद	नाही	---	नाही	8	नाही
208.	गडचिरोली नगरपरिषद	नाही	---	होय	22	6 टन (कंपोस्टींग)
209.	देसाईगंज वडसा नगरपरिषद	होय	28/07/2013	नाही	5	नाही
210.	भंडारा	होय	30/06/2016	होय	30.0	नाही
211.	पवनी	होय	30/06/2015	होय	4.5	होय 1.0
212.	तुमसर	होय	30/06/2016	होय	11.0	नाही
213.	गोंदिया	नाही	--	नाही	40.0	नाही
214.	तिरोडा	नाही	--	नाही	1.8	नाही
215.	चिपळूण नगरपरिषद	होय	31/12/2017	वैध	23	5 मे. टन/प्रतिदिन बायोगॅस
216.	खेड नगरपरिषद	होय	31/12/2008	नाही	07	2.5 मे. टन/प्रतिदिन बायोगॅस
217.	दापोली नगरपंचायत	होय	31/12/2009	नाही	08	5.0 मे. टन/प्रतिदिन बायोगॅस
218.	गुहागर नगरपंचायत	नाही	-	नाही	2.5	-
219.	रत्नागिरी नगरपरिषद	नाही	-	होय	25.0	प्रक्रिया केली जात नाही.
220.	राजापूर नगरपरिषद	होय	31/12/2014	नाही	1.0	प्रक्रिया केली जात नाही.
221.	कणकवली नगरपंचायत	नाही	-	नाही.	5.0	प्रक्रिया केली जात नाही.
222.	सावंतवाडी नगरपरिषद	होय	31/12/2015	होय	6.0	प्रक्रिया केली जात नाही.
223.	वेंगूर्ला नगरपरिषद	होय	31/12/2015	होय	5.0	प्रक्रिया केली जात नाही.
224.	मालवण नगर परिषद	होय	31/12/2014	नाही.	3.5	प्रक्रिया केली जात नाही.
225.	सातारा नगरपालिका	होय	31/12/2019	वैध	40	४ मे.टन कंपोस्टींग
226.	कराड नगरपालिका	होय	31/12/2019	वैध	40	सध्या प्रक्रिया केली जात नाही. प्रकल्प प्रस्तावित आहे.
227.	फलटण नगरपालिका	होय	31/12/2004	होय	14.5	प्रक्रिया केली जात नाही. प्रकल्प प्रस्तावित आहे.
228.	वाई नगरपालिका	होय	31/12/2005	होय	12	५ मे.टन कंपोस्टींग

9.	महाबळेश्वर गिरीस्थान नगरपालिका	होय	31/12/2003	होय	4.5	१.५ मे.टन कंपोटींग
).	पांचगणी गिरीस्थान नगरपालिका	होय	31/12/2003	होय	7.0	2.4 मे.टन मेकॅनिकल कंपोस्टींग
.	रहिमतपूर नगरपालिका	होय	31/12/2003	होय	8.0	प्रक्रिया केली जात नाही.
.	म्हसवड नगरपालिका	होय	31/12/2005	होय	3.0	प्रक्रिया केली जात नाही.
.	मलकापूर नगरपंचायत	नाही	-	होय	8.0	सध्या प्रक्रिया केली जात नाही. प्रकल्प प्रस्तावित आहे.
.	मुरबाड नगरपंचायत	नाही	नाही	नाही	7	नाही
.	शहापूर नगरपंचायत	नाही	नाही	नाही	7	नाही

परिशिष्ट-ब

मंगळवार, दिनांक ३० ऑगस्ट, २०१६

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ३० ऑगस्ट , २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-१० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४-१० वाजता स्थगित झाली.

उपस्थिती

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.तथा समिती प्रमुख

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(५) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(८) डॉ.अनिल बोंडे, वि.स.स.

(९) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(१०) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(११) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१२) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(१३) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(१४) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१५) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(१६) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(१७) श्री. भास्कर जाधव, वि.स.स.

(१८) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्री. शिवराज धुप्पे, उप महालेखाकार

वित्त विभाग :

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव

साक्षीदार :

नगरविकास विभाग :

(१) श्रीमती मनिषा म्हैसकर, सचिव

(२) श्री. संतोष पवार, सदस्य-सचिव, म.जि.प्रा.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालावरील परिच्छेद क्र.४-१ प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-०० वाजता सुरू होऊन दुपारी २-०० वाजता स्थगित झाली.

उपस्थिती

समिती प्रमुख :

(१) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(३) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(८) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(९) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(१०) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार

वित्त विभाग :

श्री. अ.गौ.घाटेनर, उप सचिव

साक्षीदार :

नगरविकास विभाग :

श्रीमती मनिषा म्हैसकर, सचिव

पाणीपुरवठा विभाग :

श्री. संतोष कुमार, सदस्य-सचिव, म.जि.प्रा.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालावरील परिच्छेद क्र. ४.१, प्रधान सचिव, नगरविकास विभाग व सदस्य-सचिव, म.जि.प्रा.यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक १८ जानेवारी, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक १८ जानेवारी, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ५-१५ वाजता स्थगित झाली.

उपस्थिती

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.तथा समिती प्रमुख

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(७) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(८) श्री. सुरेश गोरे, वि.स.स.

(९) श्री. वसंतराव चव्हाण, वि.स.स.

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(११) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार यांचे कार्यालय :

श्री. डी. के. शेखर, महालेखाकार

वित्त विभाग :

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव

साक्षीदार :

पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग :

(१) श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव

(२) श्री. संतोष कुमार, सदस्य-सचिव, म.जि.प्रा.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालावरील परिच्छेद क्र.४.१ संदर्भात प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २८ फेब्रुवारी , २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ५-३० वाजता स्थगित झाली.

उपस्थिती

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.तथा समिती प्रमुख

(२) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(३) श्री. हरिभाऊ जावळे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(६) श्री. वैभव नाईक, वि.स.स.

(७) श्री. संजय दत्त, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार मुंबई

वित्त विभाग :

श्रीमती वंदना कृष्णा, प्रधान सचिव

साक्षीदार :

नगरविकास विभाग :

(१) श्रीमती मनिषा म्हैसकर, प्रधान सचिव

(२) डॉ.पी.अनबलगन, सदस्य-सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालावरील परिच्छेद क्र.४.१ संदर्भात प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांची साक्ष घेतली.

शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७

लोकलेखा समिती

समितीची बैठक शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन दुपारी ३-३० वाजता स्थगित झाली.

उपस्थिती

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.तथा समिती प्रमुख

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) डॉ. अनिल बोंडे, वि.स.स.

(५) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. श्री. चु. श्रीरंगम, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१३-१४ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई